अर्थसंकल्प २०१८ वैशिष्ट्ये ▪ योजना ▪ निर्णय

एप्रिल २०१८/पाने ९२/किंमत ₹१०

# लोकराज्य



## महामानवाला अभिवादन

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१



## " राजकीय लोकशाहीला सामाजिक लोकशाहीचा आधार असल्यावाचून ती कधीही टिकु शकणार नाही "

– डॉ. बाबासाहेब आंबेडकर

### बार्टी च्या विविध शाखांतर्गत राबवले जाणारे अभिनव उपक्रम

**प्रशिक्षण**
* RTI, Atrocity, युवा नेतृत्व व विविध विषयांवर प्रशिक्षणे

**संशोधन**
* विविध जाती वर्गाचे संशोधन

**प्रकाशन व प्रसिध्दी**
* मौलिक ग्रंथाचे विविध समाज घटकांना वितरण उदा. शाळा, महाविद्यालये, शासकीय वसतिगृहे, वाचनालये, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, शासकीय अधिकारी, विविध प्रशिक्षणाचे प्रशिक्षणार्थी इ.

**विदयार्था करिता उपक्रम**
* M. Phill व Ph.D. करीता फेलोशिप कार्यक्रम UPSC आणि IBPS स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन
* JEE, NEET (पदवीपूर्व) व GRE/ TOEFL, GATE, CAT, Custom Broker (पदव्युत्तर), Custom Officer, Income Tax Officer या परीक्षांच्या तयारीसाठी प्रशिक्षण

**Mentoring the Merit**
* अनुसूचित जातीचे ८ ते १५ वयोगटातील विद्यार्थ्यांकरिता सहाय्य

**महाड**
* भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, महाड व पुणे येथे डॉ. बाबासाहेबांच्या विचारांवरील व साहित्यावरील अदयावत ग्रंथालय, दृकश्राव्य कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण, म्युझियम नव्याने सुरु.

**कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम**
* १५ ते ४५ वयोगटातील युवक व युवती करिता कौशल्य विकास प्रशिक्षण व जॉब प्लेसमेंट

**विशेष प्रकल्प**
* असंघटीत अकुशल महिलांसाठी प्रशिक्षण

**विशेष उपक्रम**
* समतादूतां व्दारे समाज प्रबोधन
* सांस्कृतिक कार्यक्रमांचे माध्यमातून समताधिष्ठीत समाज निर्माण करण्याकरीता समाज प्रबोधन

**जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी**
* जात पडताळणी दस्त ऐवजाचे स्कॅनिग व डिजिटायझेशन.
* लवकरच ऑनलाइन जात वैधता प्रमाणपत्र अर्जदारास उपलब्ध करून देणार
* १५ विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांमध्ये वाढ करून राज्यात ३६ जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या कार्यान्वित

जात वैधता मिळणे झाले सोपे

रक्ताच्या नातेवाईकांचे वैधता प्रमाणपत्र ग्राह्य

### * बार्टी यशोगाथा *

* BANRF अधिछात्रवृत्ती अंतर्गत ५६१ विद्यार्थ्यांपैकी ७६ एम.फिल व १६ पी.एच.डी. उत्तीर्ण
* संघ लोकसेवा आयोग - नागरी सेवा परीक्षेत बार्टी पुरस्कृत २९ विद्यार्थ्यांची अधिकारी पदी निवड.
* संघ लोकसेवा आयोग - नागरी सेवा मुख्य परीक्षा - २०१७ मध्ये बार्टी पुरस्कृत ३६ विद्यार्थी उत्तीर्ण.
* महाराष्ट्र लोकसेवा आयोग न्यायीक सेवा परीक्षेत बार्टी पुरस्कृत विद्यार्थ्यांपैकी ७ विद्यार्थ्यांची दिवाणी न्यायाधीश व न्याय दंडाधिकारी वर्ग -१ पदी निवड
* कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या माध्यमातून Train & Employ योजने अंतर्गत ६०% पेक्षा अधिक उमेदवारांना रोजगार संधी तर इंजिनिअरींग क्लस्टरच्या माध्यमातून ८०% पेक्षा अधिक उमेदवारांना रोजगाराची संधी.
* IBPS च्या प्रशिक्षणातून २७४८ विद्यार्थ्यांना नोकरी प्राप्त.



अधिक माहितीसाठी संपर्क- जनसंपर्क अधिकारी- ०२०-२६३४३६००/२६३३३३३०
Website: http://barti.maharashtra.gov.in
www.barti.in | /BARTIConnect | /BARTIConnect

श्री. नरेंद्र मोदी — प्रधानमंत्री
श्री. देवेंद्र फडणवीस — मुख्यमंत्री
श्री. राजकुमार बडोले — मंत्री,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
श्री. दिलीप कांबळे — राज्यमंत्री,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

# अंतरंग

## हक्क, अधिकार आणि दिले आत्मभान १०



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला सक्षमीकरणाचे धोरण महिलांच्या सर्वांगीण विकासाकरिता अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले आहे. भारतीय संविधानाच्या माध्यमातून त्यांनी स्त्रीमुक्तीचा मार्ग अधोरेखित केला.

## राजर्षी शाहू आणि डॉ. आंबेडकर १४



छत्रपती राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन महान विभूतिंनी महाराष्ट्राच्या समाजकारणावर अमीट असा ठसा उमटवला आहे. शाहू महाराजांनी बाबासाहेबांना विविध प्रकारे त्यांच्या शिक्षणासाठी आणि इतर सामाजिक व राजकीय कार्यासाठी फार मोठे साहाय्य केले.

## जलनीतीचे उद्गाते २२



आज पाणी विषयावरील गुंतागुंत कायम आहे. नद्यांच्या पाणी वापराचे, वाटपाचे विषय वारंवार उदभवू शकतात त्यासाठी आंतरराज्यीय व आंतरराष्ट्रीय करार करावे लागतात ते राज्यसरकारे करू शकणार नाहीत. तेव्हा पाणी हा विषय केंद्रीय सरकारच्या अखत्यारीत असणे फार गरजेचे आहे. अशी अत्यंत दूरदृष्टीची भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतली होती.



| | |
|---|---|
| **'सामाजिक परिवर्तनाला दिली नवी दिशा'** (मुलाखत : मधू कांबळे) | ६ |
| **हक्क, अधिकार आणि दिले आत्मभान** (राजकुमार बडोले, सामाजिक न्याय मंत्री) | १० |
| **सर्वांना समान न्याय** (दिलीप कांबळे, सामाजिक न्याय राज्यमंत्री) | १३ |
| **राजर्षी शाहू आणि डॉ. आंबेडकर** (डॉ. जयसिंगराव पवार) | १४ |
| **परिवर्तनाचे अग्रदूत** (डॉ. शैलेंद्र लेंडे) | १८ |
| **जलनीतीचे उद्गाते** (अविनाश आ. चौगुले) | २२ |
| **ऊर्जाशक्तीला चालना** (डॉ. जी.एस.कांबळे) | २५ |
| **उत्कृष्ट संसदपटू आणि शिस्तप्रिय प्रशासक** (डॉ. संभाजी खराट) | २६ |
| **बाबासाहेबांची जयंती कधी आणि कोणी सुरू केली?** | २९ |
| **महामानवाचा स्मृतिगंध** (मिलिंद मानकर) | ३० |
| **ग्रंथकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर** (डॉ. संदेश वाघ) | ३२ |
| **बुद्धिवादाची प्रेरक शक्ती** (प्रा. डॉ. म. सु. पगारे) | ३६ |
| **शिक्षणाची मुहूर्तमेढ** (दत्ता गायकवाड) | ३९ |
| **शांततामय सहजीवनाचे हमीपत्र** (डॉ. अक्रम ह. पठाण) | ४० |
| **महामानवाचा जीवनपट** | ४२ |
| **समतेचा उद्गाता** (प्रा. नागसेन भीमरावजी ताकसांडे) | ४४ |
| **प्रेरणा, ऊर्जा आणि स्फूर्ती देणारी तीर्थस्थळे** (डॉ. बबन जोगदंड) | ४६ |
| **सुरक्षेचा प्रहरी** (डॉ. विजय खरे) | ५१ |
| **नव्या संधी प्रगतीच्या** (विष्णु काकडे) | ५२ |
| **दलित साहित्याचा आधारवड** (यशवंत भंडारे) | ५८ |


**पृष्ठ क्र. ५९-८४**




## शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य; रोजगार निर्मिती व उद्योगास चालना ६०

राज्याचा विकास दर कायम पुढे जाण्याकरिता यंदाच्या महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात अनेक योजनांची आखणी करण्यात आली आहे. भांडवली गुंतवणूक ११.०१ टक्के होण्याकरिता विशेष प्रयत्न केले जातील. कृषी, रस्ते, वीज या क्षेत्रामध्ये भरीव तरतूद करण्यात आली आहे.




| | |
|---|---|
| **उद्योगात आघाडी** | ६४ |
| **बळीराजाचा सन्मान आणि समृद्धी** | ६६ |
| **मुबलक वीज** | ६९ |
| **समृद्धीचे महामार्ग** | ७० |
| **सर्वांची सोबत, सर्वांचा विकास** | ७२ |
| **समर्थ पोलीस यंत्रणा** | ७४ |
| **तरुणांच्या हितासाठी** | ७५ |
| **उत्तम आरोग्य, सुदृढ महिला** | ७६ |
| **साहित्य..संस्कृती..पर्यटन** | ७७ |
| **वन विकास, समृद्धीची कास** | ७९ |
| **स्मार्ट, सुंदर आणि स्वच्छ** | ८० |
| **वेगवान महामुंबई** | ८२ |
| **सक्षम सुप्रशासन** | ८३ |
| **चला, प्लास्टिकबंदी यशस्वी करू या..!** | ८६ |
| **'महामित्र' बनवतील सक्षम, सकारात्मक महाराष्ट्र** | ८८ |
| **येथे कर माझे जुळती...** | ९० |


## चला, प्लास्टिकबंदी यशस्वी करू या..! ८६



प्लास्टिकचा मोठ्या प्रमाणावर अनिर्बंध स्वरूपात वापर होत असल्यामुळे विविध समस्या निर्माण झाल्या आहेत. या बाबी लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने राज्यात संपूर्ण प्लास्टिक बंदी करण्याचा निर्णय घेतला आहे.

वर्ष ६९ वे | अंक १० | एप्रिल २०१८

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संपादक मंडळ — अजय अंबेकर, शिवाजी मानकर
- संपादक — सुरेश वांदिले
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर
- प्रशासन अधिकारी — मीनल जोगळेकर
- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- वितरण सहायक — अश्विनी पुजारी
- साहाय्य — स्वप्नाली जाधव, भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, स्मिता चापके
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा. लि. महापे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारण: ०२२ - २२८१८३१२
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.

# अलौकिक ग्रंथप्रेम

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अलौकिक ग्रंथप्रेम प्रसिद्ध आहे. बाबासाहेब म्हणजे ज्ञानोपासना व ग्रंथ वाङ्मयाचे, प्रगाढ अभ्यासकाचे प्रतीक. बाबासाहेबांनी आपल्या जीवनात पुस्तकांइतका आदर, प्रेम कुणावरही केले नसेल! 'ग्रंथ हेच माझे गुरू, सखे, सोबती अन् नातेवाईक आहेत. माझी जीवन प्रेरणा, धारणा आणि साधना आहेत' अशी त्यांची दृढ निष्ठा होती. बाबासाहेबांनी विद्यार्थी जीवनात इंग्लंडमधील ब्रिटिश लायब्ररीत जाऊन प्रसंगी उपाशी, अर्धपोटी राहून जी अखंड ज्ञानोपासना केली त्याचे त्या म्युझियममधल्या वृद्ध कारभाऱ्यांना आजही स्मरण आहे. बाबासाहेब म्हणायचे, 'ब्रिटिश म्युझियमचा जर कोणी जास्तीत जास्त उपयोग करून घेतला असेल तर तो मी आहे.'

उच्चविद्याविभूषित होऊन बाबासाहेब मायदेशी परतले. पण समाजसेवेचे व्रत त्यांनी सोडले नाही. सभा, आंदोलने, अन्याय-अत्याचार विरोधातील लढा, कौटुंबिक जबाबदारी सांभाळून त्यांनी भारतातील अनेक वाचनालयांना, बुक डेपोंना भेटी दिल्या. बाबासाहेबांनी भेट दिलेली राजवाडे संशोधन संस्था धुळे, दीनबंधू डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय नाशिक रोड, सर्व्हन्टस सोसायटी ऑफ लायब्ररी पुणे, मुधोजी मनमोहन राजवाडा फलटण आणि राष्ट्रीय पुस्तकालय कोलकाता ही प्रमुख वाचनालये आहेत.



## राजवाडे संशोधन संस्था

इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांनी धुळे शहरात इतिहास संशोधनाचे अपूर्व कार्य केले. संशोधन संस्था स्थापन केली. बाबासाहेबांनी या संशोधन संस्थेला भेट दिली होती. 'राजवाडे संशोधन मंडळातील पांडुलिपी आणि पेंटिंग बघून खूप आनंद झाल्याचा अभिप्राय नोंदविला. पाश्चिमात्य लायब्ररीशी तुलना करता ही अर्थातच फार लहान आहे. सरकारने अशा संस्थांकडे योग्य लक्ष द्यावे अशी आशा व्यक्त केली.

## सर्व्हन्टस् ऑफ इंडिया सोसायटी लायब्ररी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९३९ साली लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सदस्य होते. त्या वेळी त्यांचे पुणे शहरात सहा महिने वास्तव्य होते. या वास्तव्याच्या काळात बाबासाहेबांनी थोर देशभक्त गोपाळकृष्ण गोखले यांच्या 'सर्व्हन्टस् ऑफ इंडिया सोसायटी लायब्ररी'त अभ्यास केला होता.

## राष्ट्रीय पुस्तकालय

कोलकाता येथील 'नॅशनल लायब्ररी' ही देशातील सर्वात मोठी लायब्ररी आहे. या लायब्ररीत तीस लाख ग्रंथ आणि दहा लाखांपेक्षा जास्त ऐतिहासिक दस्तऐवजांचा खजिना आहे. स्वातंत्र्यानंतर याचे नाव बदलवून 'राष्ट्रीय पुस्तकालय' ठेवण्यात आले. कायदेमंत्री असताना बाबासाहेबांनी या वाचनालयाला भेट दिली होती. एका दुर्मीळ पुस्तकाच्या शोधात ते आले होते. त्यांना पी. लक्ष्मी नरसू लिखित 'इन्सेन्स ऑफ बुद्धिझम' नावाचा ग्रंथ हवा होता. लायब्ररीच्या तळमजल्यावर तो मिळाला. स्वच्छतेची तमा न बाळगता तत्क्षणीच ते खाली बसले आणि संपूर्ण ग्रंथ वाचून काढला.

# असामान्य, अद्वितीय



सामाजिक न्याय आणि विशेष साहाय्य मंत्री

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशातील गरीब, दलित, पीडित, महिला, कामगार आणि सर्व वंचित घटकांना न्याय, हक्क आणि अधिकार मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले, त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. हे अद्वितीय आणि क्रांतिकारक कार्य करणाऱ्या या महामानवाच्या देशात आपला जन्म झाला, ही सर्वांसाठी अभिमानाची बाब ठरते.

बाबासाहेब हे लोकोत्तर नेते आणि प्रकांडपंडित होते. या देशाने सर्वांगीण प्रगती करावी, विकास करावा आणि त्याची फळे तळागाळांतील सर्व घटकांना मिळावीत, यासाठी ते अखेरच्या श्वासापर्यंत झटले. या घटकांना आत्मसन्मान आणि आत्मभान त्यांनी मिळवून दिला. नव्या आत्मविश्वासाने हे घटक आज सर्व क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने तळपत आहेत.



शतकानुशतके झालेल्या अन्याय, अत्याचाराचे रडगाणे न गाता हे समाजघटक देशउभारणी आणि देशाच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलत आहेत. या देशाला जगातील शक्तिमान आणि संपन्न राष्ट्र बनवायचे असेल तर त्यासाठी, समाजातील सर्व घटकांना समान संधी मिळाली तरच ते शक्य होईल ही बाब द्रष्ट्या बाबासाहेबांनी सर्वात आधी ओळखली होती. त्यामुळेच त्यांनी आपली सर्व विद्वत्ता भारतीय घटना तयार करताना पणास लावली आणि जगातील सर्वश्रेष्ठ अशा घटनेचा जन्म झाला. भारतीय घटनेने न्याय, बंधुता, समानता या तत्त्वांना अंगीकारत सर्व घटकांच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग मोकळा करून दिला. भारतीय राज्य घटनेने आपली लोकशाही अधिक बकळट, सक्षम आणि समर्थ केली आहे. त्यामुळे भारतीय जनता सामर्थ्यवान ठरली आहे.

बाबासाहेबांच्या सर्वसमावेशक विचारांचे पावित्र्य राखत, आमच्या सरकारने मागील साडेतीन वर्षात वंचित घटकांसाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले व त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली आहे. यामध्ये मुलामुलींच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, राहण्यासाठी वसतिगृह, देशातील आणि परदेशातील उत्कृष्ट शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना साहाय्य, रोजगार आणि स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी साहाय्य, रमाई घरकूल योजना, ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवल्या जात आहेत. व्यसनमुक्तीसाठी अत्यंत प्रभावीरीत्या आम्ही काम करत आहोत. व्यसनमुक्तीसाठी साहित्य संमेलनासारखी अभिनव संकल्पना संबंध देशात पहिल्यांदाच राबवली जात आहे. बाबासाहेबांच्या वास्तव्याने पुनीत झालेली लंडन येथील वास्तू आम्ही विकत घेतली असून, त्या ठिकाणी बाबासाहेबांचे चिरस्फूर्ती देणारे स्मारक उभारणार आहोत. इंदू मिल येथे बाबासाहेबांचे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या भव्य स्मारकाचे काम सुरू झाले आहे. पुढील तीन वर्षात हे काम पूर्णत्वास जाईल. यंदाच्या अर्थसंकल्पात यासाठी १५० कोटी रुपयांची तरतूद आम्ही केली आहे. दीक्षाभूमी आणि चैत्यभूमीला 'अ' श्रेणीच्या पर्यटन स्थळाचा दर्जा दिला आहे.

केंद्र सरकार पंचतीर्थ म्हणून महू, आंबडवे, दिल्लीतील अलिपूर रोड स्थित बाबासाहेबांचे निवासस्थान, इंदू मिल आणि लंडन येथील बाबासाहेबांनी वास्तव्य केलेले ठिकाण या स्थळांचा विकास करणार आहे. ही तीर्थस्थळे आधुनिक भारताला सतत प्रेरणा आणि ऊर्जा देतील.

या आणि इतर अनेक बाबींचा ऊहापोह आम्ही लोकराज्य एप्रिलच्या विशेषांकात केला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२७व्या जयंतीनिमित्त हा विशेष अंक प्रकाशित करत आहोत. बाबासाहेबांच्या जीवनाचे विविध पैलू दर्शवणारे मान्यवर, तज्ज्ञांचे लेख या अंकात समाविष्ट केले आहेत. यंदाच्या अर्थसंकल्पाचा विस्तृत आढावा, हेही या अंकाचे वैशिष्ट्य आहे. हा अंक आपणास आवडेल, असा विश्वास वाटतो.

हा अंक छपाईला जात असतानाच, ज्येष्ठ दलित साहित्यिक आणि आंबेडकरी चळवळीला मोलाचे वैचारिक अधिष्ठान देणाऱ्या डॉ. गंगाधर पानतावणे यांचे निधन झाल्याचे वृत्त आले. त्यांच्या निधनामुळे दलित साहित्य, संस्कृती आणि आंबेडकरी चळवळीचे कधीही न भरून निघणारे नुकसान झाले आहे. महाराष्ट्र शासन आणि माझ्यातर्फे त्यांना विनम्र अभिवादन.

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीस कोटीकोटी प्रणाम!

**राजकुमार बडोले**
**(अतिथी संपादक)**



**सामाजिक न्याय विभागामार्फत गेल्या साडेतीन वर्षांमध्ये अनेक महत्त्वाच्या योजना राबवण्यात आल्या. निर्णय घेण्यात आले. समाजातील वंचित घटकांना न्याय देण्यासाठी अत्यंत प्रभावीपणे काम करण्यात येत आहे. याविषयी सांगताहेत सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री राजकुमार बडोले.**
**ही मुलाखत ज्येष्ठ पत्रकार मधू कांबळे यांनी घेतली आहे.**

# 'सामाजिक परिवर्तनाला दिली नवी दिशा'

**राजकीय सत्तेच्या माध्यमातून समाजातील वंचित, उपेक्षित वर्गाचा आर्थिक, शैक्षणिक आणि पर्यायाने सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी सामाजिक न्याय विभागाची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. त्यामुळे या खात्याचे मंत्री होणे यालाही एक महत्त्व व प्रतिष्ठा आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक न्याय मंत्री होण्याची संधी आपणास मिळाली, त्या वेळी आपल्या काय भावना होत्या?**

मी मंत्री होईन असे कधी मला वाटले नव्हते. त्यातही कॅबिनेट मंत्रिपद मिळाले, मला त्या वेळी आश्चर्याचाच धक्का बसला. चांगले काम केल्याचे फळ मिळाले. तो क्षण सुखावणारा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच मी मंत्री झालो. त्यांनी या देशात सामाजिक क्रांती घडवली. त्याची फळे आम्हाला आज मिळत आहेत.

**सामाजिक न्याय खात्याचा पदभार स्वीकारल्यानंतर आपण, पुढे कसे जायचे, काय विचार केला?**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्यायाची परिपूर्ण कल्पना मांडली. महात्मा जोतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून प्रेरणा घेऊन आपणास मिळालेल्या मंत्रिपदाच्या माध्यमातून उपेक्षित, वंचित, आदिवासी, मागास समाजासाठी काम करण्याचे ठरवले. हा समाज जोपर्यंत विकासाच्या मुख्य प्रवाहात येत नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थाने सामाजिक न्यायाची संकल्पना प्रत्यक्षात येणार नाही. समाजात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक समानता निर्माण करणे ही संकल्पना सामाजिक न्यायामध्ये येते. विमुक्त जाती, भटक्या जमाती, अनुसूचित जाती, हा मागासलेला समाज आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या पुढे जात नाही, तोपर्यंत त्यांना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होणार नाही. या समाजाची विपन्नावस्था आहे. जमीन नाही, घर नाही, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. सामाजिक न्यायाच्या विविध योजनांच्या माध्यमातून या समाजासाठी काही करता येईल का? याचा आढावा घेतला. समता, स्वातंत्र्य, बंधुभाव या बाबासाहेबांच्या विचारातून मी या योजनांकडे पाहत आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला.

**सामाजिक न्याय विभागाच्या काही योजना जुन्या व कालबाह्य झाल्या आहेत. त्याचा काही आढावा आपण घेतला का? उदाहरणार्थ दलित वस्ती सुधारणा यासारख्या योजना किती काळ चालवणार?**

अनुसूचित जाती वर्गाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात विभागासाठी आर्थिक तरतूद केली जाते. अर्थसंकल्पातील तरतूद बघून योजना सुरू केल्या. परंतु त्यात काही त्रुटी आढळल्या, त्या दूर करणे, तसेच काही नवीन योजना सुरू करण्याचे ठरवले. या योजनांच्या माध्यमातून समाजाला आर्थिक फायदा होतो का याचाही आढावा घेतला. उदाहरणार्थ कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेचा आढावा घेतला असता, भूमिहीनांना जमीन घेण्यासाठी एका एकरासाठी सरकार अडीच लाख रुपये अनुदान देते. एवढ्या किमतीत एक एकर जमीन कुठेही मिळत नाही. अनुसूचित जाती व बौद्ध समाजातील ९१ टक्के कुटुंबे भूमिहीन आहेत. त्यांना या याजनेच्या माध्यमातून आपण कसे न्याय देणार. या योजनेत बदल करण्याचे ठरवले आहे. एकरी चार ते आठ लाख रुपये अनुदान देण्याचा विचार आहे. आणखी काही पर्यायांचा विचार चालू आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याला मान्यता दिली आहे. मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर सुधारित स्वरूपातील ही योजना जाहीर केली जाईल.

या योजनेंतर्गत आतापर्यंत पाच हजार कुटुंबांना जमिनी देण्यात आल्या आहेत. त्यांना विहिरी व सिंचन व्यवस्था करून द्यायची आहे.

**उच्च शिक्षणासाठी शहरांत येणाऱ्या विद्यार्थ्यांची निवासाची अडचण असते. शासकीय वसतिगृहे अपुरी पडत आहेत. त्याबाबत आपण काय उपाययोजना केली आहे?**

संख्या वाढत आहे. त्याचा विचार करून वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना शहराच्या श्रेणीप्रमाणे वर्षाला ४५ ते ६० हजार रुपये रोख देण्याचा राज्य सरकारने निर्णय घेतला आहे. तीन-चार विद्यार्थी मिळून शहरात भाड्याने खोली घेऊन राहू शकतात. या योजनेचा लाभ दर वर्षाला सुमारे २५ लाख मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळेल, असा मला विश्वास आहे.

**अनुसूचित जाती वर्गाच्या निधीचे संरक्षण व्हावे, हा निधी दुसरीकडे वळवला जाऊ नये, यासाठी खास कायदा करण्याचा प्रस्ताव होता, त्याचे काय झाले?**

कर्नाटक, आंध्र प्रदेश, ओडिसा इत्यादी राज्यांनी तसा कायदा केला आहे. सामाजिक न्याय विभागानेही तसा मसुदा तयार केला आहे. मात्र सध्या अनुसूचित जाती वर्गाच्या निधीला संरक्षण आहे. ग्रामपंचायत, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा आणि राज्यस्तरावर समित्या आहेत. राज्यस्तरावर मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली परिषद आहे. सामाजिक न्याय विभाग समन्वयाची भूमिका पार पाडत आहे. परंतु कायदा करण्याचा विचार कायम आहे. मुख्यमंत्र्यांची भूमिका सकारात्मक आहे. त्यामुळे हा कायदा होईल, अशी अपेक्षा आहे.

**आंतरजातीय विवाह कायदा आणि बौद्ध विवाह कायदा करण्याचे आपण जाहीर केले आहे. त्याबद्दल काय सांगाल?**

स्वतंत्र बौद्ध विवाह कायद्याचा मसुदा तयार झाला आहे. आंतरजातीय विवाह कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी मसुदा समिती स्थापन करण्यात आली आहे. जाती व्यवस्था निर्मूलनाचा आंतरजातीय विवाह हा प्रभावी उपाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितला आहे.

छत्रपती शाहू महाराजांनी तर त्यांच्या संस्थानात तसा कायदा केला होता. जाती निर्मूलन करून एकजिनसी समाज निर्माण करण्यासाठी, म्हणजेच सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अनुसरून राज्यात आंतरजातीय विवाह कायदा करण्यास राज्य शासन कटिबद्ध आहे.

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणात्मक मार्गदर्शनानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सर्वांगीण विकासाचा विशाल दृष्टिकोन व मार्गदर्शक नेतृत्वाखाली सामाजिक न्याय विभागाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय राबवले आहेत. त्यापैकी निवडक निर्णयांची माहिती..**



# निर्णय आणि निर्धार

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५व्या जयंती वर्षानिमित्त घेतलेले निर्णय**

- सामाजिक न्याय व समता वर्षानिमित्त संपूर्ण राज्यभर 'दूत समतेचा जागर महामानवाचा' या अभियानांतर्गत विविध सांस्कृतिक व सामाजिक प्रबोधनाचे कार्यक्रम करण्यात आले.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडित एकूण ५० घटनास्थळांचा विकास करण्याचा निर्णय त्यापैकी २८ घटनास्थळांना निधी वितरित.
- राज्यात ५० ठिकाणी नवीन मुलींचे वसतिगृह सुरू. जिल्ह्याच्या ठिकाणी २५० मुलींसाठी व तालुक्याच्या ठिकाणी १०० मुलींसाठी वसतिगृह सुरू.
- मुंबई, नागपूर, औरंगाबाद येथे अनुसूचित जातीच्या काम करणाऱ्या महिलांकरिता प्रत्येकी १०० महिला क्षमतेचे वसतिगृह सुरू.
- १४ एप्रिल, २०१६ रोजी मुंबई विद्यापीठ येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जागतिक विचार परिषद या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन. जगातील अनेक विचारवंतांचा सहभाग.
- शासन निर्णय ९ ऑक्टोबर, २०१५ अन्वये निवडक १२५ अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्तींचा सर्वंकष विकास करण्याचा निर्णय. ➢ ३० अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्तींची निवड. आराखडे मंजूर करण्याची कार्यवाही सुरू.
- केंद्र शासनाने स्थापन केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनच्या धर्तीवर महाराष्ट्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठानची स्थापना. समता प्रतिष्ठानचे उद्दिष्ट- अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती व समाजातील इतर दुर्बल घटक,विशेषत: ज्या विभागात अशिक्षितांचे प्रमाण जास्त आहे, अशा भागात उत्तम प्रतीचे शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण मिळावे या उद्देशाने वाचनालय, अभ्यास कक्ष, संशोधन संस्था, शैक्षणिक केंद्रे, इ.ची स्थापना करणे. तसेच या घटकांच्या उन्नतीसाठी योजना तयार करून, त्यांची अंमलबजावणी करणे. सामान्यांसह समाजातील



### डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना

अनुसूचित जातीचे विद्यार्थी वसतिगृहात प्रवेश न मिळाल्याने शिक्षणापासून वंचित राहू नये या करिता डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना लागू. या योजनेंतर्गत १० वी नंतरच्या अभ्यासक्रमांना तसेच १२ वी नंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना जिल्हास्तरावर वार्षिक ४८,०००/- व शहरी भागात ६०,०००/- इतके अनुदान देण्याचा निर्णय. २०१६-१७ मध्ये ७११० विद्यार्थ्यांना याचा लाभ. २०१७-१८ मध्ये २५,००० विद्यार्थ्यांना लाभ देण्यात येणार आहे.

दुर्बल घटकांसाठी त्यांची जात, धर्म, वंश, व पंथ विचारात न घेता, त्यांचे कल्याण व विकासासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लिखाण व भाषणे आणि त्यांच्या जीवनावर चलचित्राची निर्मिती करणे.

### दिव्यांगांना दिलासा

- अपंग विद्यार्थ्यांच्या आश्रम शाळांना अनुदान देण्याचा अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन एकूण १२३ आश्रम शाळांना अनुदानित करण्याचा निर्णय. त्यामुळे अपंग विद्यार्थ्यांना परिपोषण अनुदान व शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांना वेतन श्रेणी सुरू.
- दृष्टिहीन, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित झालेल्या व्यक्ती लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेसाठी लेखनिक पुरवण्याची कार्यवाही.
- अपंग-अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक साहाय्याची योजना कार्यान्वित.
- अपंग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या धर्तीवर सुधारणा.
- सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत शासकीय/अनुदानित वसतिगृह, शासकीय/अनुदानित आश्रमशाळा, अपंगासाठीच्या विशेष शाळा/कार्यशाळा, विमुक्त जाती भटक्या जमाती आश्रमशाळांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचे आधार ओळखपत्र तयार करण्याची कार्यवाही.
- महिला व बाल विकास विभागाकडून सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरित झालेल्या अनुदानित मतिमंद बालगृह संलग्नित अपंग शाळा/कर्मशाळेसाठी पदे मंजूर.



- राज्य समन्वय समितीवरील अशासकीय सदस्यांची नियुक्ती.
- जन्ममृत्यू नोंदणीप्रमाणे शहरातील अपंगांची नोंद महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायतीमध्ये करण्याबाबत आदेश.
- अपंगाच्या विशेष शाळा/कर्मशाळांचा दर्जा सुधारण्यासाठी जिल्हास्तरीय नियंत्रण समिती.
- धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थीबहुल शासनमान्य खासगी अनुदानित/विना अनुदानित/कायम विनाअनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी-सुविधा पुरवण्यासाठी अनुदान योजनेमध्ये सकारात्मक बदल.
- स्थानिक स्वराज्य संस्थाकडून व्यक्तींसाठी राखीव ठेवण्यात येणाऱ्या ३ टक्के निधीचे नियंत्रण करण्याकरिता जिल्हा/तालुकास्तरांवर समिती.
- जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी त्यांच्या स्वउत्पन्नाच्या ३ टक्के निधीतून द्यावयाच्या अपंग कल्याणासाठी योजना राबवण्याचे निर्देश.
- खासगी अनुदानित व विनाअनुदानित अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांमधील सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबीयास अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्याबाबत निर्देश.
- रमाई आवास घरकूल योजनेंतर्गत लाभार्थ्यांसाठी असलेली दारिद्र्यरेषेखालील असण्याची अट अपंग लाभार्थ्यांसाठी शिथिल.

### शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत उत्पन्न मर्यादेत वाढ

- शासन मान्यता प्राप्त खासगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती योजनेंतर्गत विद्यार्थ्यांच्या पालकाची वार्षिक उत्पन्न मर्यादा रूपये ४.५० लक्ष वरून रूपये ६ लक्ष करण्याचा निर्णय २० ऑगस्ट २०१६ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे ५९,३१८ विद्यार्थ्यांना २०१६-१७ मध्ये लाभ मिळू शकला.

### विशेष घटक योजनेत आमूलाग्र बदल

- जिल्हास्तरीय नियोजन समितीला देण्यात येणाऱ्या विशेष घटक योजनेच्या निधीमध्ये ३% निधी हा नावीन्यपूर्ण योजनेसाठी राखून ठेवण्याचा निर्णय. ➢ २०१७-१८ च्या अर्थसंकल्पाद्वारे प्रत्येक जिल्ह्याचे विशेष घटक योजनांचे स्वतंत्र अर्थसंकल्प सादर.
- विशेष घटक योजनेच्या जिल्हास्तरीय योजनांच्या निधी मंजुरीकरिता प्रशासकीय मान्यतेचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान. त्यामुळे विकेंद्रीकरण झाले. पुनर्विनियोजनाचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान केल्याने प्रशासकीय विलंब कमी झाला.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी, पुणे)चे उपक्रम

- बार्टी मार्फत राबवण्यात येणाऱ्या कौशल्य विकासाच्या उपक्रमांमध्ये गेल्या साडेतीन वर्षात १७,९२६ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले. ११,६९२ इतक्या प्रशिक्षणार्थींनी कौशल्य विकास प्रशिक्षण पूर्ण केले. त्यापैकी १०,५७२ प्रशिक्षणार्थींना रोजगार मिळाला.




- औरंगाबाद, पुणे, नागपूर येथे अनुसूचित जाती प्रवर्गातील ५० स्पर्धा परीक्षार्थींसाठी मोफत निवासी यूपीएससी प्रशिक्षण केंद्र.
- देशातील नामवंत अशा साईराम, वाजीराम सारख्या नामांकित यूपीएससी प्रशिक्षण केंद्रात मागील ३ वर्षापासून ५० विद्यार्थी प्रशिक्षणासाठी पाठवण्यात येत आहेत. २०१६ च्या यूपीएससी परीक्षेमध्ये १४ विद्यार्थी अंतिम परीक्षेत उत्तीर्ण. २०१७ च्या प्राथमिक परीक्षेमध्ये ५५ विद्यार्थी उत्तीर्ण. ➢ अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना एमफिल आणि पीएच.डी या पदव्या मिळवण्याकरिता डॉ.बाबासाहेब आंबेडकर फेलोशीप ॲवॉर्ड योजना सुरू केली असून २०१५ साली २०१ विद्यार्थी व २०१६ साली १२५ विद्यार्थ्यांची निवड.
- अनुसूचित जाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील व्यक्तिंकरिता जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत पूर्वी १५ जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यरत होत्या. २ मार्च, २०१५ च्या शासन निर्णयानुसार ३६ जिल्ह्यांत जात प्रमाणपत्र पडताळणी समिती गठित. त्यामुळे राज्यातील नागरिकांना जात प्रमाणपत्र पडताळणी करणे सुलभ. ➢ डॉ.बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनच्या धर्तीवर 'महामानव की जयंती उत्सव मनाना' ही नवी योजना सुरू. त्या निमित्ताने १० मे, २०१७ रोजी गेट वे ऑफ इंडिया येथे विश्व शांती परिषदेचे आयोजन.

### ठळक नोंदी



- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे लंडन येथे १९२० ते १९२२ या कालावधीमध्ये शिक्षण घेत असताना वास्तव्यास असलेले लंडन येथील निवासस्थान महाराष्ट्र शासनाने स्मारकासाठी विकत घेतले. या निवासस्थानाचे घरमालक यांनी घर लिलावास विक्रीस काढले असता शासनाच्या ही बाब निदर्शनास येताच त्वरित पावले उचलून; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बाबासाहेबांचे घर घेण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांना पुढील कार्यवाही करण्याची जबाबदारी दिली. त्यांनी ही कामगिरी यशस्वीपणे पार पाडली. ही वास्तू महाराष्ट्र शासनाने विकत घेण्याची संपूर्ण प्रक्रिया पार पाडली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लंडन येथील प्रस्तावित स्मारकास भेट देऊन लोकार्पण केले. इमारत दुरुस्ती व सुशोभीकरण तसेच स्मारक उभारण्यासंदर्भात पुढील कार्यवाही सुरू आहे. लवकरच आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक लंडन येथे उभारण्यात येत आहे.
- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिल येथील आंतरराष्ट्रीय स्मारकासंदर्भात आंबेडकरी अनुयायांचे काही आक्षेप व सूचना असल्याने सर्वमान्य आराखडा व्हावा या अनुषंगाने, मुख्यमंत्र्यांनी श्री.बडोले यांच्या अध्यक्षतेखाली एकसदस्यीय समिती गठित केली. त्यांनी सर्व संबंधितांसमवेत बैठका आयोजित करून त्यांचे विचार लक्षात घेतले. सर्वांची सहमती होईल, असा सर्वमान्य आराखडा तयार करून यशस्वी करण्यात ते यशस्वी झाले. हा आराखडा मुख्यमंत्र्यांकडे सोपवण्यात आला आहे. इंदू मिल स्मारकासंदर्भात जागेच्या अडचणी दूर झाल्या आहेत. अंतिम आराखडा तयार झाला आहे. आवश्यक परवानग्या मिळाल्या आहे. त्यामुळे लवकरच स्मारकाचे बांधकाम सुरू होणार आहे. ही महाराष्ट्र शासनाची ही मोठी उपलब्धी असून सर्व आंबेडकरी अनुयायांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली आहे.
- दिव्यांगांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र राज्य अपंग व वित्त विकास महामंडळ कटिबद्ध असून २०१६-१७ चा देशातील सर्वोत्कृष्ट कार्यासाठी राष्ट्रपती पुरस्कार महाराष्ट्र अपंग व वित्त विकास महामंडळास मिळाला. या पुरस्कारामुळे महामंडळाची जबाबदारी वाढली असून, अजून जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे. यापुढेही दिव्यांगाच्या कल्याणासाठी व सर्वांगीण विकासासाठी अशाच प्रकारे सक्षमपणे कार्य करण्यात येईल.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिला सक्षमीकरणासाठी केलेले प्रयत्न सर्वात महत्त्वाचे व ऐतिहासिक ठरतात.

# हक्क, अधिकार आणि दिले आत्मभान

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला सक्षमीकरणाचे धोरण महिलांच्या सर्वांगीण विकासाकरिता अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले आहे. त्यांनी महिलांना समाजात सन्मानाचे स्थान प्राप्त व्हावे व त्या सक्षम व समर्थ व्हाव्यात याकरिता कृतिकार्यक्रमाची रचना केली. भारतीय संविधानाच्या माध्यमातून त्यांनी स्त्रीमुक्तीचा मार्ग अधोरेखित केला.**

**राजकुमार बडोले,** सामाजिक न्याय मंत्री

## हिंदू कोडबिल

९ एप्रिल १९४८ रोजी भारताचे कायदेमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली २० जणांची सिलेक्ट कमिटी नेमण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाचा मसुदा तयार करून संसदेसमोर मांडला. त्यात १३९ कलमे व (१) परिशिष्टे होती. हिंदू कोड बिलामुळे स्त्रियांना दत्तक विधान, विवाह विच्छेद, घटस्फोट, घटस्फोटाचा अधिकार, वारसा अधिकार व पोटगी यांचा अधिकार प्राप्त झाला. संपूर्ण हिंदू कोड बनवण्याच्या संदर्भात जे धैर्य, राव कमिटी दाखवू शकली नाही ते काम डॉ. आंबेडकरांनी केले व १२ ऑगस्ट १९४८ ला डॉ. आंबेडकरांनी हिंदू कोड बिल कायदे मंडळापुढे सादर केले. हे बिल भारत सरकारच्या २९ ऑगस्ट, १९४८ रोजी प्रसिद्ध झालेल्या गॅझेटच्या ४८९ व

५५० या पृष्ठांवर प्रसिद्ध करण्यात आले आहे.

२४ फेब्रुवारी, १९४९ला भारत सरकारतर्फे डॉ. आंबेडकरांनी बिलाच्या स्वरूपात हिंदू कोड बिल मांडले. परंपरांवर आधारित सामाजिक असमानता, भेदभाव, क्रूर चालीरिती आणि विषम सामाजिक नियमांचे उच्चाटन करणे हा या बिलाचा मुख्य उद्देश होता. हिंदू कोड बिलानुसार खालील सुधारणा अपेक्षित होत्या.

■ **विवाह** – या बिलानुसार शास्त्रोक्त विवाह आणि सिव्हिल विवाह असे दोन विवाह मानण्यात आले. रजिस्टर सिव्हिल विवाहामध्ये सपिंडीत समानतेच्यामुळे कोणतीही अडचण मानली गेली नाही. वधूवराचे वर्ण व उपवर्ण आणि गोत्र असा भेदभाव विवाह करताना करण्यात येऊ नये असे मत या बिलाने मानले.

■ **विवाह विच्छेद** – या बिलांतर्गत वधू आणि वरांना कोर्टातून विवाह विच्छेद मान्य करून घेण्याचा अधिकार देण्यात आला. बिलामध्ये अशी व्यवस्था करण्यात आली होती की, विवाह कोर्टातून अवैध घोषित केला तरीदेखील विवाह अवैधतेचा वैधमूल्यावर कोणताही प्रभाव पडणार नाही आणि त्यांना वैध मानण्यात येईल.

■ **घटस्फोट** – या बिलांतर्गत पुढील सात कारणांद्वारे घटस्फोट दिला जाऊ शकत होता. १) परित्याग, २) धर्मपरिवर्तन, ३) अंगवस्त्र ठेवणे किंवा अंगवस्त्र बनणे. ४) असाध्य उन्माद भय ५) भयंकर आणि असाध्य कुष्ठरोग ६) संक्रमक गुप्तरोग ७) क्रूरतापूर्वक व्यवहार.

या बिलाने स्त्री व पुरुषांच्या प्रतिमा सादर करण्याच्या घटस्फोटाच्या प्रक्रियेत कायदेशीर मान्यता सुचवली.

■ **दत्तक** – दत्तक घेण्याच्या संदर्भात या बिलामध्ये स्त्रियांना दत्तक घेण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले.

■ **संपत्तीत अधिकारी** – पालकाच्या संपत्तीत स्त्रीला संपत्ती संबंधित अधिकार बहाल करण्यात आले.

## संविधानातील स्त्रियांकरिता संरक्षणात्मक तरतुदी

भारतीय संविधानातील अनुसूची १४,१५,१५ (३), १६,३९ (अ),३९ (ब), ३९ (क) आणि ४२ मध्ये स्त्रियांकरीता महत्त्वाच्या तरतुदी नमूद करण्यात आल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे होत.

### अनुसूची १४ : कायद्यापुढे समानता

राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे समान संरक्षण नाकारणार नाही.

### अनुसूची १५ : धर्म, वंश, जात, लिंग, किंवा जन्मस्थान या कारणांवरून भेदभाव करण्यास मनाई

१) राज्य केवळ धर्म, वंश, जात, लिंग, किंवा जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशा प्रकारे भेदभाव करणार नाही. २) केवळ धर्म, वंश, जात, लिंग, किंवा जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणताही नागरिक :क) दुकाने, सार्वजनिक उपहारगृह, हॉटेल आणि सार्वजनिक करमणुकीचे स्थान यात प्रवेश, अथवा ख) पूर्णत: किंवा अंशत: राज्याच्या पैशाने राखलेल्या अथवा सर्वसाधारण जनतेच्या उपयोगाकरिता समर्पित अशा विहिरी, तलाव, स्नानघाट, रस्ते आणि सार्वजनिक राबत्याच्या जागा यांचा वापर, याविषयी कोणतीही नि:समर्थता, दायित्व, निर्बंध किंवा शर्त यांच्या अधीन असणार नाही. ३) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, स्त्रिया व बालके यांच्याकरता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

### अनुसूची १६ : सार्वजनिक सेवायोजनांच्या बाबींमध्ये समान संधी

■ राज्याच्या अखत्यारीतील सेवायोजना किंवा कोणत्याही पदावरील नियुक्ती यासंबंधीच्या बाबींमध्ये सर्व नागरिकांस समान संधी असेल. ■ कोणताही नागरिक केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्मस्थान, निवास या किंवा यापैकी कोणत्याही कारणांवरून राज्याच्या अखत्यारीतील कोणतीही नोकरी किंवा पद यांच्याकरता अपात्र असणार नाही अथवा त्यांच्या बाबतीत प्रतिकूल असा भेदभाव केला जाणार नाही.

### अनुसूची १९ : भाषण स्वातंत्र्य व इतर अधिकारांचे संरक्षण

(१) सर्व नागरिकांस – क) भाषण व अभिव्यक्ती यांच्या स्वातंत्र्याचा, ख) शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याचा, ग) अधिसंघ वा संघ बनवण्याचा, घ) भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचा, ड) भारताच्या राज्यक्षेत्राच्या कोणत्याही भागात राहण्याचा व स्थायिक होण्याचा आणि (च) कोणताही पेशा आचरण्याचा अथवा कोणताही अथवा कोणताही व्यवसाय, उदीम किंवा धंदा करण्याचा अधिकार असेल.

### अनुसूची २३ : माणसांचा अपव्यापार आणि वेठ यांना मनाई

(१) माणसांचा अपव्यापार आणि बिगार व त्यासारख्या अन्य स्वरूपातील वेठ यांना मनाई करण्यात आली. या तरतुदीचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल. (२) सार्वजनिक प्रयोजनाकरिता सक्तीने सेवा करायला लावण्यास राज्याला या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टींमुळे प्रतिबंध होणार नाही व असे सेवाबंधन लादताना केवळ धर्म, वंश, जात वा वर्ग या अथवा यापैकी कोणत्याही कारणांवरून राज्य कोणताही भेदभाव करणार नाही.

### अनुसूची ३८ : लोककल्याणसंवर्धनपर समाजव्यवस्थेची स्थापना

१) ज्या समाजव्यवस्थेमध्ये सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय हा राष्ट्रीय जीवनाच्या सर्व संस्थांना प्राणभूत होईल अशी समाजव्यवस्था, होईल तितक्या परिणामकारकरीतीने प्राप्त करून

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती (The Rise and fall of Hindu Women) तो महत्त्वाचा दस्ताऐवज समजला जातो. हा लेख २१ जानेवारी १९५० रोजी प्रसिद्ध झाला.**

देऊन व तिचे संरक्षण करून लोककल्याणाचे संवर्धन करण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील. २) राज्य हे विशेषत: केवळ व्यक्तीव्यक्तींमध्येच नव्हे तर निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये राहणाऱ्या किंवा निरनिराळ्या गुंतलेल्या लोकसमूहांमध्येदेखील, उत्पन्नाच्या बाबतीत असलेली विषमता किंवा पातळीवर आणण्यासाठी झटून प्रयत्न करील, दर्जा, सुविधा व संधी यांच्या बाबतीत असलेली विषमता नाहीशी करण्यासाठी प्रयत्नशील राहील.

युवक यांचे शोषणापासून आणि नैतिक व भौतिक गरजांच्या बाबतीत उपेक्षेपासून संरक्षण व्हावे.

### अनुसूची ३९ (क) : समान न्याय व विधिविषयक मोफत साहाय्य

राज्य हे कायद्याची यंत्रणा राबवताना समान संधीच्या तत्त्वावर न्यायाची अभिवृद्धी होईल याची निश्चिती करील. विशेषत: आर्थिक किंवा अन्य नि:समर्थतांमुळे कोणत्याही नागरिकाला न्याय

### स्त्री मुक्तीविषयक परिषदा आणि डॉ. आंबेडकरांची भूमिका

स्त्रियांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी वेळोवेळी आपली भूमिका मांडली. स्त्रीमुक्तीकरिता वेगवेगळ्या राजकीय परिषदा आयोजित केल्या. दलित महिला फेडरेशनच्या माध्यमातून कार्य चालू ठेवले.

१९४२ च्या दलित महिला फेडरेशनच्या अधिवेशनात डॉ. आंबेडकर यांनी आपले विचार मांडताना असे प्रतिपादित केले की,



- स्त्री वर्गात जागृती झाली तरच समाजाची फार मोठ्या प्रमाणात प्रगती घडून येईल.
- स्त्री समाजाने किती प्रगती केली आहे, यावरून समाजाची प्रगती मोजता येईल.
- स्त्रियांच्या स्वतंत्र व संघटित संस्था असाव्यात.
- स्त्रियांनी स्वत:ला कमी लेखू नये. त्यांनी पुरुषांच्या बरोबरीने राहिले पाहिजे.

### अनुसूची ३९ : राज्याने अनुसरावयाच्या धोरणाची तत्त्वे

राज्य हे, विशेषत: पुढील गोष्टी साध्य करण्याच्या दिशेने आपले धोरण आखील – क) उपजीविकेचे पर्याप्त साधन मिळण्याचा अधिकार स्त्री व पुरुष नागरिकांना सारखाच असावा.
ख) जनसामान्यांच्या हिताला सर्वाधिक उपकारक होईल अशा रीतीने समाजाच्या भौतिक साधनसंपत्तीचे स्वामित्वाधिकार व नियंत्रणाधिकार यांचे वाटप व्हावे. ग) आर्थिक यंत्रणा राबवताना परिणामी धनदौलतीचा व उत्पादनसाधनांचा जनसामान्यास अपायकारक होईल अशा प्रकारे एकाच ठिकाणी संचय होऊ नये. घ) पुरुष व स्त्रिया या दोघांनाही समान कामाबद्दल समान वेतन मिळावे. ङ) स्त्री व पुरुष कामगारांचे आरोग्य व ताकद आणि बालकांचे कोवळे वय यांचा दुरुपयोग करून घेण्यात येऊ नये आणि नागरिकांना आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय किंवा ताकद यांस न पेलणाऱ्या व्यवसायात शिरणे भाग पडू नये. च) बालकांना निरामय पद्धतीने आणि मुक्त व प्रतिष्ठापूर्ण वातावरणात आपला विकास करण्यासाठी संधी व सुविधा दिल्या जाव्या आणि बालके व

मिळवण्याची संधी नाकारली जाणार नाही याची शाश्वती देण्यात येईल. त्यासाठी अनुरूप विधिविधानाद्वारे किंवा योजनांद्वारे किंवा अन्य कोणत्याही मार्गाने विधिविषयक साहाय्य मोफत उपलब्ध करून देईल.

### अनुसूची ४२ : न्याय परिस्थिती आणि प्रसूतिसाहाय्य यांची तरतूद

राज्य हे कामाबाबत न्याय व मानवोचित परिस्थिती उपलब्ध करण्यासाठी व प्रसूतिसाहाय्यासाठी तरतूद करील.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे महिला सक्षमीकरणाचे धोरण स्त्रीमुक्तीच्या चळवळीत अनन्य साधारण महत्त्वाचे आहे. भारतीय संविधानाच्या माध्यमातून एक माणूस एक मत, एक मूल्य, तथा स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्यायाचे तत्त्व मांडून सामाजिक लोकशाहीचा पाया मजबूत केला आहे.

**शब्दांकन : डॉ. संदेश वाघ**

**राज्याचा सर्वांगीण विकास आणि कल्याणकारी राज्याची संकल्पना साकारण्यासाठी सर्व घटकांचा विशेषत: मागास व दीनदुबळ्या घटकांचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने राज्य शासनामार्फत विविध योजना राबवण्यात येत आहेत. गेल्या साडेतीन वर्षांच्या कालावधीत शासनाने सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले व त्याची अंमलबजावणी करण्यातही शासन आघाडीवर राहिले.**



# सर्वांना समान न्याय



**दिलीप कांबळे**, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य राज्यमंत्री

**दिलीप कांबळे**

मुंबईतील चैत्यभूमीलगत असलेल्या इंदू मिलमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून त्याचे भूमिपूजन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले आहे. या स्मारकाच्या कामाला सुरुवात झाली आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन येथील वास्तव्य असलेले '१० किंग्ज' हे किंग्ज हेन्री रोड येथील निवासस्थान खरेदी करण्यात आले आहे. भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त २०१५-१६ हे वर्ष 'सामाजिक समता व न्याय वर्ष' म्हणून साजरे केले गेले. त्यानिमित्त राज्यभरात विविध कार्यक्रम साजरे करण्यात आले.

'मेक इन इंडिया'च्या धर्तीवर 'मेक इन महाराष्ट्र' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन न प्रशिक्षण संस्थे (बार्टी) मार्फत विविध कौशल्य विकासावर आधारित प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आले आहेत. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करता यावी यासाठी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी नागपूर, पुणे आणि दिल्ली येथे 'बार्टी'मार्फत मोफत निवासी शिकवणी वर्ग सुरू करण्यात आले आहेत. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जात पडताळणी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे प्रलंबित प्रकरणाचा निपटारा होत असून सर्वसामान्यांना दिलासा मिळत आहे.

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या परदेशी शिष्यवृत्ती योजनेमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. महिलांसाठी उच्च शिक्षणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) मार्फत एमफील व पी.एचडी करणाऱ्या नवबौद्ध व अनुसूचित जातीतील महिलांसाठी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती २०१५-१६ पासून सुरू करण्यात आली आहे.

विभागीय तसेच जिल्हा स्तरावर शैक्षणिक संस्था मोठ्या प्रमाणात असल्याने तेथे विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे वसतिगृहामध्ये सर्वच विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नाही. अशा विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू करण्यात आली. यामध्ये वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना अनुदान दिले जाते. या योजनेंतर्गत मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड आणि नागपूर या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजन भत्ता ३२ हजार, निवास भत्ता २० हजार, निर्वाह भत्ता ८ हजार, असे प्रती विद्यार्थी संभाव्य वार्षिक खर्च रु. ६० हजार देण्यात येतो. तर इतर महसूल विभागीय शहरातील व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये संभाव्य वार्षिक खर्च रु. ५१ हजार तर इतर जिल्ह्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी संभाव्य वार्षिक खर्च रु. ४३ हजार देण्यात येतो.

नागरिकांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यातील अडचणी दूर करण्यासह याबाबतची पडताळणी प्रक्रिया अधिक गतिमान करण्यासाठी वडील, सख्खे चुलते किंवा वडिलांकडील रक्ताच्या नात्यातील इतर कोणत्याही व्यक्तीकडे उपलब्ध असणाऱ्या जात वैधता प्रमाणपत्राला महत्त्वाचा पुरावा मानून अर्जदारास जात प्रमाणपत्र तसेच जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबतचा निर्णय राज्य शासनाने घेतला.

अनुसूचित जातीमधील होतकरू विद्यार्थ्यांची उच्च शिक्षण घेण्याची इच्छा आर्थिक अडचणीअभावी अपूर्ण राहू नये यासाठी, राज्यातील १०० अनुसूचित जातीच्या (नवबौद्धांसहित) विद्यार्थ्यांना देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना राबवण्याचा शासनाने निर्णय घेतला. देशातील मान्यताप्राप्त नामांकित संस्थामधील पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका पूर्णवेळ अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. पात्र विद्यार्थ्यांना संबंधित विद्यापीठ/शैक्षणिक संस्थेने ठरवून दिलेले पूर्ण शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, नोंदणी फी, जिमखाना, ग्रंथालय, संगणक इत्यादीचे शुल्क मिळणार असल्याने, उच्च शिक्षणापासून गुणवंत विद्यार्थी वंचित राहणार नाहीत. या योजनांचा लाभ विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणार घेऊन आपले भविष्य उज्ज्वल करावे.

**शब्दांकन : राजाराम देवकर**



**छत्रपती राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन महान नेत्यांनी महाराष्ट्राच्या समाजकारणावर अमीट ठसा उमटवला आहे. शाहू महाराजांनी बाबासाहेबांना विविध प्रकारे त्यांच्या शिक्षणासाठी आणि इतर सामाजिक व राजकीय कार्यासाठी मोठे साहाय्य केले. बाबासाहेबांचे अतिशय क्रांतिकारी कार्य लक्षात घेऊन १९२० साली, लिहिलेल्या एका पत्रात महाराजांनी बाबासाहेबांना, रा. लोकमान्य आंबेडकर असे संबोधिले. बाबासाहेब हे हिंदुस्थानातील तमाम मागासवर्गीयांचे ' लोकमान्य ' नेते होणार आहेत. असेच महाराजांना सूचित करावयाचे होते. भावी इतिहासाचा अचूक वेध घेण्याची मोठी क्षमता त्यांच्या ठिकाणी होती. बाबासाहेबांनी पुढच्या काळात राष्ट्रीय स्तरावर महाराजांना अपेक्षित असलेली लोकमान्यता प्राप्त केली, अशीच इतिहासाची साक्ष आहे.**

# राजर्षी शाहू आणि डॉ. आंबेडकर


**डॉ. जयसिंगराव पवार**

१९१८च्या सुमारास डॉ. बाबासाहेबांचे नाव, शाहू छत्रपतींच्या कानावर आले असावे. तोपर्यंत बाबासाहेबांनी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाच्या एम.ए., पीएच.डी आणि इंग्लंडमधील लंडन विद्यापीठाच्या एम.एस्सी व बार–ॲट–लॉ, या पदव्या संपादन केल्या होत्या. वंचित समाजातील एक तरुण, परदेशातील इतक्या उच्च पदव्या प्राप्त करून मायदेशी आल्याचे समजताच, महाराजांना त्याचा विलक्षण आनंद झाला. एवढ्यावरच न थांबता, त्यांनी आपणहून मुंबई मुक्कामी, डॉ. बाबासाहेबांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली. दोन महापुरुषांची ही भेट स. १९१९ मध्ये घडली. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील ही एक अपूर्व घटना होती. या भेटीपासून या उभयतांत स्नेहाचे व सहकार्याचे संबंध सुरू झाले.

दुसऱ्याच वर्षी, बाबासाहेबांनी बहिष्कृत समाजात जागृती करण्यासाठी व त्याच्यावरील अन्यायास वाचा फोडण्यासाठी 'मूकनायक' हे वृत्तपत्र सुरू केले. बाबासाहेबांच्या या उपक्रमामागे, शाहू महाराजांनी अर्थसाहाय्य उभे केले होते. अशा प्रकारचे मूकनायकास आरंभापासून सहकार्य करणे, ही त्यांची एक स्वाभाविक प्रतिक्रिया होती. बाबासाहेबांना येथून पुढेही, अशा प्रकारचे सहकार्य महाराजांकडून मिळत गेले.

## माणगाव परिषद आणि बाबासाहेबांचा उदय

अस्पृश्य समाजाच्या माणगावच्या परिषदेत, बाबासाहेबांच्या विद्वत्तेचा महाराजांनी मोठा गौरव केला. ते म्हणाले, आज बाबासाहेबांना पंडित ही पदवी देण्यास तरी काय हरकत आहे? विद्वानांत ते एक भूषणच आहेत. आर्य समाज, बुद्ध समाज व ख्रिस्ती यांनी त्यांना आपल्या आनंदाने घेतले असते; परंतु ते तुमचा उद्धार करण्याकरिता तिकडे गेले नाहीत. याबद्दल तुम्ही त्यांचे आभार मानले पाहिजेत व मीही मानतो. याच परिषदेत, बाबासाहेबांच्या पुढाकाराने, शाहू छत्रपतींनी आपल्या राज्यात बहिष्कृतांना समानतेचे हक्क देऊन, त्यांचा उद्धार करण्याचे सत्कृत्य आरंभिल्या बद्दल अभिनंदन करून, त्यांचा वाढदिवस, प्रत्येक बहिष्कृत व्यक्तीने सणाप्रमाणे साजरा करावा, असा खास ठराव मंजूर केला गेला.




या प्रसंगी महाराजांनी बाबासाहेबांना आपल्याकडील भोजनाचे जाहीर निमंत्रण दिले. त्याप्रमाणे सोनतळी कॅम्पवर सहभोजनाचा जंगी कार्यक्रम घडवून आणला. कोल्हापूरच्या या भेटीत महाराजांनी, बाबासाहेबांना मोठ्या सन्मानाने वागवले व शेवटी निरोप देतेवेळी कोल्हापुरी 'जरीपटक्या'चा प्रेमाचा अहेरही केला. हा अहेर स्वीकारताना बाबासाहेब गहिवरून गेले आणि उद्‌गारले, 'छत्रपतींनी मानाचा जरीपटका माझ्या मस्तकी चढविला, त्याचा मी सदैव मान राखीन!' आयुष्यभर दलितोद्धाराचेच कार्य करून बाबासाहेबांनी छत्रपतींच्या 'जरीपटक्या'चा मान राखला, असेच त्यानंतरचा इतिहास सांगतो. बाबासाहेबांच्या सार्वजनिक जीवनाची खरी सुरुवात या माणगाव परिषदेच्या व्यासपीठावरूनच झाली. खुद्द बाबासाहेबांनीही या गोष्टीची, पुढे १९४० सालच्या कोल्हापुरातील एका समारंभात जाहीर कबुली दिली आहे.

## उभयतांमधील वाढता सहयोग

माणगाव परिषदेनंतर महाराज व बाबासाहेब यांच्यामधील अस्पृश्योद्धाराच्या कार्यामधील सहयोग वाढतच गेला. यानंतर अवघ्या सव्वादोन महिन्यांनी, नागपुरात 'अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषदे' च्या निमित्ताने शाहू महाराज व बाबासाहेब यांची पुन्हा एकदा भेट घडून आली (३० मे १९२०) आणि या भेटीत उभयतांमधील स्नेहाचे संबंध अधिकच दृढ झाले. या परिषदेत, येऊ घातलेल्या राजकीय सुधारणा आणि त्याअनुसार अस्पृश्यांना कायदे मंडळात मिळणारे प्रतिनिधित्व, हा ज्वलंत प्रश्न चर्चिला गेला. या प्रश्नावर अस्पृश्य समाजाची भूमिका सरकारला स्पष्ट करण्यासाठी, बाबासाहेबांनीच या परिषदेचे महाराजांच्या अध्यक्षतेखाली आयोजन केले होते. देशातील अस्पृश्य समाजाच्या चळवळीची सूत्रे, त्याच समाजाच्या उदयोन्मुख नेत्याकडे जात असल्याचे चित्र, या परिषदेत निर्माण झाले. शाहू महाराजांची बाबासाहेबांकडून हीच अपेक्षा होती. त्याप्रमाणेच हे घडत होते.

अस्पृश्य समाजाच्या उद्धाराच्या चळवळीसाठी एखादा निधी जमा करण्याचा उपक्रम हाती घ्यावा आणि त्यासाठी जी समिती स्थापन करायची, त्यात शाहू महाराजांचे नाव असावे, अशा आशयाचे एक पत्र बाबासाहेबांनी महाराजांना पाठविले होते. त्या पत्रात उत्तर देताना महाराज म्हणतात, आपण जे डेप्युटेशन, फंड गोळा करण्याकरिता पाठवणार आहे, त्यात माझे नाव घालण्यास, मी आपणास मोठ्या संतोषाने परवानगी देतो. आपण जी काही संस्था सदरहू कामाकरीता स्थापन कराल, तिचा व्हाइस प्रेसिडेंट, असिस्टंट सेक्रेटरीदेखील होण्यास मी तयार आहे. मला वाटते, आपण एक ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस एज्यु. फंड, स्थापन करून, तिच्याकरिता चांगली वजनदार व काम करणारी माणसे कामगार म्हणून निवडावीत आणि या संस्थेच्या वतीने ठिकठिकाणी डेप्युटेशने पाठवीत जावी; म्हणजे

महाराजांचा व बाबासाहेबांचा घनिष्ठ संबंध निर्माण झाला, तो अस्पृश्य समाजाच्या माणगावच्या परिषदेपासून होय (मार्च १९२०) ही परिषद महाराजांच्या प्रेरणेने भरली होती व तिच्यासाठी खास सवड काढून ते उपस्थित राहिले होते. बाबासाहेब परिषदेचे अध्यक्ष होते. त्यांच्या रुपाने अस्पृश्य समाजास एक उमदे नेतृत्व मिळत आहे, याचा महाराजांना मोठा आनंद झाला होता. आपला आनंद व्यक्त करताना महाराजांनी म्हटले होते, 'तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढला, याबद्दल मी तुमचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो. माझी खात्री आहे की, डॉ. आंबेडकर हे तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत. इतकेच नव्हे, तर अशी एक वेळ येईल की, ते सर्व हिंदुस्थानचे पुढारी होतील. माझी मनोदेवता मला असे सांगते.' शाहू महाराजांनी आपल्या दृष्टीने बाबासाहेबांविषयी केलेले भाकीत अचूक होते, हे इतिहासाने सिद्ध केले आहे.



इंग्लंडमधील आपल्या वास्तव्यात, बाबासाहेब अधूनमधून महाराजांशी पत्रव्यवहार करतच होते. हा पत्रव्यवहार मोठ्या जिव्हाळ्याचा आणि परस्परांविषयीच्या प्रेमादराचा असे. ४ सप्टेंबर १९२१ रोजी लिहिलेल्या अशाच एका पत्रात, इंग्लंडमधील चलनाचे भाव घसरल्यामुळे आपणापुढे आर्थिक अडचण निर्माण झाली असून, ती निवारण्यासाठी २०० पौंडांची रक्कम देण्याची विनंती त्यांनी केली होती. याच पत्राच्या शेवटी, बाबासाहेबांनी लिहिले होते,'आपली प्रकृती ठीक आहे अशी मला आशा आहे. आपली आम्हाला फारच जरुरी आहे. कारण, हिंदुस्थानात प्रगती करत असलेल्या सामाजिक लोकशाहीच्या महान चळवळीचे आपण एक आधारस्तंभ आहात – (Pillar of Social Democracy) महात्मा जोतिबा फुले यांच्यापासून, शाहू महाराजांपर्यंत चालत आलेली बहुजन समाजाच्या उद्धाराची चळवळ ही 'सामाजिक लोकशाही'च्या प्रस्थापनेचीच चळवळ होती. या चळवळीचे महाराज एक आधारस्तंभ आहेत, हे त्यांच्या कार्याचे बाबासाहेबांनी केलेले मूल्यमापन इतिहासाला धरूनच होते.

फंड गोळा करण्यास सोयीचे होईल. मला स्वत:ला असिस्टंट सेक्रेटरी होण्याची फार इच्छा आहे व मी हे काम मोठ्या आनंदाने करीन (७ जून १९२०) अस्पृश्यांच्या कोणत्याही चळवळीचे नेतृत्व, बाबासाहेबांसारख्या त्यांच्याच नेत्याने करावे व अशा चळवळीतील आपली भूमिका मदतनीसाची असावी, असे महाराजांचे म्हणणे, त्यांच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्यातील नि:स्वार्थीपणाचे निदर्शक होते.

शाहू महाराजांचा वाढदिवस, अस्पृश्य समाजाने सणाप्रमाणे सर्वत्र साजरा करावा, असा ठराव बाबासाहेबांच्या प्रेरणेने माणगाव परिषदेने केला होता. नागपूर परिषदेतही तसाच ठराव केला गेला होता. या संदर्भात त्यांनी महाराजांना लिहिलेले, १३ जूनचे पत्र उपलब्ध असून त्यात म्हटले आहे की, 'स्पेशल अंका'करिता महाराजांच्या आमदनीची माहिती घेण्यासाठी आपण कोल्हापुरास येत आहोत. तथापि, या पत्राप्रमाणे, बाबासाहेब कोल्हापूरला आले का आणि त्यांनी 'मूकनायक'चा खास अंक काढला का, याविषयीची काहीच माहिती मिळू शकत नाही. 'मूकनायक'चा तो अंकही आज उपलब्ध नाही.

## अपुरा राहिलेला विद्याभ्यास

या कालखंडात बाबासाहेब मुंबईच्या सिडनेहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी करीत होते; पण त्यांचे लक्ष आपल्या अपुऱ्या राहिलेल्या विद्याभ्यासाकडे लागून राहिले होते. तो पुरा करण्यासाठी ठरावीक मुदतीतच त्यांना लंडनला जाणे भाग पडल्याने, त्यांनी जुलै १९२० मध्ये तिकडे प्रयाण केले. बाबासाहेबांच्या या उच्च शिक्षणाच्या खर्चासाठी महाराजांनी आर्थिक साहाय्य पाठवून दिलेच, शिवाय बाबासाहेबांच्या निवासस्थानी जातीने जाऊन, त्यांची वास्तपुस्त केली. एवढेच नव्हे, तर रमाबाई ही धाकटी बहीण, तुम्ही लंडनहून परत येईपर्यंत मी तिला माहेरी, कोल्हापुरी घेऊन जातो, असे अंतरीच्या प्रमाचे बोलणे केले. महाराजांच्या उद्गाराने बाबासाहेब गहिवरून गेले. दुर्दैवाने या दोन महापुरुषांची ही भेट शेवटची ठरली.
(मे १९२०)

## बाबासाहेबांचे इंग्लंडमधील कार्य

दरम्यानच्या काळात, ब्रिटिश राज्यकर्त्यांनी, कॉंग्रेसच्या स्वराज्य चळवळीच्या दडपणाखाली १९१९ मध्ये 'मॉंटफर्ड' सुधारणा जाहीर केल्या होत्या. या सुधारणांमध्ये, राज्यकर्त्यांनी हिंदुस्थानातील ब्राह्मणेतर समाजाच्या न्याय्य हक्कांची उपेक्षा केली होती. याचे कारण, ब्राह्मणेतर समाजाची बाजू खंबीरपणे मांडणारा त्यांचा कोणी नेता, या सुमारास इंग्लंडमध्ये नव्हता. आता बाबासाहेब इंग्लंडला जाताहेत, तर त्यांनी हे कार्य करावे, असे शाहू महाराजांना वाटत होते. त्या दृष्टीने त्यांनी, त्यांचे इंग्लंडमधील एक स्नेही, सर आल्फ्रेड पीज यांना लिहिलेले पत्र, बाबासाहेबांच्या हाती दिले होते. ब्राह्मणेतरांची बाजू इंग्लंडमध्ये मांडून , तेथील ब्रिटिश समाजाचे व राज्यकर्त्यांचे प्रबोधन बाबासाहेब करतील ; याकामी सर पीज यांनी त्यांना सहकार्य करावे, अशी विनंती महाराजांनी त्या पत्रात केली होती.

## पुढाऱ्यांच्या गाठीभेटी

इंग्लंडमध्ये गेल्यावर महाराजांच्या अपेक्षेप्रमाणे ब्राह्मणेतर चळवळीची बाजू मांडण्यासाठी बाबासाहेब तेथील पुढाऱ्यांच्या गाठीभेटी घेत होते, तेथील वृत्तपत्रांत लेखन करीत होते. भारतमंत्री मॉटेग्यूसाहेबांचीही त्यांनी भेट घेतली होती. ३ फेब्रुवारी १९२१ रोजी महाराजांना लिहिलेल्या पत्रात बाबासाहेब म्हणतात, 'मॉटेग्यू हा नेमस्त पुढाऱ्यांच्या सूचनेप्रमाणे वागतो. तथापि तो आता ब्राह्मणेतरांच्या चळवळीसंबंधाने तुच्छतेने बोलणार नाही, अशी माझी खात्री झाली आहे. खरे म्हणजे ब्राह्मणोतरांची चळवळ समजून घेण्याची तेथे कोणी पर्वा करीत नाही... ज्यावेळी सुधारणा विधेयक तयार होत होते, त्या महत्त्वाच्या वेळी चळवळीचे महत्त्व पटवून देणारा कोणी समर्थ प्रतिपादक येथे नव्हता. त्यामुळे ब्राह्मणेतर चळवळीच्या विरोधकांना ती चळवळ ब्राह्मणविरोधी आहे, असे सांगण्याचे काम सोपे झाले. त्या चळवळीची लोकशाहीनिष्ठ बाजू, चातुर्याने दडपून टाकण्यात आली. तिचा विपर्यास करण्यात आला. तेच विपर्यस्त स्वरूप

सर्वसाधारण इंग्रजांच्या मनात सध्या वावरत आहे...'

जरी उशीर झाला असला, तरीही इंग्रजांच्या मनातील ब्राह्मणेतर चळवळीविषयीचा गैरसमज दूर करण्याचे काम, बाबासाहेबांनी आपल्या परीने केले. इंग्लंडमध्ये आपला विद्याभ्यास सांभाळून ते तेथील लोकमताचे प्रबोधन करणारी चळवळ चालवत होते. इकडे हिंदुस्थानातील अस्पृश्य समाज आणि खुद्द शाहू महाराज, त्यांच्या मायदेशीच्या आगमनाकडे डोळे लावून होते. बाबासाहेबांच्या अनुपस्थितीत त्यांची प्रतिष्ठा व नावलौकिक कसा वाढीस लागेल याची दक्षता महाराज घेत होते. फेब्रुवारी १९२२ मध्ये दिल्ली येथे अस्पृश्य समाजाची अखिल भारतीय स्वरूपाची परिषद भरली होती. महाराज या परिषदेत मुख्य पाहुणे होते. आपल्या भाषणात प्रारंभीच महाराजांनी गौरवाने म्हटले होते, 'आजचा मान खरे म्हटले असता आपणांतील उत्साही व सुशिक्षित पुढारी आंबेडकर यांनाच मिळावयास पाहिजे होता. माझ्यापेक्षा ते जास्त सुशिक्षित आहेत व अभिमानी आहेत. त्यांनी आपल्या कल्याणाकरिता अविश्रांत श्रम केले आहेत; परंतु त्यांना आज आपल्यामध्ये हजर राहता येणे शक्य नाही. कारण ते विलायतेस गेले आहेत व तेथे ते आपले हित अंत:करणात ठेवूनच इतर व्यवसाय करतील, यात तीळमात्र संशय नाही.'



या दोन थोर पुरुषांमध्ये, परस्परांविषयी मोठा आदरभाव वसत होता. शाहू महाराज हे राजे होते. बाबासाहेबांपेक्षा वयाने वडील होते. महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे उद्धारकर्ते म्हणून ते प्रसिद्धीस आले होते. असे असले तरी, बाबासाहेबांशी वागण्यात, बोलण्यात, पत्रव्यवहारात, भाषणांत कुठेही त्यांनी आपले हे मोठेपण प्रदर्शित केलेले नाही. आपल्या बरोबरीचे किंबहुना आपल्यापेक्षा जास्त ' सुशिक्षित व अभिमानी ', असे आपले मित्र म्हणून बाबासाहेबांचा गौरव त्यांनी केलेला दिसतो. महाराजांच्या या सौजन्यशील कृतीला, तितक्याच सौजन्यशीलतेने बाबासाहेबांनीही प्रतिसाद दिलेला दिसतो. महाराजांविषयी त्यांच्या ठिकाणी अपार आदरभावना वसत होती, हेच त्यांना अनेक उद्‌गारांवरून स्पष्ट होते.

## भावी इतिहासाचा अचूक वेध

१९२० साली, महाराजांनी बाबासाहेबांना लिहिलेल्या एका पत्राचा मायना मोठा वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यामध्ये महाराजांनी बाबासाहेबांना, रा. लोकमान्य आंबेडकर असे संबोधिले आहे. 'लोकमान्य' ही पदवी, त्या काळात फक्त टिळकांना लावली जात होती. येथे ती बाबासाहेबांना लावून, ते हिंदूस्थानातील तमाम मागासवर्गीयांचे ' लोकमान्य ' नेते होणार आहेत. असेच महाराजांना सूचित करावयाचे होते. यात महाराजांच्या मनाचा मोठेपणा तर होताच ; पण असे सूचित करण्यात भावी इतिहासाचा अचूक वेध घेण्याची मोठी क्षमता त्यांच्या ठिकाणी होती, हेही त्यातून स्पष्ट होते. लोकमान्य टिळकांच्यासारखी उदंड लोकप्रियता बाबासाहेबांनी पुढच्या काळात राष्ट्रीय स्तरावर प्राप्त केली, अशीच इतिहासाची साक्ष आहे.

## अस्पृश्यांचा महान कैवारी

शाहू महाराजांच्या निधनाची वार्ता बाबासाहेबांनी लंडनच्या वृत्तपत्रात वाचली, तेव्हा ते अत्यंत व्याकूळ झाले. नूतन छत्रपती राजाराम महाराज, यांना लिहिलेल्या सांत्वनपर पत्रात ते म्हणतात, 'ही संकटाची घटना, मला दोन कारणांमुळे दु:खदायक झाली आहे. महाराजांच्या निधनाने मी एका वैयक्तिक मित्राला अंतरलो आणि अस्पृश्य समाज आपल्या एका महान हितचिंतकाला व सर्वांत महान कैवाऱ्याला मुकला आहे. मी



स्वत: दु:खाने व्याकूळ झालो असताना आपल्या व महाराणीसाहेबांच्या दु:खात अपार आणि कळकळीची सहानुभूती व्यक्त करीत आहे.' शाहू महाराजांच्या निधनानंतरही, बाबासाहेबांनी प्रसंगविशेषी त्यांच्याविषयी आदरभाव व्यक्त केलेला दिसतो. १९२० मध्ये कोल्हापुरात 'दलित प्रजा परिषदे'च्या निमित्ताने ते आले असता, आपल्या भाषणात त्यांनी म्हटले होते. शाहू महाराजांनी कोल्हापुरातच खरी लोकशाहीची मुहूर्तमेढ रोवली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नाव भारताच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण असे नाव आहे. विसाव्या शतकाच्या कालखंडात त्यांनी केलेले कार्यकर्तृत्व आधुनिक भारताच्या इतिहासातील क्रांतिकारक ठरले. आधुनिक भारतीय समाजाची जडणघडण करण्यामध्ये त्यांचे विचारकार्य मूलगामी सिद्ध झाले. आजचा आधुनिक भारत हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारवैभवावर उभा असलेला व आकारास आलेला असल्याचे लक्षात येते. त्यांनी आयुष्यभर जी विविध प्रकारची व विविध पातळ्यांवरील आंदोलने केली, त्यामधून येथील शोषित-वंचित समाजाला दिशा मिळाली असे नव्हे तर भारतीय समाजव्यवस्थेतील सर्वच घटकांनादेखील नवीन दृष्टी प्राप्त झाली. त्यांच्या क्रांतिकारक विचारकार्यामधून व विचारमंथनामधून देशाला आधुनिकतेची दिशा मिळाली.**

# परिवर्तनाचे अग्रदूत

**डॉ. शैलेंद्र लेंडे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा व प्रतिभा समाजजीवनाच्या विविध विषयांना स्पर्श करणारी होती. त्यांनी ज्या ज्या विषयाला स्पर्श केला, त्या त्या विषयाच्या गाभ्यापर्यंत पोहोचण्याचा व त्या विषयाला समतोलपणे न्याय देण्याचा त्यांनी विचारपूर्वक प्रयास केला. येथील धर्मकारण, राजकारण, समाजकारण, शिक्षणकारण, अर्थकारण इत्यादी विविध विषयांना त्यांनी मुळापासून समजून घेतले. विसाव्या शतकाच्या कालखंडात



भारतीय पातळीवरील एत्तदेशीय समाजजीवनाचा व त्याबरोबरच त्यांनी येथील संस्कृतीचा गंभीरपणे अभ्यास केला. येथील साहित्यरूपाला समजून घेतले.

### राज्यघटनेचे शिल्पकार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आहेतच. पण त्याचबरोबर ते आधुनिक भारताचेदेखील शिल्पकार आहेत. आधुनिक भारताचे रूप साकारताना त्यांनी विविधांगी स्वरूपाची आंदोलने, विविध प्रकारच्या चळवळी व विविध प्रकारचे लढे येथे निर्माण केले. भारतीय समाजातील शेवटच्या घटकापासून तर या समाजातील सर्वात वरच्या घटकांपर्यंत आपल्या कृतिकार्यक्रमांची व ध्येयधोरणांची व्याप्ती वाढवत त्यांनी येथे विचारसंघर्ष उभा केला. येथील समाजव्यवस्थेमध्ये अभूतपूर्व असे परिवर्तन घडवून आणले. त्यांनी केलेले हे परिवर्तनकार्य येथील पारंपरिक समाजजीवनाचा चेहरामोहरा बदलवणारे सिद्ध झाले. त्यांनी केलेल्या परिवर्तनकार्यामुळे येथील प्रचलित संस्कृतिरूपामध्ये देखील मौलिक स्थित्यंतर घडून आले. त्याचबरोबर येथील साहित्यरूपामध्ये मोठे बदल घडून आले.

### मौलिक योगदान

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्यविषयक व संस्कृतीविषयक योगदान हे मौलिक स्वरूपाचे आहे. त्यांनी या क्षेत्रात दिलेल्या योगदानाच्या बळावर येथील साहित्यसंरचनेमध्ये व संस्कृतिसंरचनेमध्ये मूलभूत परिवर्तन आकारास आले. मागील हजारो वर्षांपासून भारतीय पातळीवर सुरू असलेल्या समाजव्यवस्थेमध्ये बाबासाहेबांच्या अभूतपूर्व कार्यकर्तृत्वामुळे येथील समाजसंरचनेमध्ये तसेच साहित्य व संस्कृतिरूपामध्ये मूलगामी स्थित्यंतर आले. त्यांनी भारतीय साहित्य व संस्कृतीमध्ये कशाप्रकारे परिवर्तन घडवून आणले व त्यांचे या क्षेत्रातील योगदान त्यांच्या अन्य क्षेत्रांतील योगदानाप्रमाणेच कशा प्रकारे क्रांतिकारक स्वरूपाचे ठरते, हे समजून घेणे अत्यावश्यक ठरते.

### दलितमुक्तीच्या प्रक्रियेला आरंभ


डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या चळवळीची सुरुवात येथील दलित-पीडित समाजाच्या उन्नयनकार्यापासून केली. मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रांतील विविध विषयांचे परदेशातील उच्चशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी सर्वसाधारणपणे १९१८-१९ पासून दलितमुक्तीच्या प्रक्रियेला आरंभ केला. स्वतः तळपातळीवरील सर्वात शेवटच्या वर्गातून पुढे आल्याने त्यांच्याकरिता येथील तळपातळीवरील दलित-पीडित वर्गाची मुक्तता करणे हे सर्वात मोठे जीवनध्येय होते. त्या काळात देशातील अस्पृश्य वर्ग हा चोहो बाजूंनी भरडला गेलेला व आयुष्यामध्ये सर्व प्रकारची उपेक्षितता, वंचितता व अभावग्रस्तता वाट्याला आलेला असा वर्ग होता. भारतीय पातळीवरील धर्मसत्ताकेंद्री संस्कृतीमुळे येथील तळपातळीवरील समाजसमूहांचे

जगणे मृतप्राय व विकलांग झाले होते. त्यात ब्रिटिश राजवटीमुळे संपूर्ण देशाला आलेल्या पारतंत्र्याची भर होतीच. अशा परिस्थितीमध्ये चौफेर कुंचबणा झालेल्या अस्पृश्यवर्गाच्या मुक्ततेसाठी बाबासाहेबांनी २७ जानेवारी १९१९ रोजी ब्रिटिशांच्या साऊथबरो कमिशनसमोर साक्ष देऊन दलितमुक्तीच्या आंदोलनाला आरंभ केला. पुढे ३१ जानेवारी १९२० मध्ये येथील अस्पृश्यवर्गाच्या जनजागरणासाठी 'मूकनायक' या पाक्षिकाची सुरुवात केली.

### सामाजिक कार्याचा प्रारंभ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्याचा प्रारंभ त्यांच्या वृत्तपत्रीय वाङ्मय निर्मितीमधून होतो, ही एक महत्त्वपूर्ण स्वरूपाची बाब मानावी लागते. तत्कालीन तळपातळीवरील शोषित, वंचित समाजाला जागृत करायचे असेल तर त्यांच्यामध्ये नवीन जाणिवांची निर्मिती करण्यासाठी त्यांना वृत्तपत्र या वाङ्मयसाधनाची निर्मिती करण्याची आवश्यकता वाटली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मूकनायक' या वृत्तपत्राची केलेली सुरुवात ही वाङ्मयसृष्टीतील एक अभिनव स्वरूपाची घटना होय. तसेच ही संस्कृतीच्या क्षेत्रातीलही अभिनव घटना आहे. या घटनेच्या अभिनवतेला केवळ महाराष्ट्राचे भौगोलिक परिमाण नाही, तर त्याला संपूर्ण भारतीय पातळीवरील नव्या आशयतत्त्वाचे व भावाभिव्यक्तीचे परिमाण आहेत. या वृत्तपत्राच्या रूपातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील हजारो वर्षांपासून निःशब्द असलेल्या व धर्मसंस्कृतीच्या साखळदंडांनी बंदिस्त असलेल्या मूकनायकाला वाचा प्राप्त करून दिली. येथील धर्मकेंद्री, वर्णकेंद्री, जातिकेंद्री, वर्गकेंद्री व लिंगभेदकेंद्री संस्कृतीमध्ये खितपत पिचत पडलेल्या तळपातळीवरील समाजसमूहांना या वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यांनी भारतात पहिल्यांदाच आत्ममुक्तीचा स्वर प्राप्त करून दिला. 'काय करू आता धरूनिया भीड । निःशंक हे तोंड वाजविले ।। नव्हे जगी कोणी मुकियांचा जाण । सार्थक लाजोनी नव्हे हित ।।' या संत तुकाराम यांच्या ओळींचा बिरुदावली म्हणून वापर करीत त्यांनी 'मूकनायक' वृत्तपत्राला आकारास आणले व त्यामधून नवीन उर्मीने दलितमुक्तीची प्रक्रिया सुरू केली. वृत्तपत्रामधून जनजागरण करीत असतानाच त्यांनी समांतरपणे बहिष्कृत वर्गाच्या परिषदांना व सभांनादेखील आरंभ केला. पुढे उर्वरित उच्चशिक्षणाला पूर्ण करण्यासाठी त्यांना लंडन येथे जावे लागले. १९२३ मध्ये परदेशी उच्चशिक्षणाला परिपूर्ण करून भारतात परत आल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितमुक्तीच्या लढ्याला नव्या जोमाने आरंभ केला. 'बहिष्कृत हितकारिणी सभे'च्या रूपातून त्यांनी पारंपरिक धर्मसंस्कृतीच्या विरूद्ध सामाजिक व सांस्कृतिक बंडखोरी करीत अस्पृश्यवर्गाच्या आत्मसन्मानाचा लढा उभारला. एका बाजूने ब्रिटिशांच्या












शासनव्यवस्थेत दीनदलितांच्या हक्कांकरिता सहभागी होत त्यांनी दुसऱ्या बाजूने येथील प्रस्थापित धर्मसंस्कृतीला स्पष्टपणे व स्वच्छपणे नकार देण्यास सुरुवात केली. १९-२० मार्च १९२७ रोजी त्यांनी महाड येथील चवदार तळ्यावर दीनदलितांच्या मुक्तीचा व त्यांच्या न्याय्य हक्काचा धर्मसंगर छेडला. हा धर्मसंग्राम निर्माण करताना लगेच त्यांनी ३ एप्रिल १९२७ रोजी 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक नव्याने सुरू केले. या वृत्तपत्राने भारतामधील दुसऱ्या भारताचा, म्हणजेच बहिष्कृत भारताचा आवाज बुलंदपणे येथील पारंपरिक समाजासमोर मांडला. त्यांच्या या बहिष्कृत भारताने समस्त शोषितांचे बहिष्कृतपण आपल्या स्वतंत्रतेच्या व समत्वाच्या न्याय्य मागणीसह समाजासमोर अभिव्यक्त केले. 'बहिष्कृत भारत' या वृत्तपत्रीय वाङ्मयामधून त्यांनी आपल्या सामाजिक-धार्मिक व अंतिमतः सांस्कृतिक मुक्तीची प्रक्रिया राबवली. या वर्तमानपत्रानंतर त्यांनी 'जनता' हे नियतकालिक काढले. 'गुलामाला तू गुलाम आहेस असे सांगा म्हणजे तो बंड करून उठेल' असा मूलमंत्र देत त्यांनी येथील दीनदलितांच्या व शोषितवंचितांच्या तनामनात स्वातंत्र्याचा व स्वातंत्र्याकांक्षेचा भाव जाज्वल्य स्वरूपात पेरला. त्यांच्या 'जनता' या वृत्तपत्राचेच पुढे त्यांच्या शेवटच्या टप्प्यात 'प्रबुद्ध भारत' या वृत्तपत्रामध्ये रूपांतर झाले. या सर्व वृत्तपत्रांमधून त्यांनी विसाव्या शतकाच्या काळात नव्या दृष्टिकोनाच्या व नव्या भूमिकेच्या वाङ्मयाची निर्मिती केली. त्याचबरोबर नव्या कालोचित संस्कृतीचीही निर्मिती केली.

### समाजचिकित्सा व संस्कृतिचिकित्सा

बाबासाहेबांच्या वृत्तपत्रसृष्टीची निर्मिती ही ज्याला आपण निखळ वाङ्मयीन दृष्टी म्हणतो, त्या प्रकारच्या दृष्टीतून कदापि झाली नव्हती. त्यांच्या वृत्तपत्रांची निर्मिती ही समाजचिकित्सेच्या व संस्कृतिचिकित्सेच्या भूमिकेतून झाली होती. त्यांनी केलेल्या या वाङ्मयनिर्मितीला ऐतिहासिक स्वरूपाचे मोल आहे. हे मोल केवळ वाङ्मयीन स्वरूपाचे नाही तर ते सामाजिक व सांस्कृतिक स्वरूपाचे आहे. त्यांच्या वृत्तपत्रांमधून केवळ त्यांचेच लेखन प्रसिद्ध झाले असे नाही तर त्यांच्याच प्रेरणा-प्रभावातून पहिल्यांदाच सुशिक्षित झालेल्या अस्पृश्यवर्गातील नवतरुणांचे लेखन प्रसिद्ध झाले. ह्या अगदी पहिल्या पिढीच्या स्वातंत्र्याकांक्षी मनाला व त्यांच्या विचारांना पोसण्याचे व त्यांना खतपाणी घालण्याचे मौलिक कार्य त्यांच्या या वृत्तपत्रीय

वाङ्मयाने केले. तत्कालीन तळपातळीवरून पुढे येऊ पाहणाऱ्या अनेक नवलेखकांचे, कवींचे व कथाकारांचे लेखन या वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध झाल्याचे दिसून येते. याबरोबरच काही स्त्रियांचे कथनपर लेखनदेखील या वृत्तपत्रांमधून प्रकाशित झाल्याचे पाहावयास मिळते. त्यांची वृत्तपत्रीय कामगिरी ही अशा प्रकारे येथील शोषित–वंचित, दीनदलित समाजाच्या सामाजिक–सांस्कृतिक प्रश्नांना अभिव्यक्त करणारी ठरली. त्याचप्रमाणे ती या वर्गातून नव्याने भावाविष्कार करू पाहणाऱ्या लेखक–कवींना लिहिते करणारीही ठरली.

## ध्येयासक्त स्वरूपाची वाङ्मयसृष्टी

बाबासाहेबांनी निर्माण केलेली वृत्तपत्रीय वाङ्मयसृष्टी एक ध्येयासक्त स्वरूपाची होती. त्यांनी वृत्तपत्रांच्या माध्यमातून तत्कालीन समाजाचे अभूतपूर्व जनजागरण केले. हे जनजागरण तळपातळीवरील समाजाला प्रबोधित करण्यासाठी ज्या प्रकारे महत्त्वाचे ठरले, त्याचप्रमाणे ते वरिष्ठ वर्गीय समाजाला प्रश्नांकित करण्याच्या व त्याला अंतर्मुख करून सोडण्याच्या दृष्टीतून महत्त्वपूर्ण ठरले. मुख्य म्हणजे या वृत्तपत्रीय वाङ्मयसृष्टीमधून त्यांनी येथील तळपातळीवरील समाजसमूहांचा 'मूकनायक' ते 'प्रबुद्ध भारत' अशा प्रकारचा विकासपट सिद्ध करून दाखवला. येथील दीनदलित व शोषितवंचित समाजाचा हा विकासपट अर्थातच त्यांच्या कार्यकर्तृत्वामधून आकारास आला. येथील पारंपरिक धर्मसंस्कृतीपासून मुक्तता मिळवून प्रबुद्ध भारतापर्यंत दीनदलित समाजाची डॉ. आंबेडकरांनी करवून घेतलेली वाटचाल; त्यांच्या या वृत्तपत्र वाङ्मयामधून स्पष्टपणे पाहावयास मिळते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वाङ्मयीन योगदानाचा विचार करताना त्यांनी निर्माण केलेली वृत्तपत्रसृष्टी ही त्यांच्या वाङ्मयीन कामगिरीची एक बाजू झाली. पण त्यांचे वाङ्मयीन योगदान केवळ त्यांच्या वृत्तपत्रवाङ्मयापुरते मर्यादित नाही. त्यांनी दिलेल्या वाङ्मयविषयक कामगिरीला अत्यंत व्यापक स्वरूपाचे संदर्भ आहेत आणि त्यांच्या या संदर्भातील योगदानामधून आधुनिक काळाशी सुसंगत असलेल्या संस्कृतीचे भरणपोषण झाले आहे. त्यांनी दिलेल्या वाङ्मयविषयक व संस्कृतीविषयक योगदानामागे त्यांचे अभिनव स्वरूपाचे ज्ञाननिष्ठ व प्रज्ञाकेंद्री व्यक्तिमत्त्व भरभक्कमपणे उभे असल्याचे दिसते.

## जीवनरूप आणि जीवनासंबंधीच्या कल्पना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक–धार्मिक–राजकीय–शैक्षणिक व एकंदरच कार्यकर्तृत्वामुळे तसेच त्यांनी केलेल्या बौद्धिक–अकादमीक विचारमंथनाच्या प्रभावामुळे आपल्या समाजातील दलित–पीडित वर्गाचे, उपेक्षित घटकांचे, स्त्रीवर्गाचे, शेतकरी वर्गाचे. श्रमिक–मजूर वर्गाचे, भटक्या–आदिवासी वर्गाचे जीवनरूप तर बदललेच, पण त्याचबरोबर येथील जीवनासंबंधीच्या कल्पना देखील बदलल्या. साहित्य व संस्कृती यांच्या संबंधातील पूर्वापार चालत आलेल्या कल्पनांमध्ये व संकल्पनांमध्येदेखील आमूलाग्र बदल घडून आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अपारंपरिक विचारचिंतनाच्या प्रभावातून प्रचलित साहित्याच्या मर्यादा सर्वांच्या लक्षात आल्या. त्यांच्या प्रेरणा–प्रभावामधून दलित

## आधुनिक काळाशी सुसंगत संस्कृतीचे भरणपोषण

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रचंड विद्या–व्यासंगी विचारवंत होते. विसाव्या शतकाच्या काळात त्यांच्याइतका विद्वान, उच्चशिक्षित, प्रकांडपंडित, बुद्धिमान व प्रज्ञावंत समाजकारणी व विचारवंत उभ्या भारतवर्षात नव्हता. आपल्या अपार बुद्धिवैभवाच्या व अतुलनीय विद्वत्तेच्या बळावर त्यांनी भारतामध्ये समाजकारण व राजकारण सुरू केले. येथील तळपातळीवरील समाजाच्या मुक्तीकरिता त्यांनी परदेशी विद्यापीठांमधून अर्जित केलेले आधुनिक ज्ञान हेच अमोघ असे शस्त्र मानले. आणि या आधुनिक ज्ञानरूपी



व अद्ययावत शिक्षणरूपी शस्त्राच्या बळावर त्यांनी विविध विषयांवरील ग्रंथांमधून, वृत्तपत्रीय लेखनामधून, व्याख्यानांमधून व भाषणांमधून, विविध सभा–संमेलनांमधून, अनेकानेक परिषदांमधून व अधिवेशनांमधून, अनेकानेक संघटनांमधून, विविधांगी आंदोलनांमधून व चळवळींमधून सबंध भारतभर अभूतपूर्व असे जनजागरण व लोकप्रबोधन केले. त्यांनी केलेले हे जनजागरण व लोकप्रबोधन केवळ दीनदलित वर्गापुरते मर्यादित नव्हते, तर या जनजागरणाची व लोकप्रबोधनाची व्याप्ती समस्त भारतीय समाजाला व या भारतीय समाजातील सर्व स्तरांना व्यापून टाकणारी होती. डॉ. आंबेडकरांनी विविध साधनांच्या व विविध माध्यमांच्या आधारे चालवलेल्या या अतिव्यापक स्वरूपाच्या जनजागरणामधून व लोकप्रबोधनामधून, भारतीय पातळीवर अभूतपूर्व स्वरूपाची समाज समीक्षा आकारास आली. त्याचबरोबर अनन्यसाधारण स्वरूपाची साहित्य समीक्षा व संस्कृती समीक्षा देखील आकारास आली. समाज, धर्म, शिक्षण, अर्थव्यवहार, इतिहास यांच्याबरोबरच साहित्य व संस्कृती यांच्यासंबंधीची नवी भूमिका त्यांच्या एकंदर ग्रंथलेखनामधून, विचारचिंतनामधून व कार्यकर्तृत्वामधून भारतीय पातळीवर अगदी नव्याने साकार झाली. त्यामुळे भारतीय पातळीवर नवी साहित्यसंरचना व नवी संस्कृतिसंरचना निर्माण होण्याची प्रक्रिया आधुनिक कालखंडात पहिल्यांदाच अस्तित्वात आली.

साहित्याची निर्मिती झाली. या दलित साहित्याच्या निर्मितीने व पुढेपुढे वेगवान पद्धतीने या साहित्याच्या होत गेलेल्या विकासामुळे या साहित्याचे महत्त्व तीव्रपणे अधोरेखित होत गेले. दलित कविता, दलित कथा, दलित स्वकथन, दलित कादंबरी, दलित रंगभूमी या दलित साहित्यातील विविध साहित्यप्रकारांनी प्रस्थापित मराठी साहित्याला प्रचंड धक्का दिला. या धक्क्यामुळे प्रस्थापित मध्यप्रवाहातील मराठी साहित्य तसेच भारतीय साहित्यविश्व पार भांबावून केले आणि प्रश्नांकित झाले. पुढेपुढे दलित साहित्याची स्वरूपनिश्चिती होत गेली आणि त्यामधून आंबेडकरवादी साहित्य हे नामरूप विचारप्रणालीनिष्ठ भूमिकेतून महाराष्ट्रासमोर आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणा–प्रभाव व परिणामातून आकारास आलेले व त्यांच्या केंद्रवर्ती विचारधनावर पोसले गेलेले हे आंबेडकरवादी साहित्य भारतीय साहित्यक्षेत्रातील अभूतपूर्व स्वरूपाची निर्मिती होय. ह्या आंबेडकरवादी साहित्याने प्रकट केलेले अनुभवविश्व व या साहित्याची अनन्यसाधारण स्वरूपाची अभिव्यक्ती मराठी साहित्यामध्ये व भारतीय साहित्यामध्ये आमूलाग्र परिवर्तन आणणारी सिद्ध झाली. ह्या दलित–आंबेडकरवादी साहित्याने मराठीच्या व भारतीय साहित्यशास्त्राचे तसेच सौंदर्यशास्त्राचे स्वरूप पार बदलवून टाकले. भारतीय साहित्यशास्त्रातील साहित्याची निर्मितीप्रक्रिया, साहित्याचे प्रयोजन, साहित्याचे आशयतत्व, साहित्याचे अभिव्यक्तिरूप, साहित्याचे सौंदर्यतत्त्व, साहित्याचे कलातत्त्व, साहित्याची आकृतिनिष्ठा इत्यादी विविध प्रकारच्या साहित्यविषयक संकल्पनांना बदलवण्याचे श्रेय या आंबेडकरवादी साहित्याचे आहे. आंबेडकरवादी वैचारिक साहित्याने व समीक्षापर साहित्याने महाराष्ट्रीय व भारतीय पातळीवर मूलभूत स्वरूपाचे विचारचिंतन केले आहे. आंबेडकरवादी साहित्यामधून व या साहित्यातील विचारचिंतनामधून मानवी जीवनासंबंधीच्या, मानवी संस्कृतीसंबंधीच्या व तसेच या संस्कृतीचे वाहक असलेल्या साहित्य व्यवहाराच्या नव्या दिशा निर्धारित झाल्या. या आंबेडकरी जाणिवेच्या वैचारिक व समीक्षापर लेखनाने आंबेडकरवादाच्या संबंधात मोलाची तत्त्वनिश्चिती केली. आंबेडकरवादी तत्त्वज्ञानाची केली गेलेली व होत असलेली तत्त्वनिश्चिती भारतीय विचारक्षेत्रामध्ये अत्यंत महत्त्वाची ठरते. आंबेडकरवादी ललित साहित्याने, आंबेडकरवादी वैचारिक साहित्याने व आंबेडकरवादी समीक्षापर साहित्याने प्रगट केलेले समाजभान व संस्कृतिभान लोकविलक्षण स्वरूपाचे आहे. या साहित्याच्या योगाने भारतीय साहित्यविश्वाला नवी जीवनदृष्टी, विचारदृष्टी व नवी साहित्यदृष्टी प्राप्त झाली.




### बाबासाहेबांच्या विचारधनामुळे नवी ऊर्जा

भारतीय साहित्यातील आशयतत्त्वाला व अभिव्यक्तिरूपाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधनामुळे नवी ऊर्जा प्राप्त झाली. साहित्याच्या संबंधातील बेगडी कल्पना, साहित्याचे पारमार्थिक स्वरूप, साहित्याची केवळ वरवरच्या सौंदर्यामध्ये मानली गेलेली इतिकर्तव्यता, साहित्यातील नायका–नायिकांसंबंधीच्या पूर्वापार चालत आलेल्या कल्पना इत्यादी विविध साहित्यविषयक घटकांची आंबेडकरी विचारदृष्टीमधून समीक्षा केली गेली. परिणामस्वरूपी साहित्याचे नवे सामाजिक व सांस्कृतिक प्रारूप आकारास येत गेले. डॉ. आंबेडकरांच्या विचारकार्यामुळे भारतीय साहित्याला बहुजनसमाजनिष्ठ व सर्वाहारा वर्गनिष्ठ स्वरूप प्राप्त झाले. भारतीय साहित्याचे पारमार्थिक, सामंतवादी, वर्णवर्चस्ववादी, जातिभेदवादी, लिंगभेदवादी स्वरूप बदलण्यासाठी डॉ. आंबेडकरांचे कार्यकर्तृत्व मूलगामी स्वरूपाचे ठरले. त्यांच्या प्रभावामुळे भारतीय साहित्याला लोकशाहीवादी, समतावादी, स्वातंत्र्यवादी, सामाजिक न्यायवादी आशयतत्त्व प्राप्त होऊ शकले. भारतीय साहित्याने पूर्वापार स्वीकारलेला पारमार्थिक व पारलौकिक धर्मसंस्कृतीचा विचारगाभा त्यामुळे बदलला. संस्कृतीच्या पारंपरिक, प्रस्थापित व प्रचलित कल्पनांमध्ये बदल होण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्यकर्तृत्व क्रांतिकारक स्वरूपाचे ठरले. येथील धर्मकेंद्री संस्कृतीला बदलवून तिला मनुष्यकेंद्री बनवण्याचे कार्य त्यातूनच घडले. विसाव्या शतकाच्या आधुनिक कालखंडात राहताना या काळाला सुसंगत अशी संस्कृतीव्यवस्था असली पाहिजे, अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची संस्कृतीविषयक भूमिका होती. ही भूमिका आपल्या ग्रंथलेखनातून, वृत्तपत्रीय लेखनातून, सभासंमेलनांमधून, परिषदांमधून भारतीय लोकांच्या मनात रुजवण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांनी केले. हे महत्कार्य करताना त्यांनी या कालसुसंगत भूमिकेवर चालणाऱ्या साहित्याची प्रतिष्ठापना केली. तशाच प्रकारच्या संस्कृतीची निर्मिती देखील केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ह्या ऐतिहासिक कार्यामुळे येथील साहित्याला व येथील संस्कृतीला लौकिक, ऐहिक, समतानिष्ठ जीवनभान प्राप्त झाले. भारतीय पातळीवरील साहित्याचे व संस्कृतीचे लोकशाहीकरण करण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मोठ्या निष्ठापूर्वक केले आहे. भारतीय साहित्यामध्ये संविधाननिष्ठा रूजवण्याचे व येथील संस्कृतीला संविधानाच्या अनुरूप घडवण्याचे मौलिक कार्य त्यांनी पार पाडले आहे. यामुळे बाबासाहेबांनी भारतीय साहित्याला व भारतीय संस्कृतीला दिलेले योगदान आधुनिक भारताच्या इतिहासातील अभूतपूर्व व अद्वितीय स्वरूपाचे ठरते.



**प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, संपर्क: ०७०३८७३१५३३**

**आज पाणी विषयावरील गुंतागुंत कायम आहे. नद्यांच्या पाणी वापराचे, वाटपाचे विषय वारंवार उदभवू शकतात. त्यासाठी आंतरराज्यीय व आंतरराष्ट्रीय करार करावे लागतात. ते राज्यसरकारे करू शकणार नाहीत. त्यात केंद्र सरकारलाच लक्ष घालून प्रश्न सोडवावे लागतील. यदाकदाचित राज्याराज्यांमध्ये आणि देशादेशांमध्ये पाण्याच्या वापरावरून संघर्ष उद्‌भवले तर ते सोडवण्याचे काम केंद्र सरकारलाच करावे लागेल. राज्यसरकार हे काम करू शकणार नाही. तेव्हा पाणी हा विषय केंद्रीय सरकारच्या अखत्यारीत असणे गरजेचे आहे. अशी अत्यंत दूरदृष्टीची भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतली होती. देशाच्या पाण्याचा इतका दूरगामी व सर्वंकष विचार फार कमी लोकांनी केला.**

# जलनीतीचे उद्‌गाते

**अविनाश आ. चौगुले**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार. उपेक्षितांवर होत असलेला अन्याय, अत्याचार आणि नशिबी आलेले दारिद्र्य यावर मात करण्याचा त्यांचा दृढनिश्चय होता. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या विचारसरणीवर त्यांनी नवी लोकजागृती घडवून आणली. परिवर्तनाची लढाई जिंकण्यासाठी शस्त्रास्त्रांची नव्हे तर लेखणी आणि ग्रंथांची आवश्यकता आहे असे ठासून सांगितले.

डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा पाया हा मूलत: आर्थिक परिवर्तनावर तयार झाला होता. जगद्‌विख्यात 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' या संस्थेतून त्यांनी शिक्षण घेतले. सामाजिक परिवर्तनासोबत आर्थिक परिवर्तनासाठी अनेक सिद्धान्त देशासमोर मांडून त्यांची अंमलबजावणी केली.

पाणी हा नैसर्गिक स्रोत. पाण्याला जीवन म्हटले जाते. त्याचे कारणही तसेच आहे. फक्त आणि फक्त पृथ्वीतलावर पाणी असल्याने येथे 'जीवन' आहे. अन्य ग्रहांवर जीवसृष्टीचा शोध लागला नाही. अनेक संशोधनानंतर सुद्धा अन्य ग्रहांवर केवळ पाण्याच्या खुणा असलेले छायाचित्र पाहावयास मिळतात. प्रत्यक्ष पाणी नाही. भारतातील जलसंपत्ती येथील विकासाचा मुख्य पाया आहे आणि तो जसा उपकारक आहे तसा विनाशकारी आहे याचे प्रत्यंतर गेल्या अनेक वर्षात आपण अनुभवतो आहे. एका बाजूला पाण्याविना अवर्षणाच्या अस्मानी संकटांचा सामना करावा लागतो तर दुसऱ्या बाजूला पूर आणि त्सुनामी याही संकटांचा मुकाबला करावा लागतो. देशातल्या प्रमुख नद्या सांस्कृतिकदृष्ट्या पवित्र मानल्या गेल्या आहेत. तथापि, त्यांचे रौद्ररूप हे विनाशकारी आहे.

## मानवी अस्तित्वातील महत्त्वाचे घटक

जमीन आणि पाणी हे दोन घटक मानवी अस्तित्वातील अत्यंत महत्वाचे आहेत. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी या दोन्ही विषयांबाबत आपले स्पष्ट मत मांडले होते. घटना तयार करताना पाणी हा विषय केंद्र शासनाच्या अखत्यारीत ठेवावा किंवा करंट लिस्टमध्ये तरी घ्यावा अशी डॉक्टर बाबासाहेबांची भूमिका होती. संसदेमध्ये त्यांनी या विषयावर अनेकदा स्पष्टपणे आपली मते मांडली होती ती अशी...



भाकरा नांगल धरण




'जमीन आणि पाणी ही विकासाची संसाधने असली तरीही दोहोंचे गुणधर्म, वैशिष्ट्ये आणि स्वरूप निरनिराळे आहे. त्यामुळे या दोन्ही घटकांना एकत्रित न्याय आणि निकष लावता येणार नाही. जमीन स्थिर आहे ती कुठेही हलणार नाही. नैसर्गिक वा मानवी हस्तक्षेपाशिवाय तीत काहीही बदल होऊ शकत नाही. तसे पाण्याचे नाही! पाणी प्रवाही आहे. ते एका जागी राहत नाही. ते चल असल्यामुळे उतार ज्या दिशेने मिळते त्या बाजूला ते वाहून जाणार आहे त्यामुळे जमीन हा विषय जरी राज्य सरकारांच्या अखत्यारीत ठेवलेला असला तरी पाणी हा विषय मात्र राज्य सरकारांच्या अखत्यारीत ठेवता कामा नये, कारण देशातल्या बऱ्याच नद्या ह्या आंतरराज्यीय (उदा. गोदावरी, कृष्णा, गंगा, कावेरी, तापी, नर्मदा, रावी, सतलज इत्यादी) आणि आंतरराष्ट्रीय (उदा. गंगा, ब्रम्हपुत्रा, सिंधु इ.) आहेत.'

डॉ. आंबेडकरांनी मांडलेल्या नद्यांच्या पाणीवाटप भूमिकेला

आणि विचारांना त्यावेळी दुर्दैवाने कोणीही फारशी साथ दिली नाही त्यामुळे राज्यघटनेत पाणी हा विषय राज्यांच्या अखत्यारीत राहिला. त्याची फळं देशाला काय मिळाली हे आपण सारेचजण आज अनुभवत आहोत. गंगा–कावेरी जोडप्रकल्पाचा विषय असेल. महाराष्ट्र–कर्नाटक  कृष्णा पाणी तंटा असेल, महाराष्ट्र आंध्रमधील गोदावरी पाणी तंटा असेल. आजही पाणी विषयावरील गुंतागुंत कायम आहे. देशाच्या पाण्याचा इतका दूरगामी व सर्वंकष विचार फार कमी लोकांनी केला. त्यात डॉक्टर आंबेडकर सुरुवातीपासूनच अग्रभागी होते.

### व्यावहारिक शहाणपणा

देशाच्या शेती आणि उद्योग या दोन्ही महत्वाच्या आर्थिक क्षेत्रांच्या विकासासाठी अत्यावश्यक असणारी सिंचन व ऊर्जा ही दोन्ही महत्त्वाची पायाभूत क्षेत्रे विकसित करण्याचा पाया घातला गेला तो बाबासाहेबांच्या व्यावहारिक शहाणपणामुळेच. देशाच्या पाणी प्रश्नाचा दूरगामी सर्वंकष विचार डॉ. आंबेडकर यांनी सुरुवातीपासूनच केला.



१९४२ ते १९४६ या कालावधीत डॉ. आंबेडकर व्हॉईसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सदस्य असताना त्यांच्याकडे श्रम, सार्वजनिक बांधकाम, सिंचन व ऊर्जा ही खाती होती. डॉ. बाबासाहेबांना फक्त दलितांचे कैवारी, घटनाकार एवढ्या मर्यादेत न ठेवता त्यांचे राष्ट्रनिर्मितीतील योगदान अत्यंत मोलाचे आहे. विशेषत: पाण्याचे नियोजन, विद्युत ऊर्जा, धरणे आणि आर्थिक नियोजन यातील डॉ. बाबासाहेबांचे अलौकिक कार्यकर्तृत्व दुर्लक्षित राहिले आहे. २० जुलै १९४२ रोजी मंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर पाणी आणि वीज यासंबंधी देशात तीन प्रशासकीय विभाग अस्तित्वात होते. ही बाब बाबासाहेबांना खटकली. ते विभाग – सेंट्रल बोर्ड ऑफ इरिगेशन, इरिगेशन ॲडव्हायजर आणि इलेक्ट्रिकल कमिशनर परंतु या आस्थापनांची रचना ही देशाच्या वाढत्या


दामोदर नदीवरील धरण



लोकसंख्या व गरजांच्या पुर्ततेसाठी अत्यंत अपुऱ्या होत्या. प्रामुख्याने पाणी व वीज हे दोन घटक विकासाच्या वाढीचे महत्त्वाचे आहेत. डॉ.आंबेडकरांनी मर्यादित अधिकार असलेल्या तीन प्रशासकीय आस्थापनांच्या रचनेत आमूलाग्र बदल केले. सेंट्रल वॉटरवेज, इरिगेशन ॲन्ड नॅव्हिगेशन कमिशन आणि सेंट्रल टेक्निकल पॉवर बोर्ड या नव्या व्यवस्था निर्माण केल्या.

### जलनीतीची तीन सूत्रे

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या क्षेत्रांच्या विकासासाठी जलनीती तयार केली. ती तीन सूत्रांवर आधारीत होती.

- जलसंपत्ती विकासासाठी (Water Resource Development) नदी खोरे (पाणलोट) क्षेत्र हा आधार धरून सिंचन प्रकल्पांचे / योजनांचे नियोजन करताना बहुउद्देशीय दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे. शेती, सिंचन, पिण्यासाठी पाणी, औद्योगिक विकास योजनांसाठी, जलवाहतूक, वीजनिर्मिती अशी उद्दिष्टे असावीत.
- जलप्रकल्पांची उभारणी करण्यासाठी नदी खोरे प्राधिकरण (River Valley Authority) ही प्रशासकीय व्यवस्था असावी.
- जलसंपत्ती आणि ऊर्जा क्षेत्राच्या नियोजित विकास योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी केंद्रस्तरावर कुशल तंत्रज्ञांच्या गटाची निर्मिती करावी. उदा. सेंटर वॉटरवेज इरिगेशन ॲण्ड नॅव्हिगेशन कमिशन, केंद्रिय तांत्रिक वीज मंडळ.

### बहुउद्देशीय प्रकल्पांच्या नियोजनाचा पाया

डॉ. आंबेडकरांच्या जलनीतीचा स्वीकार सर्व संबंधितांकडून करण्यात आला. या नीतीचा फायदा देशातील नदीखोरे प्राधिकरणाच्या माध्यमातून बहुउद्देशीय प्रकल्पांच्या नियोजनाचा पाया रचला गेला. त्यातूनच दामोदर खोरे योजना, सोन नदी खोरे विकास योजना, महानदी व कोसी व इतर नदी खोरे विकास योजना (चंबल व इतर दक्षिणेकडील नद्यांवरील प्रकल्प) या योजना फलद्रुप झाल्या. या सर्व योजना पूर नियंत्रण, सिंचन, जलवाहतूक, पिण्याच्या पाणी योजना, जलविद्युत आणि इतर गरजांसाठी राबवण्यात आल्या.

दामोदर खोरे विकास महामंडळाचे लाभक्षेत्र २४२३५ चौ.मी. इतके बिहार आणि पश्चिम बंगाल या राज्यात आहे. दामोदर नदीचा उगम पश्चिम बिहार येथे झाला असून सुमारे ५४० कि.मी. बिहार राज्यातून व २५० कि.मी. पश्चिम बंगालमधून प्रवास करून कोलकात्यापासून ५० कि.मी. वर हुगळी नदीला मिळते. दामोदर नदी ही तिच्या विनाशकारी गुणधर्मांमुळे कुप्रसिद्ध होती. तिला दु:ख प्रसवणारी नदी (River of Sorrow) म्हणून ओळखले जात असे.

## हिराकूड आणि सोन नदी प्रकल्पाबाबत

महानदी ही ओरिसा प्रांतातील सर्वात मोठी नदी आहे. जुलै, ऑगस्ट १९४३ मध्ये महापुराने हाहाकार माजला. महानदीच्या खोऱ्यातील लोकांना वर्षातून आळीपाळीने महापूर, पाणीटंचाई व दुष्काळाचा सामना करावा लागत असे. आरोग्य, दळणवळणाच्या असुविधा, गरीबी, दारिद्र्याच्या समस्या, प्रचंड जलसंपत्तीचा स्रोत असूनसुद्धा नियोजना अभावी दयनीय अवस्था होती. अमेरिकेतील मिसौरी, मियानी आणि टेनेसी नद्यांच्या भागांत अशाच समस्या होत्या. डॉ. बाबासाहेबांनी अमेरिकेतील या खोऱ्यांतील विविध उपाययोजनांचा अभ्यास केला. नद्यांना ठिकठिकाणी बांध बांधून पाणी अडवणे, ज्यायोगे मातीचे कायमस्वरूपी संवर्धन होईलच. पाण्याचेही संवर्धन होईल आणि हे प्रकल्प बहुउद्देशीय केले. महानदीवरील हिराकूड धरणाचा ३,२४,००० हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ झाला. ५० मेगावॅट वीजनिर्मिती झाली. हिराकूड धरण जगातील सर्वात मोठे धरण ठरले. सिलोनच्या क्षेत्रफळाच्या दुप्पट क्षेत्र एका प्रकल्पाचे जलाशय आहे. हिराकूड धरण १९५७ मध्ये पूर्ण झाले आणि ओरिसा राज्य वैभवसंपन्न व सशक्त झाले याचे सर्वस्वी श्रेय डॉ.आंबेडकरांच्या दूरदर्शी नेतृत्वाला आहे.


हिराकुड नदीवरील धरण

बिहार राज्यातील मातीची प्रचंड धूप करून बंगालमध्ये पुराचे थैमान घालीत असे आणि या दोन्ही राज्यात जीवित व वित्तीय नुकसान करीत असे. दरवर्षी अचानकपणे आलेल्या पुरामुळे दोन्ही राज्यांचे न भरुन येणारे नुकसान होत असे. तेथील सरकारला दरवर्षी पूरबाधित क्षेत्र सुधारणेसाठी विविध उपाययोजनांसाठी प्रचंड आर्थिक तरतूद करावी लागत असे. १९४३ च्या विनाशकारी महापुराने कोलकाता शहराशी देशाच्या इतर भागातून रस्ते व रेल्वे या दोन्हींचा संपर्क पूर्णतः तुटला होता आणि नेमकी हीच गोष्ट डॉ.बाबासाहेबांसमोर राष्ट्रीय आपत्ती म्हणून कथन केली गेली. बंगाल सरकारने या विनाशकारी पुराबाबत चौकशी समितीची नेमणूक केली. या समितीने केलेल्या मर्यादित शिफारशीत डॉ.बाबासाहेबांनी केवळ पूर नियंत्रणासाठी उपखोऱ्यातील छोट्या छोट्या नद्यांवर धरणे बांधून पाणी अडविण्याबरोबरच त्या भागातील जंगल व मातीचे संवर्धन करण्याच्या विविध योजना सुचवल्या. महत्त्वाकांक्षी व बहुउद्देशीय अशा मोठ्या प्रकल्पांची रचना करण्यासाठी अमेरिकेतील टेनेसी व्हॅली योजनेचा संपूर्ण स्वत: अभ्यास केला. धरणाच्या संकल्पना, धरणाचे प्रकार स्वत: अभ्यासले. त्यासंबंधीचे सर्व तंत्रज्ञान समजावून घेतले.


सोन नदीवरील धरण

सोन नदी खोरे प्रकल्प हा असाच बहुउद्देशीय प्रकल्प डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली पूर्ण झाला. ही नदी मध्यप्रदेशात उगम पावते आणि पुढे उत्तर प्रदेशात गंगेला मिळते. या प्रकल्पाद्वारे उत्तर प्रदेशातील औद्योगिक विकास, सामाजिक स्थिरता, जंगलांची पुर्ननिर्मिती, स्थलांतरितांचे पुनर्वसन, रस्ते आणि शाळा, अतिरिक्त सिंचन सुविधांची व्यवस्था, सहकार क्षेत्राचा विकास, खते व शेती प्रात्यक्षिक योजनांची निर्मिती, प्रांतिक आणि नगर विकास योजना मंडळांची निर्मिती केली.

## सर्वांगीण विकासात पायाभूत गोष्टींवर भर

नदी खोरे विकास योजना अंतर्गत नदीच्या लाभ क्षेत्रात सहकार क्षेत्राला चालना देण्याचे काम डॉ.आंबेडकरांनी देश स्वतंत्र होण्यापूर्वी केले होते. त्याअर्थी डॉ. आंबेडकर हे खरे सहकारमहर्षी होते.

डॉ. आंबेडकरांच्या चिंतनातून या देशातील केवळ दलितांच्या प्रश्नांची सोडवणूक केली असे नाही तर देशाच्या सर्वांगीण विकासात पायाभूत गोष्टींवर भर देऊन दीर्घकालीन विकास योजना पूर्ण करून; सामाजिक समतोल राखण्याचे काम त्यांनी केले आहे. पाण्याचा गुणधर्म समपातळीत राहणे हा आहे. डॉ. आंबेडकरांनी पाण्याच्या या गुणधर्माचा स्वत:च्या कार्यकौशल्याने वापर करून समस्त समाज व्यवस्था विकास योजनांच्या माध्यमातून समपातळीत ठेवण्याचे ऐतिहासिक कार्य केले.

**अभियंता, शाखा अभियंता, पाटबंधारे संशोधन व जलनिस्सारण उपविभाग, सांगली**

**गरीब व मागास जनतेचे कल्याण हाच प्रमुख उद्देश समोर ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विद्युत आणि जल क्षेत्राच्या विकासासंदर्भात दूरदृष्टीची मते मांडली. त्यांच्या मताचा भारताच्या जल आणि विद्युत धोरणावर मोठा प्रभाव पडल्याचे दिसून येते.**



# ऊर्जाशक्तीला चालना

**डॉ. जी.एस.कांबळे**

१९४२ साली व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळात डॉ. आंबेडकर यांची श्रममंत्री म्हणून नियुक्ती झाली. याशिवाय जल आणि ऊर्जा विभागाची जबाबदारीही त्यांच्यावर सोपवण्यात आली. त्यानंतर डॉ. आंबेडकरांनी १९४२ ते १९४६ या कालखंडात भारतातील जल व्यवस्थापन तसेच ऊर्जा निर्मिती संदर्भात दिशादर्शक आणि धोरणात्मक निर्णय घेतले. केंद्रीय वीज प्राधिकरणाची स्थापना नोव्हेंबर १९४४ मध्ये करण्यात आली. या प्राधिकरणामार्फत देशाचे वीजधोरण निश्चित केले जाते.

## विद्युत विकास

पुनर्रचना समितीच्या अंतर्गत असणारी धोरण समिती म्हणजेच विद्युत विकासासाठीची अधिकृत समिती होती. या धोरण समितीची स्थापना सप्टेंबर १९४३ साली झाली. डॉ. आंबेडकर या समितीचे अध्यक्ष होते. त्यानंतरच्या दोन वर्षांच्या कालावधीत डॉ. आंबेडकर यांनी व त्यांच्या श्रम खात्याने वीज निर्मितीच्या प्रश्नाचा सखोल अभ्यास केला. विजेची निर्मिती, उत्पादन व पुरवठा यासंदर्भात डॉ. आंबेडकरांनी महत्त्वाची व सक्रिय भूमिका मांडली. या समितीच्या २५ ऑक्टोबर १९४३ रोजी झालेल्या पहिल्या बैठकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, 'वीजनिर्मिती, वितरण आणि व्यवस्थापन यासंदर्भातील प्रश्नांचा अभ्यास करणे आणि भविष्यकालीन धोरणासंदर्भात केंद्र सरकारला मार्गदर्शन करणे ही समितीची प्राथमिक उद्दिष्टे आहेत. वीज खासगी असावी की सरकारी, वीज खासगी असल्यास सार्वजनिक हितासाठी कोणत्या अटी घालाव्या, वीज विकासाची व वितरणाची जबाबदारी केंद्राची असावी की राज्याची यासह या समितीने मार्गदर्शन करावे.'



या समितीत झालेल्या चर्चेच्या आधारे श्रम खात्याने अंतिम मसुदा तयार केला. त्यानुसार अखिल भारतीय स्तरावर केंद्रीय तांत्रिक ऊर्जा मंडळ स्थापन करण्याचा निर्णय झाला. प्रांतीय सरकारांशी चर्चा करून भारत सरकारने ८ नोव्हेंबर १९४४ रोजी केंद्रीय तांत्रिक ऊर्जा मंडळाची स्थापना केली.

धोरण समितीच्या २ फेब्रुवारी १९४५ रोजी झालेल्या दुसऱ्या बैठकीमध्ये डॉ. आंबेडकर म्हणाले की, अशा प्रकारे उच्चस्तरीय मंडळ स्थापन करून केंद्र सरकार हे या मंडळास प्रबळ अशी तांत्रिक संघटना बनवण्यास किती महत्त्व देते हे स्पष्ट होते. या मंडळाकडून वीज निर्मिती व विकासाच्या योजना राज्य व प्रांतिक सरकारच्या साहाय्याने निश्चित केल्या जातील. तसेच माहिती संकलन, सर्वेक्षण करणे, नव्या संकल्पना राबवणे हे कार्यदेखील मंडळाचे असेल. या मंडळाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे सार्वजनिक वीजपुरवठ्याची योजना राष्ट्रीय स्तरावर सर्वांनी स्वीकारावी यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार, प्रांतिक सरकारे यांना मार्गदर्शन करण्याचे आहे. हे मंडळ विद्युत विकासासाठी आवश्यक ती पाहणी करणे, माहिती संकलित करणे व राज्य आणि प्रांतिक सरकारांच्या साहाय्याने वीज विकासाच्या योजना तयार करणे यासाठी तांत्रिकदृष्ट्या सक्षम आहे. सध्या जे केंद्रीय ऊर्जा प्राधिकरण आहे त्याची सुरुवात १९४४ साली स्थापन झालेल्या केंद्रीय तांत्रिक ऊर्जा मंडळातून झाली याची अनेकांना कल्पना नसेल. कारण, नंतरच्या काळात या मंडळाच्या नावात व संघटनात्मक रचनेत वारंवार बदल झाले.

## पाणी अभावामुळे अधिक त्रास

भारतात १९४२ पूर्वीच्या जलधोरणात अतिरिक्त पाणी हीच मुख्य समस्या म्हणून विचारात घेण्यात आली होती. त्यात सुचवलेली उपाययोजना केवळ पूरनियंत्रण या एकाच बाबीचा विचार करणारी होती. डॉ. आंबेडकरांनी सांगितले की, भारतीय लोक अतिरिक्त पाण्यापेक्षा, त्याच्या अभावामुळे अधिक त्रास सहन करीत आहेत. जल ही संपत्ती असल्याने तिचे वाटप करण्याचे सर्वंकष आणि सर्वसमावेशक धोरण असले पाहिजे. नदीकिनारे बंदिस्त करण्याच्या संदर्भात त्यांनी स्पष्टपणे सांगितले की,'जनतेच्या भल्यासाठी जर पाण्याचे जतन व संवर्धन करणे अत्यावश्यक असेल तर नदीकिनारे बंदिस्त करण्याचा विचार गैर ठरतो. या संदर्भात विकसित देशांनी स्वीकारलेला मार्गच योग्य आहे आणि तो म्हणजे विविध ठिकाणी पाण्याचे जतन करणे तसेच त्याचा बहुउद्देशीय वापर करणे. धरणे बांधून पाण्याचा वापर सिंचनाशिवाय विद्युतनिर्मिती व नौकानयनासाठी (जल वाहतूक) होऊ शकतो'.


**विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, सोलापूर विद्यापीठ.**
**संपर्क : ०९८५०२४८०९४**

**डॉ. संभाजी खराट**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तत्कालीन मुंबई विधिमंडळात आणि संसदेमध्ये जी मोलाची कामगिरी केली त्याची दखल राजकीय इतिहासकारांनी घेतलेली आहे. आमदार, खासदार आणि मंत्री म्हणून त्यांनी समाजातील उपेक्षित घटकांसाठी केलेले कार्य वाखाणण्याजोगे आहे. डॉ. आंबेडकर यांची सामाजिक न्यायाची भूमिका पाहून मुंबईच्या गव्हर्नरांनी त्यांना १९२६ मध्ये मुंबई लेजिस्लेटिव्ह कौंसिलवर घेतले. या पदावर ते १९३४ पर्यंत होते. या काळात त्यांनी जमीन महसूल, राज्याचे अबकारी धोरण, बजेट, शिक्षण या विषयांवर असेंब्लीत सविस्तर भाषणे दिली. याच काळात त्यांनी शेतकरी आणि कामगार वर्ग यांच्या कल्याणासाठी आणि अस्पृश्यांसाठी विविध कायद्याचे मसुदे प्रस्तावित केले. त्यातील बहुतांशी मंजूर झाले. आपल्या पहिल्याच कारकिर्दीत डॉ. आंबेडकरांनी आपला प्रभाव पाडला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे उत्तम प्रशासक व संसदपटू होते. अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून उत्तम प्रकारे काम करून घेण्याची हातोटी त्यांच्याकडे होती. त्यांच्या कामाच्या झपाटलेपणामुळे कामगारांसाठी अनेक कायदे झाले. धोरणे झाली. जलऊर्जा धोरण झाले. भारतीय घटना झाली. या देशातील जनतेसाठी कल्याणासाठी कायदे झाले. प्रशासन कसे चालवावे. प्रशासनात कोणत्या अडचणी आहेत हे ते समजून घेत, त्यांच्यावर ज्या ज्या जबाबदाऱ्या सोपवल्या त्यात त्यांनी कुशलतेने काम करून दाखवले. प्रारंभी मुंबई विधिमंडळात व त्यानंतर संसदेमध्ये त्यांनी केलेली कामगिरी ही अप्रतिम ठरली.**

# उत्कृष्ट संसदपटू आणि शिस्तप्रिय प्रशासक



भारतीय संसदेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर

### कामगारहिताला प्राधान्य



कामगार मंत्री असताना केंद्र शासनातील पदांपैकी ५ ते ६ टक्के पदे अस्पृश्यांकरिता राखीव ठेवण्यात बाबासाहेबांना यश आले. परदेशात तांत्रिक शिक्षण घेण्यास उत्सुक असणाऱ्या अस्पृश्य विद्यार्थ्यांनाही त्यांनी साहाय्य केले. ते कामगार-सदस्य असतानाच्या कालावधीत सेवायोजन कार्यालयांची उभारणी झाली. वेगवेगळ्या योजनांखाली प्रशिक्षण घेणाऱ्या कुशल आणि अर्धकुशल कामगारांना आणि तंत्रज्ञांना सेवेची नवीन क्षेत्रे मिळावीत आणि रोजगाराच्या नवीन संधी मिळाव्यात यासाठी ही केंद्रे होती. त्याचा लाभ हजारो तरुणांना झाला.

कामगार मंत्री असतानाच डॉ. आंबेडकर यांनी लोकशाहीला पोषक आणि उद्योग क्षेत्रात सुसंवाद निर्माण करतील अशा कित्येक नव्या योजना सुरू केल्या. कर्मचारी आणि सेवायोजक यांच्यातील प्रश्न सोडवण्यासाठी त्रिपक्षीय पद्धतीचा त्यांनी प्रथम अवलंब केला. केंद्रीय क्षेत्रातील उद्योगांमध्ये कामगार कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी तसेच कामगार कल्याणाकडे लक्ष देण्यासाठी आणि औद्योगिक तंटे मिटवण्यासाठी कामगार प्रशासन स्थापन करण्यात आले होते. त्यांच्या या पदावधीच्या शेवटी प्रस्तुत करण्यात आलेले पण महत्त्वाचे कामगारविषयक विधिविधान म्हणजे किमान वेतन बिल हे होते. या नवीन उपक्रमामुळे आणि कामगारांच्या हितासाठी अनेक नव्या कायद्यांमुळे डॉ. आंबेडकरांची प्रशंसा करण्यात आली. त्यांनी मंत्रिपदांच्या कारकिर्दीत कामगारांसाठी त्यांनी अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या.

डॉ. आंबेडकरांचे कायद्याचे सूक्ष्म ज्ञान, विद्यापीठांच्या त्यांच्या उच्च पदव्या, त्यांची प्रशासनिक कार्यक्षमता आणि त्यांचे कौशल्य लक्षात घेऊन त्या वेळेच्या व्हॉईसरायने १९४२ मध्ये त्यांना डिफेन्स कौन्सिलचे सभासद करून घेतले. त्यानंतर त्यांच्याकडे कामगार खाते देण्यात आले. जून, १९४६ पर्यंत त्यांच्याकडेच ते होते. हा कालावधी अत्यल्प असला तरी तो कामगार कायद्याच्या दृष्टीने आणि कामगार कल्याण योजनांच्या दृष्टीने या देशाच्या इतिहासात निर्णायक ठरला.



१९३६ मध्ये डॉ. आंबेडकरांनी इंडिपेंडण्ट लेबर पार्टी या संघटनेची स्थापना केली. १९३५ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टच्या तरतुदींनुसार १९३६ मध्ये लोकप्रतिनिधींच्या कायदेमंडळासाठी देशभर सार्वजनिक निवडणुका घेण्यात आल्या. त्या वेळी त्यांनी मुंबईतील लढवलेल्या १७ जागांपैकी इंडिपेंडण्ट लेबर पार्टीला १५ जागा मिळाल्या. मुंबई विधानसभेमध्ये त्यांनी आपले काम उत्कृष्ट केले आणि आपण एक मुरलेले संसदपटू आहोत हे दाखवून दिले.

### मोजक्या शब्दात अर्थसंकल्पाची वैशिष्ट्ये

मुंबईच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये अर्थसंकल्पावर डॉ. आंबेडकरांची दरवर्षी भाषणे होत. मोजक्या शब्दांत अर्थसंकल्पाची वैशिष्ट्ये ते फार प्रभावीपणे मांडत. त्यातील गूढ बाबींवर टीका टिप्पणी करीत. फेब्रुवारी, १९३९ च्या अर्थसंकल्पावर त्यांनी एक प्रदीर्घ भाषण केले. त्यावरील आपले स्पष्ट व चिकित्सक विचार मांडले. साऱ्या सदनाचे लक्ष डॉ. आंबेडकरांच्या विद्वत्तेकडे आणि त्यांच्या वक्तृत्वाकडे वेधले होते. आपल्या संसदीय भाषणांमध्ये त्यांनी प्राथमिक व विद्यापीठीय शिक्षण, औद्योगिक विवाद, दारूबंदी, भाषावार प्रांतरचना, मंत्र्यांचे पगार व भत्ते, दुसऱ्या जागतिक महायुद्धातील भारतीय सहभाग या सर्व विषयांवर आपले विचार अत्यंत मुद्देसूदपणे मांडले होते. शिक्षणाच्या, विशेषकरून मुलींच्या शिक्षणाच्या मंदगतीबद्दल बोलताना ते म्हणाले, 'या गतीने गेल्यास शालेय वयोगटातील सर्व मुलींना शिक्षण मिळण्यास अजून ३०० वर्षे थांबावे लागेल. दलित वर्गाला अत्यंत वाईट अशा सामाजिक परिस्थितीत आयुष्य कंठावे लागते.' अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांनी ग्रामीण जीवनाचे प्रश्न मोठ्या पोटतिडकीने मांडले होते. तत्कालीन मुंबई विधिमंडळात त्यांनी केलेली चर्चा, भाषणे ही अत्यंत गाजली. उत्तम वक्ता, आक्रमक शैली, संदर्भासह विषयाची मांडणी यामुळे ते उत्तम संसदपटू ठरले. त्या काळात मुंबई विधिमंडळातील ते एक प्रचंड मोठे आणि आदरणीय व्यक्तिमत्त्व होते.

### हिंदू कोड बिल

डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य आणि हिंदू स्त्रिया यांची हलाखीची स्थिती पाहिली होती. त्यांच्या स्थितीमध्ये काही सुधारणांद्वारे बदल घडवून आणावा असे त्यांना वाटत होते. ही गोष्ट डोळ्यांसमोर ठेवून त्यांनी हिंदू कोड बिलाचा मसुदा तयार केला आणि संसदेपुढे ४ फेब्रुवारी, १९५१ रोजी तो प्रस्तुत केला. काही सुधारणा घडवून आणाव्यात आणि हिंदू कायद्याच्या काही शाखांचे संहितीकरण करावे, हा या बिलाचा उद्देश आहे हे त्यांनी स्पष्ट


केले. अशा रीतीने स्वतंत्र अशा भारतीय संघराज्याचे विधीमंत्री म्हणून त्यांनी पुराणमतवादी, संकीर्ण आणि अन्याय्य अशा हिंदू कायद्याला एका प्रागतिक कायद्याचे रूप देण्याचा पहिला प्रयत्न केला. हा त्यांचा प्रयत्न परिपूर्ण आणि प्रशंसनीय असला तरी शेवटास गेला नाही. कारण मंत्रिमंडळातील त्यांच्याच सहकाऱ्यांनी प्रचंड विरोध केला. शेवटी या बिलाला कायद्याचे स्वरूप आले नाही. त्यांच्या आयुष्यात आलेले मोठे अपयश होते. यांचे दु:ख ते महापरिनिर्वाणापर्यंत विसरू शकले नाहीत.

विधिमंत्री या नात्याने डॉ. आंबेडकरांनी अंतरिम संसदेपुढे ९ मे, १९५१ रोजी प्रस्तुत केलेले लक्षणीय विधिविधान म्हणजे १९५० चे लोकप्रतिनिधी बिल. इतर गोष्टींबरोबरच यात संसदेच्या आणि राज्य विधानसभेच्या मुक्त निवडणुकीची तरतूद केली होती. निवडणुकीतील गैर आणि अवैध प्रकार त्याचबरोबर सदस्यविषयक अर्हता आणि अनर्हता या बिलामध्ये स्पष्ट करण्यात आली होती.

त्यांची उत्तरे मुद्द्याला धरून व स्पष्ट शब्दात असत. डॉ. आंबेडकर व्यक्तिमत्त्व किती मोठे होते, ते कसे अभ्यासू संसदपटू होते व उत्तम प्रशासक होते, याची कल्पना श्री. मावळणकर यांच्या विधानावरून लक्षात येते. व्हाईसरायच्या मंत्रिमंडळात कामगार, ऊर्जा, रोजगार, सार्वजनिक बांधकाम, जलनियोजन, खनिज मंत्री आणि पं. नेहरूंच्या मंत्रिमंडळात कायदा मंत्री म्हणून त्यांनी जी मोठी कामगिरी केली ती ऐतिहासिक ठरली. विविध खात्यांची जबाबदारी स्वीकारताना नवनवीन कल्पना मांडून कायदे करणे, विधेयके मांडणे, विविध जागतिक संदर्भ सांगणे ही सोपी गोष्ट नव्हे. डॉ. आंबेडकर स्वत: उत्तम प्रशासक असल्यानेच ते सारे करू शकले. आपल्या मंत्रालयातील अधिकाऱ्यांकडून व कर्मचाऱ्यांकडून उत्तम प्रकारे काम करून घेण्याची हातोटी त्यांच्याकडे होती. अतिशय शिस्तप्रिय असलेले डॉ. आंबेडकर स्वत: मेहनत घेत. अधिकाऱ्यांसोबत चर्चा करीत. उशिरापर्यंत बैठका घेत. या सर्व

### घटना तयार करण्यासाठी परिश्रम

बाबासाहेब प्रथम बंगालमधून आणि नंतर मुंबईतून घटना समितीवर निवडले गेले. तोपर्यंत एक राष्ट्रीय पुढारी, घटनातज्ज्ञ आणि संसदपटू या नात्यांनी त्यांचा लौकिक पसरला होता. २९ ऑगस्ट, १९४७ रोजी त्यांची मसुदा समितीवर नियुक्ती झाली. नंतर ते त्या समितीचे अध्यक्ष म्हणूनही निवडले गेले. मसुदा समितीची पहिली बैठक डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली ३० ऑगस्ट, १९४७ रोजी झाली. डॉ. आंबेडकर आणि समितीच्या बैठका एकूण १४१ दिवस झाल्या.




त्यांनी घटनेचा कच्चा मसुदा तयार केला. या सर्व कालावधीमध्ये डॉ. आंबेडकर यांनी एकट्यानेच बरेच काम केले. घटना म्हणजे केवळ कायदेशीर दस्तऐवज नाही तर तो लक्षावधी लोकांच्या आशाआकांक्षांचा, त्यांच्या वेदनांचा, त्यांच्या गरजा आणि प्रेरणा यांचा, एक सामाजिक आणि आर्थिक लेखाजोखा आहे, हे डॉ. आंबेडकरांना माहिती होते. भारतीय संघराज्यासाठी एक संसदीय पद्धतीची राज्यघटना तयार करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी प्रचंड परिश्रम घेतले.

पंडित जवाहरलाल नेहरू आणि त्यांचे विविध विषयांवर मतभेद झाल्यामुळे डॉ. आंबेडकर यांनी २५ सप्टेंबर, १९५१ रोजी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यांच्या राजीनाम्याचे प्रमुख कारण हिंदू कोड बिलाला झालेला विरोध असे सांगितले जाते.

### अभ्यासू संसदपटू

डॉ. आंबेडकर यांच्या संसदेतील कामगिरीबद्दल लोकसभेचे अध्यक्ष राहिलेले श्री.जी.व्ही. मावळणकर म्हणतात, दिल्लीमध्ये असताना त्यांचे लोकसभेतील उत्कृष्ट काम मला चांगले आठवते. डॉ.आंबेडकर आपल्या अद्ययावत वेषभूषेत असत आणि सभागृहात बोलताना किंवा प्रश्नांची उत्तरे देताना तयारीने बोलत असत. आवश्यक तो सारा पुरावा त्यांच्याजवळ असे. त्यांचा आवाज मोठा व स्पष्ट होता. भाषाशैली शुद्ध आणि स्वच्छ होती. ते आत्मविश्वासाने बोलत आणि ऐकणाराला त्यांचा धाक वाटत असे. त्यांची मते ढिसाळ नसत आणि दृष्टिकोन स्पष्ट असे. बोलताना ते चिकित्सकपणे बोलत व ऐकणाऱ्याला ते मनोमन पटत असे. आपल्या विरोधकांचा मुद्दा खोडून टाकायची संधी ते वाया घालवत नसत. स्वत:चे म्हणणे ते आकर्षक रीतीने व पटेल अशा पद्धतीने मांडत. प्रश्नोत्तराच्या तासात त्यांचे सर्व कौशल्य दिसून येत असे.

त्यांच्या कामाच्या शैलीमुळे कामगारांसाठी अनेक कायदे झाले. धोरणे झाली. जलऊर्जा धोरण झाले. भारतीय घटना झाली. देशातील जनतेच्या कल्याणासाठी कायदे झाले. प्रशासन कसे चालवावे. प्रशासनात कोणत्या अडचणी आहेत हे ते समजून घेत. प्रशासनात कशा सुधारणा करायच्या याची त्यांना जाण होती. त्यामुळे ते प्रशासनाला एक प्रकारची चांगली शिस्त लावू शकले.

एवढेच नव्हे तर प्रशासकीय रचना कशी असावी. प्रशासकीय सभ्यता व संकेत कसे पाळले जावे. अधिकाराचा वापर कसा करावा अशा अनेक बाबतीत त्यांची भूमिका हेडमास्तरांची होती. ती खरोखरच योग्य आणि काळानुरूप होती. म्हणूनच त्यांच्यावर ज्या ज्या जबाबदाऱ्या सोपवल्या त्यात त्यांनी कुशलतेने काम करून दाखवले. प्रारंभी मुंबई विधिमंडळात व त्यानंतर संसदेमध्ये त्यांनी केलेली कामगिरी ही अप्रतिम ठरली. संसद सदस्य आणि मंत्री म्हणून त्यांनी लोकसभा आणि राज्यसभेत आक्रमक शैलीत अभ्यासपूर्ण भाषणे केली. विरोधकांना उत्तरे दिली आणि अनेक चर्चांमध्ये भाग घेतला; त्यामुळे ते दोन्ही सभागृहात सदस्यांचे आवडते संसदपटू ठरले.

**वरिष्ठ सहायक संचालक**

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आज भारतात व संबंध देशात अतिशय उत्साहाने साजरी करण्यात येते. मात्र या जयंतीची सुरुवात पहिल्यांदा पुणे शहरात जर्नादन सदाशिव रणपिसे यांनी १४ एप्रिल १९२८ रोजी सुरू केली. महामानवाच्या जयंती दिनाच्या जनकाविषयी या लेखात माहिती देण्यात आली आहे.**

# बाबासाहेबांची जयंती कधी आणि कोणी सुरू केली?

जुन्या काळातील एक थोर सामाजिक कार्यकर्ते जनार्दन सदाशिव रणपिसे यांच्या जन्म सासवड येथे २४ ऑगस्ट १८९८ मध्ये झाला. ज्या काळात शिक्षणाच्या सोयी वा सवलती उपलब्ध नव्हत्या त्या काळात पुणे जिल्ह्यातील दलित समाजातील ते पहिले मॅट्रिक्युलेट झाले यातच त्यांचा मोठेपणा आहे! मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर त्यांनी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये दोन वर्षे अभ्यास केला. १९१८ ते २१ साली त्यांनी सन्मार्ग दर्शक मंडळाची स्थापना करून सामाजिक सभा, संमेलने, मौलिक व्याख्याने, नाटके, प्रौढांकरिता रात्रीचे वर्ग चालवले. सोबतच व्यायामशाळा काढून तरुण सुशिक्षितांमध्ये नवचैतन्य निर्माण केले.

महार सेवादलाची त्यांनी स्थापना केली. तिचे ते कमांडर इन चीफ बनले. राजकारण जास्त केले नाही, परंतु सामाजिक कार्याचे ते अर्ध्वयू होते. समाजकार्यात त्यांचा मोठा वाटा आहे.



जनार्दन सदाशिव रणपिसे

पुण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानपत्र, तीन हजार रुपये प्रेस फंड, पाच हजार रुपये इमारत फंड जमवण्यात त्यांचा मोठा वाटा होता. पुण्यात युवक परिषद भरवली गेली ती पुणे जिल्ह्याकरिता किंवा शहरासाठी नव्हती. त्यात संबंध महाराष्ट्रातील प्रतिनिधी आले होते. १९३९ साली कायदे मंडळात चौदाही प्रतिनिधी निवडून गेले. त्याचे श्रेय भाऊसाहेब रणपिसे यांचेकडे ओघानेच जाते.

महात्मा गांधी यांनी पुण्यात उपवास केला त्यावेळी बाबासाहेबांचा मुक्काम नॅशनल हॉटेलमध्ये होता. त्या वेळी रणपिसे यांनी मोलाची कामगिरी बजावली. विशेष म्हणजे ते त्या वेळी सरकारी नोकरी करीत होते. अशा तऱ्हेने ते एक प्रकारची समाजसेवा करीत होते. आपले शरीर सुदृढ ठेवले. आयुष्यात कोणतेही व्यसन केले नाही.

जुन्या चालीरितीविरुद्ध रणपिसे यांनी मोठी चळवळ केली हे पाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या कार्याला नारायणगाव येथील परिषदेत पाठिंबा दिला होता यावरून त्यांच्या कार्याची कल्पना येते. बाबासाहेबांना रणपिसे यांनी जी मदत केली ती पुण्यात कोणीही केली नाही. राजकीय भूमिकेवरून ते बाबासाहेबांचे पुण्यातील उजवे हातच होते. दीर्घोद्योग, चिकाटी, निर्भयपणा, स्वीकारलेल्या कार्याची अखंड तळमळ, निस्वार्थीपणा, मधुर वाणी यामुळे त्यांनी सर्वांचीच मने आपल्याकडे खेचून घेतली होती.

## पहिली जयंती

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पहिला वाढदिवस पुण्यात प्रथमच १४ एप्रिल १९२८ रोजी रणपिसे यांनी साजरा केला इतकेच नव्हे तर या जन्मदिवस समारंभाचे ते जणू शिल्पकार ठरले. बाबासाहेबांच्या जयंतीची प्रथा त्यांनीच सुरू केली. खडकी पत्र विभाग दलित मंडळाचे अध्यक्ष असताना जयंतीचे औचित्य साधत त्यांनी बाबासाहेबांची प्रतिमा हत्तीच्या अंबारीत ठेवून प्रभात फिल्म कंपनीच्या रथातून, उंटावरून प्रचंड मिरवणुका काढल्या होत्या. यानंतर खडकी भागात प्रत्येक वस्तीत आंबेडकरांची जयंती साजरी होऊ लागली. या सर्व वस्त्यांचे भाऊसाहेबांनी एकीकरण घडवून दलित मंडळाची स्थापना केली. या मंडळातर्फे आंबेडकरांची जयंती भव्य प्रमाणात साजरी केली.

## जुन्या चालीरितीविरुद्ध चळवळ

समाजातील अनीती व जुन्या चालीरितीविरुद्ध रणपिसे यांनी पुण्यात मोठी चळवळ उभारून सामाजिक व शैक्षणिक कार्य केले. 'धम्मपद' या बौद्ध ग्रंथात म्हंटले आहे की, 'फुलांचा सुगंध वाऱ्याच्या उलट दिशेला जात नाही. परंतु थोर पुरुषांचा सुगंध वाऱ्याच्या उलट दिशेलाही जातो.' पुण्यात एक काळ असा होता की, रणपिसे यांच्याशिवाय पान हलले जात नव्हते एवढी त्यांची अफाट लोकप्रियता होती. प्रपंचाच्या, नोकरीचा भार पेलत त्यांनी मिळालेल्या वेळेचा उपयोग समाजसेवा करण्यात घालवला. १९१८ पासून त्यांनी सामाजिक कार्याला वाहून घेतले. तो काळ पाहता कोणतीही नवी सुधारणा घडवून आणणाऱ्या व्यक्तीला जनतेकडून त्या काळी कडवा विरोध होत होता. तरीही त्या विरोधाला न जुमानता त्यांनी आपले कार्य अव्याहतपणे केले होते. २४ ऑगस्ट १९५८ रोजी रणपिसे यांच्या ६० व्या वाढदिवसानिमित्त मित्रमंडळीने पुणे शहरात त्यांचा भव्य सत्कार समारंभ घडवून आणला होता. त्यात ठ.रा. पाडळे, ए.एस. कांबळे, जे.एस. भाऊसाहेब रणपिसे, वि.रा. रणपिसे (संपादक 'बोधिसत्त्व'), रा.तु. कांबळे, डी.टी. कांबळे, के.डी. भोसले आदी मान्यवरांचा समावेश होता. भाऊसाहेबांनी विद्यार्थ्यांसोबतच अस्पृश्यवर्गाची जी बहुमोल सेवा केली त्याबद्दल संपूर्ण आंबेडकरी समाज त्यांचा सदैव ऋणी राहील यात शंका नाही. त्यांचा आदर्श आजच्या तरुणवर्गाने आपल्या डोळ्यासमोर सतत ठेवला पाहिजे. अखंडपणे चाळीस वर्षे त्यांनी समाजकार्याला वाहून घेतले होते.

(**मिलिंद मानकर,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आठवणींचे ज्येष्ठ संग्राहक)

**भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजबांधवांच्या सामाजिक उत्थानासाठी महान संदेश दिला. समाजाला दीपस्तंभाप्रमाणे अनमोल मार्गदर्शन केले. स्वाभिमानाचा स्फुल्लिंग चेतविला. ज्या खुर्चीवर आसनस्थ होऊन बाबासाहेबांनी समाजप्रबोधन केले त्या खुर्च्यांचा चिरस्मरणीय स्मृतिगंध आजही आसमंतात दरवळत आहे.**

# महामानवाचा स्मृतिगंध

**मिलिंद मानकर**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतात जेव्हा अस्पृश्यता निवारणार्थ सामाजिक क्रांतीचे रणशिंग फुंकले तेव्हा देशाच्या कानाकोपऱ्यांतून अनेक शूर, धाडसी, कर्तृत्ववान तरुण कार्यकर्ते त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. काही जणांना दीर्घ सहवास लाभला तर काही जणांनी स्मृती म्हणून बाबासाहेबांच्या दैनंदिन वापरातील वस्तू आयुष्यभर जतन केल्या. बाबासाहेबांचा कोट, काठी, पुस्तक, खुर्च्या या वस्तू त्यांच्यासाठी खरे म्हणावे तर 'जीव की प्राण' ठरल्या.



## पुनीत झालेल्या खुर्च्या

बाबासाहेबांच्या हस्तस्पर्शाने पुनीत झालेल्या खुर्च्या वाशिंद बुद्ध विहार, राजगृह मुंबई, चंद्रोदय वाचनालय महू, सिद्धार्थ बुद्ध भवन महाविद्यालय मुंबई, मिलिंद महाविद्यालय औरंगाबाद, शांतिवन चिचोली, बौद्धजन पंचायत समिती सभागृह परेल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्युझियम ॲण्ड मेमोरियल पुणे या ठिकाणी आणि इतरत्र पाहावयास मिळतात. खुर्च्यांच्या पावन दर्शनाने मन सुखावून जाते. बाबासाहेबांच्या खुर्चीचे हृदयस्पर्शी प्रसंग आजही मानवी मनाला प्रेरणा देतात.

डॉ. बाबासाहेबांनी १९३० ते १९३८ या काळात शहापूर येथील कनिष्ठ स्तर न्यायालयात वकिलीचा व्यवसाय केला होता. त्या वेळी मुकुंद रामचंद्र मलबारी व गोदावरी मुकुंद मलबारी यांच्या वासिंद येथील निवासस्थानी बाबासाहेबांचे अधूनमधून वास्तव्य असायचे. या भेटीत बाबासाहेब ज्या खुर्चीवर आवर्जून बसत, ती खुर्ची मलबारी यांनी शेवटच्या श्वासापर्यंत मोठ्या आदरभावाने जोपासली. ती खुर्ची मलबारी कुटुंबाने आता वाशिंद बुद्धविहाराला दान दिली आहे.

डॉ. बाबासाहेब हे समाजसुधारक होते. समता, बंधुत्वाचे ते प्रगाढ उपासक होते. उच्च किंवा नीच असा भाव नव्हता. जातीय उतरंड, चातुर्वर्ण्य व्यवस्थेत शुद्र मानल्या गेलेल्या समाजावर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराबाबत त्यांच्या मनात विलक्षण आक्रोश होता. समाजबांधवांना न्याय मिळवून देण्याचा ध्यास होता. आपल्या प्रत्येक कृतीतून व उक्तीतून त्यांनी समानतेचे धडे दिले. बाबासाहेब स्वतःला सर्वसामान्याप्रमाणे लेखत असत. ते जेव्हा लंडनहून भारतात परत आले तेव्हा त्यांच्या चाहत्यांनी चारचाकाची व प्रथम श्रेणी लोकल प्रवासाची तयारी केली होती. बाबासाहेबांनी ती नाकारली आणि लोकलच्या सामान्य डब्यातून प्रवास केला. जेव्हा ते घरी पोहोचले तेव्हा त्यांच्या भावाने बसण्यासाठी टेबल-खुर्ची आणण्यासाठी धावपळ सुरू केली तेव्हा ते खुर्चीवर न बसता घोंगडीवर बसले. समाजबांधवाप्रतीची आत्मीयता बाबासाहेबांनी तितक्याच सहृदयतेने जोपासून समाजापुढे समानतेचा आदर्श निर्माण केला.

## दुर्मीळ छायाचित्रांनी सुशोभित दालन

बाबासाहेबांच्या मुंबई येथील 'राजगृह' निवासस्थानी प्रवेश करताना दालनाच्या आतल्या बाजूला बाबासाहेबांचा पुतळा आणि त्यांचा अस्थिकलश आहे. बाजूच्या दालनात बाबासाहेबांनी वापरलेल्या काही वस्तू पाहायला मिळतात. त्यात बाबासाहेब कामकाजासाठी ज्या टेबल-खुर्चीचा वापर करत असत ती टेबल-खुर्ची, त्यांचे चहा-नाष्ट्याचे टेबल, टीपॉट, पुस्तके ठेवायचे टेबल, त्यांची खाट आदी वस्तू आणि त्यांची भरपूर पुस्तके पाहायला मिळतात. बाबासाहेबांच्या दुर्मीळ छायाचित्रांनी हे दालन सुशोभित केले आहे. बाबासाहेबांचा जन्म माता भीमाई आणि पिता सुभेदार रामजी आंबेडकर यांच्या पोटी मध्य प्रदेशात महू येथील छावणीत झाला. मानवता, समाजसेवा व देशसेवेच्या व्यस्त समर्पित जीवनात बाबासाहेबांनी १९४१ साली महूला आयुष्यात एकदाच भेट दिली होती. ती देखील समवयस्क मित्रपरिवाराच्या आग्रहाखातर. त्या वेळी बाबासाहेबांनी 'चंद्रोदय वाचनालया'ला भेट दिली होती. कार्यकर्त्यांशी चर्चा, विचारविनिमय केला. बाबासाहेब ज्या खुर्चीवर बसले होते ती खुर्ची आजही स्मारकरूपाने दिमाखाने तेथे उभी आहे. बाबासाहेबांनी दुसऱ्यांदा १९४४ साली महूच्या धावत्या भेटीत रेल्वे गाडीतूनच आपल्या जन्मभूमीला अभिवादन केले होते.

## बहुमोल ठेवा


बाबासाहेबांचे एकनिष्ठ अनुयायी भालचंद्र वराळे 'मी पाहिलेले बाबासाहेब' या लेखात म्हणतात,'१९४५ साली पुण्यात माझे वडील सिव्हिलियन लेबर ऑफिसर होते. आम्ही पुण्यात बाबाजान चौक कँटोन्मेन्टमधील एका बंगल्यात राहत असू. बाबासाहेबांच्या भेटीत एकदा आमच्याकडे भोजनाचा योग आला. ज्या खुर्चीवर बसून बाबासाहेबांनी भोजनाचा आस्वाद घेतला ती खुर्ची आमच्यासाठी बहुमोल ठेवा ठरली. त्या खुर्चीवर बसण्यास आम्हा भावंडांची चढाओढ सुरू झाली. आकर्षण इतके वाढले की, खुर्चीवर बसण्यावरून आम्हा

भावंडांत अक्षरशः एकमेकाला खुर्चीवरून ओढून काढेपर्यंत भांडणे चालत! त्या भांडणात आणि बाबांच्या परिनिर्वाणानंतर त्यांची राजकीय खुर्ची घेण्याबाबत झालेल्या पुढाऱ्यांच्या भांडणात काय फरक आहे हे मला कळत नाही!'

सिद्धार्थ बुद्ध भवन महाविद्यालयात बाबासाहेबांच्या दुर्मीळ ग्रंथासहित खासगी, प्रकाशित पण प्रचलित न झालेली पुस्तके बघायला मिळतात. आंबेडकरवादी म्हणविणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांनी हमखास बघावे असे हे महाविद्यालय आहे. येथेच बाबासाहेबांची अभ्यास खुर्ची, पुस्तकाचे कपाट, प्रत्येक पुस्तकावर सही, प्रतिमा पाहावयास मिळते. लातूरचे माझे मित्र पांडुरंग नामदेव वाघमारे यांनी सिद्धार्थ कॉलेजला भेट दिली. पांडुरंग म्हणतात, 'सिद्धार्थ कॉलेजमधील ग्रंथालय पाहून माझे डोळे दिपले. त्या ग्रंथालयात बाबासाहेब वापरत असलेली खुर्ची आहे. ती मला तेथील एका कर्मचाऱ्याने दाखवली. मी बाबासाहेबांची खुर्ची पाहिली. त्या खुर्चीला स्पर्श केला. तेव्हा मला एका अद्भुत अनुभवाचा साक्षात्कार झाला. खुर्चीच्या स्पर्शाने एका आगळ्यावेगळ्या आनंदाची जाणीव झाली. त्याच्या गोड स्मृती आजही माझ्या मनाला पुलकित करीत आहेत.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्तित्वखुणा असलेल्या या खुर्च्या बाबासाहेबांच्या अस्तित्वाची जाणीव करून देतात यासारखा जीवनात दुसरा आनंद नाही. आंबेडकरी चळवळीत तन-मन-धनाने कार्य करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला प्रेरणा देणाऱ्या या खुर्च्या आहेत. तत्कालीन शूर, झुंजार, धाडसी अन् तडफदार भीमसैनिकांनी बाबासाहेबांचा हा अनमोल ठेवा नवीन पिढीकरिता मोठ्या निष्ठेने, भक्तिभावाने आजतागायत जतन केला आहे. १४ एप्रिल जयंतीदिनी क्षणभर का होईना बाबासाहेबांच्या या दिमाखदार खुर्च्यांचे दर्शन घेऊन नवऊर्जा प्राप्त करावी अन् आंबेडकरी चळवळ उत्तरोत्तर गतिमान करावी.





## विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

शतकानुशतके शिक्षणापासून वंचित राहिलेल्या पददलितांना शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे, त्यांचा विकास झाला पाहिजे, यासाठी बाबासाहेबांनी १९ जून १९५० रोजी पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे औरंगाबादमधील पहिले मिलिंद महाविद्यालय सुरू केले. विद्यापीठ प्रवेशद्वाराजवळ उजव्या हाताला मिलिंद महाविद्यालयाचे नालंदा वसतिगृह आहे. या वसतिगृहात बाबासाहेब नेहमी येऊन खुर्ची टाकून बसत. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत. मिलिंद महाविद्यालयाची वास्तू उभारली जात असताना बाबासाहेबांचे नागसेनवन परिसरात येणे असायचे. बाबासाहेबांच्या वापरातील वस्तूंचे महाविद्यालयात जतन करण्यात आले आहे. त्यांच्या वापरातील पलंग, गादी, बेडशीट, त्यांची खुर्ची, टेबल, शिल्पकाराकडून तयार करून घेतलेल्या बुद्धमूर्तीचाही यात समावेश आहे.



'आज मी बुद्धधम्माचा स्वीकार करीत आहे उद्या मी सारा भारत बौद्धमय करीन' अशी सिंहगर्जना बाबासाहेबांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर मुक्कामी दीक्षाभूमीवर केली होती. पूज्य महाथेरो भिक्खू चंद्रमणी यांचे हस्ते बुद्धधम्माची विधिवत दीक्षा ग्रहण करून आपल्या पाच लाख अनुयायांना धम्मदीक्षा दिली. प्रियदर्शी सम्राट अशोकानंतर धम्मचक्र प्रवर्तन करून बाबासाहेबांनी भारतीय इतिहासात अजोड धम्मक्रांती घडवून आणली. धम्मदीक्षाप्रसंगी बाबासाहेब ज्या खुर्चीवर बसले होते ती खुर्ची आजही शांतिवन चिचोली येथे पाहावयास मिळते. दरवर्षी ६ डिसेंबरला या ठिकाणी आंबेडकर अनुयायी मोठ्या श्रद्धेने नतमस्तक होतात.

मुंबईत भोईवाडा नाका परेल येथे बौद्धजन पंचायत समितीचे भव्य सभागृह आहे. या सभागृहाचा २ एप्रिल १९५८ रोजी तत्कालीन महापौर आचार्य म.वा. दोंदे, भय्यासाहेब आंबेडकर, दा.ता. रूपवते, आमदार माने, पी.टी. बोराळे, घनश्याम तळवटकर, परमार गुरुजी आदी प्रभृतींच्या उपस्थितीत कोनशीला समारंभाचा भव्य कार्यक्रम पार पडला. या सभागृहाने आपल्या स्थापनेची ५० वर्षे पूर्ण केली आहेत. पूर्वी या समितीचे नाव 'महार पंचायत समिती' असे होते. बाबासाहेबांच्या आदेशावरून 'बौद्धजन पंचायत समिती' असे नामकरण करण्यात आले.

## सजीवता प्राप्त झाली

प्रसिद्ध आंबेडकरवादी लेखिका आशालता कांबळे यांनी काही दिवसापूर्वी बौद्धजन पंचायत समिती सभागृहात 'बुद्धसंवत' विषयावर व्याख्यान दिले. आपले मनोगत व्यक्त करताना आशालता ताई म्हणाल्या, 'कार्यकर्त्यांनी तिथे ठेवलेली बाबासाहेबांची खुर्ची आणि टेबल दाखवलं. बाबासाहेबांची आणि बुद्धांची मूर्ती त्याच टेबलावर ठेवलेली आहे. खुर्ची आणि टेबल खरे तर निर्जीव, पण बाबासाहेबांच्या स्पर्शाने त्यांना केवढी सजीवता प्राप्त झालीय! खूप आनंद मिळाला आज.'

**मुद्रितशोधक, दै.'महाराष्ट्र टाइम्स', (नागपूर आवृत्ती)**
**संपर्क: ०८१७७८६६३९७**

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रकांडपंडित होते. त्यांचा विविध विषयांवरचा व्यासंग अफाट होता. त्यांनी अनेक विषयांवर मूलभूत चिंतन केले. त्यातून अनेक अत्यंत महत्त्वाच्या ग्रंथसंपदेची निर्मिती झाली. या ग्रंथसंपदेतूनच त्यांची सर्वसमावेशक आणि समन्यायी अशी वैचारीक भूमिका स्वयंस्पष्ट होते. त्यांच्या ग्रंथांचा संक्षिप्त आढावा या लेखात घेण्यात आला आहे.**


# ग्रंथकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**डॉ. संदेश वाघ**

### Administration and Finance of the East India Company

**(ईस्ट इंडिया कंपनी-प्रशासन आणि अर्थनीती)**


डॉ. बाबासाहेबांनी 'ॲडमिनिस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनी' हा शोधनिबंध, एम.ए.च्या पदवीसाठी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाला इ.स. १९१५ मध्ये सादर केला होता. हा केवळ ४२ पृष्ठांचा शोधनिबंध होता. डॉ. बाबासाहेबांनी इ.स. १७९२ ते १८५८ या कालखंडातील ईस्ट इंडिया कंपनीचा राज्यकारभार आणि वित्त या संबंधीच्या धोरणातील बदलाचा ऐतिहासिक आढावा घेतला आहे. हे बदल भारतीयांच्या हालअपेष्टांना कसे कारणीभूत ठरले याचे विदारक आर्थिक स्थितीचे स्वरूप या प्रबंधात मांडले आहे.




### Castes in India : Their Mechanism, Genesis and Development

**(भारतातील जातिसंस्था तिची यंत्रणा, उत्पत्ती आणि विकास)**

१९१६ सालच्या मे महिन्यात अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातील समाजशास्त्राचे प्रा. ए. ए. गोल्डनवायझर यांच्या मानववंशशास्त्राच्या परिषदेत डॉ. बाबासाहेबांनी 'कास्ट्स इन इंडिया, देअर मेकॅनिझम, जेनिसिस ॲन्ड डेव्हलपमेंट' या विषयावर आपला संशोधनात्मक निबंध वाचला. त्यात त्यांनी स्पष्ट केले की, 'आपल्याच जातीत विवाह करणे हा जातिसंस्थेचा प्राण मानलेला आहे.'





### The National Dividend of India a Historical and Analytical Study

**(ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती)**- डॉ. बाबासाहेबांनी भारताच्या आर्थिक प्रश्नांवर सखोल अभ्यास करून 'The National Dividend of India a Historical and Analytical Study' (भारताच्या राष्ट्रीय नफ्याचा वाटा) हा एक ऐतिहासिक पृथक्करणात्मक प्रबंध लिहून पूर्ण केल्यानंतर तो १९१६ मध्ये कोलंबिया विद्यापीठाला सादर केला. या प्रबंधावर यांना डॉक्टरेट ही पदवी मिळाली.

### Federation Versus Freedom

**(संघराज्य विरुद्ध स्वातंत्र्य)**


पुणे येथील 'गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स ॲन्ड इकॉनॉमिक्स' या संस्थेच्या वार्षिक समारंभात गोखले सभागृहातील काळे स्मृती व्याख्यानमालेत २९ जानेवारी १९३९ रोजी डॉ. बाबासाहेबांना व्याख्यानासाठी आमंत्रित केले होते. त्याप्रसंगी त्यांनी 'फेडरेशन व्हर्सेस फ्रीडम' या विषयावर आपले विचार प्रकट केले.





### The Problem of the Rupee - Its Origin and its Solution

**(रुपयाचा प्रश्न-उद्‌गम आणि उपाय)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये डॉक्टर ऑफ सायन्स (डी.एस.सी.) या अत्युच्च पदवीसाठी प्रा. एडविन कॅनन यांच्या अनुमतीने 'दि प्रॉब्लेम ऑफ दि रुपी - इट्स ओरिजिन ॲण्ड इट्स सोल्युशन' हा प्रबंध १९२२ साली ऑक्टोबर महिन्यात लंडन विद्यापीठाला सादर केला. या ग्रंथात त्यांनी भारतीय चलनाच्या उत्क्रांतीची ऐतिहासिक मीमांसा करून भारतासाठी आदर्श चलन पद्धती कोणती? या त्या काळातील महत्त्वाच्या प्रश्नावर आपले मूलगामी विचार मांडले आहेत.







## Pakistan or The Partition of India
**(पाकिस्तान अथवा भारताची फाळणी)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रथम १९४० च्या डिसेंबर महिन्यात 'थॉट्स ऑन पाकिस्तान' (पाकिस्तान अथवा भारताची फाळणी) हा अत्यंत महत्त्वाचा अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहून प्रकाशित केला. याच ग्रंथाची सुधारित आवृत्ती पुढे १९४५ साली प्रकाशित करण्यात आले. सुधारित आवृत्तीचे शीर्षक 'पाकिस्तान ऑर दि पार्टिशन ऑफ इंडिया' असे होते. या ग्रंथाची प्रथम आवृत्ती होय. हा ग्रंथ थॅकर ॲण्ड कंपनी लि. मुंबई या संस्थेने प्रकाशित केला.

## Annihilation of Castes (जातीचे निर्मूलन)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३६ मध्ये जातपात तोडक मंडळाद्वारा लाहोर येथे होणाऱ्या अधिवेशनात आपले विचार मांडण्यासाठी तयार केलेला अध्यक्षीय भाषणाचा मसुदा मंडळाच्या रिवाजाप्रमाणे जातपात तोडक मंडळाकडे अनुमतीसाठी पाठवला. पुढे तो पुस्तकरूपाने प्रकाशित करण्यात आला.


## Ranade, Gandhi and Jinnah
**(रानडे, गांधी आणि जीना)**




दि. १८ जानेवारी १९४२ रोजी न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त भारतसेवक समाज या संस्थेने गोखले मेमोरियल सभागृहात आयोजित केलेल्या समारंभात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना प्रमुख वक्ते म्हणून डेक्कन सभा ऑफ पुणे या संस्थेने आमंत्रित केले होते. त्या प्रसंगी त्यांनी 'रानडे, गांधी आणि जीना' या विषयावर प्रदीर्घ असे तात्त्विक व्याख्यान दिले होते.

## Mr. Gandhi and the Emancipation of the Untouchables
**(गांधी आणि अस्पृश्यांची मुक्ती)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४२ साली हिंदुस्थानातील अस्पृश्यांच्या प्रश्नासंबंधी विचार प्रदर्शित करणारा प्रबंध इन्स्टिट्यूट ऑफ पॅसिफिक रिलेशन्स या संस्थेकडे पाठविला होता. त्यावर चर्चा होऊन तो प्रबंध अधिवेशनाच्या अहवालात छापला होता. पुढे हा प्रबंध 'गांधी ॲण्ड दी इमॅन्सिपेशन ऑफ दी अन्टचेबल्स' (गांधी आणि अस्पृश्याची मुक्ती/गांधी आणि अस्पृश्य वर्गाचे विमोचन) या नावाने डिसेंबर १९४३ मध्ये थॅकर ॲन्ड कंपनी लिमिटेड, मुंबई यांनी पुस्तकरूपात प्रकाशित केला.





## Communal Deadlock and a way to Solve it
**(जातीय पेच आणि तो सोडवण्याचा मार्ग)**

दी ऑल इंडिया शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे ६ मे १९४५ रोजी मुंबईत नरेपार्कवर आयोजित केलेल्या अधिवेशनात अध्यक्षपदावरून बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या राष्ट्रीय दृष्टीकोनातून भूमिका विशद केली. त्यात त्यांनी भारतीय राजकारणातील जातीय पेचप्रसंग आणि त्यातून मार्ग काढणे या व इतर मुद्द्यांवर आपली मते प्रदर्शित केली. याप्रसंगी त्यांनी आपल्या भाषणाची एक लिहिलेली प्रत तयार केली होती. ती पी. ॲन्ड ओ प्रिटिंग प्रेस दिल्ली येथे १९४५ मध्ये छापून घेतली.




## What Congress and Gandhi have done to the Untouchables)
**(काँग्रेस आणि गांधी यांनी अस्पृश्यांसाठी काय केले?)**





डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४५ च्या जून महिन्यात प्रसिद्ध केलेला हा एक महान वैचारिक ग्रंथ मानला जातो. या ग्रंथाच्या नावात 'काँग्रेस आणि गांधी यांनी अस्पृश्याचे किती नुकसान केले? असाच गर्भीत अर्थ निघतो. हा गर्भित अर्थ सिद्ध करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी या ग्रंथात विपुल माहिती व आकडेवारी दिली आहे. त्यांच्या आधाराने त्यांनी काँग्रेस आणि गांधी यांच्या राजकीय, सामाजिक धार्मिक व आर्थिक योजनासंबंधी चिकित्सक व टीकात्मक विचारसरणीने प्रकाश टाकला आहे.

## States and Minorities-What are their rights and how to secure them in the Constitution Free India
**(संस्थाने आणि अल्पसंख्याक)**

संस्थाने आणि अल्पसंख्यांक जाती यांचे हक्क कोणते आणि ते स्वतंत्र भारताच्या संविधानात प्रविष्ट कसे करून घेता येतील या विषयी शेड्यूल्ड कास्टस् फेडरेशनतर्फे घटना समितीस सादर केलेला अस्पृश्यांच्या हितसंरक्षक तरतुदींचा खलिता, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले मूळ इंग्रजीतील निवेदन घटना समितीला सादर

## Who were the Shudras? How they came to be the Fourth Varna in Indo-Aryan Society




**(शूद्र पूर्वी कोण होते?)**


डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'हू वेअर शूद्राज? हाऊ दे केम टू बी द फोर्थ वर्णा इन द इंडो आर्यन सोसायटी' हा ग्रंथ १९४६ मध्ये प्रसिद्ध झाला. या संशोधनात्मक ग्रंथाचा शूद्र हे पूर्वी क्षत्रिय होते हा या ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय असून पूर्व काळात त्यांना दास व दस्यू म्हणत. सूर्यवंशापैकी तो एक समाज होता. त्यांचा ब्राह्मणांशी संघर्ष झाल्यामुळे समाजातील त्यांचा दर्जा कमी झाला. कारण ब्राह्मणांनी त्यांचे मौजीबंधन करण्याचे नाकारले. त्यामुळे त्यांना चौथा वर्णातील मानण्यात आले. त्यापूर्वी ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य असे तीनच वर्ण होते.

हिंदू समाजातील चौथा वर्ण शूद्र कसा व केव्हा उत्पन्न झाला हा आपला सिद्धान्त सिद्ध करण्यासाठी आणि या संबंधित जगातील समाज शास्त्रज्ञांची जी मते आहेत ती खरी नाहीत हे स्पष्ट करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी अनेक उत्तम व सत्यसंदर्भ आपल्या ग्रंथासाठी वापरले आहेत.




केले. ते 'फ्रेमिंग ऑफ इंडियाज कॉन्स्टिट्यूशन' या ग्रंथाच्या पृष्ठ ८४ ते ११४ पानावर छापण्यात आले होते. पुढे हे निवेदन डॉ. बाबासाहेबांनी पुस्तकरूपाने मार्च १९४७ मध्ये थॅक्कर ॲन्ड कंपनी लिमिटेड, मुंबई यांच्याद्वारे प्रकाशित केले.


## Maharashtra as a Linguistic Province




**(महाराष्ट्र-एक भाषिक प्रांत)**

महाराष्ट्रा ॲज लिग्विंस्टिक प्रोव्हीअन्स हे पुस्तकरूपाने ऑक्टोबर १९४८ मध्ये थॅक्कर ॲन्ड कंपनी लिमि. मुंबई या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केले. मूळ इंग्रजी भाषेत लिहिलेल्या पुस्तकाचे प्रा. बी.सी. कांबळे यांनी मराठीत भाषांतर करून प्रसिद्ध केले होते. महाराष्ट्र एक भाषिक प्रांत या विषयी विचार मांडताना डॉ. बाबासाहेबांनी भाषावार प्रांतरचनेच्या समस्या महाराष्ट्र हा व्यवहार्य प्रांत होईल का? महाराष्ट्र प्रांत हा एकच असावा की, संघराज्य असावा व महाराष्ट्र आणि मुंबई शहर. या चार भागात विवेचन केले आहे.

## The rise and fall of Hindu Women





**(हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती)**

डॉ. बाबासाहेबांचा हा वैचारिक व सांस्कृतिक लेख प्रथम कोलकात्याच्या 'महाबोधी' मासिकाच्या मे व जून १९५१ च्या अंकात प्रसिद्ध झाला होता. नंतर 'द राईज ॲन्ड फॉल ऑफ हिंदू वूमन' हे संशोधनात्मक वैचारिक लेखन १९६५ साली डॉ. आंबेडकर पब्लिकेशन सोसायटी या प्रकाशन संस्थेने पुस्तक रूपाने प्रकाशित केले.


## The Riddles in Hinduism

**(हिंदू धर्मातील कोडे)**




इ.स. १९५१ ते १९५६ या पाच वर्षाच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी द बुद्ध ॲन्ड हिज धम्म (भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म) रिव्होलेशन ॲन्ड काऊंटर रिव्होलेशन इन इंडिया (क्रांती आणि प्रतिक्रांती) बुद्ध ॲन्ड कार्लमार्क्स, दि रिडल्स ऑफ हिंदुइझम (हिंदू धर्माचे कोडे) या ग्रंथांचे लेखन चालू होते. दी रिडल्स ऑफ हिंदू इझम या ग्रंथाच्या लेखनमालेची सुरुवात १९५४ मध्ये केली व सप्टेंबर १९५६ मध्ये लिहून पूर्ण केला. परंतु त्यात फेरफार करणे व शेवटची प्रत तयार करण्याचे काम अपूर्ण राहिले.

## Thoughts on Linguistic States




**(भाषिक राज्यासंबंधी विचार)**

डॉ. बाबासाहेबांनी 'थॉटस् ऑन लिग्विंस्टीक स्टेटस्' हे पुस्तक नागसेन बन औरंगाबाद येथे लिहून प्रकाशित केले. यात एकूण पाच भाग व अकरा प्रकरणे आहेत आपले विचार स्पष्ट करण्यासाठी पाच नकाशे व प्रमुख जातीची आकडेवारीचे परिशिष्ट जोडले आहे.

## The Pali Grammar, Dictionary and Bouddha Pooja Patha **(पाली व्याकरण, शब्दकोश आणि बौद्ध पुजापाठ)**


– Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches-Vol-16 Gramma and Dictionary of the Pali Language- by Dr. B.R. Ambedkar. हा ग्रंथ बराच काळ अप्रकाशित होता. महाराष्ट्र शासनाने १९९८ साली हा ग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकर समग्र साहित्य प्रकाशन समितीमार्फत प्रकाशित करण्यात आला. त्या वेळी महाराष्ट्र शासनाचे विशेष

पदाधिकारी व बाबासाहेबांच्या साहित्याचे अभ्यासक वसंत मून हे होते. त्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक हा ग्रंथ संपादित केला आहे. या ग्रंथाच्या संदर्भात वसंत मून यांनी संपादित केलेल्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा धम्मप्रवास' १९८९ या पुस्तकात महत्त्वाचा उल्लेख केला आहे. या ग्रंथात पाली व्याकरणाची माहिती समाविष्ट आहे. त्याचबरोबर शब्दकोश देण्यात आला आहे. बौद्ध पूजापाठ याची विस्तृत माहिती देण्यात आली आहे.

## Revolution and Counter Revolution

**(क्रांती आणि प्रतिक्रांती)**

क्रांती आणि प्रतिक्रांती हा एक महत्त्वाचा ग्रंथ आहे. या ग्रंथात डॉ. बाबासाहेबांनी बौद्धधर्माच्या भारतात झालेल्या उदयाला 'क्रांती' मानले असून ब्राह्मणी धर्माने त्याविरुद्ध ज्या मार्गांचा अवलंब केला त्याला 'प्रतिक्रांती' मानले. या प्रतिक्रांतीचा जो परिणाम झाला तो म्हणजे बौद्धधर्माची अवनती किंवा ऱ्हास होय. या दोन्ही ऐतिहासिक घटना कशा घडल्या त्यामागे नेमकी कोणती कारणे होती. याची कारणमीमांसा करण्याच्या हेतूने, डॉ. बाबासाहेबांनी या ग्रंथाची निर्मिती केली.




## Buddhism and Communism

**(बौद्धधम्म आणि साम्यवाद)**


१५ नोव्हेंबर १९५६ रोजी नेपाळची राजधानी काठमांडू येथे 'वर्ल्ड फेलोशीप ऑफ बुद्धिस्ट कॉन्फरन्स'ची (बौद्धभ्रातृ संघाची जागतिक परिषद) परिषद भरली होती. संयोजकांच्या आमंत्रणानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिषदेला उपस्थित राहिले होते. २० नोव्हेंबर १९५६ रोजी या परिषदेत त्यांनी 'बौद्धधर्मातील अहिंसा' Buddhism and Communism या विषयावर व्याख्यान देण्याचे ठरवले होते. परंतु बहुसंख्य प्रतिनिधींनी 'बुद्ध आणि साम्यवाद' या विषयावर बोलण्याचा आग्रह धरला. त्यानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण असे विस्तृत व्याख्यान दिले. या व्याख्यानाने सर्व उपस्थित मंत्रमुग्ध झाले. पुढे बाबासाहेबांच्या या व्याख्यानात मांडलेले विचार विचार बुद्धिझम ॲण्ड कम्युनिझम या नावाने प्रकाशित करण्यात आले.

**सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,**
**मुंबई विद्यापीठ, मुंबई. संपर्क: ०९७०२७५६६५५**

## The Buddha and His Dhamma

**(भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म)**

या ग्रंथाची आठ खंडात विभागणी केली आहे. पहिल्या खंडात सिद्धार्थ गौतम बोधिसत्त्व बुद्ध कसे झाले? दुसऱ्या खंडात धम्मदीक्षेची मोहीम, तिसऱ्या खंडात भगवान बुद्धांनी काय शिकवले? यात धम्म, अधम्म व सद्धम्म म्हणजे काय याचे विवरण. चौथ्या खंडात धर्म व धम्म पुनर्जन्म, कर्म, बुद्धांची प्रवचने, पाचव्या खंडात संघ, भिक्खूचे कर्तव्य, भिक्खू आणि उपासक, उपासकासाठी नियम तर सहाव्या खंडात भगवान बुद्धांचे समर्थक, त्यांचे विरोधक आणि बौद्धधम्माचे टीकाकार. सातव्या खंडात भ्रमणिकांची अंतिम यात्रा–वैशालीचा निरोप व महापरिनिर्वाण आणि आठव्या खंडात भगवान बुद्धांचे व्यक्तिमत्त्व व उपसंहार इत्यादी विषयांच्याद्वारा भगवान बुद्धांचा जन्म, गृहत्याग, संबोधीप्राप्ती, धम्मचक्र प्रवर्तन, धम्मप्रचार, बौद्धधम्माचे तत्त्वज्ञान आणि महापरिनिर्वाणापर्यंत. भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या संदर्भातील प्रचलित असलेल्या पारंपरिक मतप्रणालीला धक्का देणारे क्रांतिकारी विचार प्रस्तुत केले आहेत. त्यामुळे हा ग्रंथ अंधश्रद्धेने पठण करावयाचा धर्मग्रंथ नव्हे, तर तो ज्या बुद्ध वचनाच्या आधारे डॉ. बाबासाहेबांनी लिहिला आहे, ती वचने भगवान. बुद्धांच्या विचारांची बुद्धिनिष्ठा, तर्कसंगती, अनुभवप्रामाण्य, बहुजनांची कळकळ इ. निकषांवर आधारित आहेत.




बौद्धधम्माच्या अभ्यासकांनाही प्रस्तुत ग्रंथ हा त्या धर्मतत्त्वज्ञानावरील इतर पारंपरिक ग्रंथापेक्षा वेगळा असल्याची जाणीव होऊन बौद्धधम्माबद्दल नवीन दृष्टी प्राप्त होईल. असा मौलिक ग्रंथ त्यांनी आपल्या आयुष्याच्या अखेरच्या पर्वात आपली निष्ठा आणि परिश्रम पणाला लावून लिहिला. या ग्रंथाची पूर्ती म्हणजे त्यांची वचनपूर्तीच होती. म्हणून 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' हा ग्रंथ म्हणजे सर्वश्रेष्ठ साहित्यकृती, ग्रंथसंपदा मानली जाते.

**माणसाला दु:खमुक्त करण्यासाठी आंबेडकरवादाचे योगदान खूप महत्त्वपूर्ण मानले जाते. आंबेडकर ही व्यक्ती नसून मानवमुक्तीचा विचारप्रवाह ठरते. आंबेडकरवादाच्या विचारप्रवाहाने जात, पंथ, धर्म, लिंग, वंश, प्रदेश, राज्य,देश या सर्व मर्यादा ओलांडून जिथे माणसाच्या वाट्याला दु:ख आलेले आहे त्यापासून मुक्ती मिळवून देण्याचा विचार प्रस्थापित झालेला आहे. गुलामीच्या बेड्या तोडण्यासाठी आंबेडकरांचे कार्य प्रेरणादायी ठरले आहे. प्रत्येक घरातील स्त्री गुलामीतून मुक्त होण्यासाठी आंबेडकरांनी हिंदू कोड बिल मांडले. महात्मा फुले यांची विचारधारा जोपासत स्त्रीशुद्रांच्या शिक्षणाचे आणि उद्धाराचे कार्य त्यांनी हाती घेतले. त्यामुळे आंबेडकरवाद दु:खमुक्तीची भाषा आहे, गुलामगिरीची शृंखला तोडणारा प्रहार आहे. आंबेडकरवाद समानता प्रस्थपित करतो. उपेक्षितांना जवळ घेतो.**

# बुद्धिवादाची प्रेरक शक्ती

**प्रा. डॉ. म. सु. पगारे**

माणूस समाजसमूहामध्ये सुखदु:ख अनुभवतो, तो समाजशील प्राणी आहे. समाजसमूहात राहून माणूस आपल्या समस्या दूर करण्याचा प्रयत्न करतो. इतरांच्या आनंदात सहभागी होणे आणि दु:खात रडगाणे गाणे अशी क्रिया प्रतिक्रिया माणसाची असते.निसर्गनिर्मित दु:खावर मात करण्यासाठी माणसांनी एकत्र यावयाचे असते. दु:खी लोकांचे अश्रू पुसावयाचे असतात. भूकंप होतात, महापूर येतात, त्यामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होतात. या उद्ध्वस्तपणाच्या वेळेला जात, धर्म, पंथ, लिंग, वंश, प्रदेश, राज्य, देश, अशा सगळ्याच मर्यादांना बाजूला सारून, माणसाने माणसासाठी धावून जायचे असते. मदतकार्यात सहभागी व्हायचे असते. ते नैतिक कर्तव्य आहे. या कर्तव्याला माणुसकी असे म्हणतात, त्यामध्येच माणूसपण आढळते. असे माणूसपण जपणाऱ्यालाच माणूस म्हटले जावे. परंतु हजारो वर्षांपासून दु:खाच्या, वेदनेच्या इंगळ्या डसणारी माणसे समोर पाहून त्यांच्या बाबतीत स्वार्थापोटी, जात्याधिष्ठित अहंकारापोटी गुलामगिरी लादण्याचा प्रयत्न होतो, त्या वेळेला त्या क्रियेला माणूसपणातील क्रिया कशी संबोधता येणार? निसर्गाकडून नव्हे तर माणसाकडूनच माणसाला गुलाम बनवण्याची प्रक्रिया जेव्हा सातत्याने सुरू राहते, त्या वेळेला पशूंच्या आचरणाशी संबंधितच ती क्रिया म्हणता येते. स्वतःचा अहंकार जोपासण्यासाठी, स्वार्थासाठी, द्वेषाने प्रेरित होऊन, कर्मठ परंपरेचा वारसा सांगत, जनावरांना गोंजारत आणि माणसांना लाथाडत ज्या वेळी गुलामगिरी प्रस्थापित होऊ लागते, त्या वेळेला तो मानतावादाला काळिमा फासला जातो. या देशात प्रत्येक घरातील स्त्री गुलामीच्या वेदनेने ढसढसा रडल्याचा इतिहास आढळेल, तसेच अनेक जातींमधील पोटजाती यादेखील अपमानाने दु:खी झालेल्या दिसतील.



चातुर्वर्ण्याची उतरंड तर माणसाला माणूसपण नाकारून गुलाम करू पाहते. शूद्रांची अवस्था अतिशय यातनामय आणि अस्पृश्यांची तर महाभयंकर वेदनांची! इतिहासात या वेदनांची अनेक उदाहरणे सापडतात. स्त्रियांना आणि शूद्रांना शिक्षणाचा अधिकार आतापर्यंत नाकारलेला होता.

### माणूस म्हणून ओळख

प्रत्येकाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क आहे. त्याच्या निसर्गदत्त जगण्याच्या आड कुणी येत असेल तर आंबेडकरवाद त्याला प्रखर विरोध करतो. संपूर्ण विश्व बदलण्याची ताकद आंबेडकरवादात असल्यामुळेच कवी म्हणतो,'जग बदल घालूनी घाव; सांगून गेले मला भीमराव' ही भीमशक्ती अन्यायाच्या परिमार्जनासाठी कार्य करते. आंबेडकरवादाने माणसाला माणूस म्हणून ओळख करून दिली. म्हणूनच आंबेडकरवाद हाच मानवतावादही ठरतो. आंबेडकरवाद हा बुद्धिवादाच्या शास्त्रीय कसोटीवर आधारलेला आहे. बुद्धिवादातील

विवेकाला आंबेडकरवाद प्राधान्य देतो.

## वैश्विक पातळीवर दु:खमुक्तीचा उद्‌गार

आंबेडकरवादाला मानवमुक्तीचा जाहीरनामा म्हटले पाहिजे. परंतु एका बाजूला असे म्हणताना दुसऱ्या बाजूला काही लोक आंबेडकरवादाला जातिजातींच्या भिंतीमध्ये अडकवू पाहतात. परंतु तसा प्रयत्न फसणारा आहे, कारण आंबेडकरवाद विवेकावर आधारित आहे आणि मानवतावादाशी त्याचे नाते आहे. मानवतावादातील माणूस म्हणून असणारे मूल्य आणि आंबेडकरवादातील मूल्य एकच आहे. त्यामुळे आंबेडकरवाद हा वैश्विक पातळीवर दु:खमुक्तीचा उदगार होताना दिसतो. आंबेडकरवादाची दु:खमुक्तीची चळवळ ही भारतातील चतुर्वर्ण्यव्यवस्थेच्या विरोधात शोषण आणि उपेक्षेच्या विरोधात सुरू झालेली दिसत असली तरी, ती विश्वातील चिरंतन वेदनेशी जाऊन भिडते आणि शोषणाच्या पार्श्वभूमीवरचा मानव दु:खमुक्त करू पहाते.

महापुरुष आणि महात्म्यांचा मृत्यूही निसर्गनियमांप्रमाणे अटळ असतो. परंतु त्यांनी दिलेला विचार हा सत्यान्वेषी असल्यामुळे मारला जाऊ शकत नाही. आंबेडकर ही व्यक्ती शरीराने लौकिक विश्वात उपस्थित नसली तरी विचाराने मात्र उपस्थित आहे. कारण सत्याच्या पार्श्वभूमीवर प्रखर आणि स्वच्छ प्रकाश आंबेडकरी विचारधारेत आहे. ही विचारधारा चिरंतन सत्याला भिडणारी आहे. आंबेडकरवाद मानवमुक्तीची उकल करीत आपली विचारधारा मांडणारा आहे.

## आंबेडकरवादी अनुयायी

अलीकडे काही समीक्षक आंबेडकरवादाला एखाद्या विशिष्ट जातीमध्ये बंदिस्त करू पाहतात, तसे करणे चुकीचे ठरेल. एखाद्या विशिष्ट जातीत जन्माला आल्यावरून आणि मानव–मुक्तीसाठी गुलामीची शृंखला तोडण्यासाठी एखाद्या जातीचा संदर्भ घेतला असला म्हणून, विशिष्ट जातीचा केंद्रवर्ती मर्यादित विचार करणे चुकीचे ठरेल. आंबेडकरवाद ठरावीक जातीसाठी कार्य करणारा वाद नाही. तो जात, पंथ, धर्म, वंश, लिंग, देश, यांच्यातील भिंती तोडून, माणसाची माणूस म्हणून ओळख करून देणारा वाद आहे. त्यामुळे कोणतीही पुरोगामी विचारसरणीची व्यक्ती बुद्धिवादाच्या विवेकावर आधारित विचार करणारी असेल आणि मानवमुक्तीची भाषा बोलणारी असेल, तर त्या व्यक्तीला आंबेडकरवादी किंवा आंबेडकरानुयायी असे म्हणता येईल. अभ्यासक जिज्ञासूंनी विवेकावर आणि बुद्धिवादाच्या पार्श्वभूमीवर विचारधारेचे अवलोकन आणि आकलन करून घेतले पाहिजे. अशा पद्धतीची सजग दृष्टी लाभणे म्हणजे आंबेडकरवादी किंवा आंबेडकर अनुयायी होणे होय. डोक्यामध्ये दलितपणाचे किंवा श्रेष्ठकनिष्ठपणाचे प्रश्न लोंबकळल्यासारखे असतील,तोपर्यंत आंबेडकरवादी किंवा आंबेडकर अनुयायी म्हणून घेताना लाज वाटत राहील. परंतु समतेच्या द्रवाने मेंदूची साफसफाई झाली असेल तर विवेकाच्या पार्श्वभूमीवर बुद्धिवादाचा पुरस्कार करत मानवतावादाचे गीत गात दु:खी व शोषणमुक्त समाजव्यवस्थेसाठी कार्य करण्याची इच्छा करत आंबेडकर अनुयायी किंवा आंबेडकरवादी म्हणून घेताना; अभिमानाने ऊर भरून आला पाहिजे. मतांसाठी स्टेजवर आंबेडकरांचा फोटो लावल्याने आंबेडकरवादी होता येत नाही, त्याचप्रमाणे स्वार्थ आणि प्रसिद्धीसाठी लेखन करणारेही आंबेडकरवादी ठरू शकत नाहीत. कारण माणसाच्या कल्याणासाठीची, दु:खमुक्तीची वाटचाल आंबेडकर अनुयायी चोखाळतात. आंबेडकरवादाशी भावनेपेक्षा विचारांचे दृढ नाते असणे जास्त महत्त्वाचे मानले पाहिजे.

## परिवर्तनवादी विचार

साहित्य मानवी जीवनाचा आरसा आहे. त्यामुळे साहित्यात प्रतिबिंबित होणारे मानवी जीवन शुद्ध, निखळ आणि संस्कारित स्वरूपाचे आढळावयाचे असेल तर माणूस परिवर्तनवादी होणे महत्त्वाचे आहे. हा परिवर्तनवाद निसर्गातील होणाऱ्या बदलांसहित, माणसातील होणाऱ्या बदलांचा विकास करतो. माणूस प्रतिबिंबित झालेल्या साहित्यातून प्रेरणाही देतो. अलीकडे परिवर्तनवादी विचारांची बीजे साठोत्तरी साहित्य प्रवाहामध्ये, दलित साहित्यासह प्रभावीपणाने आढळून येताना दिसतात. पुरोगामी विचारांची सक्षमतेने नोंद घेताना दिसतात. तथागत गौतम बुद्ध, भगवान महावीर, पकुध कच्चायन, निगंठ नातपुत्त, संजय बेलतीपुत्त,अजित केशकंबली, जीवक, इपिक्युरस, महात्मा चक्रधर, महात्मा बसवेश्वर, संत तुकाराम, महात्मा फुले, डॉ. बाबसाहेब आंबेडकर, पेरियार रामस्वामी, अहिल्याबाई होळकर,माता रमाई, राजर्षी शाहू महाराज, अण्णाभाऊ साठे अशा अनेक महापुरुषांनी व विचारवंतांनी परिवर्तनाच्या पार्श्वभूमीवरचा पुरोगामी विचार उचलून धरला. या परिवर्तनवादी विचारांमुळे माणसाचे कल्याण होते आणि अस्तित्व फुलून येते; त्याचबरोबर मानवतावाद प्रस्थपित होऊ लागतो. त्यामुळे परिवर्तन हे जाणिवेने अनुभवले पाहिजे आणि परिवर्तनवादी म्हणजेच आंबेडकरवादी बनले पाहिजे.

## सर्वंकष मानव कल्याण

सर्वंकष मानव कल्याणाची बीजे आंबेडकरी तत्त्वज्ञानात आढळतात. माणसाचा सर्वार्थाने विकास होण्यासाठी बहुआयामी चिंतन, संशोधन आणि त्यावरील भाष्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले आढळते. त्यांच्या अनेक भाषणांचा, अनेक पुस्तकांचा, अनेक कृतिशील कार्यक्रमांचा, संघर्षाचा आणि दैनंदिन जीवनातील आचरणाचा आणि विचारातील भाग म्हणजे माणसाची दु:खमुक्ती होऊन, किंबहुना शोषणमुक्ती होऊन माणसाचे कल्याण साधले पाहिजे, असा विचारप्रवाह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रक्षेपित होणाऱ्या कार्याच्या दिशेमधून आढळून येतो.

माणसाला स्वातंत्र्य असणे आवश्यक आहे. वैचारिक स्वातंत्र्य लाभलेला माणूस बुद्धिवादाच्या पार्श्वभूमीवर विचार करू लागतो. त्यामुळे स्वतंत्रतेला खूप महत्त्व आहे. लोकांचे हित साधावयाचे असेल तर स्वतंत्रता ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. खरे म्हणजे माणसाला दु:ख देणाऱ्या घटना, या निसर्गापेक्षा माणसाकडून अधिक घडतात. माणसाने माणसाला कनिष्ठ लेखणे यामध्ये माणसाचे अवमूल्यन होते. वर्णभेदाच्या पार्श्वभूमीवर, जातीच्या आधारावर

आणि संपत्तीच्या आधारावर माणसांची अवहेलना झालेली लक्षात येते. ही अवहेलना, हे दु:ख मानवनिर्मित आहे, निसर्गनिर्मित नाही. निसर्ग असा कसलाही भेद करताना दिसत नाही. परंतु माणसातील ठरावीक वर्ग निसर्गाला स्वत:च्या मालकीचा म्हणवून घेत माणसावर अन्याय, अत्याचार करताना दिसतो. कोणत्या देशात-प्रदेशात किंवा कोणत्याही माणसाच्या पोटी जन्माला येणे हे माणसाच्या हातात नाही; ती निसर्गदत्त क्रिया आहे. तरीदेखील जन्माच्या पार्श्वभूमीवर जातीचा आणि संपत्तीचा टेंभा मिरवणारा माणूस किंवा असा मानवसमूह अज्ञानी, अहंकारी आणि मूर्खच संबोधला पाहिजे.

### समान न्यायाने वागण्याची शिकवणूक

निसर्ग समानता शिकवतो, समान न्यायाने वागण्याची शिकवणूक देतो. त्यामुळे समानता शिकविणाऱ्या निसर्गाचे आकलन माणसाला किंवा मानवसमूहाला होऊ लागले तर तो माणूस किंवा मानवसमूह विकसित आणि गतिमान होऊ लागलेला आहे; नीतिमान आणि संस्कारशील झालेला आहे असे म्हणता येते. त्यामुळे समता प्रस्थापित करणारा माणूस आणि माणसाच्या विचाराला चालना देणारा माणूस, बुद्धिवादाचा पुरस्कार करणारा माणूस हा संपूर्ण मानवजातीला मूलगामी स्वरूपात प्रेरक ठरतो. समानतेच्या तत्त्वाचा पुरस्कार आणि बुद्धिवादातून जोपासलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरक शक्ती ही संपूर्ण मानवसमूहाच्या कल्याणासाठी मूलगामी स्वरूपात महत्त्वपूर्ण ठरते. राज्यघटनेमध्ये स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही पेरलेली तत्त्वे मानव कल्याणासाठी मूलगामी आणि महत्त्वपूर्ण आहेत. ती सर्वच कल्याणकारी प्रवाहांचा आदिम स्रोत ठरतात.



संबंध मानवसमूहाच्यानिमित्ताने बंधुतेचे तत्त्व विकसित होणे ही मूल्यगर्भी बाब मानता येईल. परंतु माणसामध्ये बंधुता निर्माण होण्याऐवजी, जनावरांच्या पार्श्वभूमीवर बंधुतेचा उदघोष होतो आणि माणसाला लाथाडले जाते ही अवस्था शोचनीय म्हणता येईल. कुत्र्याला 'भाऊ भाऊ' म्हणणे आणि माणसाला लाथाडणे अशी बंधुता पशु संस्कृतिवर्धक राहू शकेल? माणसाला प्राधान्य देण्याऐवजी जनावरांना प्राधान्य देण्यात येते, मानव संस्कृतीचा बळी घेतला जातो, माणसाला मेंदू आहे आणि या मेंदूने विचार करावयाचा असतो. या मेंदूमधूनच विवेकाची म्हणजे योग्य-अयोग्य निर्णय घेण्याची क्षमता सिद्ध होते. निर्णय हा विवेकाधिष्ठित असतो असे मात्र, काही लोकांच्या बाबतीत म्हणता येत नाही. विवेक जागृत राहिला तर भूतदया अगोदर की, मानवता अगोदर हे कळू लागते. नेमका क्रम ठरवता येतो आणि मानवतावादालाच सर्व ठिकाणी प्राधान्य देता येते. माणसाच्या बुद्धिवादातील विवेक हा मानवतावाद सबळ करतो; त्यामुळे पुरोगामी विचारसरणीमध्ये विवेकी विचार हा केंद्रवर्ती आढळतो, जो आंबेडकरी तत्त्वव्यवहारातून प्रेरक ठरलेला आहे.

माणूस हा इथूनतिथून सारखाच आहे. त्यामुळे माणसानेच माणसाच्या विकासासाठी बाधा ठरणे ही अधम बाब म्हणावी लागेल. या देशाच्या पार्श्वभूमीवर माणसाचे मूल्य जोपासणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'एक माणूस: एक मूल्य' ही विचारधारा नोंदवलेली आढळते. संपत्तीचा किंवा जातीचा कोणताही संदर्भ माणसात मूल्यभेद निर्माण करू शकत नाही. निसर्गदत्त असलेली माणसामधील समानता ही 'एक माणूस: एक मूल्या'ने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेत स्थिर केलेली आढळते. स्त्रियांना, शूद्रांना, अस्पृश्यांना, गरिबांना ज्या वेदना आणि यातना झाल्या, त्या दु:खापासून मुक्ती मिळवण्यासाठी, हे समानतेचे तत्त्व खूपच उपयोगी पडलेले आहे.

इतरांवर भारस्वरूप राहणे; जात अहंकार, धर्म अहंकार, पुरुषी अहंकार जोपासणे या सर्वच क्रिया विकासात्मक ठरत नाहीत.

निसर्गात सातत्याने बदल सुरू आहे. माणसाचा जन्म ते मृत्यूपर्यंतच्या प्रवासात बदल आढळतो. संस्कारशील गतिमान बदल होण्यासाठी वैज्ञानिक जाणिवा असलेल्या धम्माचे आचरण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले आहे. म्हणजे विधायक स्वरूपाची परिवर्तने कशी होतात आणि चांगल्या बदलाला सामोरे कसे जायचे हे आकलन होऊ लागते. कर्मठ परंपरा गाडून टाकून नव्या बदलाची नांदी घेत परिवर्तन हा शब्द येतो. तो वाईटाविरुद्ध संघर्ष पुकारतो आणि सत्याचे अनुसरण करतो.

बुद्धिवादातील विवेक, विचारस्वातंत्र्य, समतेचे तत्त्व, वैज्ञानिक जाणिवा, विधायक बदल आणि संस्कारशील धम्म; माणसाचे कल्याण करणारा, माणसाचा विकास करणारा, माणसाला गतिमान करणारा, माणसाला दु:खमुक्त करणारा, माणसाचे शोषण थांबवणारा असा आहे. त्यामुळे अशा पद्धतीने माणसाचे आकलन म्हणजे मानवसमूहाचा सर्वंकष विकास होय, असे विचारसूत्र आंबेडकरी विचारधारेत आढळते! त्यामुळे आंबेडकरवादी प्रज्ञाविवेकाची सैद्धान्तिकता अधिकाधिक प्रगल्भ स्वरूपात अनुभवावयास मिळते.

**संचालक, भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र,**
**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव,**
**संपर्क : ०९४२३१५९६२३**

**अस्पृश्य समाजामध्ये शिक्षणाची मूहूर्तमेढ सोलापूरातून झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सार्वजनिक क्षेत्रातील हे पहिले काम होते. याचा बाबासाहेबांना सार्थ अभिमान होता. सोलापूर भेटीच्या वेळी त्यानी जाहीरपणे अनेकदा सांगितले होते. त्यानंतर देशाच्या विविध ठिकाणी अस्पृश्य मुलामुलींसाठी वसतिगृह सुरू केले.**

# शिक्षणाची मुहूर्तमेढ



**दत्ता गायकवाड**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संघटनात्मक पातळीवर अस्पृश्यांना न्याय मिळवून देण्यासाठी समाजातील विविध स्तरातील मान्यवरांना एकत्रित केले. २० जुलै १९२४ साली बहिष्कृत हितकारणी संस्था ही सभा स्थापन केली. यात प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ सर चिमणलाल सेटलवाड, अॅडव्होकेट नरीमन, शिक्षणतज्ज्ञ रँगलर परांजपे, सिताराम शिवतरकर, बाबासाहेब आबंडेकर इ. चा सहभाग होता. बाबासाहेब या सभेचे अध्यक्ष होते. अस्पृश्यांचे विविध प्रश्न सभेपुढे होते. ते जटील होते. शेकडो वर्षापासून माणसाला अंधारगुहेत ढकलले होते. त्यासाठी त्या माणसाला तू माणूस आहेस ही जाणीव करून देणे, ही प्राथमिकता होती. त्यासाठी त्याला शिक्षण देणे हा एका मार्ग होता. बहिष्कृत हितकारणी सभेने अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह निर्माण करण्याचा निर्णय घेतला. या विद्यार्थ्यांना शिक्षणविषयक सुविधा देऊन त्यांच्या निवास आणि भोजनाची व्यवस्था करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सोलापूर येथे पहिले वसतिगृह १ जानेवारी १९२५ रोजी सुरू केले. त्याचे नाव बहिष्कृत विद्यार्थी वसतिगृह असे होते.

### विषमतेचे क्रूररूप

शिक्षणाशिवाय पर्याय नाही, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो शिकेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. म्हणून समाजक्रांतीची जी तीन सूत्रे बाबासाहेबांनी सांगितली. त्यातील पहिले सूत्र होते, 'शिका.. मी आज जो आहे तो शिक्षणामुळे आहे. मी जेव्हा महाविद्यालयात शिकत होतो. तेव्हा महाविद्यालयीन शिक्षणात अस्पृश्यांचे प्रमाण लाखात शून्य होते. किंबहुना मी एकच होतो.' बाबासाहेब आंबेडकरांचे ते विधान समाजातील विषमतेचे क्रूररूप दाखवणारे होते.

बाबासाहेबांनी शिक्षणविषयक आपली मते अनेक ठिकाणी अनेक वेळा मांडली आहे. १२ मार्च १९२७ रोजी, मुंबई प्रांतिक विधिमंडळात शिक्षणावर चर्चेत भाग घेताना ते म्हणाले होते. शिक्षणावरचा खर्च निदान दारूवरील इतका तरी असावा अशी अपेक्षा बाळगण्यात वावगे काय.? तेव्हा ब्रिटिश सरकार फक्त ८७ पैसे खर्च करत होते. अबकारी उत्पन्न २.१७ रुपये होते. 'जे मागे आहेत. त्यांच्यासाठी अधिक खर्च करा. विशेष सोयी, सवलती द्या मागासलेल्यांसाठी असमानतेचे तत्त्व लागू करा,' असा आग्रह बाबासाहेबांनीच त्या भाषणात धरला होता.

त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे असा आग्रह धरला होता. ते म्हणतात. की, 'केवळ लोकांच्या खुशीवर हा प्रश्न सोपवल्यास प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होण्यास कैक शतके लागतील. म्हणून प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत सक्तीचा कायदा करावा लागेल.'

### शिक्षणामध्ये एकसूत्रीपणा

सक्तीच्या प्राथमिक शिक्षणातील व्यवस्थापनाच्या, संसाधनाच्या व वातावरणाच्या उणिवा दूर करून, प्राथमिक शिक्षणाचे राष्ट्रीय धोरण असले पाहिजे असे डॉ. आबंडेकराना अभिप्रेत होते. प्रांतिक स्वायत्तता मागा आणि राष्ट्रीय दृष्टीने शिक्षणाचे धोरण ठरवा. शिक्षणामध्ये एकसूत्रीपणा असला पाहिजे. प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे असावे. परंतु ते मोफत नसावे. असे डॉ. आंबेडकराना वाटत होते. ते म्हणतात. ज्यांना फी देणे शक्य आहे, त्यांच्याकडून ती घेण्यात काही पाप नाही की अन्याय नाही. त्याचप्रमाणे फी वसुली केली. तर थोडा का होईना सक्तीच्या शिक्षणाचा जादा खर्च भागविण्यास मदत होईल. मागासवर्गीयाना शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले, तरच हा समाज शिक्षण घेईल. अन्यथा हा समाज अविद्येच्या अंधारात चाचपडत राहील. शिक्षण आत्मजाणीव देते. ह्यावर बाबासाहेबांचा विश्वास होता. सर्व सामाजिक दुखण्यावर शिक्षण हाच एक उपाय आहे, ही बाबासाहेबांची धारणा होती.

**संपर्कः ०९९७५६२६७१०**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सेक्युलॅरिझमची प्रेरणा माणसाला अधिक जबाबदार बनवणारी आहे. ही प्रेरणा आपल्याला कोणाचेही अहित वा द्वेष करायला शिकवत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून आणि इतर सर्व साहित्याच्या माध्यमातून सर्वकल्याणकारी समाजरचनेचा, आदर्श समाजरचनेचा सुंदर प्रस्ताव मांडलेला आहे. प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जीवन जगण्याची हमी यात आहे. शांततामय सहजीवनाचे ते हमीपत्र आहे. डॉ. बाबासाहेबांचा सेक्युलॅरिझम म्हणजे सौहार्दमय जीवन जगण्याचा वचननामा आहे.**

# शांततामय सहजीवनाचे हमीपत्र

**डॉ. अक्रम ह. पठाण**

समाजवाद, सेक्युलॅरिझम आणि आंबेडकरवाद यांचे फ्युजन म्हणजेच भारतीय संविधान आहे. भारतीय संविधानातील प्रत्येक कलमांमध्ये या फ्युजनचे प्रतिबिंब उमटलेले दिसून येते. भारतीय संविधानाची उद्देशिकेची सुरुवातच, 'आम्ही भारताचे लोक भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही' या शब्दांपासून होते. समाजवाद आणि सेक्युलॅरिझम आणि आंबेडकरवाद या तिन्ही संकल्पना एकसंध स्वरूपाच्या आहे. समाजवाद आणि सेक्युलॅरिझम या संकल्पना पाश्चिमात्य आहेत. युरोपियन देशात १४ व्या शतकाच्या पूर्वी पोपशाहीची अनिर्बंध सत्ता होती. सामान्य माणसांची जीवन जगण्याची शैली ही पोपशाही ठरवीत होती. या पोपशाहीच्या धर्मांध, दैववादी प्रवृत्तीला नाकारून समाजवाद आणि सेक्युलॅरिझम स्वीकारले. पण या संकल्पनेचे मूळ आपणास चार्वाक, बुद्धाच्या तत्त्वज्ञानात पाहावयास मिळते. यानंतर इस्लामाचे तत्त्वज्ञान समाजवाद आणि सेक्युलॅरिझमवर आधारित आहे.

## मूळ संकल्पनाची पुनर्रचना

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या पाश्चिमात्य संकल्पना आणि चार्वाक, बुद्धाच्या, इस्लामच्या तत्त्वज्ञानातील मूळ संकल्पनाची पुनर्रचना करून, नव्याने फेरमांडणी भारतीय संविधानाच्या निमित्ताने केलेली आहे. ही फेरमांडणी म्हणजे मानवमुक्तीची फेरमांडणी आहे. या फेरमांडणीत समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय या घटकांना विशेष महत्त्व देण्यात आलेले आहे. 'माणूस' हा कोणाचा गुलाम अथवा मालक राहणार नाही. कोणत्याही प्रकारची हुकूमशाही समाजामध्ये असणार नाही. आदर्श समाजाचे प्रारूप डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वरील दोन्ही संकल्पनांमधून मांडलेले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी साम्यवादामध्ये असलेली समाजवादाची संकल्पना नाकारली आणि लोकशाही व्यवस्थेवर आधारित समाजवादाचा सिद्धान्त मांडला.

समाजवाद या संकल्पनेत देशातील उत्पादन आणि वितरण व्यवस्था ही सामूहिक मालकीची असावी आणि कोणीही कोणाचेही शोषण करणार नाही. समाजवादाच्या माध्यमातून, सामाजिक हितातून व्यक्तीचे हित साधता येते. समाजवादातून व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि आर्थिक समानता साधता येते. समाजवादाने सामूहिक मालकी आणि नियंत्रण ही संकल्पना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडली. राष्ट्रीय उत्पादनावर सामूहिक मालकी आणि त्याचे नियंत्रणही सामूहिकरीत्या व्हायला हवे. त्याचप्रमाणे वर्गविहीन समाज निर्माण व्हावा, समाजामध्ये कोणत्याही प्रकारचे वर्ग नसावेत, गरीब–श्रीमंत हा भेद नष्ट व्हावा, समाजात एकमेकांना सहकार्य करण्याची भावना वृद्धिंगत व्हावी, समाजात कोणत्याही प्रकारची सामाजिक विषमता असता कामा नये, हे सर्व सामाजिक लोकशाहीनेच साध्य होऊ शकते.



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजवादाची फेरमांडणी करताना, सर्वसामान्य 'माणूस' हाच केंद्रस्थानी गृहीत धरला आहे. त्यांनी केलेली समाजवादाची मांडणी, सर्वसामान्य माणसाचा गौरव करणारी आहे. सर्वसामान्य माणसाला नायक करणारी ती प्रक्रिया आहे. माणसाला माणूसपणाचा गौरव वाटावा अशी ही प्रक्रिया आहे. सर्वसामान्य माणसांचे जीवन हे सन्मानाने मोहरून यावे. माणूसपणाचे स्वप्न सतत त्याच्या डोळ्यात फुलत राहावे अशी समाजवादाची मांडणी डॉ. बाबासाहेबांनी केली आहे. प्रत्येक माणसाने आपले काम जीव ओतून करावे. प्रत्येक काम एकाग्रतेने करावे. आपल्या कामामुळे आपण दुसऱ्यांना ओरबाडणार नाही याची दक्षता घ्यावी. समाजात वावरताना आपण दुसऱ्याची फसवणूक करणार नाही, दुसऱ्याशी लबाडी करणार नाही, दुसऱ्याचे शोषण करणार नाही या गोष्टींचा स्पर्शही माणसाच्या मनाला होणार नाही याची काळजी समाजमनाने घ्यावी.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या समाजवाद या सिद्धान्तामधून आदर्श माणूस, इहवादी माणूस कसा निर्माण करता येईल यावर कटाक्ष दिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समाजवादाचे ध्येय हे शांततामय सहजीवन हेच आहे. येथील माणसाने वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकवाद आणि सामाजिक न्याय यांना आपली जीवनशैली मानावी तेव्हाच जात, वर्ग, धर्म आणि लिंगविरहित मनाची निर्मिती होईल. त्याचप्रमाणे समाजामध्ये कोणत्याही प्रकारची आर्थिक आणि सामाजिक विषमता असू नये. प्रत्येक माणसाला भयमुक्त जीवन जगण्याची मुभा असावी हाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरवादाचा समाजवादाचा जाहीरनामा आहे.

### सेक्युलॅरिझम म्हणजेच इहवाद

सेक्युलॅरिझम हे मानवी जीवनाला उपकारक आहे. सेक्युलॅरिझम या संकल्पनेचा अर्थच 'निधर्मी' असा आहे. सेक्युलॅरिझ म्हणजेच इहवाद होय. या संकल्पनेत स्वर्ग, नरक, परलोक, पुर्नजन्म या गोष्टींना थारा नाही. समाजाचा शेवटचा घटक हा व्यक्तीचाच असावा. तो कोणत्या धर्माचा, जातीचा, पोटजातीचा असू नये. प्रत्येक व्यक्तीचे स्वतंत्र असे अस्तित्व असते. सेक्युलॅरिझममध्ये हे अस्तित्व अबाधित राहते. प्रत्येक माणसांमाणसात स्नेहाचे संबंध हे



परस्परांमधील सर्जनशील नात्याचे प्रतीक असते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेल्या सेक्युलॅरिझम संकल्पनेत धर्माला स्थान नाही. कारण धर्म ही संकल्पना विषमता, अन्याय, शोषण, पारतंत्र्य यालाच मूल्य मानते. विषमता, अन्याय, शोषण, पारतंत्र्य या गोष्टी मूल्य ठरू शकत नाही. सेक्युलॅरिझम या संकल्पनेला पुर्नजन्म कबूल नाही. समाजाला विघातक असणाऱ्या सर्वच गोष्टींपासून मुक्त असणारे मानवीपण त्यांना अपेक्षित होते. माणूस म्हणून जन्माला आलेल्या बाळाला कोणी जात, धर्म, पंथ याचे डोस पाजू नये. त्याला विविध अंधश्रद्धांना बळी पडू देऊ नये. या सर्व गोष्टी माणसाला माणसापासून विलग करतात. म्हणून अशा संस्कारापासून तो दूर राहील, याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. हे जसे जन्म घेणाऱ्या बाळासाठी आहे तसेच ते मोठ्या माणसांसाठीही आहे. येथील सर्व लोकांनी अमानुषतेच्या विषापासून दूर राहावे. केवळ माणसात त्याच्या माणूसपणाची वाढ व्हावी. माणुसकीचे टॉनिक भारताबाहेर सॉक्रेटिक्स, मार्क्स, सात्र, लिंकन इत्यादींनी दिले आहे. भारतात चार्वाक, बुद्ध, फुले, आंबेडकर इत्यादींनी दिले आहे.



### विज्ञाननिष्ठ आंबेडकरवाद

आंबेडकरवाद म्हणजे नीती आणि नीती म्हणजेच आंबेडकरवाद होय. आंबेडकरवाद हा विज्ञाननिष्ठ आहे. जीवनाला सत्य मानणरी प्रणाली म्हणजे आंबेडकरवाद आहे. आंबेडकरवादाचा मूळ गाभा हा वैज्ञानिक दृष्टिकोन आहे. आंबेडकरवादाने पाप–पुण्य, कर्मकांड, अंधश्रद्धा, ईश्वर, आत्मा, पुनर्जन्म या सर्वच गोष्टींना नकार दिला आहे. या सर्व गोष्टी माणसाच्या मेंदूला बधिर करणाऱ्या आहेत असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. मानवी देह हे आप, तेज, वायू आणि पृथ्वी या चार भौतिक तत्त्वांपासून तयार होतो. डॉ. बाबासाहेबांनी आकाश हे तत्त्व नाकारले आहे. त्यांनी पाचवा घटक विज्ञानाला मानले आहे. माणसांच्या मानसविश्वाला त्यांनी 'नामस्कंध' म्हटले आहे. हे नामस्कंध म्हणजेच विज्ञान आहे.

आंबेडकरवाद हे विचारस्वातंत्र्याला महत्त्व देणारे तत्त्वज्ञान आहे. प्रत्येक माणसाला स्वतंत्रपणे विचार करण्याची मुभा असावी. जर माणूस स्वतंत्रपणे विचार करणार नाही तर त्याचे जीवन हे गुलामीचे ठरेल. आंबेडकरवाद माणसाला नायकत्व देतो. आंबेडकर वादात समता, बंधुता आणि न्याय या मानवी मूल्यांचा उद्घोष केला आहे. मानवी जीवनाच्या भोवती जाती, धर्माची चौकट आंबेडकरवादाला मंजूर नाही. माणूस हा माणूसच आहे. या माणसाने इतरांचे माणूसपण अबाधित ठेवावे. माणसाने आपल्या कर्तृत्वाने आपले माणूसपण सतत फुलवीत ठेवावे. स्वतःचे माणसूपण फुलविताना इतरांच्या माणूसपणाला इजा पोहोचणार नाही याचीही दक्षता घ्यावी, हेच आंबेडकरवादाचे सांगणे आहे.

आज आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेला समाजवाद आणि सेक्युलॅरिझमचे सदस्य होणे गरजेचे आहे. या दोन बाबीच आपल्याला सर्वकल्याणकारी ठरणार आहोत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समाजवाद आणि सेक्युलॅरिझम हाच येथील समाजाला राजकीय आणि सामाजिक पडझडीतून बाहेर काढू शकतो.

**अंजूमन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, सदर नागपूर,**
**संपर्क : ०८६००६९९०८६**

# महामानवाचा जीवनपट

**१४ एप्रिल, १८९१** – महू, मध्यप्रदेश येथे सैनिक छावणीत जन्म.
**१९०७** – डॉ.आंबेडकरांनी मॅट्रिकची परीक्षा पास केली.
**१९०७** – रमाबाई वलंगकर यांच्यासोबत विवाह.
**१९१०** – इन्टरमीडिएट परीक्षा उत्तीर्ण.
**१९१२** – बी.ए.परीक्षा उत्तीर्ण.
**१९१२** – पुत्र यशवंतराव यांचा जन्म.
**२ फेब्रुवारी, १९१३** – वडील सुभेदार रामजी यांचे निधन.
**१ जून, १९१३** – सयाजीराव गायकवाड यांनी विदेशातील अध्ययनासाठी शिष्यवृत्ती बहाल केली.
**१९१३** – उच्च शिक्षणाकरिता न्यूयॉर्क (अमेरिका) येथे रवाना.
**१९१५** – 'अॅन्शंट इंडियन कॉमर्स' या प्रबंधावर एम.ए.ची उपाधी बहाल.
**जून १९१६** – 'नॅशनल डिविडंड ऑफ इंडिया ए हिस्टॉरिक अँड अनालिटिकल स्टडी' प्रबंध कोलंबिया विद्यापीठाद्वारे स्वीकृत
**१९१६** – 'कास्ट इन इंडिया, देअर मेकॅनिझम जेनिसिस अँड डेव्हलपमेंट' या निबंधाचे वाचन.
**१९१६** – पीएच.डी. ची पदवी बहाल.
**११ नोव्हेंबर १९१८** – सिडेनहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्रोफेसर म्हणून नियुक्ती.
**३१ जाने.१९२०** – राजर्षी शाहू यांच्या साहाय्याने 'मूकनायक' पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित.
**१ मार्च, १९२०** – माणगाव (कोल्हापूर) येथे बहिष्कृत परिषदेचे अध्यक्षपद.
**१ मे, १९२०** – अखिल भारतीय बहिष्कृत परिषद, नागपूर
**१९२२** – बॅरिस्टरची परीक्षा पास.
**१९२३** – डॉक्टर ऑफ सायन्सची पदवी बहाल.
**२० जुलै, १९२४** – 'बहिष्कृत हितकारिणी सभा' ची स्थापना, मुंबई
**जुलै, १९२६** – 'राजरत्न' या मुलाचे निधन.
**१९ मार्च, १९२७** – कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद, महाड
**३ एप्रिल, १९२७** – 'बहिष्कृत भारत' पाक्षिकाचे प्रकाशन.
**१९२७** – मुंबई विधिमंडळात सदस्य म्हणून निवड.
**४ सप्टेंबर, १९२७** – 'समाज समता संघ' ची स्थापना.
**१२ नोव्हेंबर, १९२७** – डॉ. आंबेडकरांचे ज्येष्ठ बंधू बाळाराम आंबेडकर यांचे निधन.



**१३ नोव्हेंबर, १९२७** – अमरावती येथे अंबादेवी मंदिर सत्याग्रह.
**२५ डिसेंबर, १९२७** – महाडचा सत्याग्रह आणि मनुस्मृती दहन
**जून, १९२८** – मुंबई येथे सरकारी विधी महाविद्यालयात प्राध्यापक.
**२९ जून, १९२८** – 'समता' पाक्षिकाचा आरंभ
**२३ ऑक्टो.१९२८** – 'सायमन कमिशन' पुढे साक्ष.
**१९२९** – अस्पृश्यांसाठी ३३ टक्के आरक्षण ठेवण्याबाबत मुंबई विधिमंडळात भाषण.
**३ मार्च, १९३०** – काळाराम मंदिर, नाशिक सत्याग्रह प्रारंभ.
**२ ऑक्टो.१९३०** – लंडन येथे गोलमेज परिषदेसाठी मुंबईहून रवाना.
**नोव्हेंबर, १९३०** – गोलमेज परिषदेत अस्पृश्यांची बाजू ठामपणे मांडली.
**२४ नोव्हें.१९३०** – 'जनता' साप्ताहिकाचा आरंभ.
**१४ ऑगस्ट, १९३१** – मणीभवन, मुंबई येथे गांधीजींसोबत पहिली भेट.
**८ ऑक्टो.१९३१** – अल्पसंख्याकांच्या प्रश्नाबाबत गांधीजींच्या धोरणाला गोलमेज परिषदेत विरोध.
**२६ नोव्हे.१९३१** – गांधी–आंबेडकर–पंचम जॉर्ज यांची भेट.
**२५ सप्टें.१९३२** – पुणे करारावर स्वाक्षरी.
**२७ मे, १९३५** – पत्नी रमाबाई यांचे निधन.
**२ जून, १९३५** – मुंबई, विधी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदावर नियुक्ती.
**१३ ऑक्टो.१९३५** – येवला, 'हिंदू म्हणून जन्माला आलो, पण हिंदू म्हणून मरणार नाही.' डॉ. आंबेडकरांची धर्मांतराची घोषणा.



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या पत्नी रमाबाई आंबेडकर**

**मे, १९३६** – 'जातिप्रथेचे उन्मूलन' भाषण प्रकाशित.
**३१ मे, १९३६** – 'मुक्ती कोन पथे' विख्यात भाषण, मुंबई
**१५ ऑगस्ट, १९३६** – स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना.
**१७ फेब्रु. १९३७** – मुंबई असेंब्ली निवडणूक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विजयी.
**१७ सप्टें.१९३७** – कोकणातील 'खोती' नष्ट करण्याकरिता मुंबई विधिमंडळात बिल मांडले.
**४ जाने. १९३८** – पंढरपूर, मातंग परिषदेतर्फे मानपत्र अर्पण.
**१२–१३ फेब्रु.१९३८** – मनमाड येथे अस्पृश्य रेल्वे कामगार परिषद.
**मे १९३८** – मुंबई विधी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाचा राजीनामा.
**सप्टेंबर १९३८** – औद्योगिक कलहाचे विधेयक मुंबई विधिमंडळात मांडले.
**७ नोव्हें.१९३८** – स्वतंत्र मजूर पक्षातर्फे सत्याग्रह.
**जानेवारी,१९३९** – महाड, शेतकरी परिषदेचे अध्यक्षपद–काँग्रेसच्या

शेतकरी– विरोधी धोरणावर टीका.



**२२ जून, १९४० –** मुंबई, सुभाषचंद्र बोस यांच्यासोबत भेट.
**१९४० –** 'थॉटस् ऑन पाकिस्तान' ग्रंथाचे प्रकाशन.
**एप्रिल, १९४२ –** अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना.
**१९ जुलै, १९४२ –** भारतीय दलित वर्ग परिषद, नागपूर येथे हजर.
**१९४२ –** मजूर मंत्री म्हणून निवड.
**१९ जाने.१९४३ –** पुणे येथे विख्यात भाषण– रानडे, गांधी आणि जिन्ना.
**जून, १९४५ –** काँग्रेस आणि गांधींनी अस्पृश्यांप्रती काय केले? ग्रंथ प्रकाशित
**२० जून, १९४६ –** मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना.



**१९४६ –** 'शूद्र पूर्वी कोण होते? ' हा ग्रंथ प्रकाशित.
**१७ डिसें.१९४६ –** भारताला कोणतीही शक्ती एकात्मक होण्यापासून परावृत्त करू शकत नाही. संविधान सभेत भाषण.
**ऑगस्ट १९४७ –** भारताचे पहिले कायदे मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश.
**२९ ऑगस्ट १९४७ –** संविधान मसुदा समितीच्या अध्यक्षपदावर निवड.
**१५ एप्रिल, १९४८ –** डॉ. शारदा कबीर यांच्यासोबत विवाह.
**ऑक्टो. १९४८ –** 'दि अनटचेबल्स' ग्रंथ प्रकाशित.
**सप्टेंबर, १९४८ –** सरसंघसंचालक माधवराव गोळवलकर यांच्यासोबत भेट.
**४ नोव्हें. १९४८ –** घटनेचा मसुदा घटना समितीसमोर ठेवला.
**२५ नोव्हें. १९४९ –** घटना समितीत देशभक्तीने ओथंबलेले समारोपीय भाषण.
**२६ नोव्हें.१९४९ –** घटना समितीने घटना स्वीकार केली.
**मे, १९५० –** 'बुद्ध आणि त्यांच्या धम्मा'चे भवितव्य लेख महाबोधी संस्थेच्या मासिकात प्रसिद्ध.
**२५ मे, १९५० –** कोलंबोत विश्व बौद्ध परिषदेला उपस्थित.
**१९ जून, १९५० –** औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय स्थापन.
**मे, १९५१ –** लोकप्रतिनिधित्व विधेयक लोकसभेपुढे मांडले.
**सप्टें. १९५१ –** 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती' हा लेख महाबोधी मासिकामध्ये प्रकाशित.
**२७ सप्टें. १९५१ –** हिंदू कोड बिल व मागासवर्गीयांच्या आरक्षणाबाबत मंत्रिपरिषदेचा राजीनामा.
**जानेवारी, १९५२ –** प्रथम सार्वत्रिक निवडणुकीमध्ये पराभव.
**मार्च, १९५२ –** राज्यसभेसाठी निवड.
**५ जून, १९५२ –** कोलंबिया विद्यापीठातर्फे 'डॉक्टर ऑफ लॉज' ही पदवी अर्पण.
**१२ जाने.१९५३ –** हैद्राबाद, उस्मानिया विद्यापीठातर्फे 'डॉक्टर ऑफ लिटरेचर' पदवी अर्पण.
**३० जाने,१९५४ –** 'महात्मा फुले' बोलपट चित्रपटाच्या मुहूर्त समारंभास उपस्थित.
**मे, १९५४ –** भंडारा पोटनिवडणुकीमध्ये पराभव.
**३ ऑक्टो.१९५४ –** आकाशवाणीवर 'माझे वैयक्तिक तत्त्वज्ञान' भाषण.
**२८ ऑक्टो.१९५४ –** माझे आयुष्य तीन गुरुंनी आणि तीन उपास्य दैवतांनी घडले.
**डिसेंबर, १९५४ –** रंगून, तिसऱ्या जागतिक बौद्ध परिषदेला उपस्थित.
**४ मे, १९५५ –** भारतीय बौद्ध महासभा स्थापित.
**४ फेब्रु. १९५६ –** मुंबई ही महाराष्ट्राची आहे, अशी ताकीद भारत सरकारला दिली.
**२४ मे, १९५६–** नरेपार्क येथे 'ऑक्टोबर महिन्यात मी बौद्धधर्माची दीक्षा घेईल,' अशी घोषणा केली.
**१४ ऑक्टो.१९५६–** नागपूर येथे पूज्य भंते महास्थवीर चंद्रमणी यांच्या हस्ते पत्नीसोबत धम्मदीक्षा घेतली व नंतर आपल्या ५ लाख अस्पृश्य बंधूंना बौद्ध धम्माची दीक्षा दिली.
**१५ ऑक्टो. १९५६ –** 'बौद्ध धम्म का स्वीकारला' या विषयी सकाळी अभूतपूर्व भाषण व नागपूर म्युनिसिपालिटीतर्फे संध्याकाळी मानपत्र अर्पण.
**१६ ऑक्टो. १९५६ –** चंद्रपूर येथे २ लाख अस्पृश्य बंधूंना धम्मदीक्षा दिली.
**२० नोव्हें. १९५६ –** काठमांडू, नेपाळ येथे जागतिक बौद्ध परिषदेत 'बुद्ध आणि कार्लमार्क्स' हे अभूतपूर्व भाषण दिले.
**६ डिसें. १९५६ –** दिल्ली येथे त्यांच्या निवासस्थानी महापरिनिर्वाण.
**७ डिसें. १९५६ –** मुंबई येथे दादर चौपाटीच्या किनाऱ्यावर १० लाख लोकांच्या साक्षीने बौद्ध पद्धतीनुसार अंतिम संस्कार.



**भारतीय समाज व्यवस्थेला जातिपातींनी अत्यंत वाईटरीत्या पोखरले आहे. त्यामुळे भारतीय समाजाची प्रगतीपेक्षा अवनतीच अधिक झाली. जातिपातींच्या अनिष्ट चालीरीती, प्रथा याविरुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एल्गार पुकारला. जातविरहित समताधिष्ठित समाज निर्मितीसाठी शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी अथक प्रयत्न केले.**

# समतेचा उद्गाता

**प्रा. नागसेन भीमरावजी ताकसांडे**


भारतातील प्रत्येक राज्य कोणत्या ना कोणत्या समाजसुधारकामुळे परिचित आहे. महाराष्ट्र तर संतांची भूमी. जात-पात, भेदभाव विसरून एकोप्याने नांदण्याचा संदेश देणारे, वैचारिकदृष्ट्या प्रगल्भ असलेले आणि एक पुढारलेले राज्य आहे. या महाराष्ट्राच्या भूमीत जगद्गुरू संत तुकाराम, संत नामदेव, संत चोखामेळा यांसारखे संत होऊन गेले. त्यांनी आपल्या भक्तिमार्गाने सुधारणावादी चळवळ उभी केली. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, थोर समाजसुधारक महात्मा जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला समानतेचा संदेश वैश्विक बंधुतेच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो.

संत रविदास आपल्या संदेशात म्हणतात,

'जाति-जाति में जात है, ज्यों केलन के पात । रैदास न मानुष जुड़ सके जौ लौ जात न जात ।।

जात-पात के फेरे में, उलझ रहहि सब लोग । मनुष्यता को खात है, रैदास जाति का रोग ।।'

(दयाराम, क्रांती युगपुरुष रविदास जीवन और मिशन, पृ. क्र. २०) अशा पद्धतीने संत रविदास स्पष्ट करतात की, 'आपल्या जातीला प्रबळ बनविणारे लोक वर्षानुवर्षापासून जाती व्यवस्थेला जिवंत ठेवू इच्छितात. त्यामुळे त्यांच्या जातींची ताकद वाढते. जात समाज आणि देशाला जोडत नाही तर तोडते.' म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जाती निर्मूलनाची भूमिका महत्त्वाची ठरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातिप्रथेच्या उत्पत्तीचा सिद्धांत मांडून भारतात जातीचा उगम कसा झाला आणि भारतीय समाज जाती आणि धर्माच्या जोखडात कसा ओढला गेला याचे सप्रमाण विवेचन केले आहे. जातिप्रथा हा भारतीय समाजाला जडलेला असाध्य रोग आहे आणि अशा रोगाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी त्यांनी मांडलेला विचार लक्षात घ्यावा लागेल.





## भारतातील जाती : त्यांची घडण, उत्पत्ती आणि प्रसार

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ९ मे १९१६ रोजी "Caste in India: It's Mechanism, Genesis and Development' (भारतातील जाती : त्यांची घडण, उत्पत्ती आणि प्रसार) हा निबंध अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात डॉ गोल्डनवाईजर मानववंशशास्त्र परिषदेस सादर केला होता. त्यात त्यांनी वस्तुनिष्ठपणे जातिव्यवस्था ही एक सामाजिक समस्या असल्याचे प्रतिपादन केले. आपल्या सिद्धांतात ते मांडतात की, "Endogamy is the only Characteristic that is peculiar to Caste' (जातीअंतर्गत विवाह हेच जातीचे व्यवच्छेदक लक्षण आहे.) डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले की, जगात अनेक परिवर्तने झालीत पण भारतात मात्र अशा प्रकारे कोणतेच परिवर्तन झाले नाही. 'तुमच्या आवडीप्रमाणे कोणत्याही दिशेने पळा, जातीचा राक्षस तुमचा मार्ग अडवून बसला आहे. या राक्षसाला ठार मारल्याशिवाय तुम्हाला राजकीय सुधारणा किंवा आर्थिक सुधारणा कधीही प्राप्त होऊ शकत नाही.' म्हणूनच एक जात दुसऱ्या जातीचा द्वेष करते. त्यामुळे त्यांच्यात शत्रूत्व निर्माण होते, हा जातिपद्धतीचा परिणाम होय. 'जातिसंस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे पूर्वीच्या काळात एका जातीच्या लोकांनी दुसऱ्या जातीवर केलेला अन्याय त्या जातीमधील नंतरची पिढी विसरत नाही.' (Ambedkar Dr. B. R., Annihilation of Caste, Dr. Ambedkar Writing and Speeches- Vol. No. 1 pp.52) अशा प्रकारे आज दिसत असलेला जातिजातीतील संघर्ष राष्ट्रीय एकात्मतेला धोकादायक आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'खालच्या जातीच्या लोकांना आपल्याबरोबरीचा सांस्कृतिक दर्जा प्राप्त होऊ नये म्हणून उच्च जातीचे लोक मुद्दाम अडथळे निर्माण करतात.' (तत्रैव पृ. क्र. ५२) जातिव्यवस्थेला पवित्र दैवी व धार्मिक मान्यता प्राप्त झाल्यामुळे जाती व्यवस्थेमध्ये कुठल्याच प्रकारचे परिवर्तन अशक्य आहे. अशी व्यवस्था सामाजिक समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव ही मूल्ये नाकारणारी ठरतात.

लाहोरच्या 'जात-पात तोडक मंडळ' या समाजसुधारक सवर्ण हिंदूंच्या एका संस्थेने जातिभेद नष्ट व्हावा या उद्देशाने १९३६ साली

वार्षिक संमेलनाकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अध्यक्ष म्हणून निमंत्रित केले. त्यासाठी बाबासाहेबांनी अध्यक्षीय भाषण तयार केले. परंतु या भाषणात बाबासाहेबांनी व्यक्त केलेले विचार स्वागत समितीला अनुकूल नसल्यामुळे ते संमेलन रद्द झाले. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ते "Annihilation of Caste' या ग्रंथाच्या रूपात प्रसिद्ध केले. त्यात जाती नष्ट करण्यासाठी काही विद्वानांनी असे मत मांडले की, जातिभेद नष्ट करण्यासाठी प्रथम पोटजाती नष्ट कराव्यात. त्यावर डॉ. आंबेडकर म्हणतात कि, विभिन्न जातीपेक्षा पोटजातीमध्ये रूढी आणि दर्जा यात बराच सारखेपणा आहे. पोटजातीचे एकत्रीकरण शक्य आहे असे गृहीत धरले तरी पोटजातीचे निर्मूलन, आपणाला हळूहळू सर्व जाती नष्ट करण्यास मार्गदर्शक होईल याची शाश्वती नाही. अशा अवस्थेत पोटजाती नष्ट करण्याचा परिणाम जाती अधिक मजबूत करण्याकडे होईल. म्हणून हा उपाय परिणामकारकही व व्यवहार्य नाही. तो एक चुकीचा मार्ग असल्याचे आपोआप सिद्ध होईल.

जाती नष्ट करण्याचा दुसरा उपाय म्हणून आंतरजातीय सहभोजन आवश्यक आहे असे मानले जाते. परंतु हा उपायदेखील बाबासाहेबांना योग्य वाटत नाही. आंतरजातीय सहभोजने करणाऱ्या अनेक जाती आहेत. परंतु स्वजातीची जाणीव व वृत्ती ठार करण्यात सहभोजने यशस्वी ठरली नाहीत.




## जातीनिर्मूलनावरील उपाय

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आंतरजातीय विवाह हा जातीनिर्मूलनावरील एक चांगला उपाय वाटतो. कारण रक्तसंबंधानेच आपुलकीची भावना निर्माण होते. या नातेसंबंधाच्या भावनेवाचून विभक्तपणाची भावना कळसाला पोहचेल व जातीने निर्माण केलेली परकेपणाची भावना कधीच नष्ट होणार नाही. डॉ. आंबेडकर म्हणतात, 'जात ही मानसिक वृत्ती आहे' जातीचे पालन करण्यात लोकांची चूक नाही. त्यांचा धर्म त्यांना तसे करावयास लावतो. कारण धर्मानेच जातीची कल्पना बिंबवली आहे. ज्या शास्त्रांनी लोकांना जातिधर्म शिकवला ती शास्त्रे बाबासाहेबांना मानवतेचे शत्रू वाटतात. म्हणून शास्त्र पवित्र असल्याबद्दलची श्रद्धा नष्ट करणे हा जातिभेदावर प्रभावी आणि खरा उपाय होय, असे प्रतिपादन डॉ. आंबेडकर करतात. अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती उत्पत्तीचा शास्त्रशुद्ध आणि वस्तुनिष्ठ सिद्धांत मांडला व त्याच्या दुष्परिणामावर प्रकाश टाकून जाती निर्मूलनाचा विचार सांगितला.

भारतातील कुठलाही सुजाण नागरिक जातिव्यवस्थेमुळे देशाच्या प्रगतीस खीळ बसली आहे हे सत्य नाकारू शकत नाही. बाबासाहेबांनी सांगितलेले आंतरजातीय विवाह आणि शास्त्र पवित्र असल्याबद्दलची श्रद्धा नष्ट करणे हे जातिभेदाच्या निर्मूलनाचे भीमबाण उपाय आहेत.

## कायद्याने अस्पृश्यतेला थारा नाही

२१ व्या शतकाच्या वाटचालीत भारतातील वर्णवर्चस्ववादी लोक जातीयतेचे विष पेरीत आहेत. कायद्याने आज अस्पृश्यतेला थारा नाही तरीही जातीयता आजही पाळली जाते. याची असंख्य उदाहरणे आहेत. परंतु काहीच घटना या प्रकाशझोतात येतात.

देशात जाती आणि धर्म यांच्या नावावर कुठे ना कुठे अन्याय, अत्याचार, स्त्रियांवरील लैंगिक अत्याचार चालू आहेत. अशा वेळी देशाचे अखंडत्व कायम राखण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि कार्याचा सर्वत्र प्रचार आणि प्रसार होणे ही काळाची गरज आहे. डॉ. आंबेडकर 'Annihilation of Caste' या ग्रंथात लोकशाही आणि आदर्श समाजाच्या संदर्भात केलेले विधान महत्त्वाचे आहे. ते म्हणतात–

'An ideal society should be mobile, should be full of channels for conveying a change taking place in one part to other parts. In an ideal society there should be many interests consciously communicated and shared. There should be varied and free points of contact with other modes of association. In other words there should be social endosmosis. This is fraternity, which is only another name for democracy. Democracy is not merely a form of Government. It is primarily a mode of associated living, of conjoint communicated experience. It is essentially an attitude of respect and reverence towards fellowmen.'

शेवटी केतन पिंपळापुरे यांच्या शब्दात,–
'आम्हाला बघायचं आहे माणसांच्या गावात
समतेला नांदताना
आम्हाला करायची आहे
मानवाच्या मूलभूत गरजांची गळचेपी करणाऱ्या
नीतिशास्त्रांची खांडोळी
आम्हाला बघायची आहे
आमच्या स्वप्नांची दुनिया
शांती–समृद्धीच्या पदराखाली विसावलेली....'

(डॉ. यशवंत मनोहर, आंबेडकरवादी मराठी साहित्य, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर पृ. क्र.२३३).

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभाग,**
**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.**
**संपर्क : ०९९२१८५८३४०**

**डॉ. बबन जोगदंड**

महाराष्ट्रात डॉ. बाबासाहेब आंबडेकरांची अनेक स्मरणस्थळे आहेत. बाबासाहेबांच्या जीवनातील अनेक प्रसंगाच्या काही वास्तू साक्षीदार आहेत. त्यात त्यांचे मूळगाव आंबडवे, ता. मंडणगड जि. रत्नागिरी, त्यांनी जिथे बौद्ध धम्माची दीक्षा घेतली ती नागपूरची दीक्षाभूमी, माणगाव (ता. कोल्हापूर) येथे घेतलेली माणगाव परिषद, महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह, येवला (जि. नाशिक) येथे केलेली धर्मातरांची घोषणा, नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश, सातारा शाळेतील पहिलीचा प्रवेश,

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडित महत्त्वाच्या स्थळांचा विकास केला जात आहे. ही सर्व स्थळे सर्वांसाठी प्रेरणादायी, स्फुर्तिदायक आणि नवी ऊर्जा देणारी आहेत.**

# प्रेरणा, ऊर्जा आणि स्फूर्ती देणारी तीर्थस्थळे




मुंबई येथील इंदू मिल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभारले जात आहे. त्याचे भूमिपूजन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. या वेळी राज्यपाल सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रस्ते वाहतूक व नौकानयन मंत्री नितीन गडकरी, सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले, राज्यमंत्री दिलीप कांबळे, खा. रावसाहेब दानवे आदी मान्यवर.



भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिल येथील स्मारकाच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली असून स्मारकाचे काम तीन वर्षात पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

त्यांनी सुरू केलेले औरंगाबाद येथील मिलिंद महाविद्यालय, मुंबई येथील त्यांचे निवासस्थान राजगृह, पुण्यातील तळेगाव येथील त्यांचा बंगला, देहूरोड येथे स्थापन केलेली बुद्धमूर्ती. अशा कितीतरी स्थळांचा उल्लेख करता येईल. या स्थळांना अनेक लोक श्रद्धेने भेटी देऊन डॉ. आंबेडकरांच्या स्मृती जाग्या करतात, त्यातून प्रेरणा घेऊन तिथे नतमस्तक होतात.

महाराष्ट्रातील या महत्त्वपूर्ण स्थळांव्यतिरिक्त विदेशातील स्थळही डॉ. आंबेडकराच्या सहवासाने पुनीत झाली आहेत, त्यामध्ये लंडन येथे शिकण्यासाठी डॉ. आंबेडकर ज्या बंगल्यात वास्तव्यास होते तो बंगला, कोलंबिया विद्यापीठ (न्यूयार्क) ग्रेज इन विद्यापीठ (जर्मनी) तर देशातील मध्यप्रदेशातील त्यांचे जन्म गाव महू, दिल्ली येथील २६ अलीपूर रोड येथील निवासस्थान आणि त्यांचे महापरिनिर्वाण झाल्यानंतर त्यांच्यावर अत्यंसस्कार करण्यात आलेले ठिकाण म्हणजे चैत्यभूमी ही सर्व स्थळे बाबासाहेबांच्या अनुयायींसाठी अत्यंत महत्त्वाची ठिकाणे आहेत.

नागपूर येथील दीक्षाभूमी, येवला येथील मुक्तीभूमी त्यांचे मूळगाव आंबडवे 'स्फूर्तिभूमी' आणि मुंबई येथील चैत्यभूमीला दरवर्षी लाखोंचा जनसागर जमतो. या स्थळांचा विकास महाराष्ट्र सरकारने केला आहे. नागपूर येथील दीक्षाभूमीला आणि चैत्यभूमीला 'अ' वर्ग पर्यटनाचा दर्जा शासनाने दिला आहे. या सर्वच पर्यटन स्थळांना भेटी देण्यासाठी देश-विदेशातून अनेकजण येत असतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंतीनिमित्त केंद्र व राज्य शासनाने जी 'पंचतीर्थ' म्हणून विकसित करण्यासाठी स्थळे घेतली. त्यामध्ये १) महूमधील स्मारक, २) आंबडवे गाव, ३) दिल्ली येथील निवासस्थान, ४) इंदू मिल, ५) लंडन येथील घर आदींचा समावेश आहे. या सर्व स्थळांचा विकास प्रगतीपथावर आहे.

## इंदू मिल

इंदू मिल ही मुंबईला दादरमध्ये आहे. याच भागात डॉ. आंबेडकरांचे 'राजगृह' हे निवासस्थान होते. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांचे पार्थिव शरीर येथेच अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले. ७ डिसेंबर रोजी त्यांच्यावर दादर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. बाबासाहेबांचे निवासस्थान राजगृह आणि त्यांच्यावर अंत्यसंस्कार केलेले ठिकाण म्हणजे चैत्यभूमी हे दादर याच परिसरात असल्याने ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिनी मोठी गर्दी होते. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य असे स्मारक दादर येथील इंदू मिलच्या जागेवर व्हावे, अशी लाखो लोकांची अपेक्षा होती. म्हणून शासनाने इंदू मिलची १२ एकर जमीन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी दिली. हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक होणार असून या स्मारकात स्मृती स्तूप, सभागृह, प्रेक्षकगृह, वस्तुसंग्रहालय, ग्रंथालय, शोभिवंत बगिचा, वाहनतळ असणार आहे. यासाठी २०१८ च्या अर्थसंकल्पात सुमारे १५० कोटी रूपयांची तरतूद केली आहे. इंदू मिल येथील स्मारकाच्या कामाच्या कार्यारंभ आदेश शापूरजी पालनजी कंपनी प्रा. या कंपनीला देण्यात आला आहे. या कंपनीची निविदा रक्कम रुपये ७०९ कोटी इतकी मंजूर करण्यात आली आहे. यानुसार त्यांना ९ फेब्रुवारी २०१८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. कंपनीला तीन वर्षांत काम पूर्ण करण्याची मुदत देण्यात आली आहे. कामाचे महत्त्वाचे टप्पे दोन वर्षात आणि इतर अनुषंगिक कामांसाठी आणखी एक वर्ष देण्यात आले आहे.



**इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे संकल्प चित्र.**

प्रस्तावित स्मारकाच्या संदर्भात जागा हस्तांतरणाबाबत औपचारिक बाबींची पूर्तता, सीआरझेड अधिसूचनेच्या अनुषंगाने मान्यता, मंजूर विकास योजनेमध्ये आरक्षणासाठी फेरबदल या वैधानिक बाबींची पूर्तता, संकल्पना नकाशाबाबत संबंधित व्यक्ती व संस्था यांची मते विचारात घ्यावयाची असल्याने तसेच मागवण्यात आलेल्या निविदांना पहिल्या प्रयत्नात योग्य प्रतिसाद मिळालेला नसल्याने, स्मारकाचे प्रत्यक्ष बांधकाम सुरू होण्यासाठी कालावधी

### महू
### (डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जन्मस्थळ)

डॉ. बाबासाहेबांचे वडील रामजी सपकाळ यांनी पुण्यात आपले शिक्षण पूर्ण केले. पंतोजी शाळेमध्ये ते होते. त्यांनी आपले शिक्षण पूर्ण झाल्यानंतर लष्करामध्ये शिक्षक म्हणून नोकरी करण्यास सुरुवात केली. नंतर शाळेत ते प्रधान शिक्षक झाले. त्यानंतर त्यांना मुख्याध्यापक म्हणून पदोन्नती मिळाली. १४ वर्ष मुख्याध्यापकाचे काम सांभाळल्याने त्यांना सैन्यात मेजर (सुभेदार) म्हणून बढती मिळाली. नंतर ते महू इथे नोकरी निमित्त वास्तव्यास होते. कारण महूला (Mhow) मिलीटरी हेडक्वार्टर्स ऑफ वॉर म्हणून ओळखले जाई. तेथेच डॉ. बाबासाहेबांचा जन्म १४ एप्रिल १८९१ मध्ये झाला. भीमाबाई यांच्या पोटी जन्म घेणारे डॉ. बाबासाहेब हे १४ वे अपत्य होते. भीमाबाई यांचे पुढे बाबासाहेबांच्या बालपणीच निधन झाले. (भीमाबाईची समाधी सातारा इथे आहे.) बाबासाहेबांचे नाव 'भीम' असे ठेवण्यात आले. नंतर 'भीम' यांचे भीमराव आणि नंतर लोक 'बाबा' संबोधू लागले. नंतर



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जन्मभूमी असलेल्या महू येथे भव्य स्मारक उभारण्यात आले आहे.

ते सर्वांचे बाबासाहेब झाले. या भीमाचा सांभाळ डॉ. आंबेडकरांची आत्या मिराबाई हिने केला. हा भीम बुद्धीवान व्हावा, त्याने दीन-दलित समाजाचा उद्धार करावा अशी त्यांचे वडील रामजी सुभेदार यांची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी लहाणपणीच बाळ 'भीम' यांच्यावर १) शिक्षण, २) शिस्त, ३) स्वावलंबन, ४) स्वाभिमान, ५) कठोर परिश्रम ही पाच मूल्ये रुजवली. या मूल्यांचा बाबासाहेबांनी आपल्या जीवनात अंगीकार केला आणि त्यानुसार वाटचाल केली. पुढे हा 'भीम' या देशातील दीन दलितांचा उद्धारकर्ता, भारतीय राज्यघटनेचा निर्माता ठरला.

म्हणून बाबासाहेबांच्या जन्मस्थळाला म्हणजे 'महू' ला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. महू इथे लाखो पर्यटक दरवर्षी भेट देऊन बाबासाहेबांच्या जन्स्थळाला वंदन करत असतात.

महू येथे बाबासाहेबांच्या जन्मस्थळावर शासनाने यथोचित स्मारक उभे केले आहे. हे स्मारक चैतन्याचा झरा आहे. या स्मारकाच्या विकासासाठी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी केंद्रसरकारने पावले उचलली आहेत.

**महू येथे कसे जाल –** मध्यप्रदेशची राजधानी भोपाळ येथून दोन ते तीन तासांच्या अंतरावर व इंदौर येथून २० किलोमीटरच्या अंतरावर महू आहे.

लागला. या नियोजित स्मारकाला भेट देण्यासाठी दादर, परेल येथील लोकल रेल्वे स्थानकातून जाता येईल.

### आंबडवे

डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील संस्मरणीय स्थळ म्हणजे रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील आंबडवे हे गाव होय. अतिशय कमी लोकवस्ती असलेले हे बाबासाहेबांच्या पूर्वजांचे गाव. इथे सपकाळ कुटुंबीय वास्तव्य करून राहते. या सपकाळ घराण्यातीलच डॉ. आंबेडकर. त्यांच्या आडनावाची कहाणी मोठी रंजक आहे. बाबासाहेबांचे आडनाव सपकाळ. नंतर त्यांच्या वडिलांनी बाबासाहेबांचे आडनाव सातारा येथील प्रतापसिंह शाळेत आंबडवेकर असे ७ नोव्हेंबर १९०० रोजी नोंदवले. आज ७ नोव्हेंबर हा शाळा दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'शाळा प्रवेश दिन' म्हणून साजरा होतो. कारण शाळेत बाबासाहेबांचे नाव नोंदवलेले रजिस्टर आणि त्यांची स्वाक्षरी पाहावयास मिळते. या शाळेत त्यांना शिकवण्यासाठी आंबेडकर नावाचे शिक्षक होते. त्यांचे बालभीमावर खूप प्रेम होते. शाळेच्या दप्तरात नोंदवलेले आंबडवेकर हे आडनाव उच्चारताना त्यांना ते आडनीड वाटत असे म्हणून

रत्नागिरी जिल्ह्यातील आंबडवे



माझे आंबेडकर हे नाव तू धारण कर, त्यांनी असे भीमाला सुचवले. त्याला बालभीमाने लगेच होकार दिला आणि बाबासाहेबांचे आडनाव आंबडवेकराचे आंबेडकर झाले. तशी नोंद शाळेत झाली. तेव्हापासून बालभीमाचे नाव आंबेडकर झाले. असे आंबडवे हे डॉ. बाबासाहेबाचे गाव त्यांच्या आडनावामुळे आणि त्यांच्या मूळ गावामुळे जगाच्या नकाशावर प्रसिद्ध आहे.

केंद्र सरकारने या गावाचा विकास करण्याचे ठरवले असून तेथेही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे यथोचित स्मारक उभे राहणार आहे. केंद्र सरकारने यासाठी पायाभूत सोयी–सुविधा उभारण्यासाठी ४१२ कोटी रुपये मंजूर केले आहे. महाराष्ट्र शासनाने यासाठी ४० कोटींची तरतूद केली आहे. आता हे गाव खा. अमर साबळे यांनी दत्तक घेऊन या त्यांच्या मूळ गावाचा विकास हाती घेतला आहे. या अंतर्गत आता २ कोटींची कामे सुरू आहेत. त्यामध्ये शाळा, रस्ते, पाणी, सभागृह आदी कामांचा समावेश आहे. सरकारकडून या गावाहून





लंडन येथे वास्तव्य केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक निवासस्थानी बाबासाहेबांच्या अर्धपुतळ्यास अभिवादन करताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले.

### इंग्लंडमधील घर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना उच्च शिक्षणासाठी ते ५ जुलै १९२० रोजी लंडनला उच्च शिक्षणाकरिता रवाना झाले. लंडनच्या स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पॉलिटीकल सायन्समध्ये त्यांनी एम. एस्सी.साठी प्रवेश मिळवला. त्या काळात अस्पृश्य समाजातील जन्म घेतलेला एकमेव विद्यार्थी या देशात शिक्षणाकरिता गेला होता. त्यांनी या संस्थेत एम. एस्सी.साठी प्रवेश मिळवला. तसेच ग्रेज इन या संस्थेतून बॅरिस्टरीचा अभ्यासही सुरू केला. लंडन विद्यापीठाने १९२१ मध्ये म्हणजे १ वर्षांनी त्यांना एम. एस्सी ही पदवी प्रदान केली. त्यानंतर त्यांनी पी.एच.डी.साठी 'द प्राब्लेम ऑफ रूपी' हा प्रबंध लंडन विद्यापीठात सादर केला. त्यानंतर त्यांना १९२२ मध्ये या विद्यापीठाने 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी बहाल केली. डॉ. आंबेडकर १९२१ ते १९२२ अशी दोन वर्ष लंडनमध्ये किंग हेन्री या मार्गावर एका घरात राहत होते. याच घरात त्यांनी रात्र–रात्र जागून अभ्यास केला. प्रसंगी उपाशी, अर्धपोटी राहून आपला उदरनिर्वाह केला. हे घर आज एक ऐतिहासिक स्मारक ठरले आहे. हे घर राज्य शासनाने ३५ कोटी रुपयांना खरेदी केले आहे. या घराला भेट देण्यासाठी अनेक जण इंग्लंडला जातात. या घराचे स्मारक करून इथेही डॉ. आंबेडकरांचा विचार सरकारला तेवत ठेवायचा आहे. आपल्या देशाव्यतिरिक्त परदेशातही डॉ. आंबेडकर यांच्या स्मृती प्रेरणास्थळ ठरल्या आहेत. कोलंबिया विद्यापीठाने 'द सिम्बॉल ऑफ' नॉलेज असे त्यांच्या पुतळ्याखाली लिहून ठेवले तर इंग्लंडच्या घरावर 'सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते डॉ. भीमराव रामजी आंबेडकर (१८९१–१९५६) यांनी १९२१–१९२२ या घरात वास्तव्य केले अशी अक्षरे कोरली आहेत. हे घर ३.१ मिलीयन पौंड डॉलरला राज्य सरकारने विकत घेतले असून आवश्यक दुरुस्ती व नूतनीकरण येथे चालू आहे.

डॉ. आंबेडकरांशी संबंधित या पाचही स्थळांना 'पंचतीर्थ' म्हणून घोषित करून या स्थळांचा विकास करण्याचा सरकारने जो संकल्प केला आहे. तो अत्यंत अभिनंदनीय स्वरूपाचा आहे. डॉ. आंबेडकरांच्या स्मृती, त्यांच्या आठवणी भावी पिढीच्या हृदयात कोरावयाच्या असतील तर ही 'पंचतीर्थ' मोलाची भूमिका पार पाडू शकतील, यात शंकाच नाही!




लंडन येथे वास्तव्य केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक निवासस्थानी सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले, भारतीय दुतावासातील प्रथम सचिव एम.पी.सिंग आणि या निवासस्थानाचे मूळ मालक.



**नवी दिल्ली येथे २१ मार्च २०१६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाच्या नियोजित प्रकल्पाची पाहणी करताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी. सोबत केंद्रीय सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्री थावरचंद गेहलोत, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री विजय सांपला**

राज्य-महामार्ग वळवण्याचा विचार आहे. त्यामुळे विकासाला गती मिळेल. आंबडवे रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड या तालुक्याच्या ठिकाणापासून १७ किलोमीटर अंतरावर आहे.

## दिल्लीतील २६ अलिपूर रोड येथील निवासस्थान

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बरेच काळ देशाची राजधानी दिल्ली येथे वास्तव्य होते. ते जेव्हा देशाचे कायदामंत्री बनले तेव्हा दिल्लीमधील २६ अलिपूर रोड येथील निवासस्थान त्यांना देण्यात आले. येथेच त्यांनी विविध विषयांवर लेखन केले. यामध्ये 'बुद्धा अँड हिज धम्मा', 'बुद्ध और कार्ल मार्क्स' यांचा समावेश आहे. अनेक सामाजिक, राजकीय चळवळीच्या संदर्भात बैठकाही याच निवासस्थानी बाबासाहेबांनी बोलवलेल्या होत्या. डॉ. आंबेडकरांसमवेत माई आंबेडकर येथेच राहिल्या. बाबासाहेबांनी जीवनभर खूप परिश्रम घेतले अभ्यास, चिंतन, दौरे लेखन याला त्यांनी खूप वाहून घेतल्याने ते आजारी असायचे. वयाच्या ६५व्या वर्षी म्हणजेच ६ डिसेंबर १९५६ रोजी रात्री झोपेतच बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण झाले. त्यांच्या निधनाची वार्ता दुपारी आकाशवाणीवरून संबंध देशभर पसरली. त्यांच्या निधनाने भारतीय समाजाचे हृदय हेलावले. अनेकांना खूप दु:ख झाले. दलित समाज तर पुरता शोकसागरात बुडाला. दीनदलितांच्या उद्धारकर्त्यांचा अस्त झाल्याने अनेकांनी २६ अलिपूर रोड गाठून त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी रीघ लावली. अंत्यदर्शनासाठी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू त्यांच्या निवासस्थानी गेले. पंडित नेहरू हे बाबासाहेबांना मंत्रिमंडळातील सर्वांत हुशार, ज्ञानी मंत्री म्हणून संबोधत असत. डॉ. आंबेडकरांनी महाराष्ट्रात विशेषत: मुंबईत अधिक वास्तव्य केल्याने व महाराष्ट्रातील ते मूळ रहिवासी असल्याने त्यांच्यावर मुंबईत अंत्यसंस्कार करण्याचा निर्णय घेण्यात आला. अंत्यदर्शनासाठी त्यांचे शव खास विमानाने मुंबईला नेण्यात आले. ७ डिसेंबर रोजी त्यांच्यावर दादर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. या अंत्यसंस्काराला महाराष्ट्र व देशातील त्यांचे लाखो अनुयायी उपस्थित होते. मुंबईने पहिल्यांदाच एवढी विशाल अंत्ययात्रा अनुभवली.

जिथे डॉ. आंबेडकरांवर अंत्यसंस्कार झाले ती जागा 'चैत्यभूमी' म्हणून प्रसिद्ध आहे. ६ डिसेंबर रोजी त्यांच्या महापरिनिर्वाणदिनी लाखो अनुयायी त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी येथे येतात. दिल्ली येथील २६ अलिपूर रोड या स्थळाला डॉ. आंबेडकरांच्या जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान असल्याने हा त्यांचा बंगला ऐतिहासिक स्मारक ठरला आहे. या स्थळांचा केंद्र सरकारने आणखी विकास करण्याचे ठरवले आहे. या बंगल्याचे क्षेत्र ७३७४ मीटर असून येथे ध्यानधारणा केंद्र, मुख्य स्मारक, प्रेक्षागृह, उद्यान, व इतर अनेक सोयी सुविधा असणार आहेत. या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीच्या व महापरिनिर्वाण दिनानिमित्त व्याख्याने, चर्चा, प्रदर्शने, सांस्कृतिक कार्यक्रम होतील. या स्थळाचा विकास प्रगतिपथावर आहे. यासाठी केंद्र सरकारने भरीव निधीची तरतूद केली आहे. येथे जाण्यासाठी दिल्ली मेट्रो आहे. दररोज सकाळी ९ ते रात्री ६ वाजेपर्यंत विधानसभा मेट्रो स्टेशनपर्यंत ट्रेनने जाऊन या ऐतिहासिक स्थळाला भेट देता येईल.

**संशोधन अधिकारी (प्रकाशन) यशदा, बाणेर रोड, पुणे**
**संपर्क : ०९८२३३३८२६६**

**भारताच्या बहिर्गत सुरक्षा व्यवस्थापनासाठी लष्करी साधनसामग्री व मानवी बळाद्वारे बहिर्गत संघर्ष निवारण आणि त्याचे व्यवस्थापन भारत करू शकेल. परंतु भारताला सध्या भेडसावणारे अंतर्गत सुरक्षेचे प्रश्न व त्याचे व्यवस्थापन कसे करता येईल व सध्याच्या अंतर्गत सुरक्षेच्या प्रश्नाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार कसे महत्त्वाचे आहेत; याबाबत विचार होणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हटले की, केवळ दलितांचे नेते किंवा भारतीय घटनेचे शिल्पकार याबाबत त्यांचा विचार होतो परंतु या महामानवाने भारताची अंतर्गत व बाह्यसुरक्षा याविषयी मूलभूत चिंतन केले होते.**



# सुरक्षेचा प्रहरी

**डॉ. विजय खरे**

आजच्या बदलत्या भूराजकीय व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे आंतरराष्ट्रीय घडामोडीत जे बदल होत आहेत त्या बदलाच्या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेबांनी संरक्षण, परराष्ट्र व सुरक्षाविषयक धोरणाबाबत ज्या काही मूलभूत संकल्पना मांडल्या होत्या त्या संकल्पना आजही कशा महत्त्वाच्या आहेत हे बघणे गरजेचे आहे. मुळातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आईवडलांकडील बहुतेक नातेवाइकांना सैनिकी नोकरीची पार्श्वभूमी असल्याकारणाने बाबासाहेबांना भारताचे संरक्षण आणि सुरक्षततेबाबत अतिशय प्रेम होते.

जुलै १९४१ मध्ये ब्रिटिश सरकारने कार्यकारी मंडळाची पुनर्रचना व सदस्यांची वाढ करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कार्यकारी मंडळात संरक्षण सल्लागार समितीत निवड केली. त्यामुळे बाबासाहेबांनी दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी या समितीची जबाबदारी स्वीकारून, त्यांनी भारताच्या संरक्षण सिद्धतेबाबत व लष्करी शिक्षणासोबतच इतर महत्त्वाच्या बाबतींमध्ये आपले विचार राष्ट्रीय सुरक्षेच्या मंडळात मांडले.

दुसऱ्या महायुद्धाला ३ सप्टेंबर १९३९ रोजी नाझी जर्मनीने पोलंडवर कब्जा केल्यानंतर सुरुवात झाली. त्याच वेळेस डॉ. बाबासाहेबांनी भारताने आपल्या सुरक्षिततेसाठी व जागतिक सुरक्षेतेबाबत नाझी जर्मनीचा विरोध करावा व त्यासाठी भारत सरकारने प्रयत्न करावेत अशी भूमिका घेतली. त्याचबरोबर ब्रिटिश सरकारने गोलमेज परिषदामध्ये जी आश्वासने दिली होती त्या आश्वासनांची पूर्तता करावी त्यात प्रामुख्याने भारताच्या सुरक्षेततेची हमी होती. शिवाय गोलमेज परिषदांमध्ये बाबासाहेबांनी भारतीय युवकांना ठरावीक वयानंतर लष्करी शिक्षण सक्तीचे करावे. जेणेकरून; त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होईल. शिवाय चांगले सुदृढ प्रशासकीय अधिकारी निर्माण व्हावे त्यासाठी लष्करी शिक्षण हे सक्तीचे करावे ही मागणी केली. लष्करात भरती करताना सर्वांना ती खुली करण्यात यावी सर्व जातिधर्माच्या लोकांना लष्करात सामावून घ्यावे अशी बाजू बाबासाहेबांनी राष्ट्रीय सुरक्षा मंडळाचे सदस्य असताना घेतली. त्याचबरोबर दुसऱ्या महायुद्धाचे वर्णन करताना युद्ध हे केवळ कोणत्या प्रदेशाचेच विभाजन करत नाही तर मानवामानवांत एक मूलभूत बदल घडवून आणते. त्यात



राष्ट्राराष्ट्रांत बदल होतो. त्यामुळे आपली संस्कृती आणि मूल्ये यात बदल होतो. म्हणून युद्ध थांबवणे व नाझीवादावर विजय मिळवणे हे सर्वांच्या हिताचे आहे. नाझीवादाद्वारे झालेल्या युद्धामुळे स्वातंत्र्य, बंधुता, समानता निर्माण होणार नाही. त्यामुळे अशा सर्व प्रवृत्तींवर विजय मिळवणे गरजेचे आहे म्हणून त्यांनी नाझीवादाच्या विरोधात भूमिका घेऊन युद्धाचे समर्थन करून नवीन समता, बंधुता, स्वातंत्र्य, न्याय, प्रस्थापित व्हावा, नाझीवादामुळे निर्माण झालेले वांशिक प्रश्न, दोन भिन्न संस्कृतीचे प्रश्न हे केवळ युद्ध केल्यावर संपणार नाहीत तर त्यासाठी युद्ध जिंकून शांतता निर्माण करणे गरजेचे आहे व शांतता टिकवण्यासाठी सर्वांची गरज आहे, असे प्रतिपादन केले.

**(लेखक हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील संरक्षण आणि सामरिक शास्त्र या विभागात प्राध्यापक आहेत.)**
**संपर्क : ०९४२३२१०३१४**

**सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जमाती संवर्गातील घटकांसाठी विविध योजना राबवण्यात येतात. या योजनांचा लाभ घेऊन प्रगतीच्या आणि विकासाच्या नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात. काही महत्त्वपूर्ण योजनांचा हा गोषवारा...**

# नव्या संधी प्रगतीच्या

**विष्णु काकडे**

## शिष्यवृत्ती

### माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

**उद्दिष्ट:** इ. ५ वी ते ७ वी मधील २ गुणवत्ताधारक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना तसेच इ. ८ वी ते १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या पहिल्या दोन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते.

**अटी व शर्ती:** ■ मागील वार्षिक परीक्षेत किमान ५० टक्के व त्याहून अधिक गुण मिळवणे आवश्यक ■ उत्पनाची अट नाही. ■ शाळेतील नियमित हजेरी, समाधानकारक प्रगती व चांगली वर्तणूक आवश्यक ■ ही शिष्यवृत्ती दरवर्षी जून ते मार्च या १० महिन्यासाठी मंजूर करण्यात येईल. (इयत्ता पाचवी ते सातवी दरमहा ५० रुपये/इयत्ता आठवी ते दहावी दरमहा १०० रुपये)

**संपर्क:** ■ संबंधित शाळेचे मुख्याध्यापक ■ जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद



### अस्वच्छ व्यवसायातील पालकांच्या मुलांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती

अस्वच्छ व्यवसायात काम करणारे, या व्यवसायाशी परंपरेने संबंधित सफाईगार, कातडी सोलणे व कमावणे या व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तींच्या पाल्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते.

**अटी व शर्ती:** ■ ही शिष्यवृत्ती सर्व जातिधर्माला लागू आहे. ■ ही योजना केंद्र पुरस्कृत असून यासाठी कोणतीही उत्पन्नाची अट नाही. ■ अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींना ग्रामसेवक व सरपंच, नगरपालिका मुख्याधिकारी महानगरपालिका आयुक्त/उपायुक्त/प्रभाग अधिकारी यांच्याकडून अस्वच्छ व्यवसाय करत असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ■ अनुसूचित जातीमध्ये समावेश केलेल्या पालकांच्या पाल्यांसाठी जातीचा दाखला आवश्यक आहे.

**लाभाचे स्वरूप:** ■ १ ली ते २ रीच्या वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रु. ११०/– दरमहा व तदर्थ अनुदान रु. ७५०/– ■ इ. ३ री ते १० वीचे वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ११०/– दरमहा व तदर्थ रु. ७५०/– दरमहा ■ वसतिगृहात राहणाऱ्या इ. ३ री ते १० वी दरमहा रु. ७००/– व तदर्थ अनुदान रु. १०००/–

**संपर्क :** ■ संबंधित शाळेचे मुख्याध्यापक व संबंधित जिल्ह्याचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.

### भारत सरकारची मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती

**योजनेचा उद्देश:** अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण कमी व्हावे.

**योजनेच्या प्रमुख अटी:** ■ शासकीय शाळेत ९ वी व १० वी मध्ये शिकत असणारे विद्यार्थी ■ उत्पन्नाची मर्यादा २ लाख रुपये.

**दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप :** १० महिन्यांसाठी (वसतिगृहात न राहणारे विद्यार्थी – दरमहा १५० रुपये आणि पुस्तके व तदर्थ अनुदान (वार्षिक) ७५० रुपये/वसतिगृहात राहणारे विद्यार्थी दरमहा ३५० रुपये) आणि पुस्तके व तदर्थ अनुदान (वार्षिक) १००० रुपये)

**अर्ज करण्याची पद्धत :** या योजनेसाठी https//mahaeschol.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज भरणे आवश्यक. **संपर्क :** ■ संबंधित जिल्ह्याचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद ■ समाज कल्याण अधिकारी (वर्ग–२) बृहन्मुंबई

### राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती

इयत्ता १० वी मध्ये ७५ टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेला अनुसूचित जाती संवर्गातील विद्यार्थी आणि इयत्ता ११ वी व १२ वी मध्ये असणारे अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांसाठी ही शिष्यवृत्ती आहे. **शिष्यवृत्ती स्वरूप (१० महिन्यांसाठी):** इयत्ता ११ वी आणि १२ वी दरमहा ३०० रुपये.

या शिष्यवृत्तीसाठी https://mahaeschool.maharashtra.gov.in या संकेतस्थळवर ऑनलाइन अर्ज भरावा.

**संपर्क:** ■ संबंधित जिल्ह्याचे, साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व महाविद्यालयाचे प्राचार्य.

## भारत सरकार शिष्यवृत्ती

**लाभाचे स्वरूप :** ■ शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर मान्य बाबींवरील शुल्क प्रदान ■ दरमहा रु. २३० व रु. ४५० या दराने निर्वाहभत्ता ■ वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी दरमहा रु. ३८० ते रु. १२०० निर्वाहभत्ता.

**अटी व शर्ती:** ■ पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. २ लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे. ■ विद्यार्थी शालांत परीक्षोत्तर व त्यापुढील शिक्षण घेत असलेला असावा आणि महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

## मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क

शालांत परीक्षोत्तर शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना त्यांचे वय व उत्पन्न विचारात न घेता जिल्हास्तरावरील मान्यताप्राप्त संस्थांमध्ये मॅट्रिकोत्तर शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व विहित केलेले शुल्क देण्यात येते.

या योजनेसाठी https://mahaeschool.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज भरणे आवश्यक.

**संपर्क:** ■ संबंधित जिल्ह्याचे, साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व महाविद्यालयाचे प्राचार्य.

## उच्च शिक्षण घेण्यासाठी गुणवत्ता शिष्यवृत्ती

**उद्दिष्ट:** अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील विद्यार्थ्यांना मोफत उच्च शिक्षण देण्यासाठी राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. १०० विद्यार्थ्यांना देशातील नामांकित व शासनमान्य शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी ही शिष्यवृत्ती देण्यात येते.



**अटी व शर्ती:**

■ विद्यार्थ्याच्या पालकांचे सर्व मार्गांनी वार्षिक उत्पन्न ४.५० लाख रुपयांपर्यंत असावे. ■ या योजनेसाठी महाराष्ट्र शासनाने मान्य केलेल्या संस्थेत प्रवेश मिळालेला असावा.

**लाभाचे स्वरूप:** ■ संस्थेने आकारणी केलेले शैक्षणिक शुल्क, वसतिगृह व भोजन शुल्क. ■ क्रमिक पुस्तके व शैक्षणिक साहित्य यांच्या खर्चासाठी प्रतिवर्षी १०,००० रुपये. दरवर्षी जुलै महिन्यात अर्ज मागवण्यात येतात. **संपर्क:** आयुक्त, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

## सैनिक शाळेतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता

नाशिक, पुणे, सातारा येथील सैनिक शाळांमध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, भोजन, निवास, कपडे, घोडेस्वारी, पॉकेट मनी इत्यादींवर होणाऱ्या संपूर्ण खर्चाची प्रतिपूर्ती. इतर मान्यताप्राप्त सैनिक शाळांना प्रती विद्यार्थी प्रतिवर्षी रु.१५,०००/- शिष्यवृत्ती.

**संपर्क :** १. संबंधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त समाज कल्याण. २.संबंधित सैनिक शाळेचे प्राचार्य.

## सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना

वर्षातून तीन वेळा म्हणजे २६ जून,२२ सप्टेंबर आणि ३ जानेवारी या तारखांना शिष्यवृत्ती - ५ वी ते ७ वी करिता दरमहा ६० रुपये दहा महिन्यांसाठी/ ८ वी ते १० वी करिता दरमहा १०० रुपये १० महिन्यांसाठी.

## परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

**उद्दिष्ट:** परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये ज्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर व पीएच.डी. अभ्यासक्रमाकरिता प्रवेश मिळाला आहे. अशा ५० विद्यार्थ्यांना (पीएच.डी-२४ व पदव्युत्तर-२६) शिष्यवृत्ती देण्यात येते.

**अटी व शर्ती:** ■ विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा. ■ विद्यार्थ्याचे वय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाकरिता ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे व पीएच.डी अभ्यासक्रमाकरिता ४० वर्षापेक्षा जास्त नसावे. ■ विद्यार्थ्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ६ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. ■ जागतिक क्रमवारीत ३०० क्रमांकापर्यंतच्या



विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळालेला असावा.

**लाभाचे स्वरूप:** ■ विद्यापीठाने प्रमाणित केलेल्या शिक्षण शुल्काची पूर्ण रक्कम व इतर खर्च मंजूर करण्यात येतो.

■ विद्यार्थ्यास वार्षिक निर्वाह भत्ता - अमेरीका व इतर राष्ट्रांसाठी १४००० अमेरिकन डॉलर तर इंग्लंडसाठी ९,००० पौंड इतका अदा करण्यात येतो.

■ विद्यार्थ्याला अमेरिका व इतर राष्ट्रांसाठी आकस्मिक खर्चासाठी १३७५ अमेरिकन डॉलर आणि इंग्लंडमध्ये १००० पौंड इतके अर्थसाहाय्य देण्यात येते. पुस्तके, अभ्यासदौरा इत्यादी खर्चाचा यात समावेश आहे. ■ विद्यार्थ्यास परदेशात जाताना व अभ्यासक्रम झाल्यानंतर परत येताना विमान प्रवासाचा खर्च (नजीकचा इकॉनॉमी वर्ग) तिकीट सादर केल्यानंतर मंजूर करण्यात येतो. जाहिरातीद्वारे दरवर्षी मे महिन्यात अर्ज मागवण्यात येतात.

**संपर्क :** आयुक्त, समाज कल्याण, आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**संपर्क :** संबंधित जिल्ह्याचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जि.प. ■ संबंधित शाळेचे मुख्याध्यापक.

### तालुकास्तरावर १०० शासकीय निवासी शाळा

■ अनुसूचित जातीच्या व नवबौद्ध मुलांमुलींकरिता प्रत्येक तालुक्यात एक शासकीय निवासी शाळा सुरू करण्याचा निर्णय. ३५३ शासकीय निवासीशाळा पैकी प्रथम टप्प्यात १०० शासकीय निवासी शाळा सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी ८० निवासी शाळा सुरू. ■ निवासी शाळेमध्ये इ. ६ वी ते १० वी पर्यंतच्या अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलामुलींना प्रवेश.
■ निवासी शाळेत मोफत भोजन, निवास, ग्रंथालयीन सुविधा व इतर आवश्यक शैक्षणिक सुविधा.

**संपर्क :** संबंधित जिल्ह्याचे, साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, शासकीय निवासी शाळेचे मुख्याध्यापक, गट कल्याण ■ मुख्याध्यापक, संबंधित पब्लिक स्कूल.

### इतर महत्त्वाच्या योजना

■ स्वयंसेवी संस्थांच्या मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहांना साहाय्यक अनुदान ■ स्वयंसेवी संस्थेमार्फत चालवण्यात येणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुलामुलींसाठी अनुदानित आश्रमशाळांना साहाय्यक अनुदान. ■ समाज कल्याण संस्थांना अनुदाने (समाजकार्य महाविद्यालये) वैद्यकीय, तंत्रनिकेतन, कृषी, पशुवैद्यकीय व अभियांत्रिकी व्यावसायिक पाठयक्रम असणाऱ्या महाविद्यालयात शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यासाठी पुस्तकपेढी योजना. **संपर्क :** संबंधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य.
■ व्यावसायिक पाठ्यक्रमांशी संलग्न वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता व विद्यावेतन. **संपर्क :** संबंधित जिल्ह्याचे साहाय्यक

## विभागीयस्तरावर उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेशाकरिता अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील उमेदवारांकरिता कमी जागा राखीव असतात. या बाबीचा सातत्याने विचार करून प्रत्येक विभागीय स्तरावर अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात आली आहे. संचालक, व्यवसाय व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत संनियंत्रण केले जाते. प्रवेशितांना मोफत निवास, भोजन व व्यवसाय अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण इ. ची सुविधा.



**अभ्यासक्रम :** राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची संलग्नता प्राप्त असलेले एकूण १२ व्यावसायिक अभ्यासक्रम. यामध्ये मेकॅनिकल, मेडिकल, इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिक यांत्रिक मोटार गाडी, फॅशन टेक्नॉलॉजी (मुलींकरिता), डेंटल लॅब टेक्निशियन, क्राफ्ट्समन फूड प्रॉडक्शन (जनरल), डाटा एन्ट्री ऑपरेटर (मुलींकरिता), ऑपरेटर ॲडव्हान्स मशीन टूल, मेकॅनिक कॉम्प्युटर हार्डवेअर, इंटिरिअर डेकोरेशन ॲण्ड डिझाइनिंग, हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर, नेटवर्क टेक्निशियन, ड्रायव्हर कम मेकॅनिक या अभ्यासक्रमांचा समावेश.

**संपर्क :** ■ संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण ■ संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य.

शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त.

### सफाई कामगारांच्या मुलांमुलींसाठी पब्लिक स्कूल

■ पुणे येथे ठिकाणी १९८५ व नागपूर येथे १९९६ पासून पब्लिक स्कूल. यामध्ये इयत्ता १ ली ते ७ वी पर्यत शिक्षण.
■ पब्लिक स्कूलमध्ये निवास, भोजन, नाष्टा, शैक्षणिक साहित्य, अंथरुण-पांघरूण, गणवेश इत्यादी सोयीसुविधा विनामूल्य पुरवण्यात येतात.

**संपर्क :** ■ संबंधित जिल्ह्याचे, साहाय्यक आयुक्त, समाज आयुक्त, समाज कल्याण आता प्रत्येक जिल्ह्यात एक याप्रमाणे जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### मागासवर्गीय मुलींसाठी नवीन ५० शासकीय वसतिगृहे

■ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्ताने राज्यामध्ये मागासवर्गीय मुलींना शिक्षण घेणे सोयीचे व्हावे म्हणून मुलींसाठी विभागीय स्तरावर ७ आणि जिल्हा व तालुकास्तरावर ४३ अशी एकूण ५० नवीन शासकीय वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय. विभागीय स्तरावरील वसतिगृहे ही २५०

क्षमतेची आणि जिल्हा व तालुकास्तरावरील वसतिगृहे ही १०० क्षमतेची आहेत.

■ या वसतिगृहात मागासवर्गीय मुलींसाठी मोफत निवास, भोजन याबरोबरच अभ्यासाकरिता टेबल-खुर्ची, पुस्तके व वह्या इत्यादी साहित्य ठेवण्यासाठी कपाट, कॉट, गादी, उशी, अंथरूण-पांघरूण, बेडशीट, ब्लँकेट इत्यादी सुविधा पुरवण्यात येत आहे. स्पर्धा परीक्षा केंद्रांमध्ये प्रवेशित मुलींसाठी ५ जागा गुणवत्तेनुसार राखीव.

### महानगरात नोकरी करणाऱ्या मागासवर्गीय महिलांसाठी शासकीय वसतिगृहे

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त शासकीय, निमशासकीय, खासगी इत्यादी प्राधिकरणात नोकरी करणाऱ्या मागासवर्गीय महिलांकरिता मुंबई, पुणे व नागपूर येथे प्रत्येकी एक शासकीय वसतिगृह सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या वसतिगृहात महिलांच्या निवासाची व्यवस्था करण्यात येऊन या प्रवेशित महिलांना कॉट, अंथरूण-पांघरूण इत्यादी सोयी उपलब्ध करून दिल्या जातात. या वसतिगृहात ग्रंथालय, कॅरमबोर्ड, बुद्धिबळ व इतर इनडोअर क्रीडा साहित्य पुरवण्यात येईल.

### मुलामुलींसाठी शासकीय वसतिगृहे

मागासवर्गीय मुलामुलींची शिक्षणाची सोय व्हावी, त्यांना उच्च शिक्षण घेता यावे, त्याचप्रमाणे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे, यासाठी शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. सध्या महाराष्ट्रात विभागीय, जिल्हा व तालुका पातळीवर ३८१ वसतिगृहे मंजूर असून त्यांपैकी ३७७ सुरू आहेत. यात मुलामुलींची (मुलांची २१८ + मुलींची १६३) शासकीय वसतिगृहे कार्यान्वित ३५,५३० विद्यार्थ्यांना या लाभ होत आहे. यामध्ये मोफत निवास व भोजन,



अंथरुण- पांघरुण, ग्रंथालयीन सुविधा, शालेय विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी दोन गणवेश, क्रमिक पाठ्य पुस्तके, वह्या, स्टेशनरी तसेच वैद्यकीय आणि अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमानुसार स्टेथोस्कोप, ॲप्रन, ड्रॉईंग बोर्ड, बॉयलर सूट व कला निकेतनच्या विद्यार्थ्यांसाठी रंग, ड्रॉईंग बोर्ड, ब्रश, कॅनव्हास इत्यादींचा समावेश आहे. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन खर्चासाठी विभागीय पातळीवर दरमहा रु. ८००, जिल्हा पातळीवर रु. ६०० तर तालुका पातळीवर रु. ५०० निर्वाहभत्ता दिला जातो.



**संपर्क :-** १. संबंधित जिल्ह्याचे, साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण . ३. संबंधित विभागाचे प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण २. संबंधित गृहपाल, मागासवर्गीय मुलामुलींचे शासकीय वसतिगृह.

### पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना

■ अनुसूचित जाती / नवबौद्ध घटकातील १८ ते ६० वयोगटातील दारिद्र्यरेषेखालील व भूमिहीन शेतमजूर या योजनेस पात्र आहे. यासाठी विधवा आणि परित्यक्ता यांना प्राधान्य दिले जाते.

■ लाभार्थ्यास चार एकर कोरडवाहू किंवा २ एकर बागायती जमीन देण्यात येते. जमीन खरेदीसाठी शासनाकडून ५०% अनुदान व ५०% बिनव्याजी कर्ज. ■ कर्ज फेडीची मुदत १० वर्ष असून कर्जाची परतफेड कर्ज मंजुरीनंतर २ वर्षांनी सुरू. ■ जिल्हास्तरीय समिती जमीन खरेदी करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपद्धतीचा अवलंब करते... **१.** जिल्हाधिकारी यांनी प्रचलित रेडीरेकनरच्या किंमतीप्रमाणे जमीन विकत घेण्याचा प्रयत्न करावा. रेडीरेकनरच्या किंमतीप्रमाणे जमीन उपलब्ध होत नसल्यास जमिनीच्या मुल्याबाबत संबंधित जमीन मालकाशी वाटाघाटी कराव्यात. त्यानुसार रेडीरेकनरची किंमत अधिक २०% पर्यंत प्रथम रक्कम वाढवावी. तरीसुद्धा जमीन विकत मिळत नसल्यास ही २०% रक्कम २०% च्या पटीत १००%पर्यंत म्हणजेच रेडीरेकनरच्या दुप्पट किंमती पर्यंत वाढवण्यात यावी. तथापि, ही रक्कम प्रती एकरी रु. ३.०० लाख इतक्या कमाल मर्यादेत असावी. **२.** लाभार्थीने स्वतः जमिनीचा शोध घेतल्यास व योजनेच्या इतर सर्व अटी व शर्ती पूर्ण करत असल्यास त्यास ती जमीन प्राधान्याने देण्यात यावी, मात्र जमीन खरेदी करताना जमिनीचे दर वरीलप्रमाणे राहतील. **संपर्क-** संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## महामंडळे

### महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई

■ **कर्ज अनुदान योजना-** या योजनेंतर्गत रु. ५०,०००/- पर्यत गुंतवणूक असणाऱ्या व्यवसायांना आर्थिक साहाय्य

■ **बीज भांडवल योजना-** या योजनेंतर्गत रु. ५ लाखापर्यंत गुंतवणूक असणारे प्रकल्प विचारात घेऊन महामंडळाकडून २० टक्के

## ज्येष्ठांना दिलासा

### मातोश्री वृद्धाश्रम योजना

■ वृद्धांना राहण्याची व जेवणाची सोय व्हावी याकरिता शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -१०९५/के.न १०६/सुधार-२, १७ नोव्हेंबर १९९५ अन्वये प्रत्येक जिल्ह्यात वृद्धाश्रमाच्या धर्तीवर सुसज्ज असे मातोश्री वृद्धाश्रम योजना मुंबईव्यतिरिक्त ३० जिल्ह्यांमध्ये सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. ■ या वृद्धाश्रमामध्ये ६० वर्षे वयांवरील पुरुष व ५५ वर्षे वयांवरील स्त्रियांना प्रवेश देता येतो. प्रत्येक वृद्धाश्रमाची एकूण मान्य प्रवेश संख्या १०० असून ५०% जागा नि:शुल्क आहेत व ५०% जागांकरिता वार्षिक उत्पन्न रु. १२,००० पेक्षा जास्त असणाऱ्या वृद्धांकडून रु.५००/- दरमहा प्रवेश शुल्क घेऊन प्रवेश दिला जातो.



### ज्येष्ठ नागरिक धोरण

■ वृद्धांची आर्थिक सुरक्षितता आरोग्य, पोषणमूल्य, निवारा, शिक्षण, कल्याणकारी जीवन जगता यावे यास्तव मालमत्तेचे व जीविताचे संरक्षण करून व मालमत्तेचे संरक्षण करण्यात येईल. ■ ज्येष्ठ नागरिकांना देय असणाऱ्या सर्व सुविधा उपलब्ध होण्यासाठी ६० वर्ष वयोमर्यादा ग्राह्य धरण्यात येईल. ■ ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना एसटी भाड्यात ५०% सवलत मिळण्यासाठी ओळखपत्र देण्यात येईल. ■महामंडळाच्या बसमध्ये प्रवासासाठी सवलत योजना.

### आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणासाठी नियम-२०१०

■ राज्य शासनाने आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम, २०१० तयार केला आहे. या अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र शासनाने राज्य परिषद व जिल्हा समिती गठीत केली आहे. ■ जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय संनियंत्रण समिती - जिल्हा दंडाधिकारी नियम २३ अन्वये ही समिती गठीत शासन आदेशाद्वारे जिल्हास्तरावर अधिनियमाच्या प्रभावी तथा समन्वित अंमलबजावणीसाठी आणि सल्ला देण्यासाठी प्रत्येक जिल्हाकरिता ज्येष्ठ नागरिकांची एक जिल्हा समिती स्थापन करेल. ही समिती जिल्हा स्तरावर राज्य शासन विनिर्दिष्ट करेल व जेष्ठ नागरिकांच्या संबंधात अन्य कर्तव्ये पार पाडेल. ■ **समेटकर्ता अधिकारी** - सहाय्यक आयुक्त समाज कल्याण संबंधित जिल्हा ■ **अपिलीय अधिकारी** - संबंधित उपविभागीय अधिकारी महसूल

**संपर्क :** संबंधित साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण.

बीज भांडवल रक्कम तर प्रकल्प रकमेच्या ५% रक्कम स्वत: चा सहभाग म्हणून अर्जदाराने भरणे आवश्यक. उर्वरित ७५% रक्कम ही बँकेकडून मंजूर केली जाते. महामंडळामार्फत रु. १०,०००/- चे अनुदान देण्यात येते.

■ **प्रशिक्षण योजना-** विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार करण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण.

### साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ

या महामंडळामार्फत विशेष केंद्रीय अर्थ साहाय्य योजना, बीज भांडवल योजना, मुदत कर्ज योजना, लघुऋण वित्त योजना, महिला समृद्धी योजना, शैक्षणिक कर्ज योजना, अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती या योजना राबवल्या जातात.

**संपर्क :** नवीन प्रशासकीय इमारत क्र. २, ३ रा माळा बी विंग आर सी मार्ग, चेंबूर (पूर्व) मुंबई - ४०००७१ दूरध्वनी : ०२२-२५२२०००८/ २५२२०००८ फॅक्स : ०२२-२५२७४०७२ संकेतस्थळ: www.lasdc.com, lasdcmumbai@gmail.com ई-मेल: lasdc@rediffmail.com/

### संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ

मर्यादित मार्फत राज्य शासनाच्या ५० टक्के अनुदान योजना, बीज भांडवल आणि प्रशिक्षण या योजना तर राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (नवी दिल्ली) यांच्या मुदती कर्ज, सुक्ष्म पत पुरवठा, महिला समृद्धी, महिला किसान, शैक्षणिक कर्ज या योजना राबवल्या जातात.

**संपर्क :** महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय बॉम्बे लाईफ बिल्डिंग, ५ वा मजला, वीर नरीमन रोड, मुंबई ४००००१. दूरध्वनी: २२०४ ४१८६,२२०४ ७१५७ संकेतस्थळ: www.charmodhyog.com




### वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ

या महामंडळामार्फत बीज भांडवल कर्ज, थेट कर्ज, अनुदान, प्रशिक्षण या योजना राबवल्या जातात.

**संपर्क :** जुहू सुप्रिम शॉपिंग सेंटर, गुलमोहर क्रोस रोड नं. ९ विलेपार्ले (प.) मुंबई -४०००४९ दूरध्वनी : ०२२-२६२०२५८८/ २६२०२५८६ / फॅक्स : ०२२- २६२३४५२७

संकेतस्थळ : www.vnvjntdc.com

### महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ

या महामंडळामार्फत थेट कर्ज व २०% बीज भांडवल कर्ज योजना राबवल्या जातात. त्याचबरोबर या महामंडळामार्फत राष्ट्रीय मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळ (नवी दिल्ली) यांच्या मुदती कर्ज, ४५% मार्जिन मनी, महिलांसाठी स्वर्णिमा, शैक्षणिक कर्ज, सूक्ष्म पतपुरवठा आणि महिला समृद्धी योजना राबवल्या जातात.

**संपर्क :** प्रशासकीय भवन, ४ था मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१. दूरध्वनी क्र. ०२२ - २५२७ ५३७४ / २५२९ ९६८५, फॅक्स क्र. ०२२-२५२२९२१९,
संकेतस्थळ: www.msobcfdc.gov.in
ई-मेल : md@msobcfdc.gov.in

### अपंग-अव्यंग व्यक्तीच्या विवाहास प्रोत्साहन

किमान ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या अपंग वधू किंवा वराने अपंगत्व नसलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास अथवा अपंगत्व नसलेल्या वधू किंवा वराने अपंगत्व असलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास या योजनेतून खालीलप्रमाणे अर्थसाहाय्य.

■ रक्कम रुपये २५०००/- चे बचत प्रमाणपत्र. ■ रुपये २००००/- रोख स्वरूपात. ■ रुपये ४५००/- संसारोपयोगी साहित्य/ वस्तू खरेदीसाठी ■ रुपये ५००/- स्वागत समारंभाच्या कार्यक्रमाचा खर्च करण्यासाठी.

यासाठी विहित नमुन्यात जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद सर्व व साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/उपनगर यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक असून अर्जदाराचे अपंगत्व किमान ४० टक्के अथवा त्यापेक्षा जास्त असावे. **संपर्क :** जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद सर्व व साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/उपनगर.

### महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ (मुंबई)



मार्फत राज्य शासनाची वैयक्तिक थेट कर्ज योजना व सेवा व व्यापार क्षेत्रातील छोट्या धंद्यासाठी कर्जसाहाय्य, शेती व शेतीपूरक व्यवसायासाठी कर्ज योजना, वाणिज्यिक वापरासाठी वाहन खरेदी करण्यासाठीची कर्ज योजना, मानसिक विकलांग (मनोरुग्ण) सेरेब्रल पाल्सी आणि (ऑटीझम) आत्ममग्न अशा अपंगांसाठी स्वयंरोजगार योजना, लघु उद्योग उभारणीसाठी कर्ज योजना, शैक्षणिक कर्ज योजना, सूक्ष्म वित्त साहाय्य योजना, प्रशिक्षण योजना, मतिमंद व्यक्तीच्या पालकांच्या संस्थांसाठी आर्थिक साहाय्य योजना, युवा स्वावलंबन या राष्ट्रीय महामंडळाच्या योजना राबवल्या जातात.



**विभागीय संपर्क अधिकारी**

## रमाई आवास (घरकूल) योजना




अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबांचे राहणीमान उंचवावे व त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागांमध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घरांच्या जागेवर २६९ चौरस फुटाचे पक्के घर बांधून देण्यासाठी रमाई आवास घरकूल योजना २००९-१० पासून सुरू.

■ घराच्या बांधकामासाठी क्षेत्रनिहाय कमाल खर्चाची मर्यादा ग्रामीण क्षेत्र रुपये १,००,०००/- व नगरपालिका / नगरपरिषद क्षेत्र रु. १.५० लाख व महानगरपालिका व मुंबई विकास प्राधिकरण क्षेत्र रु. २ लाख इतकी आहे.

■ ग्रामीण भागातील कुटुंबांला लाभार्थी हिस्सा भरण्यापासून सूट, नगरपालिका क्षेत्र ७.५ टक्के, महानगरपालिका क्षेत्रातील लाभार्थ्यांना १० टक्के लाभार्थी हिस्सा भरणे आवश्यक.

■ ग्रामविकास विभाग शासन निर्णय ३० डिसेंबर २०१५ अन्वये पंडित दिनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसाहाय्य योजना सुरू. या योजनेंतर्गत रमाई आवास योजनेतील ग्रामीण क्षेत्रातील दारिद्र्य रेषेखालील घरकुलासाठी पात्र असणाऱ्या परंतु जागा उपलब्ध नसणाऱ्या लाभार्थ्यांना जागा खरेदीकरिता रु. ५०,०००/-पर्यंत अर्थसाहाय्य.

■ अनुसूचित जातींमधील जे अपंग लाभार्थी दारिद्र्यरेषेखाली नाहीत, ज्याचे अपंगत्व ४०% पेक्षा अधिक आहे व वार्षिक उत्पन्न एक लाखापर्यंत आहे, अशा अपंग लाभार्थ्यांना, ते योजनेच्या उर्वरित अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास त्यांना रमाई आवास घरकूल योजनेचा लाभ देण्याचा निर्णय.




**संपर्क :** संबंधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण / जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद / आयुक्त महानगरपालिका (संबंधित).

**मराठीतील ज्येष्ठ विचारवंत, लेखक, समीक्षक, दलित चळवळ आणि साहित्याचे आधारस्तंभ, मार्गदर्शक आणि अमेरिकेतील सॅन होजे येथे २००९ मध्ये झालेल्या पहिल्या मराठी विश्व साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. गंगाधर पानतावणे यांचे मंगळवारी २७ मार्च, २०१८ रोजी पहाटे तीन वाजता निधन झाले. ते ८१ वर्षांचे होते. दलित साहित्य, संस्कृती आणि चळवळीतील या थोर विभूतीस 'लोकराज्य'तर्फे विनम्र श्रद्धांजली..**

# दलित साहित्याचा आधारवड

**यशवंत भंडारे**

डॉ. गंगाधर विठोबाजी पानतावणे हे मूळचे विदर्भातले. २८ जून, १९३७ रोजी नागपूर येथे त्यांचा जन्म झाला. डी. सी. मिशन स्कूलमध्ये त्यांचे प्राथमिक तर नवयुग विद्यालय आणि पटवर्धन हायस्कूल नागपूर येथे माध्यमिक शिक्षण झाले. १९५६ मध्ये मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर नागपूर महाविद्यालयातून त्यांनी बी.ए. आणि एम.ए.ची पदवी मिळवली. नंतर तत्कालीन मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी पीएच.डी.ची पदवी मिळवली. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात मराठीचे प्राध्यापक म्हणून ते अध्यापन करू लागले. पुढे ते याच विभागाचे प्रमुख झाले.



## लहान वयात लेखनाला सुरुवात

लहान वयातच त्यांच्या लेखनाला सुरुवात झाली. त्या वेळी ते प्रतिष्ठान नियतकालिकातून लेखन करीत. साहित्य, समाज आणि संस्कृती या विषयांवर त्यांनी एकूण २० पेक्षा अधिक वैचारिक व संशोधनपर ग्रंथ लिहिले असून, १२ पुस्तकांचे संपादनही त्यांनी केले आहे.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात विविध विषयांवर शोधनिबंध सादर केले आहेत. त्यांच्या लेखनाची प्रेरणा बुद्ध, महात्मा जोतिबा फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते. त्यांच्याच विचारधारेचाच त्यांनी आयुष्यभर ध्यास घेतला. त्यांनी 'धम्मचर्चा', 'मूल्यवेध', 'मूकनायक', 'विद्रोहीचे पाणी पेटले आहे', 'वादळाचे वंशज', 'दलित वैचारिक वाङ्मय', 'किल्ले पन्हाळा ते किल्ले विशालगड', 'साहित्य प्रकृती आणि प्रवृत्ती', 'साहित्य शोध आणि संवाद' हे ग्रंथ लिहिले. 'दलित आत्मकथा', 'दलित साहित्य चर्चा आणि चिंतन' ,'लोकरंग', 'स्त्री आत्मकथन', 'महारांचा सांस्कृतिक इतिहास' आदी ग्रंथांचे संपादन केले.

डॉ. पानतावणे यांनी लोकसाहित्य, कविता, नाटक, समीक्षा आणि संशोधनपर लेखन भरपूर केले. साहित्य, संस्कृती, धर्म, इतिहास, मानववंशशास्त्र हे त्यांचे अभ्यासविषय त्यांनी मोठ्या ताकदीने मांडले.

## अस्मितादर्श

अस्मितादर्श या नियतकालिकाचे संस्थापक संपादक म्हणून सलग ५० वर्षे धुरा स्वीकारून, त्यांनी ती कायम जोपासली. अस्मितादर्शचा पहिला अंक डिसेंबर १९६७ मध्ये प्रकाशित झाला. मजकूर गोळा करण्यापासून निवडण्यापर्यंत आणि अंकाची प्रूफे तपासण्यापर्यंतचे काम ते करत असत. त्याशिवाय अंक छापून आल्यानंतर त्याला रॅपर चिटकवून त्यावर पत्ते टाकण्यापर्यंतची ही सर्व कामे ते एकट्याने करत असत. अस्मितादर्शने लिहिणाऱ्या हातांना लिहिण्याची प्रेरणा दिली. दलित साहित्य, संस्कृती, वैचारिक चळवळीला विचारांचे अधिष्ठान देणारे नियतकालिक म्हणून अस्मितादर्शची प्रतिमा कायम ठेवण्याचे, जपण्याचे आणि अस्मितादर्शचे सातत्याने प्रकाशन करण्याचे कामही त्यांनी तहहयात केले.

अस्मितादर्श साहित्य संमेलने भरवून त्यांनी दलित साहित्याला जिवंत ठेवण्याबरोबरच नवनवीन साहित्यिक घडवण्याचे कामही केले.

## विविध पुरस्कारांनी सन्मानित

पद्मश्रीबरोबरच त्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार, दलित साहित्य अकादमी, फाय फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळाची गौरववृत्ती आदी अनेक पुरस्कारांनी ते सन्मानित झाले होते. विदर्भ साहित्य संमेलन (आनंदवन वरोरा), मराठवाडा साहित्य संमेलन (परभणी) या आणि इतर अनेक साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले होते.

भारत सरकार तसेच महाराष्ट्र शासनाच्या साहित्य, समाज तथा संस्कृतीविषयक अनेक समित्यांवर त्यांनी कार्य केलं आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेवर डॉ. पानतावणे यांनी पीएच.डी केली होती. त्यानंतर त्यांचा प्रबंध पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाने प्रसिद्ध झाला. या ग्रंथामुळे बाबासाहेबांच्या अनेकविध पैलूंपैकी पत्रकार आंबेडकर हा पैलू जगासमोर आला. डॉ. पानतावणे यांनी १९६३ मध्ये नागपूर सोडले आणि ते औरंगाबादकर झाले. बाबासाहेबांनी स्थापन केलेल्या मिलींद महाविद्यालयात त्यांना नोकरीची संधी मिळाली. याच काळात त्यांनी औरंगाबाद आणि मिलिंद महाविद्यालय परिसरात साहित्य चळवळीला सुरुवात केली. या चळवळीला त्या वेळच्या तरुण आणि विचारवंतांचा मोठा पाठिंबा मिळाला. मराठी दलित साहित्य आणि वैचारिक चळवळीला भक्कम करतानाच; होतकरू लेखक, कवी, कादंबरीकार, विचारवंतांची जडणघडणही डॉ. पानतावणे यांच्या प्रोत्साहनाने आणि प्रेमळ आशीर्वादाने झाली.

**उपसंचालक (माहिती), लातूर**

# लोकराज्य




# अर्थसंकल्प विशेष
## २०१८-१९

- कृषी क्षेत्राला प्राधान्य
- सिंचनवृद्धीवर भर
- कुशल महाराष्ट्र – रोजगारयुक्त महाराष्ट्र योजनेस चालना
- आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ
- आर्थिक दुर्बलांना शिष्यवृत्ती
- मेट्रो रेल्वे विकासाला गती
- रस्ते विकासावर भर
- पोलीस दलाचे बळकटीकरण
- स्वच्छ, स्मार्ट सिटीला प्राधान्य
- सर्वांसाठी घरे
- डिजिटल महाराष्ट्र



**राज्याचा विकास दर कायम पुढे जाण्याकरिता यंदाच्या महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात अनेक योजनांची आखणी करण्यात आली आहे. भांडवली गुंतवणूक ११.०१ टक्के होण्याकरिता विशेष प्रयत्न केले जातील. कृषी, रस्ते, वीज या क्षेत्रामध्ये भरीव तरतूद करण्यात आली आहे. विदर्भ, मराठवाडा उत्तर महाराष्ट्रातील उद्योगांना वीज सवलत देण्यासाठी ९२६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. कर्जमाफीच्या योजनेतून शेतकरी वंचित राहणार नाही, यासाठी मोठ्या प्रमाणावर तरतूद करण्यात आली आहे. शासकीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. शेतकरी, उद्योजक, युवक, दिव्यांग बांधव आदी विविध घटकांचा सर्वसमावेशक विचार करून त्यांच्या कल्याणासाठी अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्यासोबतच वित्तीय तूट वाढणार नाही, यासाठी पूर्णपणे प्रयत्न करणार असल्याची ग्वाही वित्त व नियोजन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी लोकराज्यला दिलेल्या विशेष मुलाखतीत दिली.**

# शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य ; रोजगार निर्मिती व उद्योगास चालना

**राज्याच्या २०१८-१९ च्या अर्थसंकल्पाची काय वैशिष्ट्ये सांगाल?**

यंदाचा राज्याचा अर्थसंकल्प हा समाजातील दुर्बल तसेच वंचित घटकांचा विकास साधणारा, कृषी आणि रोजगार निर्मितीला प्राधान्य देणारा आहे. या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा आणि कृषी क्षेत्रामधील गुंतवणुकीत भरीव वाढ करण्यात आली असून राज्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या लॉजिस्टिक क्षेत्राकरिता साहाय्य, तसेच स्टार्टअप योजनांना अर्थसंकल्पात चालना देण्यात आली आहे.

कृषी, जलसिंचन, शिक्षण, उद्योग, आरोग्य, अल्पसंख्याक विकास, सामाजिक न्याय या क्षेत्रामध्ये भरीव तरतूद केल्याने राज्याचा विकासदर वाढण्यास मदत होणार आहे.

राज्याच्या जनतेला न्याय देण्यासाठी सरकार योग्य काम करत आहेत. या वर्षी केंद्र शासनाने आर्थिक वितरणाची पद्धत बदलली. त्यामुळे केंद्र शासनाकडून राज्याला ४३ हजार ५१४ कोटी रुपये मिळाले. मुंबईच्या अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक येत्या तीन वर्षात उभारण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. जगातील सर्वात उंच पुतळा या स्मारकामध्ये असणार असून, लार्सन ॲण्ड टुब्रो कंपनीला ३ हजार ८२६ कोटी रुपयांचा आर्थिक देकार देण्यात आला आहे. या कामासाठी रु.३०० कोटींची तरतूद करण्यात आली असून, कामाच्या गतीनुसार व आवश्यकतेनुसार अतिरिक्त तरतूद पुरवणी मागण्यांमध्ये करण्यात येईल, याची ग्वाही मी महाराष्ट्राच्या जनतेला देत आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रस्तावित स्मारकाच्या विकासासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून शासनाने नियुक्ती केली आहे. प्रस्तावित स्मारकाच्या इंदू मिल येथील जागेचा रितसर ताबा राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाकडून मार्च-२०१७ मध्ये राज्य शासनाने घेतला आहे. ९ फेब्रुवारी २०१८ रोजी या स्मारकासाठी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. २०१८-१९ साठी रु.१५० कोटी रकमेची तरतूद करण्यात आली आहे. हे स्मारकसुद्धा पुढील तीन वर्षात पूर्ण करण्यावर आम्ही लक्ष केंद्रित करणार आहोत.

**शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या कोणत्या तरतुदी आहेत?**

बळीराजाच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य आमचे सरकार देत आहे. त्यामुळेच कृषी क्षेत्रात सातत्याने मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्यात येत आहे. याचा परिणाम कृषी उत्पन्न वाढण्यात झाला आहे. २०१६-१७ मध्ये अंतिम अंदाजानुसार १७ हजार २३० सहस्र मेट्रिक टन अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन झाले. २०१७-१८ मध्ये दुसऱ्या आगाऊ अंदाजानुसार १३ हजार २८३ सहस्र मेट्रिक टन अन्नधान्याचे उत्पादन झाले. याचे प्रमुख कारण २०१७ मध्ये सरासरी पावसाच्या ८४.३ टक्के पाऊस पडला. राज्यातील पर्जन्यमान व उत्पादन याची तुलना केली असता असे लक्षात येते की, २०१३-१४ मध्ये पावसाचे प्रमाण सरासरी पावसाच्या



# सर्वसमावेशक सर्वजनहिताय अर्थसंकल्पातून वंचितांचा विकास - मुख्यमंत्री



राज्य विधानमंडळात सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पातून राज्यातील वंचित, उपेक्षित आणि दिव्यांग जनतेच्या विकासासह कृषी, ग्रामविकास आणि पायाभूत सुविधांच्या निर्मितीला चालना मिळणार आहे. खऱ्या अर्थाने सर्वजनहिताय असा हा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली असून, प्रगतिशील आणि सर्वसमावेशक अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे त्यांनी अभिनंदन केले आहे.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, राज्याच्या या अर्थसंकल्पात आदिवासी, दलित, दिव्यांग यासारख्या वंचित-उपेक्षित समाजाला मुख्य धारेत आणण्यासाठी भरीव तरतुदी केल्या आहेत. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजनेसाठी भरीव निधी देऊन गरिबांच्या गृहनिर्मितीला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन देण्यात आले आहे.

## मुख्यमंत्र्यांकडून अर्थमंत्र्यांचे अभिनंदन

कृषी क्षेत्रात शाश्वतता आणण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना अर्थसंकल्पातून बळकटी मिळाली असल्याचे सांगून, मुख्यमंत्री म्हणाले, विविध योजनांच्या माध्यमातून यंदाच्या अर्थसंकल्पातही कृषी क्षेत्रासाठी भरीव तरतुदी केल्या आहेत. रोजगार निर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी तुलनात्मकरीत्या कित्येक पटींनी जास्त निधी देण्यात आला आहे. सूक्ष्म व लघू उद्योगांसाठी योजना जाहीर करून इज ऑफ डुईंग बिझनेसद्वारे रोजगाराला चालना मिळाली आहे. छोट्या शहरांच्या विकासासह ग्रामीण व रस्त्यांच्या निर्मिती आणि पायाभूत सुविधांसाठीही तरतुदी केल्या आहेत.

उत्पादन आणि सेवा क्षेत्रातील अंतर कमी झाले असून सेवाक्षेत्रातून सर्वाधिक रोजगार निर्मिती होत आहे. या क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून केलेली भरीव तरतूद स्वागतार्ह असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

अर्थसंकल्प २०१८-१९: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि वित्त राज्यमंत्री दीपक केसरकर



१२४.६ टक्के होते व त्यावेळी अन्नधान्य उत्पादन १३ हजार ७९१ सहस्र मेट्रिक टन होते. २०१३-१४ मध्ये झालेल्या १२४.६ टक्के सरासरी पावसाच्या पार्श्वभूमीवर झालेले अन्नधान्य उत्पादन व २०१७-१८ मध्ये सरासरी ८४.३ टक्के पाऊस पडला असताना झालेले अन्नधान्य उत्पादन हे जवळपास सारखेच आहे. याचाच अर्थ भूपृष्ठभागावरील तसेच भूपृष्ठाखालील पाण्याच्या उपलब्धतेत वाढ झाली आहे. हे सर्व शक्य झाले. कारण आम्ही गेल्या साडेतीन वर्षात जलसंपदा प्रकल्प, जलयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे, कृषिविषयक विविध कार्यक्रमांना पुरेसा निधी दिल्याने व योजनांची प्रभावी अंमलबजावणी केल्यामुळे, ही बाब मी नम्रपणे नमूद करू इच्छितो.

कृषी क्षेत्रात बदल करणे आवश्यक आहे. राज्यात एकपीक पद्धतीमुळे देशात अन्य राज्यांच्या तुलनेत आपली उत्पादकता कमी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी अनेक योजना सुरू करण्यात आल्या आहेत. शेतकरी बांधवांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून, या योजनांची अंमलबजावणी केली जात आहे. जलसिंचनाचे वर्षानुवर्षे अपूर्ण असलेले प्रकल्प आम्ही पूर्ण करणार आहोत. ४६.३४ लाख शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी २३ हजार ८०२ कोटी रुपये खर्चाला मान्यता दिली आहे. ३५.६८ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत १३ हजार ६८२ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. एकही पात्र शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहू नये, यासाठी तालुकास्तरावरील समित्यांमार्फत अर्जाची छाननी करण्यात येत आहे. त्यात जे पात्र ठरतील त्यांचे कर्ज माफ केले जाईल. या अर्थसंकल्पात शेतकरी कर्जमाफीसाठी १० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे बळीराजाला मोठा दिलासा मिळेल, अशी मला खात्री आहे.

**लघु उद्योजक आणि नवउद्यमींना प्रोत्साहन देण्यासाठी कशी तरतूद करण्यात आली आहे?**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताच्या अर्थव्यवस्थेचे आकारमान २०२५ पर्यंत ५ हजार अब्ज डॉलर्स एवढे करण्याचे घोषित केले आहे. यातील महाराष्ट्राचा वाटा १ हजार अब्ज डॉलर्सचा असावा, हे लक्ष्य डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्र शासन वाटचाल करणार आहे. कृषी, वस्त्रोद्योग, पर्यटन, नवउद्यम (स्टार्टअप) यांसारख्या क्षेत्रात वाढ करून आणि आवश्यक कौशल्यविकासाच्या आधारे उद्योगांमध्ये गुंतवणूक करून हे लक्ष्य आम्ही साध्य करू. या ध्येयपूर्तीसाठी संरक्षण, कृषी व अन्न प्रक्रिया, वस्त्रोद्योग, अंतराळ (एअरोस्पेस), लॉजिस्टिक्स, वित्त तंत्रज्ञान (फिन्टेक), ॲनिमेशन, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशिअल इंन्टेलिजन्स), इत्यादींसारख्या उद्योगांशी संबंधित ठरवलेली नवीन धोरणे जाहीर करून; ती राबवण्यात सुरुवात करण्यात आली आहे. पायाभूत सुविधा आणि कृषी क्षेत्रांमधील गुंतवणुकीत वाढ केली आहे. आगामी काळात सेवा क्षेत्रात सर्वाधिक रोजगार वृद्धी होणार असल्याने त्या क्षेत्राचा विकासदर वाढवण्याचे प्रयत्न शासनाकडून सुरू आहेत.

मेक इन महाराष्ट्र

'मेक इन इंडिया' सप्ताहात राज्यात २ हजार ९८४ सामंजस्य करार झाले. त्या माध्यमातून ८ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक व ३० लाख रोजगार अपेक्षित होते. त्यापैकी १०३६ सामंजस्य करार उत्पादनात गेले आहेत. त्यातून २ लाख रोजगार निर्मिती झाली आहे. ५२३ सामंजस्य करार बांधकामाधीन असून त्यातून ८ लाख रोजगार अपेक्षित आहेत. राज्याच्या विकासासाठी ४४ सूक्ष्म व लघू उद्योग समूहांना मंजुरी दिली असून, त्याद्वारे पुढील ३ वर्षांमध्ये १०० कोटी रुपये इतक्या अपेक्षित अनुदानासह लघुउद्योजकांना प्रोत्साहन मिळेल. एक लाखाहून अधिक लोकांना थेट रोजगार मिळेल. अलीकडेच महिला उद्योजकांकरिता एक विशेष धोरण घोषित केले आहे. त्यामुळे पुढील ५ वर्षांमध्ये महिला उद्योजकांच्या संख्येत ९ टक्क्यांवरून २० टक्के इतकी वाढ अपेक्षित आहे.

**वस्त्रोद्योग क्षेत्राला चालना कशाप्रकारे देण्यात येणार आहे?**



वस्त्रोद्योग क्षेत्राला चालना देण्यासाठी एक विशेष धोरण लागू केले असून त्यानुसार सहकारी सूतगिरण्यांना प्रति युनिट ३ रुपये दराने वीज अर्थसाहाय्य दिले जाईल. सहकारी सूतगिरण्यांव्यतिरिक्त अन्य वस्त्रोद्योग संचांनादेखील प्रतियुनिट २ रुपये दराने वीज अर्थसाहाय्य देण्यात येईल. विणकाम व विणमाल (होजीयरी) संचांनादेखील वीज अर्थसाहाय्य देण्यात येत आहे. नवीन संचांना प्रकल्प खर्चाच्या २५ टक्क्यांपर्यंत भांडवली अर्थसाहाय्य देण्यात येईल. विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाडा या कापूस उत्पादक क्षेत्रातील संयुक्त गिरण्यांसाठी ४५ टक्क्यांपर्यंत अर्थसाहाय्य देण्यात येईल. प्रकल्प खर्चाच्या ९ कोटी रुपयांपर्यंत अर्थसाहाय्य पुरवून, त्याद्वारे कापूस उत्पादक क्षेत्रांमध्ये वस्त्रोद्योग केंद्रांना चालना देण्यात येत आहे. तयार कापडांच्या उद्योग क्षेत्रात विशेषत: महिलांच्या रोजगारास चालना देण्यासाठी, कौशल्य विकास कार्यक्रमास मान्यता देण्यात आली आहे.

**राज्यातील मुंबई, नागपूर व पुणे येथील महत्त्वाकांक्षी मेट्रो प्रकल्प त्वरेने पूर्ण करण्यासाठी तसेच उत्तम वाहतूक व्यवस्था निर्माण करण्यासाठी या अर्थसंकल्पात काय तरतुदी करण्यात आल्या आहेत?**

अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी सुदृढ सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अनिवार्य आहे. राज्यातील वाढत्या वाहतुकीच्या समस्येवरील एक उपाय म्हणून मेट्रो रेल्वेची आवश्यकता लक्षात घेता, मुंबई, पुणे व नागपूर महानगर प्रदेशांमध्ये एक लाख कोटी रुपये इतक्या अंदाजित खर्चाच्या विविध मेट्रो प्रकल्पांच्या अंमलबजावणीचे काम आमच्या सरकारने वेगाने सुरू केले आहे. मुंबई महानगर प्रदेशात एमएमआरडीएमार्फत २६६ कि.मी. लांबीचे मेट्रो रेल्वे प्रकल्प येत्या ३-४ वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे.

नागपूर व पुणे या शहरांमध्ये रु. २० हजार १०० कोटी अंदाजित खर्चाचे मेट्रो रेल्वे प्रकल्प सुरू करण्यात आले असून या प्रकल्पांद्वारे ६९ कि.मी. लांबीचे मेट्रो मार्ग बांधण्यात येतील. याशिवाय पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत रु. ८ हजार ३१३ कोटी खर्चाचे २३.३० कि.मी. लांबीचे मेट्रो रेल्वेचे काम सार्वजनिक खासगी सहभाग तत्त्वावर उभारण्यात येतील. या प्रकल्पाकरिता केंद्र शासनाने रु. १३०० कोटी व्यवहार्यता तफावत निधी देण्यास सहमती दर्शविली आहे. २०१८-१९ या आर्थिक वर्षात राज्यातील रस्ते विकासासाठी रु.१० हजार ८२८ कोटी एवढा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. नाबार्ड कर्ज साहाय्य योजनेतून रस्ते सुधारण्याच्या व पूल बांधकामाच्या कार्यक्रमासाठी २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये रु. ३०० कोटी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विकास करण्यासाठी आवश्यक सर्व मंजुरी मिळाल्या आहेत. विमानतळाच्या मध्यवर्ती भागातील विकास कामे सुरू करण्यात आली आहेत. एका धावपट्टीचे काम डिसेंबर, २०१९ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाण्यासाठी मुंबई आणि नवी मुंबई यांना जोडणारा १७ हजार ८४३ कोटी रुपये इतक्या अंदाजित खर्चाचा मुंबई ट्रान्स हार्बर लिंक रस्ता बांधण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

### रोजगार निर्मितीसाठी कोणती पावले उचलण्यात येणार आहेत?

ज्यांना प्रस्थापित बँकिंग क्षेत्राकडून पुरेशा प्रमाणात निधी व वित्तीय सेवा मिळत नाहीत अशा गरीब-गरजू लोकांना अभिनव पद्धतीने वित्तीय सेवा देण्यास आणि सुशिक्षित तरुणांना रोजगार पुरवण्यास चालना देण्याचे आम्ही ठरवले आहे. या उद्देशाने देशात प्रथमच राज्याने एक अभिनव वित्त तंत्रज्ञान (फिनटेक) धोरण राबवण्याचे ठरवले आहे. या धोरणांतर्गत मुंबईमध्ये वित्त तंत्रज्ञान केंद्र (फिन्टेक हब) स्थापन करून सामाईक सोयीसुविधा उभारण्यासाठी भांडवली साहाय्य करण्यात येईल.



राज्याच्या विकासात लॉजिस्टिक्स क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावत आहे, हे ओळखून अलीकडेच लॉजिस्टिक्स धोरण घोषित केले आहे. त्या धोरणानुसार बहुविध प्रकारचे लॉजिस्टिक्स पार्क स्थापन करणे शक्य व्हावे, याकरिता या व्यवसायाची विशिष्ट गरज लक्षात घेता त्यासंबंधातील नियमांचे सुलभीकरण करण्यात आले आहे. या क्षेत्राला एक उद्योग म्हणून घोषित करण्यात आले आहे. भारत सरकारच्या संरक्षणाविषयक उत्पादनांच्या स्वदेशीकरणाच्या धोरणास अनुसरून; समूह विकास संकल्पनेने विशाल, सूक्ष्म व लघू उद्योगाच्या संचांना विशेष साहाय्य केले जाणार आहे. त्याद्वारे संरक्षण संबंधित घटकांच्या महाराष्ट्रातील उत्पादनास प्रोत्साहन देणारे अवकाश व संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण जाहीर केले आहे. सूक्ष्म व लघू उद्योगांना परवडण्यायोग्य किमतीने इमारतीची जागा उपलब्ध करून देण्यासाठी, एक विस्तारित गाळा योजना घोषित केली आहे. या योजनेंतर्गत औद्योगिक परिवास्तूच्या बांधकामासाठी अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक उपलब्ध करून दिला आहे.

### व्यवसाय सुलभतेला कशा प्रकारे प्रोत्साहन देण्यात येणार आहे?

२०१५ पर्यंत १ अब्ज डॉलरची अर्थव्यवस्था साध्य करण्यासाठी या शासनाने व्यवसाय सुलभता प्रक्रिया सुटसुटीत करण्याचे धोरण (ईज ऑफ डुईंग बिजनेस) अंगीकारले आहे. जागतिक बँकेने व्यवसाय सुलभतेच्या निकषावर आधारित जगातील १९० अर्थव्यवस्थांचे सर्वेक्षण केले आहे. या मानांकनामध्ये व्यवसाय सुलभतेच्या दृष्टीने सन २०१७ मध्ये भारताचा गुणानुक्रम १३० वरून २०१८ मध्ये १०० वर आला आहे. मुंबई आणि दिल्ली या शहरात केलेल्या सर्वेक्षणाप्रमाणे, ही प्रगती प्रामुख्याने महाराष्ट्रात व्यवसाय करण्याच्या सुलभतेत सुधारणा केल्यामुळे झाली आहे. व्यवसाय सुलभतेच्या १० निदर्शक तत्त्वांपैकी ९ निदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करण्यांसदर्भात मुंबईचा क्रमांक दिल्ली राज्यापेक्षा आघाडीवर आहे. त्यामुळे खासगी उद्योगास चालना मिळून निर्मिती क्षेत्रात भरीव वाढ होईल.

### कररूपाने राज्याच्या तिजोरीत येणारे उप्पन्न व विकास कामांसाठी होणारा खर्च यांचा ताळमेळ कसा साधला आहे?

राज्याची वित्तीय तूट वाढली असली तरी करांमध्ये वाढ केलेली नाही. योजना आणि योजनेतर असे स्वरूप बदलले असले तरी कुठल्याही विभागाची आर्थिक तरतूद कमी केली नाही, ही बाब लक्षात घ्यायला हवी. राज्यातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळण्यासाठी निधीची तरतूद करतानाच महात्मा फुले जनआरोग्य योजनेसाठी यावर्षी ५७६ कोटी रुपये देण्यात आले आहेत. भविष्यात या योजनेकरिता एक रुपयाही कमी पडू देणार नाही. शिक्षण, आरोग्य या गोष्टींना अर्थसंकल्पात प्राधान्य दिले आहे. वेळोवेळी झालेल्या जिल्हा नियोजन व विकास समित्यांच्या बैठकीत याबाबत वारंवार निर्देश दिले आहेत. अल्पसंख्याक समाजासाठी ५०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. राज्याची भांडवली गुंतवणूक अन्य राज्यांच्या तुलनेत कमी असून ती वाढवणे आवश्यक आहे. राज्य कर्जबाजारी झाले आहे, असा भ्रम निर्माण केला जात आहे. त्यात तथ्य नाही. राज्याच्या हिताच्या दृष्टीने एकत्र येऊन महसूल वाढ आणि विकासाच्या दृष्टीने चर्चा करणे आवश्यक आहे. या दृष्टीने मी सर्वांनाच आवाहन केले आहे. सर्वांच्या सकारात्मक आणि राज्याच्या हितासाठी असलेल्या सूचनांचा आम्ही निश्चितच विचार करू.

### या अर्थसंकल्पातून आपण जनतेला कोणता संदेश देऊ इच्छिता?

राज्याच्या चौफेर प्रगतीला, शेतकऱ्यांच्या समृद्धीला, रोजगार व स्वयंरोजगारास चालना देणारा आणि सशक्त, समर्थ आणि संपन्न महाराष्ट्राच्या उभारणीसाठी हा अर्थसंकल्प महत्त्वाचा ठरणार आहे.



**महाराष्ट्र राज्य उद्योगात देशामध्ये आघाडीवर राहावा यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात अनेक महत्त्वाच्या तरतुदी केल्या आहेत. यामुळे गुंतवणूक वाढीसोबतच मोठ्या प्रमाणावर रोजगार व स्वयंरोजगार निर्मिती होण्यास मदत होईल.**

# उद्योगात आघाडी

### मॅग्नेटिक महाराष्ट्र

१८ ते २० फेब्रुवारी २०१८ या कालावधीत 'मॅग्नेटिक महाराष्ट्र गुंतवणूक परिषद २०१८' ही गुंतवणुकदारांसाठी जागतिक परिषद एमएमआरडीए मैदान, वांद्रे, मुंबई येथे यशस्वीरीत्या संपन्न झाली. या वेळी देशांतर्गत व परकीय गुंतवणूकदारांकडून एकूण ४ हजार १०६ सामंजस्य करार, गुंतवणूक स्वारस्य, गुंतवणूक प्रस्ताव प्राप्त झाले. यांचे एकूण मूल्य रु.१२ लाख १० हजार ४६४ कोटी आहे. यामुळे सुमारे ३७ लक्ष इतकी रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.



### उद्योगवाढीसाठी सामूहिक प्रोत्साहन योजना

२०१८-१९ या वर्षासाठी उद्योगवाढीसाठी सामूहिक प्रोत्साहन योजनेसाठी अनुदान म्हणून रु. २ हजार ६५० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

### कुशल महाराष्ट्र रोजगारयुक्त महाराष्ट्र

प्रधानमंत्र्यांच्या 'स्किल इंडीया' या संकल्पनेस अनुसरून कुशल महाराष्ट्र-रोजगारयुक्त महाराष्ट्र हे ध्येय पूर्ण करण्यासाठी राज्यातील १५ ते ४५ वयोगटातील युवक युवतींचे कौशल्य विकास प्रशिक्षणाद्वारे सक्षमीकरण केले जात आहे. रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी २०१५ पासून प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान सुरू करण्यात आले आहे.

या अभियानांतर्गत २ लाख ८४ हजार ६२७ उमेदवारांना प्रशिक्षित करण्यात आले असून ८५ हजार ५४९ उमेदवारांना रोजगार किंवा स्वयंरोजगार प्रशिक्षण देण्यासाठी २९११ प्रशिक्षण संस्थांना सुचीबद्ध केले आहे. या संस्थामार्फत १ लाख ३७ हजार गरजू युवकांना रोजगार व स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. आगामी ५ वर्षात १० लाख ३१ हजार उमेदवारांना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याचे नियोजन आहे. प्रशिक्षण सुविधांकरिता राज्यातील ९० उद्योजकांसमवेत सामंजस्य करार करण्यात आले असून आणखी २३ उद्योजकांसमवेत सामंजस्य करार करण्याचे प्रस्तावित आहे.

### काथ्या उद्योग

राज्यातील काथ्या उद्योगाच्या वाढीसाठी असलेली क्षमता ओळखून त्यामाध्यमातून रोजगाराची संधी उपलब्ध होण्यासह महिलांचे सबलीकरण करता यावे, यासाठी महाराष्ट्र काथ्या उद्योग धोरण नुकतेच जाहीर करण्यात आले. या उद्योगामुळे ग्रामीण भागात पुढील ५ वर्षात किमान ८ हजार सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांची स्थापना होऊन ५० हजार रोजगारांची निर्मिती अपेक्षित आहे. यासोबतच महिला सबलीकरण, शाश्वत व पर्यावरणपूरक अशा काथ्यांच्या उत्पादन वापरास प्रोत्साहन मिळेल. यासाठी रु. १० कोटी नियतव्यय राखून ठेवला आहे.

### हस्तकला समूह विकास

राज्यातील हस्तकला उद्योगाच्या विकासासाठी व पारंपरिक हस्तकलेचे जतन करण्याचा शासनाचा मानस आहे. त्याअंतर्गत

पारंपरिक हस्तकलेचा वापर करून नावीन्यपूर्ण डिझाईन्स तयार करणे, विक्रीसाठी मदत होण्यासाठी ऑनलाइन विक्री व्यवस्था, प्रदर्शने, प्रशिक्षण, हस्तकला कारागिरांना व्यवसायासाठी लागणारी साधनसामग्री, कच्च्या मालाचा पुरवठा इत्यादी बाबींचा समावेश या योजनेमध्ये आहे. त्यामुळे राज्यातील विविध हस्तकला कारागिरांची क्षमतावृद्धी करून, हस्तकलेच्या विकासास मदत होईल. यासाठी २०१८-१९ मध्ये रु. ४ कोटी २८ लक्ष नियतव्यय प्रस्तावित आहे.

### संत शिरोमणी गोरोबाकाका महाराष्ट्र मातीकला बोर्ड

व्यवसायाचा भाग म्हणून एकीकडे माती तुडवीत असतानाही भक्तिमार्गाची पताका आपल्या खांद्यावर मिरवित संप्रदायाचे थोर संत गोरोबाकाकांनी आपला आध्यात्मिक विकास साधला. त्यांच्या नावाने संत शिरोमणी गोरोबाकाका महाराष्ट्र मातीकला मंडळाची वर्धा येथे स्थापना करून, या क्षेत्रातील कारागिरांचा कौशल्य विकासाच्या माध्यमातून; आर्थिक विकास साधण्याची मुहूर्तमेढ रोवण्यात येत आहे. या मंडळाच्या माध्यमातून मातीकलेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, कौशल्य विकास, अधिक गुणवत्तापूर्ण व कलात्मक उत्पादन, पायाभूत सुविधा, विक्री व्यवस्था, निर्यात अशा विविध घटकांचा एकात्मिक विकास करून रोजगार निर्मितीस चालना देण्यात येईल. या प्रयोजनासाठी रु. १० कोटी एवढा नियतव्यय राखून ठेवण्यात येत आहे.

दीनदयाळ बहुउद्देशी प्रसारक मंडळ (यवतमाळ) यांच्यावतीने भटक्या विमुक्त विकास प्रतिष्ठान तसेच श्री विश्वकर्मा औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (सांगली, मार्डी, जि. उस्मानाबाद) यांच्यामार्फत केल्या जात असलेल्या कौशल्य विकासाच्या कामासाठी प्रत्येकी रु. २ कोटी अनुदान देण्यासाठी नियतव्यय ठेवण्यात येत आहे. श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्था, औरंगाबाद यांच्या शताब्दी वर्षानिमित्त रु. २ कोटी एवढे अनुदान देण्यासाठी नियतव्यय ठेवण्यात येत आहे.

### संत्रा प्रक्रिया उद्योग

राज्यात दीड लाख हेक्टरवर संत्रा लागवड होते परंतु लागवडीच्या मानाने उत्पादन कमी आहे. त्यामुळे संत्र्याची उत्पादकता व दर्जा वाढवण्यासाठी पंजाब राज्याप्रमाणे 'सिट्रस इस्टेट' निर्माण करण्याचा मानस आहे. याची अंमलबजावणी विदर्भातील संत्रा उत्पादक असलेल्या नागपूर, अमरावती व अकोला या तीन जिल्ह्यात टप्प्याटप्प्याने करण्यात येईल. यासाठी २०१८-१९ मध्ये रु. १५ कोटी इतका नियतव्यय ठेवण्यात येत आहे.

### रेशीम लागवड

रेशीम उद्योग विकासातून रोजगार निर्मितीची क्षमता निर्माण होते. संपूर्ण राज्यात रेशीम विकासाच्या योजना राबवण्यात येत आहेत. त्याअंतर्गत तुती, टसर, अर्जुन व ऐन या जातीच्या रोपांची मोठ्या प्रमाणात लागवड करण्यासाठी २०१८-१९ करिता रु.३ कोटी इतका निधी देण्याचे प्रस्तावित आहे.

### अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ

राज्यातील आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील उद्योजक बनू इच्छिणाऱ्या व तशी क्षमता असलेल्या तरुणांना आर्थिक साहाय्य पुरवण्याच्या उद्देशाने या महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या महामंडळाचे भागभांडवल रु.५० कोटी होते. या भागभांडवलामध्ये गतवर्षी रु.४०० कोटींनी वाढ करण्यात आली. त्याअनुषंगाने आवश्यक तरतूद उपलब्ध करून देण्यात येईल. नुकतेच शासनाने या महामंडळास वैयक्तिक कर्ज परतावा योजना, गटकर्ज व्याज परतावा योजना व गटप्रकल्प कर्ज योजना या तीन योजना राबवण्यास मान्यता दिली आहे. यातून जवळपास १ लक्ष १२ हजार लाभार्थ्यांना फायदा होणार आहे.

## स्टार्टअप संस्कृती

राज्यात रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी, नावीन्यपूर्ण स्टार्टअप धोरण-२०१८ राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुढील ५ वर्षात १५ इनक्युबेटर्स विकसित करणे, एंजल फंड व सीड फंडच्या माध्यमातून ५ हजार कोटींची गुंतवणूक करणे, त्या माध्यमातून १० हजार स्टार्टअप उद्योगांना, सुविधांचा लाभ देऊन ५ लाख रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याचे लक्ष्य ठरवण्यात आले आहे.

युवकांना एरोस्पेस आणि संरक्षण क्षेत्राशी संबंधित कौशल्यविकासाचे प्रशिक्षण देण्यासाठी तसेच स्टार्टअपचा विकास



करण्यासाठी सेंटर ऑफ एक्सेलन्स उडान व इनक्युबेशन सेंटरची स्थापना करण्यात येत आहे. याकरिता रु.५ कोटी एवढा नियतव्यय ठेवण्यात येत आहे. स्टार्टअप उद्योगांना चालना देण्याकरिता भारतीय पेटंटसाठी रु.२ लाखांपर्यंत आणि आंतरराष्ट्रीय पेटंटसाठी रु.१० लाख मर्यादेपर्यंत अशी एकूण खर्चाच्या ८० टक्के इतकी रक्कम अनुदान स्वरूपात देण्यात येईल. या उद्योगाच्या विकासासाठी व गुणवत्ता परीक्षणासाठी ८० टक्के रकमेची भरपाई करण्यात येईल. राज्य वस्तू व सेवा कराच्या रकमेची शासनाकडून भरपाई करण्यात येईल.

**शेतकऱ्याचे उत्पन्न दुपटीने वाढवणे हा सरकारचा दृढ संकल्प असून शाश्वत शेतीवर भर देण्यात येईल. त्यासाठी पाण्याची सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यामुळे सरकारने जलयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे, विहिरी इत्यादी प्रकल्प राबवून मागील तीन वर्षांपासून सिंचन क्षेत्र वाढवण्यावर भर दिला आहे.**



# बळीराजाचा सन्मान आणि समृद्धी

**दीपक केसरकर**



**दीपक केसरकर,** वित्त व नियोजन राज्यमंत्री

मागील तीन वर्षात जलसंपदा विभागाच्या सर्व योजनांना निधी उपलब्ध करून दिला आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेंतर्गत समाविष्ट राज्यातील २६ प्रकल्पांकरिता २०१८-१९ मध्ये रु.३ हजार ११५ कोटी २१ लक्ष निधीची तरतूद करण्यात आली आहे. २०१८-१९ मध्ये जलसंपदा विभागासाठी रु.८ हजार २३३ कोटी १२ लक्ष निधीची तरतूद या अर्थसंकल्पात आहे. यामध्ये नाबार्ड प्रकल्पासाठी रु.३०० कोटी १३ लक्ष तरतुदीचा समावेश आहे. या वर्षी सुमारे २ लक्ष २६ हजार हेक्टर सिंचन क्षमता व ८५३ दशलक्ष घनमीटर पाणीसाठ्यांची निर्मिती अपेक्षित असून अपूर्ण पाटबंधारे प्रकल्पांपैकी ५० प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. कोकणातील खारबंधाऱ्यांच्या बांधकामासाठी विशेष कार्यक्रम राबवण्यात येईल व अस्तित्वातील खारबंधाऱ्यांची दुरुस्ती करण्यात येईल. या प्रयोजनार्थ २०१८-१९ मध्ये रु.६० कोटींची भरीव तरतूद करण्यात आली आहे. समुद्रकिनाऱ्यांच्या संवर्धनासाठी व जमिनीची धूप थांबवण्यासाठी जागतिक बँकेच्या साहाय्याने मोठा प्रकल्प राबवण्यात येईल.

## जलयुक्त शिवार

जलयुक्त शिवार हा राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. या योजनेंतर्गत दुष्काळावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत दरवर्षी ५ हजार गांवे टंचाईमुक्त करण्याचे उद्दिष्ट आहे. मागील दोन वर्षात ११ हजारांहून अधिक गांवे जलपरिपूर्ण झाली आहेत. या गावांमध्ये ४ लक्ष २५ हजारांहून अधिकची कामे पूर्ण होऊन १६ लक्ष ८२ हजार सहस्र घनमीटर गाळ काढण्यात आला. १८४७ कि.मी.खोलीकरण आणि रुंदीकरणाचे काम करण्यात आले. २०१७-१८ या आर्थिक वर्षात जानेवारी २०१८ अखेरपर्यंत ८३५९

कामे पूर्ण झाली आहेत. या कामांमुळे २० लक्ष हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्राकरिता संरक्षित पाण्याची सिंचन क्षमता निर्मित झाली. २०१८–१९ मध्ये जलयुक्त शिवार अभियानासाठी रु.१५०० कोटी एवढा विशेष निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

### विहिरी, शेततळे व सूक्ष्म सिंचन

समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजना व अन्य योजना अंतर्गत एकूण ८२ हजार ८५९ एवढ्या सिंचन विहिरी पूर्ण करण्यात आल्या. तर सुमारे ९८ हजार विहिरींची कामे प्रगतिपथावर आहेत.

'मागेल त्याला शेततळे' या योजनेत ६२ हजार शेततळी पूर्ण केली आहेत. उपलब्ध पाण्याचा १०० टक्के वापर काटकसरीने करण्याकरिता सूक्ष्म सिंचनाशिवाय पर्याय नाही. राज्यातील अनेक भागांमध्ये इस्त्रायली तंत्रज्ञानाचा अवलंब करून सूक्ष्म सिंचन पद्धतीचा वापर वाढला आहे. २०१८–१९ मध्ये सिंचनासाठी रु.४३२ कोटी तर विहिरी व शेततळे या बाबींसाठी रु.१६० कोटी एवढा निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.



### वनशेतीस प्रोत्साहन

शेतकऱ्यांना पीक व पशुधन या बरोबरच उत्पन्नाचा एक नवीन स्रोत उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने वन शेतीस प्रोत्साहन देण्यात येईल. या अभियानांतर्गत वृक्षारोपणासाठी दर्जेदार बियाणे, नवीन रोपटे, क्लोन्स, संकरित व सुधारित जातीचे लागवड साहित्य शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येईल. वृक्ष लागवड आणि रोपवाटिकेसाठी एकूण खर्चाच्या ५०% एवढे अनुदान देण्यात येईल. या योजनेमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याबरोबरच वातावरणातील कार्बन उत्सर्जनाची पातळी कमी होणे, जमिनीचा पोत सुधारणे यांसारखे इतर फायदेसुद्धा होतील. २०१८–१९ मध्ये या योजनेकरिता रु.१५ कोटी एवढा निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

अर्थसंकल्प २०१८–१९


### शेतमाल साठवणूक सुविधा व प्रतवारीसाठी प्राधान्य

राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतमालाची प्रतवारी ठरविताना शेतकऱ्यांना नाहक त्रास होऊ नये, म्हणून एफ.ए.क्यू. दर्जाचा शेतमाल वेगळा करून व त्यास रास्त भाव देणे व्यापाऱ्यांना क्रमप्राप्त करण्यात येईल. त्यासाठी राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये धान्य चाळणी यंत्र बसविण्याचा निर्णय घेण्यात आला




महाराष्ट्राचा मानबिंदू, आदर्श, पराक्रमी व रयतेचा राजा, छत्रपती शिवाजी महाराज यांनी दाखवलेल्या न्याय्य मार्गावर सरकारची वाटचाल सुरू आहे. शेतकऱ्यांचे हित जपणे या महाराजांच्या नीतीला अनुसरून सरकार शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत आहे. २००९ साली देण्यात आलेल्या कर्जमाफी योजनेत नियमातील अटीमुळे लाभार्थ्यांची संख्या मर्यादित राहिली. ही बाब लक्षात घेता वेळोवेळी उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे वेळेत कर्जाची परतफेड करू न शकलेल्या व परिणामी थकबाकीत गेलेल्या शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणे तसेच वेळेत कर्ज परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम देण्यासाठी शासनाने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७ लागू केला आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांकडे असणाऱ्या क्षेत्राचा विचार न करता सरसकट रु.१.५० लाखापर्यंत कर्जमाफी तसेच वेळेत परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना रु.२५,००० पर्यंत प्रोत्साहनपर रक्कम अदा करण्याची तरतूद आहे. या योजनेचा लाभ गरजू व पात्र शेतकऱ्यांनाच होण्यासाठी काही निकष ठरवण्यात आले आहेत.

आतापर्यंत ४६.३४ लाख कर्जखातेधारकांना रु.२३१०२.१९ कोटी इतक्या कर्जमाफीच्या रकमेचा लाभ देण्याबाबतची मान्यता संबंधित बँकांना देण्यात आली आहे. त्यानुसार बँकांनी ६ मार्च, २०१८ अखेर ३५.६८ लाख कर्ज खातेधारकांना रु.१३ हजार ७८२ कोटी इतक्या रकमेचा लाभ दिला आहे. उर्वरित सर्व पात्र लाभार्थींना या योजनेचा लाभ लवकरात लवकर देण्यासाठी शासनामार्फत कार्यवाही सुरू आहे.



## फलोत्पादन योजना विस्तार



रोजगार हमी योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत फळबाग लागवड योजना राज्यभर राबवण्यात येत आहे. रोजगार हमी योजनेंतर्गतच्या फळबाग योजनेच्या अंमलबजावणीकरिता वैयक्तिक लाभधारकांसाठी फळबागेच्या क्षेत्राची मर्यादा कोकणात कमाल १० हेक्टर व उर्वरित महाराष्ट्रात कमाल ४ हेक्टर अशी आहे. या क्षेत्राची मर्यादा ही उर्वरित महाराष्ट्रात कमाल ६ हेक्टर करण्याचे प्रस्तावित आहे. या निर्णयामुळे फळबागक्षेत्र वाढून सध्या लाभ मिळत नसलेल्या अनेक शेतकऱ्यांचा यामध्ये समावेश होईल. कोकणातील आंबा व काजू उत्पादक शेतकरी व उद्योजक यांना विशेष प्रोत्साहन देण्यात येईल. २०१८-१९ साठी या प्रयोजनार्थ रु.१०० कोटी इतका नियतव्यय राखून ठेवण्यात येत आहे.

आहे. त्याअनुषंगाने २५% अर्थसाहाय्य पुरवण्याची नवीन योजना प्रस्तावित करण्यात येत आहे. २०१८-१९ मध्ये धान्य चाळणी यंत्र बसविण्यासाठी नियतव्यय राखून ठेवला आहे.

### सेंद्रीय शेती- विषमुक्त शेती



रासायनिक खते, कीटकनाशके यामुळे कमी होत चाललेला जमिनीचा कस, आरोग्यास होत असलेला अपाय यामुळे जागतिक स्तरावर सेंद्रीय शेतीचा पुरस्कार करण्यात येत आहे. शासनाने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे धोरण निश्चित केले आहे. नैसर्गिक पद्धतीने उत्पादित केलेल्या शेतमालास अधिक पसंती व पर्यायाने बाजारपेठेत अधिक भाव प्राप्त होईल. तसेच उत्पादन खर्चही मर्यादित राहील. त्या दृष्टीने शासनाने सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देण्याचे ठरवले आहे. शेतकऱ्यांची उत्पादन किंमत कमी व्हावी या दृष्टीने यासाठी एक स्वतंत्र योजना प्रस्तावित असून त्यासाठी रु.१०० कोटी नियतव्यय राखून ठेवला आहे.

### कृषी पंप

मागील तीन वर्षात ३ लक्ष १० हजार कृषिपंपांना वीजजोडण्या देण्यात आल्या. त्यासाठी रु.३ हजार १४ कोटी इतका खर्च करण्यात आला. विदर्भ मराठवाडा कृषिपंप वीज जोडणी विशेष योजना या अंतर्गत जानेवारी २०१८ अखेर एकूण १ लक्ष ४३ हजार ५६० कृषिपंपांना वीज जोडणी देण्यात आली. रु.१ हजार ३९२ कोटी इतका खर्च करण्यात आला. २०१८-१९ या वर्षामध्ये राज्यातील ९३ हजार ३२२ कृषिपंपांना विद्युतजोडणी देण्यासाठी रु.७५० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित केला आहे.

### राष्ट्रीय कृषी बाजार

बाजार समितीत विक्रीसाठी येणारा शेतमाल, आडते व दलालापासून मुक्त असावा, शेतमालाला योग्य मोबदला मिळावा यासाठी ई-राष्ट्रीय कृषी बाजार (ई-नाम) हे पोर्टल देशात सुरू करण्यात आले आहे. राज्यातील ३० बाजार समित्यांमध्ये ई-ट्रेडिंगची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. राज्यातील १४५ मोठ्या बाजार समित्या ई-नामच्या पोर्टलवर आणण्याचे नियोजित आहे. शेतकऱ्यांसाठी शेतमाल तारण कर्ज योजना बाजार समितीच्या आवारातील प्रमाणित गोदामातून राबवण्यास प्रोत्साहन देण्यात येत आहे. ११६ बाजार समित्यांनी ही योजना सुरू केली असून, १,०६,००० क्विंटलपेक्षा जास्त शेतमाल तारणात ठेवण्यात आला आहे. अशा शेतमालावर शेतकऱ्यांना केवळ ६% व्याज दराने कर्ज देण्यात येते. यासाठी २०१८-१९ या वित्तीय वर्षामध्ये रु.९ कोटी इतका निधी केंद्र शासनाकडून प्राप्त होणार आहे.

शेतमाल तारण योजना महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत राबवण्यात येत आहे. त्यास शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद लाभत आहे. या योजनेची राज्यभर व्यापक अंमलबजावणी करण्याच्या हेतूने राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये राज्य कृषी पणन मंडळाच्या आर्थिक सहभागाने, गोदामांची उभारणी करण्याची नवीन

### मुख्यमंत्री कृषी आणि अन्न प्रक्रिया योजना



शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालावर प्रक्रिया झाल्यास शेतमालास उत्तम भाव मिळू शकतो, याकरिता मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेकरिता २०१८-१९ साठी रु.५० कोटी उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाचे मूल्यवर्धन करून चांगल्या दराने बाजारात विकण्यास मदत होईल.

योजना प्रस्तावित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळामार्फत समृद्धी महामार्गालगत गोदामे, शीतगृहे व सायलो इ. साठवणूक सुविधांची उभारणी करण्यात येणार आहे.

### महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत माल वाहतूक

राज्यातील माल वाहतूक जलद आणि किफायतशीर दराने होण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडे असलेला प्रवासी वाहतुकीचा प्रदीर्घ अनुभव आणि उपलब्ध असलेली साधनसामग्री तसेच महामंडळाचे राज्यात गावोगावी पोहोचलेले वाहतुकीचे जाळे या बाबी विचारात घेऊन, एस.टी. महामंडळामार्फत मालवाहतुकीची नवीन सेवा सुरू करण्याचा मानस आहे. एस.टी. महामंडळाकडून माल वाहतूक सुरू झाल्यामुळे खेड्यापाड्यांतील शेतकऱ्यांचा नाशवंत माल कमी वेळेत किफायतशीर दराने बाजारपेठेच्या ठिकाणी पोहोचण्यास मदत होईल. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेस तसेच ग्राहक वर्गास फायदा होईल. त्याप्रमाणे माल वाहतुकीच्या या नवीन सेवेमुळे महामंडळाचे उत्पन्न वाढेल. त्या अनुषंगाने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांची एकूण संख्या ६०९ एवढी आहे. त्यांची टप्प्याटप्प्याने सुधारणा करण्यात येत आहे. बसस्थानकांचे बांधकाम व सुधारणेची कामे हाती घेण्यासाठी मागील तीन वर्षात रु.१४२ कोटी निधी शासनाने उपलब्ध करून दिला. त्या माध्यमातून ९२ बसस्थानकांची पुनर्बांधणी, दुरुस्ती व आधुनिकीकरण यांची कामे करण्यात आली. २०१८-१९ करिता बसस्थानकांची पुनर्बांधणी करण्यासाठी रु.४० कोटींची तरतूद प्रस्तावित असून आवश्यकतेनुसार अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला जाईल.



### दारिद्र्यरेषेवरील शेतकऱ्यांना अन्नधान्याचा लाभ

औरंगाबाद, नागपूर व अमरावती विभागांतर्गत १४ जिल्ह्यांतील दारिद्र्यरेषेवरील अंदाजे शेतकऱ्यांना तांदूळ व गहू अनुक्रमे २ व ३ रु. अशा सवलतीच्या दराने पुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. २०१८-१९ या आर्थिक वर्षात रु.९२२ कोटी ६८ लक्ष नियतव्यय प्रस्तावित आहे.

# मुबलक वीज

अर्थसंकल्प २०१८-१९

**विजेचे उत्पादन वाढावे यासाठी शासन विविध उपाययोजना राबवत आहेत. त्यामुळे राज्यात सध्या मुबलक वीज उपलब्ध झाली आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात वीज उत्पादनासाठी भरघोस तरतूद करण्यात आली आहे.**



ऊर्जा विभागाच्या पायाभूत सुविधा तसेच अन्य बाबींकरिता २०१८-१९ मध्ये रु. ७ हजार २३५ कोटी नियतव्यय, पायाभूत आराखडा-२ योजनेंतर्गत अस्तित्वात असलेली वितरण प्रणाली सुधारण्यासाठी २०१८-१९ मध्ये महावितरण कंपनीकरिता शासनाच्या भागभांडवलापोटी रु.३६५ कोटी ५५ लक्ष इतका नियतव्यय आणि राज्याला भासणारी वीज टंचाई भरून काढण्यासाठी महानिर्मिती कंपनीचे २१२० मे.वॅ.क्षमतेचे औष्णिक प्रकल्प प्रस्तावित आहेत. यासाठी २०१८-१९ मध्ये रु.४०४ कोटी १७ लक्ष इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

### घारापुरी लेण्यांवर वीज

समुद्रकिनाऱ्यावरील घारापुरी लेण्यात ७० वर्षात प्रथमच वीज पोहोचवण्यात शासनाला यश प्राप्त झाले आहे. घारापुरीला वीजपुरवठा करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवत ७.५ कि.मी.ची उच्चदाब वीजवाहिनी व ३.५ कि.मी.लांबीची लघुदाबवाहिनी टाकून २०० के. व्ही.ए.च्या ३ ट्रान्सफॉर्मरद्वारे वीजपुरवठा सुरू करण्यात आला आहे. यासाठी रु.२२ कोटी इतका खर्च करण्यात आला आहे.

### नवीन व नवीकरणीय ऊर्जास्रोतांचा विकास

नवीन व नवीकरणीय ऊर्जा (अपारंपरिक ऊर्जा) स्रोतांद्वारे वीज निर्मिती करण्यावर शासनाने भर दिला आहे. या क्षेत्राचा विकास करण्यासाठी २०१८-१९ मध्ये रु.७७४ कोटी ५३ लक्ष नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.



२५०० मे.वॅ.क्षमतेचे सौरऊर्जे

पासून वीज निर्मिती प्रकल्प महानिर्मिती कंपनीतर्फे सार्वजनिक-खासगी भागीदारी पद्धतीने विकसित करण्याचे उद्दिष्ट आहे.

### मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी

मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजनेंतर्गत राज्यातील ४० लाख शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या योजनेची अंमलबजावणी गतीने सुरू आहे. अहमदनगर जिल्ह्यात राळेगणसिद्धी, यवतमाळ जिल्ह्यातील कोळंबी, अमरावती जिल्ह्यातील वरुडजवळ गव्हाणकुंड येथे सौर कृषिवाहिनी योजनेची कामे सुरू असून, येत्या २-३ महिन्यात हे प्रकल्प होतील. विदर्भ-मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रात ३०० मेगावॅटचे प्रकल्प सुरू होत आहेत. यासाठी ग्रीनसेस फंडातून निधी उपलब्ध करून देण्यात येईल. ग्रीनसेस फंडासाठी रु. ३७५ कोटीचा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र या भागातील डी व डी + उद्योगांना वीजदरामध्ये सवलत देण्यात येते. यासाठी २०१८-१९ मध्ये रु. ९२६ कोटी ४६ लक्ष नियतव्यय प्रस्तावित करण्यात येत आहे.

**रस्ते, पूल, लोहमार्ग, बंदरे यांसारख्या पायाभूत सुविधांची दर्जेदार निर्मिती हे महाराष्ट्राचे वैशिष्ट्य राहिले आहे. यंदाच्या अर्थसंकल्पातील या कामासाठींच्या पुरेशा तरतुदींमुळे या सुविधा महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये गतीने पूर्ण होण्यास साहाय्य होईल.**



# समृद्धीचे महामार्ग

### रस्ते विकास

रस्ते विकास योजना २००१ ते २०२१ मध्ये एकूण ३,३६,९९४ किमी लांबीच्या रस्त्यांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून त्यापैकी २ लक्ष ९९ हजार ४४६ कि.मी. चे रस्ते साध्य झाले आहेत. २०१८-१९ या आर्थिक वर्षात राज्यातील रस्ते विकासासाठी रु. १० हजार ८२८ कोटी एवढा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. नाबार्ड कर्ज साहाय्य योजनेतून रस्ते सुधारणेचा व पूल बांधकामाच्या कार्यक्रमासाठी २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये ३०० कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. महाराष्ट राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाची क्षमतावाढ करण्याचे काम हाती घेण्यास मंजुरी देण्यात आली आहे. याची अंदाजित किंमत ४ हजार ७९७ कोटी एवढी आहे. याशिवाय वर्सोवा-वांद्रे सागरी सेतूच्या ७ हजार ५०२ कोटी किमतीच्या कामासही मंजुरी देण्यात आली आहे. या दोन्ही कामाच्या निविदा प्रगतिपथावर आहेत.

### राष्ट्रीय महामार्ग

राज्य रस्ते विकास योजना २००१-२०२१ मध्ये राष्ट्रीय महामार्गांची लांबी ४५०९ कि.मी. एवढी प्रस्तावित करण्यात आली होती. ३१ मार्च २०१४ रोजी राज्यातील राष्ट्रीय महामार्गांची लांबी ५८५८ कि.मी. होती. त्यात वाढ होऊन ती सध्या १५४०४ कि.मी. आहे. केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने महाराष्ट्रातील सुमारे ११ हजार ७०० कि.मी. लांबीच्या रस्त्यांना राष्ट्रीय महामार्ग म्हणून तत्त्वत: मंजुरी दिली आहे. त्यापैकी ७ हजार ९०० कि.मी. लांबीचे रस्ते राष्ट्रीय महामार्ग म्हणून जानेवारी २०१७ मध्ये घोषित करण्यात आले. एकूण २८०० कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या पेव्हड् शेल्टरसह दुपदरीकरणासाठी २६ हजार कोटी अंदाजित किंमतचे प्रकल्प प्रगतिपथावर आहेत व २ हजार कि.मी. लांबीचे अंदाजित १६ हजार कोटी किमतीचे प्रकल्प निविदा स्तरावर आहेत.

### मुख्यमंत्री ग्रामसडक योजना

ग्रामीण जनतेच्या दळणवळणासाठी वरदान ठरलेल्या मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मागील तीन वर्षात सुमारे २ हजार ६०० कि.मी. रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत व ७६०० कि.मी. लांबीची कामे प्रगतिपथावर आहेत. २०१८-१९ मध्ये सुमारे ७ हजार कि.मी.लांबीचे रस्ते पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून, त्यासाठी रु.२ हजार २५५ कोटी ४० लक्ष निधी प्रस्तावित आहे.

### मिहान

मिहान हा राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. या प्रकल्पात गुंतवणूक केलेल्या प्रकल्पांद्वारे आगामी काळात सुमारे १० हजार रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. रु. ४ हजार ६६ कोटी रकमेचे नवीन गुंतवणुकीच्या सामंजस्य करारांवर स्वाक्षरी झाली असून, त्यामधून १४ हजार ४७५ इतकी रोजगार निर्मिती होण्याची अपेक्षा आहे. मिहान अंतर्गत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय

विमानतळाचा डीबीओएफटी (DBOFT) तत्त्वावर विकास करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. विस्तारीकरणानंतर या विमानतळावरून २०३० पर्यंत अंदाजे १ हजार ४०० दशलक्ष प्रवासी तसेच सुमारे ९ लक्ष टन कार्गो वाहतूक अपेक्षित आहे. या बाबींसाठी २०१८-१९ करिता रु.१०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

### सागरमाला

किनारपट्टीवरील बंदरांमध्ये प्रवासी जलवाहतुकीसाठी पायाभूत सुविधांच्या रु.२२२ कोटी ३९ लक्ष इतक्या खर्चाच्या एकूण ११ प्रकल्पांना केंद्र शासनाने सागरमाला कार्यक्रमांतर्गत मान्यता दिली आहे. हे प्रकल्प विविध टप्प्यांत प्रगतिपथावर आहेत. डिसेंबर २०१९ पर्यंत हे प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे. याव्यतिरिक्त, रु. २७७ कोटी खर्चाचे आणखी २३ प्रकल्प मंजुरीसाठी केंद्र शासनाकडे सादर करण्यात आले आहेत. या प्रकल्पामध्ये राज्य शासनाचा ५० टक्के हिस्सा असून २०१८-१९ मध्ये यासाठी रु.२२ कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे. मुंबई शहर आणि कोकणपट्टीवरील विविध स्थळांदरम्यान प्रवासी जलवाहतूक प्रस्तावित आहे. महाराष्ट्र सागरी महामंडळ, मुंबई बंदर न्यास, आणि सिडको यांच्या सहकार्याने भाऊचा धक्का ते मांडवा, अलिबाग दरम्यान प्रवासी जलवाहतूक सेवेचा आरंभ एप्रिल २०१८ मध्ये करण्यात येणार आहे.

### न्यायालयीन इमारतींचे बांधकाम

राज्यातील विविध ठिकाणी न्यायालयांसाठी न्यायालयीन इमारती व न्यायाधीशांसाठी निवासस्थाने बांधण्याची योजना राबवण्यात येत आहे. त्यासाठी पुरेसा निधी शासन उपलब्ध करून देत आहे. माहे डिसेंबर २०१७ अखेरपर्यंत न्यायालयीन इमारती, न्यायाधीश निवासस्थाने व आनुषंगिक कामे यांची एकूण ३०१ कामे सुरू असून, त्यापैकी १५२ कामे पूर्ण झाली आहेत. १४९ कामे प्रगतिपथावर आहेत. २०१८-१९ मध्ये रु.७०० कोटी ६५ लक्ष नियतव्यय प्रस्तावित करण्यात येत आहे.

अर्थसंकल्प २०१८-१९

### सर्वांसाठी घरे: प्रधानमंत्री आवास योजना

प्रधानमंत्री आवास योजना- सर्वांसाठी घरे २०२२ या केंद्र पुरस्कृत योजनेची अंमलबजावणी काही सुधारणांसह राज्यात करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. व्याज अनुदान योजना बँकांमार्फत संपूर्ण राज्यात राबवण्यात येणार आहे. या योजनेचे नागरी भागातील उद्दिष्ट २०१८-१९ मध्ये १.५९ लक्ष घरे बांधण्याचे आहे. या योजनेकरिता २०१८-१९ मध्ये रु.१ हजार ७५ कोटी ५० लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

प्रधान मंत्री आवास योजना-ग्रामीण

ग्रामीण भागासाठी या योजनेखाली १० लाखांपेक्षा जास्त लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली असून, यापैकी सुमारे ४ लाख घरांचे नियोजन करण्यात आले असून बांधकाम वेगवेगळ्या टप्प्यांवर आहे. २०१८-१९ मध्ये रु.१ हजार १४० कोटी ३५ लक्ष एवढी तरतूद करण्यात येत आहे.

## मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग

नागपूर व मुंबई दरम्यान भुपृष्ठ वाहतूक सुलभ होण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत ३१ जुलै, २०१५ रोजी नागपूर-मुंबई शीघ्रसंचार द्रुतगती महामार्ग (समृद्धी महामार्ग) तयार करण्याची घोषणा केली होती. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून घोषित करण्यात आले. या महामार्गासाठी संपूर्ण नवीन संरेखा (ग्रीनफिल्ड अलायनमेंट) निश्चित करण्यास मान्यता देण्यात आली. या प्रकल्पाकरिता नागपूर-मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लिमिटेड या नावाने विशेष उद्देश वाहन (एस.पी.व्ही) स्थापन करण्यात आले आहे. १० जिल्हे, २६ तालुके आणि ३९० गावांमधून जाणारा ७०१ किमी लांबीच्या महाराष्ट्र समृद्धी महामार्गासाठी संपादित करावयाच्या जमिनीसाठी ९९ टक्के संयुक्त मोजणी पूर्ण झाली असून भूसंपादनाची ६४ टक्के प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

इंटरचेंजेस व वे साइड मेनिटीज संदर्भात डिझाइन व क्षेत्र निश्चिती अंतिम टप्प्यात आहे.

या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया प्रगतिपथावर असून प्रकल्पाचे काम एप्रिल २०१८ मध्ये सुरू होणे अपेक्षित आहे. हा प्रकल्प ३० महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.





राज्यातील अनुसूचित जाती-जमाती आणि इतर वंचितांच्या सर्वांगीण विकासावर शासनाने ठळकपणे लक्ष केंद्रित केले आहे. त्याचेच प्रतिबिंब यंदाच्या अर्थसंकल्पीय तरतुदींमधून दिसून येते.

# सर्वांची सोबत, सर्वांचा विकास

## सामाजिक न्याय विभाग

अनुसूचित जाती उपयोजनेसाठी एकूण रु. ९ हजार ९४९ कोटी २२ लक्ष एवढी तरतूद प्रस्तावित आहे. त्यापैकी रु. २ हजार ७०० कोटी जिल्हा योजनेसाठी तर रु. ७ हजार २४९ कोटी २२ लक्ष राज्यस्तरीय योजनेसाठी प्रस्तावित आहे. या योजनेंतर्गत प्रामुख्याने आरोग्यसेवेसाठी रु. ३५७ कोटी ९९ लक्ष, रमाई घरकुल योजनेसाठी रु. ७०० कोटी, शासकीय वसतिगृहासाठी रु. ७१८ कोटी ५९ लक्ष आणि निवासी शाळा सुरू करण्यासाठी रु. २०२ कोटी ३२ लक्ष तरतूद प्रस्तावित केलेली आहे.

विशेष साहाय्य योजनेंतर्गत दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील वृद्ध निराधार, विधवा व अपंग या घटकांना संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजना, इंदिरा राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तिवेतन योजना आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेंतर्गत अर्थसाहाय्य देण्यात येते. याकरिता रु. १ हजार ६८७ कोटी ७९ लक्ष नियतव्यय प्रस्तावित केला आहे.

१८ ते ६५ वयोगटातील दिव्यांगांना राज्यपुरस्कृत श्रावणबाळ निवृत्तीवेतन योजनेंतर्गत प्रतिमहा रु. ६०० इतके निवृत्तीवेतन देण्यात येत होते. त्यात वाढ करून ४० ते ८० टक्के दिव्यांगता असणाऱ्यांना रु. ८०० आणि ८० टक्के व अधिक दिव्यांगता असणाऱ्या प्रतिमाह निवृत्तिवेतन रु. १ हजार करण्याचे प्रस्तावित आहे.

### क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांचे स्मारक

क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या प्रेरणादायी कार्याच्या स्मरणार्थ पुणे येथे त्यांचे यथोचित स्मारक निर्माण करण्याचे प्रस्तावित असून यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करण्यात येईल.

### कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील भूमिहीन व दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना शासनामार्फत जमीन खरेदी करून त्याचे वाटप करण्यात येते. सध्या या योजनेंतर्गत ४ एकर जिरायती अथवा २ एकर बागायती जमीन प्रती एकरी रु. ३ लक्ष या मर्यादेत खरेदी करून वाटप करण्यात येते. सध्याच्या योजनेत ५० टक्के कर्ज व ५० टक्के अनुदान देण्यात येते. या योजनेत आर्थिक मर्यादा वाढवण्याचे तसेच अनुदानाची मर्यादा वाढवण्याचे प्रस्तावित आहे.

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीमध्ये मूलभूत सोयीसुविधा पुरवण्यासाठी राज्यस्तरीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना ही नवीन योजना २०१८-१९ पासून सुरू करण्याचे प्रस्तावित आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या नागसेनवन औरंगाबाद येथील वसतिगृह व सभागृह यांच्या विस्तारीकरण व दुरुस्तीसाठी रु. २ कोटी अनुदान देण्यासाठी नियतव्यय राखून ठेवण्यात येत आहे.

### सारथी

राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या समाजाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकासावर प्रकर्षाने लक्ष देण्यासाठी, त्यांचे प्रश्न जाणून घेण्यासाठी व त्यावर उपाययोजना सुचवण्यासाठी राजर्षी शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानवविकास संस्था स्थापन करण्याचे मागील अर्थसंकल्पात घोषित करण्यात आले होते. ही संस्था कार्यान्वित करण्यासाठी रु.५ कोटी निधी राखीव ठेवला असून, आवश्यकतेनुसार आणखी निधी उपलब्ध करण्यात येईल.

### पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सामाजिक सभागृह

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी महाराष्ट्रास सामाजिक विकासाचा वारसा दिला. आपल्या प्रजेवर पुत्रवत प्रेम करून त्यांच्या कल्याणासाठी अनेक सुधारणा घडवून आणल्या. तलाव, पाणवठे,

मंदिरे, धर्मशाळा बांधून प्रजेला सुख आणि शांती बहाल केली. त्यांच्या स्मरणार्थ महाराष्ट्रात विविध ठिकाणी सामाजिक सभागृह बांधण्याचा शासनाचा मानस असून, त्यासाठी २०१८-१९ मध्ये रु.३० कोटी नियतव्यय राखून ठेवण्यात येत आहे.

## आदिवासी विकास विभाग

आदिवासी उपयोजना कार्यक्रमासाठी रु.८ हजार ९६९ कोटी ५ लक्ष इतका नियतव्यय प्रस्तावित आहे. याअंतर्गत इंदिरा आवास योजना व शबरी आदिवासी घरकूल योजनेसाठी एकत्रित रु.१५० कोटी, रस्ते विकास करिता रु.३०० कोटी, विद्युतीकरणासाठी रु.१० कोटी, सार्वजनिक आरोग्याकरिता रु.७ कोटी ७७ लक्ष, सुवर्णमहोत्सवी शिष्यवृत्ती योजनेकरिता रु.४१ कोटी आणि भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेकरिता रु.२७५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

### भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना टप्पा क्र.२

शासनाने आदिवासी भागातील कुपोषण समस्या मिटवण्यासाठी भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरू केलेली आहे. या योजनेतील पहिल्या टप्प्याला लाभलेले यश बघून याची व्याप्ती आता वाढवण्यात येत आहे. योजनेच्या टप्पा क्र.२ मध्ये गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना आठवड्यातून ६ दिवस एक वेळ चौरस आहार देण्यात येईल. दरमहा १,२२,१४२ महिलांना याचा लाभ मिळेल. ६,९८,६५४ बालकांना आठवड्यातून ४ दिवस अंडी व केळी उपलब्ध करून देण्यात येतील. यासाठी २०१८-१९ या आर्थिक वर्षात रु.१५ कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे.

### पेसा कायद्यांतर्गत ग्रामपंचायतींना निधींचे वितरण

आदिवासी क्षेत्रातील राज्यांचे विकेंद्रीकरणाचे धोरण स्वीकारून पंचायतराज संस्थांचे बळकटीकरण करण्यासाठी अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना दरवर्षी आदिवासी उपयोजनेच्या नियतव्ययाच्या ५% निधी उपलब्ध करून देण्याच्या योजनेस मंजुरी देण्यात आली. पेसा ग्रामपंचायतींना एकूण आदिवासी घटक कार्यक्रम नियतव्ययाच्या ५% थेट अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला असून सद्य:स्थितीत २०१८-१९ करिता रु.२६७ कोटी ८८ लक्ष नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

### नामांकित निवासी शाळेत प्रवेश

आदिवासी विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांसोबत इंग्रजी माध्यमातून शिक्षण मिळावे म्हणून नामांकित निवासी शाळा योजना सुरू करण्यात आली आहे. इंग्रजी माध्यमांच्या नामंकित शाळांमध्ये आतापर्यंत अनुसूचित जमातीच्या ५१ हजार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. या योजनेसाठी २०१८-१९ मध्ये रु.३७८ कोटी नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

### शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ

शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ ही महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाची कोकण विभागाकरिता उपकंपनी आहे. या कंपनीस २०१८-१९ करिता रु.११ कोटी २५ लक्ष एवढ्या भागभांडवली अंशदानाची तरतूद प्रस्तावित आहे. या महामंडळासाठी रु.२५ कोटी एवढे अतिरिक्त भागभांडवल उपलब्ध करून दिले जाईल.

## अल्पसंख्याकांचा विकास

राज्यातील अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी राबवण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय विविध योजनांसाठी २०१८-१९ मध्ये रु.३५० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे. यात मदरसा आधुनिकीकरण

## दिव्यांग बालकांकरिता नवीन योजना

केंद्र शासनाच्या दिव्यांगता अधिकार अधिनियम २०१६ (The Rights of Persons with Disabilities Act, २०१६) या कायद्यातील तरतुदीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ० ते ५ या वयोगटातील कर्णबधीर व बहुदिव्यांग आणि बौद्धिक दिव्यांग बालकांचे दिव्यांगत्वाचे प्रमाण कमी होऊन सामान्य शाळेत शिक्षण घेण्यास मदत व्हावी या करिता, कर्णबधिर बालकांसाठी होय कर्णबधिर बालक बोलू शकतात आणि बहुदिव्यांग आणि बौद्धिक दिव्यांग




बालकांसाठी शीघ्रनिदान व हस्तक्षेप योजना या दोन नवीन योजना मी घोषित करीत आहे. या योजनांसाठी २०१८-१९ या आर्थिक वर्षात पुरेशी तरतूद करण्यात येत आहे.

### दिव्यांगांसाठी मोबाइल स्टॉल्स

राज्यातील दिव्यांगांना स्वावलंबी बनवण्यासाठी त्यांना हरित उर्जेवर चालणाऱ्या पर्यावरणस्नेही मोबाइल स्टॉल्स मोफत उपलब्ध करून देण्याचा मानस असून, त्यामाध्यमातून या दिव्यांगांना अशा वाहनांचे वाटप करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी रु. २५ कोटी इतका नियतव्यय राखून ठेवण्यात येत आहे.

योजना, मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबद्ध योजना, अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या वसतिगृहामध्ये मोफत भोजनाची सुविधा, पोलीस शिपाई भरतीपूर्व परीक्षा, निवासी प्रशिक्षण वर्ग योजना या योजनांचा समावेश आहे.

### अल्पसंख्याकबहुल ग्रामीण क्षेत्रात पायाभूत सुविधांचा विकास

अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राज्यातील अल्पसंख्याकबहुल ग्रामीण क्षेत्रात पायाभूत सुविधांचा विकास करण्याकरिता २०१८-१९ या वर्षात रु.३८ कोटी इतक्या निधीची तरतूद प्रस्तावित आहे.

## कामगार विभाग

### ऑटोरिक्षा चालक कल्याणकारी महामंडळ

राज्यामध्ये ऑटोरिक्षा चालकांची संख्या जवळपास २० लाखांपर्यंत आहे. त्यांच्या विविध अडचणी मांडण्यासाठी व निराकरणासाठी हक्काचे व्यासपीठ मिळावे, म्हणून महाराष्ट्र राज्य ऑटोरिक्षा चालक कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याचा मानस आहे. यासाठी २०१८-१९ मध्ये रु.५ कोटी इतका नियतव्यय राखून ठेवण्यात येत आहे.

## अन्न व नागरी पुरवठा

### सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. २०१८-१९ या आर्थिक वर्षात रु.५ कोटी ४१ लक्ष नियतव्यय प्रस्तावित आहे.
आधारकार्डाशी रेशनकार्डची जोडणी केली असल्यामुळे सुमारे १० लक्ष शिधापत्रिका या चुकीच्या आढळून आल्याने रद्द करण्यात आल्या आहेत. त्यासोबत ९२ लक्ष नवीन गरजू लाभार्थ्यांना सप्टेंबर, २०१६ नंतर नवीन शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले आहे.

# समर्थ पोलीस यंत्रणा

**राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी कायदा व सुव्यवस्थेची स्थिती चांगली असणे आवश्यक आहे. पोलीस दलाचे आधुनिकीकरण, बळकटीकरण तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हे ध्येय साध्य करावयाचे आहे. गृह विभागासाठी या अर्थसंकल्पात रु. १३ हजार ३८५ कोटी ३ लक्ष इतकी भरीव तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.**

### सर्व पोलीस ठाण्यांमध्ये अभ्यागत प्रवेश व्यवस्थापन प्रणाली

राज्यातील सर्व पोलीस कार्यालयांमध्ये जे अभ्यागत विविध तक्रारींसाठी किंवा अन्य कामकाजांकरिता भेट देण्यासाठी येतात त्यांची नोंद घेणे, त्यांचे काम वेळेत व समाधानकारकरीत्या झाले किंवा कसे, याची माहिती संकलित करून पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांना उपलब्ध करून देणे यासाठी अभ्यागत प्रवेश व्यवस्थापन प्रणाली निर्माण करण्यात येईल. २०१८-१९ मध्ये ई-गव्हर्नन्स योजनेमधून हा खर्च भागवण्यात येईल. ई-गव्हर्नन्स योजनेसाठी रु. ११४ कोटी ९९ लक्ष एवढी तरतूद प्रस्तावित आहे.

### सर्व पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही



पोलीस ठाणे व त्यांच्या कार्यक्षेत्रातील कायदा व सुव्यवस्थेशी संबंधित कामकाज सुरळीतपणे, जलदगतीने व अचूकपणे पार पाडण्यासाठी आणि त्यावर योग्य देखरेख व नियंत्रण राहण्यासाठी सीसीटीव्ही बसवण्याची कार्यवाही प्रगतिपथावर आहे. सर्व पोलीस ठाणी सीसीटीव्हीच्या माध्यमातून जिल्हा पोलीस नियंत्रण कक्षाशी जोडण्यात येतील. यासाठी २०१८-१९ मध्ये रु. १६५ कोटी ९२ लक्ष एवढी तरतूद प्रस्तावित आहे.



### गुन्हे अन्वेषण संगणक प्रणाली

सीसीटीएनएस (क्राईम ॲण्ड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क ॲण्ड सिस्टिम) प्रकल्पाद्वारे सर्व पोलीस ठाण्यांच्या क्षेत्रातील गुन्हेगार व गुन्हेगारीची अचूक माहिती संगणकीय स्वरूपात जतन केली जात असून आवश्यकतेनुसार या माहितीची देवाणघेवाण संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये करता येते. त्यामुळे राज्यातील अभियोग संचालनालय व न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, संबंधित पोलीस ठाणी व न्यायालये यांच्यामध्ये योग्य समन्वय साधणे सोपे जाईल. यासाठी २०१८-१९ मध्ये रु. २५ कोटी एवढी तरतूद प्रस्तावित आहे.

### मच्छीमारांच्या सुरक्षेसाठी गस्ती बोटी

महाराष्ट्राच्या समुद्र किनाऱ्यावर मच्छीमार करणाऱ्या मच्छीमार बोटींच्या सुरक्षेसाठी दोन अत्याधुनिक गस्ती नौका तैनात करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी आवश्यक ती तरतूद उपलब्ध करून देण्यात येईल.

# तरुणांच्या हितासाठी

**राज्यातील तरुणांच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांना प्रगतीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून शासनामार्फत विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद करण्यात आली आहे.**

अर्थसंकल्प २०१८-१९



### स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

उच्च शिक्षण घेतलेल्या पदवीधर तरुणांना केंद्र शासन तसेच राज्य शासनाच्या विविध स्पर्धा परीक्षांच्या संधी उपलब्ध असतात. राष्ट्रीय स्तरावर युपीएससी, स्टाफ सिलेक्शन, बँकिंग, रेल्वेभरती, सैन्यभरती इत्यादी परीक्षांमध्ये महाराष्ट्रातील तरुणांचे प्रमाण वाढणे आवश्यक आहे. परंतु बऱ्याच वेळा बौद्धिक, शारीरिक क्षमता असूनही माहितीअभावी तसेच योग्य मार्गदर्शनाअभावी त्यांची अंतिम निवड होत नाही. त्यामुळे अशा स्पर्धापरीक्षांची सर्वच तरुणांना समान संधी मिळावी. तसेच होतकरू तरुणांच्या आकांक्षांची पूर्ती व्हावी, यासाठी प्रत्येक जिल्हास्तरावर एक स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्याचा शासनाचा मानस आहे. यासाठी २०१८-१९ मध्ये रु.५० कोटी इतका नियतव्यय राखून ठेवण्यात येत आहे.

### भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्राचे बळकटीकरण

महाराष्ट्रातील बुद्धिवान होतकरू उमेदवारांचे, संघ लोकसेवा आयोगातील सेवांमध्ये प्रमाण वाढवण्यासाठी विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात चालू आर्थिक वर्षापासून रु.२ हजारावरून रु.४ हजार इतकी वाढ करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या अनुषंगाने अधिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नामांकित खासगी प्रशिक्षण संस्थांकडे उपलब्ध असणारे सराव पेपरसंच विकत घेऊन ते पेपर्स या विद्यार्थ्यांकडून सोडवून, त्यांची तपासणी तज्ज्ञ परीक्षकांकडून करून घेण्याकरिता येणारा खर्च भागवण्यासाठी; रु.४६ लक्ष ३० हजार नियतव्यय प्रस्तावित आहे. आवश्यकतेनुसार आणखी निधी उपलब्ध करून देण्यात येईल. अमरावती येथील भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्राची प्रशासकीय इमारती व वसतिगृह यांच्या बांधकामाकरिता रु.१३ कोटी नियतव्यय राखून ठेवण्यात येत आहे.



### महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाची स्थापना

राज्यातील शाळा आंतरराष्ट्रीय शैक्षणिक मानके प्राप्त करणाऱ्या शाळा असाव्यात, याकरिता पहिल्या टप्प्यात शासनाने आंतरराष्ट्रीय शैक्षणिक दर्जाच्या १०० शाळा निर्माण करण्याबाबत निर्णय घेतला आहे. राज्यातील या आंतरराष्ट्रीय शाळांच्या संलग्नतेकरिता महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ (एमआयईबी) असे नवीन मंडळ स्थापन करण्यात येत आहे. २०१८-१९ या वित्तीय वर्षामध्ये रु.३६ लक्ष इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

### आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती


मान्यताप्राप्त व्यावसायिक व उच्च शिक्षण अभ्यासक्रमात शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत लाभ मिळण्याच्या पात्रतेसाठी कुटुंबाची एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा


### थोर राष्ट्रीय पुरुषांच्या साहित्याचे प्रकाशन

महाराष्ट्रातील सामाजिक न्यायाचे थोर पुरस्कर्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, महाराजा सयाजीराव गायकवाड या थोर राष्ट्रीय पुरुषांच्या तेजस्वी विचारांच्या साहित्याची देशात तसेच विदेशात मोठ्या प्रमाणात असलेली मागणी लक्षात घेऊन; त्यांचे साहित्य सहज उपलब्ध होण्यासाठी स्वतंत्र संकेतस्थळ तयार केले जाईल. हे साहित्य वेबपोर्टलद्वारे प्रकाशित करण्याचा मानस आहे.

याकरिता २०१८-१९ मध्ये रु.४ कोटी एवढा निधी प्रस्तावित आहे.

महानुभाव पंथाचे आद्यप्रवर्तक सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांच्या नावे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथे अध्यासन केंद्र उभारण्याचे प्रस्तावित आहे.




रुपये ६ लाखांवरून ८ लाख करण्याचे प्रस्तावित आहे. या योजनेच्या अटी व शर्ती यात शिथिल करण्यात येईल. तसेच अनेक अभ्यासक्रमांचा समावेश करून, या योजनेची व्याप्ती वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. २०१८-१९ मध्ये या योजनेकरिता रु.६०५ कोटी एवढा निधी प्रस्तावित आहे.

विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय यांचे कल्याण या विभागाचे कामकाज सुरू झाले असून, या विभागासाठी या वर्षी रु.२ हजार ९६३ कोटी ३५ लक्ष एवढी तरतूद प्रस्तावित आहे. त्यात विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती व शिष्यवृत्ती यासाठी रु.१ हजार ७८५ कोटी ९७ लक्ष तरतूद प्रस्तावित आहे.

### अकृषी विद्यापीठांमध्ये एकात्मिक विद्यापीठ व्यवस्थापन प्रणाली

सर्व अकृषी विद्यापीठांमध्ये विद्यार्थी प्रवेश, अभ्यासक्रम, महाविद्यालयांचे संलग्नीकरण, प्रशासकीय बाबी इत्यादी सर्व घटकांची माहिती आयटीद्वारे कार्यान्वित करण्यासाठी व विद्यापीठांचे कामकाज अधिक पारदर्शक व सक्षम होण्यासाठी एकात्मिक विद्यापीठ व्यवस्थापन पद्धती (Integrated University Mangagement System) निर्माण करण्याची कार्यवाही, माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून करण्यात येत आहे. या बाबींसाठी रु.३८ कोटी ६४ लक्ष इतक्या निधीची आवश्यकता असून, २०१८-१९ मध्ये रु.१८ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

# उत्तम आरोग्य, सुदृढ महिला

**आरोग्याच्या उत्तम सोयी उपलब्ध करून देण्यासोबतच महिला व बालविकासाच्या नावीन्यपूर्ण योजना शासन राबवत आहे.**




## आरोग्य

### राष्ट्रीय आरोग्य अभियान

ग्रामीण आणि शहरी गरीब, दुर्लक्षित तसेच गरजू नागरिकांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी, केंद्रपुरस्कृत 'राष्ट्रीय आरोग्य अभियान' राबवण्यात येत आहे. २०१८-१९ मध्ये यासाठी रु. ९६४ कोटी प्रस्तावित करण्यात येत आहे.

'महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य' योजनेंतर्गत २०१८-१९ मध्ये रु. ५७६ कोटी ५ लक्ष नियतव्यय प्रस्तावित आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये रु. २० कोटी अंदाजित किमतीचे मल्टिस्पेशालिटी रुग्णालय स्थापन करण्याचा शासनाचा मानस असून, त्यासाठी आवश्यक ती तरतूद करण्यात येईल. हाफकिन संस्थेचे बळकटीकरण व श्रेणीवर्धन करण्यासाठी २०१८-१९ यासाठी रु. ३ कोटी ५० लक्ष इतका नियतव्यय राखून ठेवला आहे.

### प्रधानमंत्री मातृ वंदना योजना

'प्रधानमंत्री मातृ वंदना योजना' योजनेंतर्गत दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील गर्भवती महिलांना गरोदरपणाच्या शेवटच्या टप्प्यामध्ये काम करावे लागू नये म्हणून रु. ५ हजार इतकी रक्कम थेट लाभार्थीच्या खात्यात तीन हप्त्यात जमा करण्यात येते. यामुळे मातामृत्यू व बालमृत्यूचा दर नियंत्रणात ठेवण्यास मदत होत आहे. या योजनेंतर्गत २०१८-१९ मध्ये रु. ६५ कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे.

प्रधानमंत्री मातृ वंदना योजना
मातृ शक्ति राष्ट्र शक्ति

## महिला व बालविकास



### स्वाधार योजना

केंद्र शासनाच्या नवीन स्वाधारगृह योजना -२०१५ च्या निकषानुसार, राज्यात सध्या कार्यरत असलेली ३३ अल्पमुदती निवासगृहे व ५३ स्वाधारगृहे एकत्रित करून, संकटग्रस्त महिलांसाठी स्वाधारगृहे ही नवीन योजना राबवण्याचे प्रस्तावित आहे. या योजनेसाठी २०१८-१९ या आर्थिक वर्षात राज्य हिश्श्यासाठी रु. २० कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे.

### ग्राम बालविकास केंद्र

कुपोषणाच्या समस्येवर मात करण्यासाठी शासनाने गेल्या काही वर्षात विविध उपाययोजना केल्या आहेत. आदिवासी क्षेत्रातील १६ जिल्ह्यासांठी तसेच बिगर आदिवासी क्षेत्रातील अतितीव्र कुपोषित बालकांसाठी ग्राम बालविकास केंद्र योजना सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेसाठी २०१८-१९ या आर्थिक वर्षात रु. २१ कोटी १९ लक्ष नियतव्यय प्रस्तावित आहे.




**साहित्य संस्कृती आणि पर्यटन विकासाला शासनाने महत्त्व दिले आहे. राज्याच्या प्रगतीला वेगळ्या उंचीवर नेण्याचे काम या विभागामार्फत करण्यात येत आहे. यासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही.**

अर्थसंकल्प २०१८-१९

# साहित्य..संस्कृती..पर्यटन

### कातळशिल्पांचे संरक्षण, जतन व संवर्धन

कोकणातील अश्मयुगीन काळापासून ते इतिहास काळामधील अज्ञात काळ हा कातळशिल्पांच्या माध्यमाने जगासमोर येणार असून, ती कोकणाच्या इतिहासपूर्व काळावर नवीन प्रकाश टाकणार आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात आजमितीस जवळजवळ ४०० कातळशिल्पे सापडली आहेत. त्यांचे संशोधन व पर्यटन विकास या दोन्ही दृष्टिकोनातून संरक्षण करून, जतन करणे आवश्यक आहे. या स्थळांचे संरक्षण केल्यास सागर किनाऱ्यांवरील पर्यटनाबरोबरच पठारी पर्यटनासही चालना मिळेल. यासाठी २०१८-१९ या आर्थिक वर्षात रु.२४ कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे. सातारा येथील छत्रपती श्रीशिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाच्या बांधकाम व सुशोभिकरणाकरिता रु.५ कोटी नियतव्यय राखून ठेवण्यात येत आहे.

### स्मरणवस्तूंचे विक्री केंद्र (सुव्हेनिअर शॉप)

संग्रहालये पाहण्यासाठी देशभरातून आणि परदेशातूनही खूप पर्यटक येत असतात. विकसित देशांमध्ये पर्यटकांसाठी ते या ठिकाणी भेट देऊन गेले, याची आठवण म्हणून स्मरणवस्तूंची खरेदी केली जाते. याच धर्तीवर महाराष्ट्रातील शासकीय संग्रहालयात येणाऱ्या पर्यटकांसाठी स्मरणवस्तू बनवून, विक्रीसाठी ठेवण्याची योजना आहे. या स्मरणवस्तूंमध्ये कलात्मक वस्तूंच्या व ऐतिहासिक नाण्यांच्या प्रतिकृती, स्मारकांची चित्रे असलेले मग, पेपरवेट इत्यादी गोष्टींचा अंतर्भाव असेल. यासाठी कलाकृतीच्या आधुनिक तंत्राने प्रतिकृतीही बनवल्या जातील. यासाठी २०१८-१९ या आर्थिक वर्षात रु.७ कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे.

### रामटेक तीर्थक्षेत्र विकास

प्रभूरामचंद्राच्या वास्तव्याने पावन झालेले विदर्भातील रामटेक या तीर्थक्षेत्राला धार्मिकदृष्ट्या विशेष महत्त्व आहे. ऐतिहासिक काळात कालिदासाचे गाजलेले 'मेघदूत' हे महाकाव्यदेखील याच भूमीत



निर्माण झाले आहे. रामटेकचे हे पौराणिक आणि ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता, या तीर्थक्षेत्राच्या विकासाकरिता रु. १५० कोटीच्या विकास आराखड्यास शासनाने मंजुरी दिली आहे. त्यासाठी २०१८-१९ मध्ये रु.२५ कोटी इतका नियतव्यय राखून ठेवण्यात येत आहे.

### संरक्षित किल्ल्यांचे त्रिमित मानचित्रण (थ्री डी मॅपिंग)

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वैभवाची साक्ष देणारे गडकिल्ले यांचे सरकारी नोंदीप्रमाणे सीमा निश्चित करणे, सरकारी नोंदीपलीकडील

## गणपतीपुळे विकास

रत्नागिरी जिल्ह्यातील गणपतीपुळे हे पर्यटन स्थळ प्रसिद्ध आहे. या ठिकाणी ४०० वर्षांपूर्वीची गणपतीची स्वयंभू मूर्ती व मंदिरालगतचा सुंदर समुद्रकिनारा आणि वनराईने नटलेला डोंगर यामुळे हे स्थळ पर्यटकांचे आकर्षण ठरले आहे. गणपतीपुळे येथील पर्यटन क्षेत्राचा विकास व्हावा व त्यातून स्थानिक जनतेस रोजगार व



व्यवसायाची संधी निर्माण व्हावी यासाठी रु. ७९ कोटी रकमेचा विकास आराखडा प्रस्तावित आहे. २०१८-१९ साठी रु.२० कोटी नियतव्यय राखून ठेवला आहे. माचाळ, ता. लांजा जि. रत्नागिरी येथे नवीन पर्यटन स्थळ विकसित करण्यासाठी आराखडा तयार करून आवश्यक ती आर्थिक तरतूद करण्यात येईल.

## सिंधुदुर्ग येथे पर्यटन विकास

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यातील निवती रॉक येथील समुद्रातील पाण्याखाली अद्‌भुत सागरी विश्व दडलेले आहे. हे विश्व पर्यटकांना उपलब्ध करून देण्यासाठी, भारतातील पहिली बॅटरी ऑपरेटेड पाणबुडी सिंधुदुर्ग या पर्यटन जिल्ह्यास वेंगुर्ला येथे उपलब्ध करून देण्यात येईल. पाणबुडीद्वारे होणारे समुद्रपर्यटन हे जागतिक दर्जाचे असेल. त्यामुळे देश-विदेशातील पर्यटक मोठ्या प्रमाणात सिंधुदुर्गाकडे आकर्षित होतील. त्यायोगे रोजगार निर्मिती होईल.

### सिंधुदुर्ग किल्ला संवर्धन



छत्रपती शिवाजी महाराजांनी सागरी सीमांच्या रक्षणासाठी बांधलेले जलदुर्ग आजही कोकणात बुलंदपणे उभे आहेत. मालवण येथील सिंधुदुर्ग किल्ला हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. या जलदुर्गास केंद्र शासनाने महाराष्ट्रातील संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले आहे. या किल्ल्याला सुमारे ३५० वर्षे पूर्ण झाली आहेत. ज्या किल्ल्याने आपला इतिहास समृद्ध केला, त्याचे संवर्धन करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. किल्ले सिंधुदुर्ग संवर्धनासाठी रु.१० कोटी नियतव्यय राखीव ठेवण्यात आला आहे.

खासगी किंवा इतर सरकारी ताब्यातील क्षेत्र निश्चित करणे, जीआयएससारख्या प्रगत यंत्रणेद्वारे किल्ल्यांचे मॅपिंग करणे, किल्ल्यांच्या दस्तऐवजीकरणासाठी वेगवेगळ्या प्रगत यंत्रणाचा वापर करणे, मॅपिंगद्वारे किल्ल्याचे जागतिक स्थान, उंची इत्यादीची अचूक माहिती संकलित करणे, किल्ल्यांची अचूक भौगोलिक माहिती मिळवणे, किल्ल्यांवर असलेल्या अवशेषांची अचूक नोंद घेणे, ही या योजनेची मुख्य उद्दिष्टे आहेत. या कार्यक्रमासाठी २०१८-१९ या आर्थिक वर्षात आवश्यक तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

### जीवाश्म संग्रहालय

नुकतेच सिरोंचा, जिल्हा गडचिरोली येथे हजारो वर्षांपूर्वीचे जीवाश्म (fossils) सापडले आहेत. या जीवाश्मांचे जतन, संरक्षण व अभ्यास करण्याच्या दृष्टीने सिरोंचा येथे जिवाश्म संग्रहालय स्थापन करण्यात येईल. यासाठी २०१८-१९ मध्ये रु. ५ कोटी नियतव्यव राखून ठेवण्यात येत आहे.

### अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन व नाट्य संमेलनाच्या अनुदानात वाढ

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन व अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनासाठी, दरवर्षी देण्यात येणाऱ्या रु.२५ लक्ष इतक्या साहाय्यक अनुदानात दुपटीने वाढ करून २०१८-१९ या आगामी वित्तीय वर्षापासून अनुदानाची रक्कम रु.५० लक्ष करण्याचा शासनाचा मानस आहे. या कार्यक्रमासाठी रु.३ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित असून त्यातून आवश्यक ती तरतूद उपलब्ध करून देण्यात येईल.

### हेरिटेज टुरिझम, मुंबई मेला, चेतक महोत्सव

हेरिटेज टुरिझम पॉलिसी तयार करण्यात येत आहे. त्यानुसार हेरिटेज पर्यटनाच्या अनुषंगाने पायाभूत सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद केली जाईल.

जानेवारी २०१८ मध्ये 'मुंबई मेला फेस्टिवल' आयोजित करण्यात आला होता. हा महोत्सव यापुढे दरवर्षी आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच मौजे सारंगखेडा, (ता.शहादा जि.नंदुरबार) येथे चेतक महोत्सवाचे २०१६-१७ मध्ये आयोजन करण्यात आले होते. हा महोत्सवही यापुढे दरवर्षी आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे. या महोत्सवांकडे पर्यटक आकर्षित करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासाठी पुरेशी तरतूद करण्यात येईल.




### ख्यातनाम दिवंगत साहित्यिकांचे जन्मशताब्दी व स्मृती शताब्दी वर्ष

ख्यातनाम दिवंगत साहित्यिक पु.ल.देशपांडे व ग.दि.माडगूळकर यांची जन्मशताब्दी व राम गणेश गडकरी स्मृती शताब्दी वर्षानिमित्त २०१८-१९ या वर्षात विविध कार्यक्रम आणि उपक्रम राबवण्यासाठी रु.५ कोटी नियतव्यय राखून ठेवण्यात येत आहे. त्याचप्रमाणे कविवर्य मंगेश पाडगावकर यांचे वेंगुर्ला (जि. सिंधुदुर्ग) येथे व प्रसिद्ध नाट्यनिर्माते व नाट्यकलाकार मच्छिंद्र कांबळी यांचे सिंधुदुर्ग जिल्ह्यात स्मारक उभारण्याचे प्रस्तावित आहे. तसेच कविवर्य ग. दि. माडगूळकर यांच्या शेटफळे (ता.आटपाडी, जि.सांगली) येथील स्मारकाची सुधारणा करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

**वेगवेगळ्या योजना व अभिनव उपक्रमांद्वारे महाराष्ट्रातील वनसंपदा आणखी समृद्ध व्हावी, यासाठी अतिशय सूत्रबद्ध आणि जोमाने प्रयत्न करण्यात येत आहेत. यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात सुयोग्य तरतूद करण्यात आली आहे.**

# वन विकास, समृद्धीची कास

## वृक्षलागवड

जागतिक तापमानात वाढ, हवामान आणि ऋतुबदल यांची दाहकता व तीव्रता कमी करण्यासाठी वृक्षलागवडीची महामोहीम सरकारने हाती घेतली आहे. या मोहिमेंतर्गत १ जुलै, २०१६ या एकाच दिवशी २ कोटी ८१ लक्ष वृक्षलागवड राज्यामध्ये करण्यात आली. या विक्रमी वृक्षलागवडीची नोंद लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने घेतली आहे. वृक्षलागवडीची ही महामोहीम पुढे नेत १ ते ७ जुलै, २०१७ या कालावधीत ४ कोटी वृक्षलागवड करण्याचे नियोजन करण्यात आले. लोकसहभागाच्या बळावर या उद्दिष्टाच्या पुढे जात ५ कोटी ४३ लक्ष एवढी विक्रमी वृक्षलागवड राज्यात करण्यात आली. सलग दुसऱ्या वर्षीसुद्धा या विक्रमाची नोंद लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने घेतली आहे. २०१८च्या पावसाळ्यात या मोहिमेंतर्गत १३ कोटी व २०१९च्या पावसाळ्यात ३३ कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. प्रत्येक नागरिकाने या ५० कोटी वृक्षलागवडीच्या मोहिमेत सहभागी होणे, तसेच लावलेली रोपे जगविणे हे उद्दिष्ट मनाशी बाळगणे आवश्यक आहे. या वृक्षलागवड मोहिमेसाठी २०१८-१९ साठी आवश्यक नियतव्यय प्रस्तावित आहे.

## संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रम

वनाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी स्थानिक लोकांचा यात अधिकाधिक सहभाग प्राप्त व्हावा, या हेतूने सदर योजना राबवण्यात येत आहे. त्यासाठी २०१८-१९ करिता रु. ५४ कोटी ६८ लक्ष एवढा नियतव्यय प्रस्तावित करण्यात येत आहे.

## वन बंधारे

मृद व जल संधारणाचा हेतू साध्य होऊन वन्य प्राण्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यासाठी तसेच मानव-वन्यजीव संघर्ष कमी करून सहजीवन प्रस्थापित करण्यासाठी वनक्षेत्रात वनतळे तसेच सिमेंट बंधाऱ्यांची कामे करण्यात येतात. याकरिता २०१८-१९ या वर्षात ११ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.



## डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन-विकास योजना

बफरझोन क्षेत्रातील गावातील जन-जंगल-जमीन या संसाधनाच्या शाश्वत विकासासाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजना राबवण्यात येत आहे. त्यासाठी २०१८-१९ करिता रु. १०० कोटी नियतव्यय प्रस्तावित करण्यात येत आहे.

## ईको टुरिझम

राज्यात ६ राष्ट्रीय उद्याने, ४८ अभयारण्ये व ६ संवर्धन राखीव क्षेत्र अशी एकूण ६० वन्यजीव संरक्षित क्षेत्रांची निर्मिती करण्यात आली आहे. त्या क्षेत्रात आणि इतर वनक्षेत्रात निसर्ग पर्यटन विकसित करण्यास बराच वाव आहे. वनातील जैव विविधतेचे संरक्षण करणे व वनावर आधारित लोकांचे राहणीमान सुधारणे हे दोन्ही उद्देश साध्य करावयाचे आहेत. या बाबींसाठी २०१८-१९ करिता रु.१२० कोटी नियतव्यय प्रस्तावित करण्यात येत आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय रोपवाटिकेचे बळकटीकरण व आधुनिकीकरण

या योजनेंतर्गत प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी उच्च तंत्रज्ञानाद्वारे रोपनिर्मितीसाठी रोपवाटिका निर्माण करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्याद्वारे प्रगतिशील शेतकऱ्यांच्या पडीक जमिनीवर वृक्षलागवडीसाठी व उत्पादकता वाढवण्यासाठी रोपे उपलब्ध करून देण्यात येतील. यासाठी २०१८-१९ करिता रु. ४० कोटी नियतव्यय प्रस्तावित करण्यात येत आहे.

### गोरेवाडा प्राणिसंग्रहालय

निसर्ग पर्यटनाचा विकास करण्याच्या हेतूने व शहरी क्षेत्रातील लोकांना वने तसेच वन्यजीवाविषयी जनजागृती निर्माण करण्याकरिता गोरेवाडा येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्राणिसंग्रहालय आणि इतर प्रकल्प नियोजित आराखड्याप्रमाणे कामे सुरू आहेत. यासाठी २०१८-१९ मध्ये रु. २० कोटी नियतव्यय प्रस्तावित करण्यात येत आहे.

### औषधी वनस्पती

राज्यातील अकाष्ठ वनोपज व औषधी वनस्पतीचे शास्त्रोक्त पद्धतीने संकलन, योग्य प्रकारे प्रक्रिया, पॅकेजिंग, ब्रँडिंग तसेच प्रक्रियायुक्त हर्बल उत्पादनांच्या विक्रीकरिता वेगवेगळ्या ठिकाणी पुरेशा प्रमाणात विक्री केंद्रे स्थापित करणे या बाबींवर भर देण्यात येणार आहे. यासाठी २०१८-१९ मध्ये रु. ५ कोटी एवढा नियतव्यय राखून ठेवण्यात येत आहे.

## पर्यावरण व वने

### मोरणा नदी स्वच्छता मोहीम

अकोला शहरातील मोरणा नदीची स्वच्छता मोहीम १३ जानेवारी, २०१८ रोजी सर्वसामान्य नागरिक, लोकप्रतिनिधी, सर्वांनी एकत्रित येऊन हाती घेतली. या मोहिमेची प्रधानमंत्र्यांनी त्यांच्या 'मन की बात' या कार्यक्रमात कौतुकाने दखल घेतली. या मोहिमेला मदतीचा हात देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. राज्यातील जलस्रोतांच्या स्वच्छता व सौंदर्यीकरणाच्या योजनेसाठी २०१८-१९ या आर्थिक वर्षात रु. २७ कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे.

### महाराष्ट्र सागरतटीय व्यवस्थापन प्राधिकरण

सागरी क्षेत्रांचे संरक्षण व व्यवस्थापन, सागरी संकटाचे निवारण करण्यासाठी सागरी किनारा क्षेत्राचा महाराष्ट्र राज्यातील ६ तटीय जिल्ह्यांसाठी व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला आहे. सागरी क्षेत्रातील विकास कामांचे नियमन व तटीय क्षेत्रातील पारंपरिक लोकांची उपजीविका वाढवणे, हे तटीय क्षेत्र व्यवस्थापन आराखड्याने शक्य होणार आहे. या माध्यमातून पर्यटनाबाबतचे प्रकल्प राबवता येतील. या योजनेसाठी २०१८-१९ या आर्थिक वर्षात रु. ९ कोटी ४० लक्ष नियतव्यय प्रस्तावित आहे.

**स्मार्ट सिटी अभियान, स्वच्छ भारत अभियान, अमृत या योजनांच्या अंमलबजावणीत महाराष्ट्राने देशात आघाडी घेतली आहे. ही आघाडी कायम राहावी म्हणून यंदाच्या अर्थसंकल्पात सुयोग्य अशी तरतूद करण्यात आली आहे.**

# स्मार्ट, सुंदर आणि स्वच्छ



### स्मार्ट सिटी अभियान

स्मार्ट सिटी अभियानात महाराष्ट्रातील पुणे, सोलापूर, कल्याण, डोंबिवली, नागपूर, नाशिक, ठाणे, औरंगाबाद व पिंपडी चिंचवड या ८ शहरांची निवड झाली आहे. या अभियानासाठी अर्थसंकल्पात रु. १ हजार ३१६ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

### अमृत अभियान

नागरी क्षेत्रातील पाणीपुरवठा, मलनिस्सारण व नागरी परिवहन सांडपाण्याचा पुनर्वापर, हरितपट्टे या मूलभूत सुविधांचा विकास करण्यासाठी केंद्र शासनाने अटल मिशन फॉर रिज्युवनेशन ॲण्ड अर्बन ट्रान्सफॉर्मेशन (अमृत) ही योजना अमलात आणली आहे. या योजनेचा राज्यातील ४४ शहरे व ७६ टक्के नागरी लोकसंख्येस लाभ मिळत आहे. या योजनेतील रुपये ७७५० कोटींचे राज्य वार्षिक कृती आराखडे, केंद्र शासनाने मंजूर केले आहेत. त्यामध्ये नागरी भागातील ३७ पाणीपुरवठा व ३१ मलनिस्सारण प्रकल्पांचा समावेश केला आहे. या अभियानात २०१८-१९ च्या अखेरपर्यंत किमान १० पाणीपुरवठा प्रकल्प पूर्ण करण्याचा शासनाचा मानस आहे. या प्रयोजनासाठी २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात रु. २ हजार ३१० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

### सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान

राज्यातील सर्व नगरपरिषदा, नगरपंचायती व 'ड' वर्ग महानगरपालिकांच्या क्षेत्रात नागरी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी 'महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान' राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत रु. ५ हजार ४२३ कोटी किंमतीचे ९८ प्रकल्प मंजूर असून त्यापैकी ११०० कोटीचे २७ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. यासाठी २०१८-१९ मध्ये रुपये ९०० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

### स्वच्छ भारत अभियान

देशातील सर्व शहरे पूर्णपणे स्वच्छ, निरोगी आणि राहण्यायोग्य करून सर्व नागरिकांना चांगले आरोग्य व स्वच्छ पर्यावरण देण्यासाठी केंद्र सरकारने स्वच्छ भारत अभियानाची देशात सुरुवात केली आहे. केंद्र शासनाच्या अभियानांतर्गत नागरी क्षेत्रात 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान' राज्यात प्रभावीपणे राबवण्यात येत असून त्यास नागरिकांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या अभियानाद्वारे नागरी भागात ६ लक्ष ३३ हजार ४२४ तर, ग्रामीण भागात २१ लक्ष ३ हजार ४८९ शौचालयांचे बांधकाम करण्यात आले आहेत. राज्यातील सर्व शहरे १ ऑक्टोबर, २०१७ रोजी हागणदारीमुक्त करण्यात आली आहे.

केंद्र शासनाच्या घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ मधील तरतुदी नुसार शहरांमध्ये घनकचरा व्यवस्थापन करण्याची कार्यवाही सुरू आहे. आतापर्यंत एकूण १५२ शहरांमध्ये १८५६ कोटी ३६ लाख किंमतीच्या घनव्यवस्थापन प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. २१० शहरांमध्ये ओला व सुका कचरा असे विलगीकरण सुरू करण्यात आले आहे. या प्रयोजनासाठी २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात रु. १ हजार ५२६ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

### हरित महासिटी कंपोस्ट

१३९ शहरांमध्ये ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खताची निर्मिती करण्यात येत आहे. कंपोस्ट खताची विक्री करण्यासाठी 'हरित महासिटी कंपोस्ट' ब्रॅन्ड नोंदणीकृत करण्यात आला आहे. या कंपोस्ट खत निर्मितीला चालना देण्यासाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर अनुदान देण्याचा शासनाचा मानस आहे. २०१८-१९ मध्ये रुपये ५ कोटी इतका नियतव्यय राखून ठेवण्यात येत आहे.

### मुख्यमंत्री ग्रामीण सांडपाणी प्रक्रिया व्यवस्थापन

ग्रामीण भागात सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन नसल्याने उद्भवणारे गंभीर आजार लक्षात घेता, सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील पाण्याचे दुर्भिक्ष तसेच पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त इतर प्रयोजनासाठी होणारा पाण्याचा वापर यासाठी सांडपाण्यावर
प्रक्रिया करून, त्याचा पुनर्वापर करणे आवश्यक आहे. सरकारने या संदर्भात गांभीर्याने विचार केला आहे. ज्या गांवाची लोकसंख्या १५ हजार किंवा त्यापेक्ष अधिक आहे, त्या गावांमध्ये ''मुख्यमंत्री ग्रामीण सांडपाणी प्रक्रिया व्यवस्थापन प्रकल्प'' ही नवीन योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या प्रयोजनासाठी २०१८-१९ मध्ये रुपये ३३५ कोटी इतका नियतव्यय उपलब्ध करून देण्यात येत आहे.

## कौशल्य विद्यापीठ

राज्यात युवक-युवतींना कौशल्य प्रदान करण्यासाठी पोषक वातावरणनिर्मिती करण्यासाठी (ecosystem) खासगी सहभागातून केंद्र शासनाच्या साहाय्याने सहा कौशल्य विद्यापीठांची स्थापना करण्यात येईल. त्यासाठी राज्य शासन आवश्यकतेनुसार आपल्या हिश्श्याचा निधी उपलब्ध करून देईल.

### परदेश रोजगार व कौशल्य विकास केंद्र

परदेशात रोजगारासाठी किंवा शिक्षणासाठी जाणाऱ्या राज्यातील युवक-युवतींना परदेशात उपलब्ध असलेल्या सर्व संधीची माहिती मिळवून देण्यासाठी, तसेच त्यांना त्यांच्या क्षमतेनुसार उच्च दर्जाच्या रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात आणि त्यांची फसवणूक होऊ नये यासाठी; त्यांना कौशल्ययुक्त करून परदेशात पाठवण्यासाठी, राज्य शासन आगामी वर्षात परदेश रोजगार व कौशल्य विकास केंद्र सुरू करणार आहे.






**मुंबई शहराला वाहतुकीच्या अत्याधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उपनगरीय रेल्वे सेवा अधिक सुदृढ व सक्षम करण्यात येत आहेत. मेट्रो रेल्वे प्रकल्पाला गती देण्यात आली आहे.**

### उपनगरीय रेल्वे सेवांमध्ये सुधारणा

मुंबई उपनगरीय सेवेमध्ये सुधारणा करण्याकरिता मुंबई नागरी परिवहन प्रकल्पा टप्पा-३ (एमयुटीपी-३) अंतर्गत रु.१० हजार ९४८ कोटी अंदाजित खर्चाचे प्रकल्प मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनमार्फत केंद्र व राज्य शासनाच्या ५०:५० टक्के आर्थिक सहभागाने हाती घेण्यात आले आहे. या प्रकल्पाकरिता २०१८-१९ करिता केंद्र शासनाने रु.५१९.५ कोटी तरतूद प्रस्तावित केली आहे. राज्य शासनाच्यावतीने या प्रकल्पांमध्ये ५० टक्के सहभागाची रक्कम ही एमएमआरडीए व सिडको यांनी सोसण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. एमयुटीपी ३-ए प्रकल्पांतर्गत मुंबई उपनगरीय सेवेमध्ये अधिक सुधारणा करण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनाने रु.५४ हजार ७७६ कोटी खर्चाचे विविध प्रकल्प प्रस्तावित केले असून केंद्र शासनाने याकरिता २०१८-१९ करिता रु.१ कोटी तरतूद प्रस्तावित केली आहे. एमयुटीपी-३ अ, प्रकल्पासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था / प्राधिकरणे यांच्या सहभागाने प्रकल्पात आर्थिक सहभाग व प्रकल्पास इतर साहाय्य देण्याबाबतचा प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

मुंबईमध्ये एमएमआरडीएच्या सहभागातून २६६ कि.मी. लांबीच्या मेट्रो मार्गाच्या आराखड्यास मंजुरी देण्यात आली आहे. यापैकी १६३ कि.मी. लांबीचे मेट्रो प्रकल्पाचे बांधकाम करण्यात येत आहे. या प्रकल्पांची अंदाजे किंमत रु.७६ हजार ४२१ कोटी आहे. याशिवाय एमएमआरडीएकडून १०३ कि.मी. लांबीचे मेट्रो प्रकल्प येत्या ३-४ वर्षात राबवण्यात येतील. अशा तऱ्हेने मुंबई महानगर प्रदेशात एमएमआरडीएमार्फत २६६ कि.मी. लांबीचे मेट्रो रेल्वे प्रकल्प येत्या ३-४ वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर ६७ लाख प्रवाशांना दररोज वातानुकूलित, सुरक्षित व आरामदायी प्रवासाचे फायदे मिळतील. तसेच प्रवासास लागणाऱ्या वेळेत बचत होऊन रस्त्यावरील दुर्घटना, ध्वनी व वातावरणातील प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे. याकरिता २०१८-१९ मध्ये रु.१३० कोटी इतकी रक्कम दुय्यम कर्जाच्या स्वरूपात प्रस्तावित आहे.

### राज्यातील मेट्रोचा विकास

नवी मुंबईमध्ये सिडकोच्या निधीमधून ११.१० कि.मी. लांबीच्या रु.३ हजार ४३ कोटी खर्चाच्या मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. नागपूर व पुणे या महानगरांमध्ये रु.२० हजार १०० कोटी अंदाजित खर्चाचे मेट्रो रेल्वे प्रकल्प हाती घेण्यात आले असून या प्रकल्पांद्वारे ६९ कि.मी. लांबीचे मेट्रो मार्ग बांधण्यात येणार आहेत. या प्रकल्पांसाठी रु.९० कोटी रक्कम दुय्यम कर्जाच्या स्वरूपात प्रस्तावित आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत रु.८ हजार ३१३ कोटी खर्चाचे २३.३० कि.मी. लांबीचे मेट्रो रेल्वेचे काम सार्वजनिक खासगी सहभाग तत्त्वावर हाती घेण्यात येत असून या प्रकल्पाकरिता केंद्र शासनाने रु.१३०० कोटी व्यवहार्यता तफावत निधी देण्यास सहमती दर्शवली आहे.

### स्मारके आणि सभागृह



- अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक प्रकल्पाची निविदा अंतिम करण्यात आली असून कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. ३०० कोटी रुपयांची तरतूद.
- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिल येथील स्मारकासाठी १५० कोटी रुपये.
- क्रांतिवीर लहूजी वस्ताद साळवे यांचे स्मारक.
- पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या स्मरणार्थ विविध ठिकाणी सामाजिक सभागृहे.

अर्थसंकल्प
२०१८-१९

**राज्याला गतीने प्रगतिपथावर नेण्यासाठी सुप्रशासनाची गरज असते. त्यासाठी सरकारने विविध योजना कार्यान्वित केल्या आहेत. त्याचबरोबर डिजिटल कार्याप्रणालीचा मोठ्या प्रमाणावर अंगीकार केला आहे. ही गतिमानता आणखी सुदृढ व सक्षम करण्यावर अर्थसंकल्पात भर देण्यात आला आहे.**

# सक्षम सुप्रशासन



## ई-गव्हर्नन्स प्रकल्प

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स प्रकल्पांतर्गत अनेक प्रकल्प राबवण्यात येत आहे. ग्रामीण भागातील जनतेला ई-शिक्षण, ई-आरोग्य व इतर माहिती तंत्रज्ञान आधारित सुविधेचा लाभ मिळण्यासाठी भारत नेट कार्यक्रमांतर्गत टप्पा १ अंतर्गत सुमारे १४ हजार ग्रामपंचायतींची जोडणी झाली आहे. टप्पा २ महानेट योजनेखाली सुमारे १३ हजार ग्रामपंचायती जोडण्यात येणार आहेत. यासाठी २०१८-१९ करिता रु.११४ कोटी ९९ लक्ष नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

### सेवेचे सुलभीकरण

शासकीय कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीपासून ते सेवानिवृत्तीपर्यंतच्या सर्व टप्प्यावरील सेवाविषयक बाबींचे संगणकीय प्रक्रियेद्वारे व्यवस्थापन करण्याच्या उद्देशाने सेवा सुलभीकरण ही व्यवस्थापन प्रणाली कार्यान्वित करण्याचा शासनाचा मानस आहे. या बाबीकरिता २०१८-१९ मध्ये रु.२३ कोटी एवढी तरतूद प्रस्तावित आहे.

### 'सुकर्मी' पुरस्कार योजना

अविरत व प्रामाणिकपणे शासकीय कामकाज करणारे अनेक गुणवंत अधिकारी व कर्मचारी विविध शासकीय संवर्गात कार्यरत असून त्यांच्या कामांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि भविष्यात उत्तम कामगिरी करण्यास प्रेरित करण्यासाठी 'सुकर्मी' पुरस्कार योजना ही नवीन योजना सुरू करण्यात येत आहे.

### सातवा वेतन आयोग

सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार केंद्र शासनाने २५ जुलै, २०१६ रोजीच्या आदेशान्वये केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेण्यांमध्ये १ जानेवारी, २०१६ पासून सुधारणा केली आहे. केंद्र शासनाच्या सुधारित वेतनश्रेण्यांच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणी तसेच निवृत्तिवेतनधारकांचे निवृत्तिवेतन १ जानेवारी, २०१६ पासून सुधारित करण्याची शासनाने यापूर्वीच घोषणा केली आहे. त्याअनुषंगाने बक्षी समिती गठित करण्यात आली असून, त्यांचा अहवाल सादर होताच राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात येईल. यासाठी अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद ठेवण्यात आली आहे.


### चाचणीपथाचे बांधकाम

राज्यातील सर्व परिवहन कार्यालयात वाहन चालकांची चाचणी घेण्यासाठी राज्यात संगणकीय वाहनचालक चाचणीपथ उभारण्यासाठी २०१८-१९ करिता रु.२० कोटी ९२ लक्ष नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

### लोकसंवाद केंद्र

शासकीय संदेश प्रभावीपणे प्रसारित करणे आणि शासकीय योजनांबाबत जनजागृती करणे ही काळाची गरज आहे. योजना चांगल्या असण्याबरोबरच त्या योजनांची माहिती प्रभावीपणे लाभार्थ्यांपर्यंत वेळेत आणि परिणामकारकरीत्या पोहोचणे आवश्यक

## डिजिटल इंडिया, भूमी अभिलेखाचे आधुनिकीकरण



राज्यातील एकूण सुमारे ९५ लाख ७५ हजार भूमापन नकाशे आणि सुमारे ४ कोटी ८० लाख पॉलीगॉन्सचे डिजिटायझेशन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्या अनुषंगाने प्रथम टप्प्यात राज्यातील ६ जिल्ह्यांतील भूमापन नकाशांच्या डिजिटायझेशनचे काम सुरू असून अंदाजे १ कोटी ३६ लाख पॉलीगॉन्सपैकी ५ लाख ९२ हजार पॉलीगॉन्सचे डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे. हे काम जून २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे संकल्पित आहे. तसेच 'ईज ऑफ डुईंग बिझनेस'च्या अनुषंगाने उर्वरित २८ जिल्ह्यांतील अंदाजे रु. १५१ कोटी खर्चाचे भूमापन नकाशांच्या डिजिटायझेशनचे कामही २०१८-१९ मध्ये हाती घेऊन ते पूर्ण करण्याचा शासनाचा संकल्प आहे. या प्रकल्पासाठी २०१८-१९ मध्ये रु.१२५ कोटी २८ लक्ष तरतूद प्रस्तावित आहे.

असते. याकरिता शासकीय योजनांची माहिती थेट जनतेला स्वत:हून करून घेता यावी. तसेच या संदर्भात त्यांचे प्रश्न सोडवले जावे याकरिता लोकसंवाद हा उपक्रम सुरू करण्याचे शासनाने ठरवले आहे. कोणत्याही नागरिकाला टोल-फ्री कमांकावर दूरध्वनी करून, शासनाशी संबंधित आवश्यक सर्व माहिती मिळण्याची सोय आम्ही करणार आहोत.

याशिवाय महाराष्ट्रातील शेतकरी बांधवांसाठी केवळ मिस्ड् कॉलवर शेतीसंबंधी माहिती, तज्ज्ञांचा सल्ला, बियाणे व खते, नवीन योजना व धोरणे याविषयीची माहिती मिळावी यासाठी 'महासमाधान' या अभिनव उपक्रमाची सुरुवात करण्यात येत आहे.

### स्थूल आर्थिक आढावा व राज्याचे उत्पन्न

प्रचलित किमतीनुसार २०१६-१७ मध्ये राज्याचे नाममात्र निव्वळ उत्पन्न १९ लक्ष ८६ हजार ८०६ कोटी रुपये असून ते मागील वर्षाच्या राज्य उत्पन्नापेक्षा १३.४ टक्क्याने जास्त आहे. महाराष्ट्राचे अंदाजित दरडोई उत्पन्न २०१६-१७ मध्ये १ लक्ष ६५ हजार ४९१ रुपये इतके आहे. अंदाजित दरडोई राष्ट्रीय उत्पन्न १ लक्ष ३ हजार ८७० रुपये इतके आहे.



### वार्षिक योजना २०१८-१९

वर्ष २०१८-१९ मध्ये नवीन पद्धतीनुसार जरी कार्यक्रम खर्चाची रक्कम ९५ हजार कोटी रुपये असली तरी २०१७-१८ च्या योजनांतर्गत ७७ हजार १८४ कोटी रुपयांच्या तुलनेत यावर्षी १७ हजार ८१६ कोटी रुपये इतकी वाढीव तरतूद करण्यात आली आहे. गतवर्षीच्या योजनांतर्गत तरतुदीच्या तुलनेत तरतुदीमध्ये सुमारे २३.०८ टक्के वाढ करण्यात आली आहे.

## राज्याची वित्तीय स्थिती

मार्च-२०१७ मध्ये अर्थसंकल्प सादर केला असताना २ लक्ष ४३ हजार ७३८ कोटी रुपये महसुली जमा अपेक्षित केली होती. वर्षभरातील महसूल संकलनाचा कल पाहता सुधारित अंदाज २ लक्ष ५७ हजार ६०५ कोटी रुपये एवढा निश्चित केला आहे. २०१८-१९ च्या अर्थसंकल्पामध्ये महसुली जमा २ लक्ष ८५ हजार ९६८ कोटी रुपये व महसुली खर्च ३ लक्ष १ हजार ३४३ कोटी रुपये अंदाजित केला आहे. परिणामी १५ हजार ३७५ कोटी रुपये महसुली तूट येत




आहे. अनावश्यक खर्चात बचत करून व महसूल वसुली अधिक प्रभावीपणे करून ही तूट मर्यादित करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.


एकच ध्यास ठेवू या,
प्लॅस्टिक पिशवी हटवू या,
समृद्ध पर्यावरणाचे रक्षण करु या!
मा. श्री. नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
मा. श्री. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
प्लास्टिक पिशवी
आणि
थर्माकोल मुक्त महाराष्ट्र
प्लास्टिक अधिसूचनेद्वारे बंदी करण्यात आलेले घटक :
सर्व प्रकारच्या प्लास्टिक पिशव्या.
थर्माकोल (पॉलिस्टायरिन) व प्लास्टिक पासून बनविण्यात येणाऱ्या व एकदाच वापरल्या जाणाऱ्या डिस्पोजबल वस्तु, उदा. ताट, कप्स, ग्लास, काटे, वाटी, चमचे, भांडे इत्यादी.
हॉटेल्समध्ये अन्नपदार्थ पॅकेजींगसाठी वापरले जाणारे भांडे व वाटी.
स्ट्रॉ, नॉन वोवन पॉलिप्रॉपीलीन बॅग्ज्.
द्रव पदार्थ साठविण्यासाठी वापरात येणारे प्लास्टिक पाऊच / कप.
अन्नपदार्थ, धान्य इत्यादी साठविण्यासाठी व पॅकेजींगसाठी वापरले जाणारे प्लास्टिक व प्लास्टिक वेष्टन .
प्लास्टिक व थर्माकोलचा वापर सजावटीसाठी बंदी असेल.
गुन्हा केल्यास दंड :
पहिला गुन्हा रु. ५००० दंड
दुसरा गुन्हा रु. १०००० दंड
तिसरा गुन्हा रु. २५००० दंड + ३ महिने
वरील सर्व उत्पादन, वापर, साठवणूक, वितरण, घाऊक व किरकोळ विक्री, आयात व वाहतुक करण्यास राज्यात संपूर्णतः बंदी
मा. श्री. रामदास कदम
मंत्री, पर्यावरण
मा. श्री. प्रवीण पोटे पाटील
राज्यमंत्री, पर्यावरण
पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन
http://mahenvis.nic.in
महाराष्ट्र
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
http://mpcb.gov.in
सदरहू अधिसूचना इंग्रजी व मराठीमध्ये २३ मार्च २०१८ पासून लागू करण्यात आली असून https://dgps.maharashtra.gov.in यावर उपलब्ध आहे

**मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकचा अनिर्बंध स्वरूपात वापर होत असल्यामुळे विविध समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यातून आरोग्याचे प्रश्न उद्‌भवले आहेत. पर्यावरण प्रदूषित करण्यात प्लास्टिकचा मोठा हातभार लागत आहे. या बाबी लक्षात घेऊन यंदाच्या गुढीपाडव्यापासून महाराष्ट्र शासनाने राज्यात संपूर्ण प्लास्टिक बंदी करण्याचा निर्णय घेतला आहे.**

# चला, प्लास्टिकबंदी यशस्वी करू या..!



**रामदास कदम**
पर्यावरण मंत्री

**रामदास कदम**

प्लास्टिकच्या कचऱ्यामुळे मुंबईत पाणी साचले, राज्यातील अनेक शहरात प्लास्टिकच्या वस्तूंमुळे गटारे तुंबून पूरसदृश स्थिती झाली. कोकण किनारपट्टीवर खच साचल्याने समुद्री जीवांना धोका, अनेक ठिकाणी मासे मृत अवस्थेत आढळले. गाईच्या पोटातून काढल्या कॅरिबॅग आणि प्लास्टिकच्या वस्तू, डम्पिंग ग्राऊंडमध्ये प्लास्टिकच्या कचऱ्याला आग, धुरामुळे नागरिकांना श्वसनाचा त्रास, सर्वदूर दुर्गंधी, नदीच्या पुरात वाहून आला प्लास्टिकचा कचरा आणि बाटल्या, पर्यटन स्थळांना प्लास्टिकचा विळखा, नागरिकांना श्वसनाचा त्रास, प्लास्टिकच्या कचऱ्यामुळे नदी झाली प्रदूषित, कारखान्यातील धुरामुळे नागरिकांना श्वसनाचे आजार, कारखान्याचे रसायनमिश्रित सांडपाणी नदी-नाल्यात सोडल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका. अशा बातम्या आपण वाचतो आणि सुन्न होतो. प्लास्टिकच्या अनिर्बंध वापरामुळे या समस्या निर्माण झाल्या आहेत. म्हणूनच महाराष्ट्र शासनाने गुढीपाडव्यापासून संपूर्ण प्लास्टिक बंदी लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र प्लास्टिक पिशव्यांचे (कॅरिबॅग उत्पादन व वापर) नियम, २००६ द्वारे ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यावर बंदी आणूनदेखील या कचऱ्यांच्या वाढत्या प्रमाणामुळे पर्यावरणावर व आरोग्यावर होणारे नुकसान वाढतच आहे. ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ चा कलम ४ ची पोटकलमे (१) व (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून शासनाने प्लास्टिक व थर्माकोल इत्यादीपासून बनवलेल्या अविघटनशील वस्तूंचे उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक याकरिता अधिक कडक नियम केले आहेत.

## बंदी घातलेल्या वस्तू

प्लास्टिकपासून बनवल्या जाणाऱ्या पिशव्या तसेच थर्माकोल व प्लास्टिकपासून बनवण्यात येणाऱ्या, एकदाच वापरल्या जाणाऱ्या डिस्पोजेबल वस्तू उदा. ताट, कप, प्लेट, ग्लास, काटे, वाटी, चमचे, स्ट्रॉ, कटलरी, स्प्रेडशीट, पॅकेजिग, सर्व प्रकारचे प्लास्टिक वेष्टन ०.५ लिटरची पाणी बॉटल असा उत्पादनांचा वापर, साठवणूक, वितरण, घाऊक व किरकोळ विक्री, आयात, व वाहतूक करण्यास राज्यात संपूर्णतः बंदी घालण्यात आली आहे.

## वगळण्यात आलेल्या वस्तू

औषधांच्या वेष्टनासाठी वापरण्यात येणारे प्लास्टिक, वन व फलोत्पादनासाठी, कृषी व घनकचरा हाताळण्यासाठी वापरण्यात येणारी प्लास्टिक पिशवी, विशेष आर्थिक क्षेत्र निर्यातीसाठी विविक्षित उद्योग इत्यादी मध्ये फक्त निर्यातीसाठी प्लास्टिक व प्लास्टिक



**प्लास्टिक क्रशर मशिन उद्‌घाटनाप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री सुभाष देसाई, पर्यावरण मंत्री रामदास कदम, युवानेते आदित्य ठाकरे.**

पिशवीची उत्पादने, प्लास्टिक आवरण वा पिशवी, दुधाच्या पॅकेजिंग साठी ५० मायक्रॉनपेक्षा जाड पिशवी यांचा समावेश आहे. परंतु पुनर्खरेदी पद्धती विकसित करण्यासाठी अशा पिशव्यांवर रिसायकलिंगसाठी पूर्वनिर्धारित किंमत जी रु.५० पैशापेक्षा कमी नसेल ती ठळकपणे छापलेली असावी. रिसायकलिंगसाठी अशा पिशव्यांची संकलन व्यवस्था विकसित करण्यासाठी दुधडेअरी, वितरक व विक्रेते यांनी अशा रिसायकलिंगसाठी निर्धारित छापील किंमतीनुसार अशा पिशव्या पुनर्खरेदी करणे बंधनकारक राहील.

पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या विकत घेताना १ रु. जादा द्यावा लागेल. ज्या वेळी दुसऱ्यांदा रिकामी बाटली परत केली जाईल तेव्हा १ रु. परत ग्राहकाला मिळेल. वापर, खरेदी, विक्री व साठवणूक करायची असेल तर उत्पादक, विक्रेते, आणि वितरक यांनी पुनर्खरेदी व्यवस्था निर्माण करणे बंधनकारक आहे.

बॉटल उत्पादित करणारे उद्योग/आस्थापनांना पूर्णतः प्रतिबंधित करण्याऐवजी वस्तू व सेवा कर संचालनालयांकडून उत्पादन स्तरावर प्रत्येक आकारमानानुसार पुनर्वापर, रिसायकलिंग शुल्क आकारण्यात येणार आहे. त्यासाठी जीएसटी संचालनालयाला प्राधिकृत करण्यात आले आहेत. किरकोळ विक्री स्तरावर मनपा, नगरपालिका, नगरपरिषद, व ग्रामपंचायत येथील कर्मचारी पुनर्वापर अथवा रिसायकलिंग शुल्काची वसुली करणार आहेत.



जगभर प्लास्टिकच्या कचऱ्याचा प्रश्न भेडसावत आहे. मानवी आरोग्य, वन्यजीवाचे आरोग्य, सागरी जीवांचे आरोग्य या प्लास्टिकच्या वस्तूंमुळे धोक्यात आले आहे. एकूणच पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे. म्हणूनच सरकारने राज्यात संपूर्ण प्लास्टिक बंदीचा निर्णय घेतला आहे. नागरिकांनी स्वतःहून प्लास्टिकच्या कॅरिबॅग, अन्य वस्तू नाकारल्या पाहिजेत तरच ही मोहीम यशस्वी होईल.

**– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

वस्तू व सेवा कर संचालनालयाकडे या पुनर्वापर शुल्काद्वारे जमा झालेल्या रकमेतून प्लास्टिकचा पुनर्वापर करणाऱ्या उद्योगांना त्यांनी केलेल्या एकूण प्लास्टिक पुनर्वापराच्या संख्येनुसार परतावा देण्याची तरतूद असेल. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व उद्योग संचालनालयाने नोंदणी केलेल्या अशा अधिकृत उद्योगांची यादी, वस्तू व सेवा कर संचालनालयास उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

संपूर्ण प्लास्टिक बंदीच्या अंमलबजावणीसाठी पर्यावण मंत्री म्हणून माझ्या अध्यक्षतेखाली शक्तिप्रदत्त समिती गठित करण्यास मान्यता देण्यात आली असून, ही समिती या नियमांमध्ये भविष्यात आवश्यक त्या सुधारणा करणे वा अंमलबजावणीबाबत आढावा घेऊन वेळोवेळी निर्णय घेणार आहे. अद्ययावत तंत्रज्ञानाच्या आधारे अविघटनशील कचऱ्याच्या विल्हेवाटीबाबत शासनास तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी तज्ज्ञ समिती गठित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

### कोण कारवाई करणार

या सूचनेच्या अंमलबजावणीसाठी व नियमांतर्गत कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा,२००६ अनव्ये तरतुदीनुसार महापालिका आयुक्त, शॉप्स ॲण्ड इस्टॅब्लिशमेंट अधिकारी व निरिक्षक, स्वच्छता निरीक्षक, आरोग्य निरीक्षक, आरोग्य अधिकारी, प्रभाग अधिकारी किंवा आयुक्त यांनी नामनिर्देशित केलेला अधिकारी तसेच सर्व नगरपालिकांचे मुख्याधिकारी व त्यांनी नामनिर्देशित केलेले अधिकारी, जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी, तहसीलदार, तलाठी व जिल्हाधिकारी यांनी नामनिर्देशित केलेले इतर अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गट विकास अधिकारी, आरोग्य अधिकारी, विस्तार अधिकारी, जिल्हा शिक्षण अधिकारी, गट सदस्य सचिव, प्रादेशिक अधिकारी, उप प्रादेशिक अधिकारी व क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र क्षेत्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, शास्त्रज्ञ श्रेणी–१ व संचालक पर्यावरण, संचालक आरोग्य सेवा, उप संचालक, आरोग्य अधिकारी, संचालक प्राथमिक व उच्च शिक्षण, सर्व टुरिझम पोलीस, पोलीस निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक, मोटार वाहन निरीक्षक, वाहतूक पोलीस, उपायुक्त पुरवठा, जिल्हा पुरवठा अधिकारी, सर्व विक्रीकर अधिकारी, विक्रीकर निरीक्षक, रेंज फॉरेस्ट ऑफिसर, जिल्हा वन अधिकारी, यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

### शिक्षेची तरतूद

प्लास्टिक वस्तूचा वापर, उत्पादन, साठवणूक, वितरण, घाऊक वा किरकोळ विक्री तसेच आयात व वाहतुकीस राज्यात बंदी घालण्यात आली आहे. या नियमांचे उल्लंघन केल्यास पहिल्यांदा गुन्हा केल्यास ५ हजार रुपये दंड, दुसऱ्यांदा गुन्हा केल्यास १० हजार रुपये दंड व तिसऱ्यांदा गुन्हा केल्यास २५ हजार रुपये दंड व ३ महिन्याचा कारावास अशी तरतूद करण्यात आली आहे. प्लास्टिक बंदीचे महाराष्ट्रातील सर्वस्तरातून स्वागत होत असून महाराष्ट्र सज्ज झाला आहे.

### जनतेला आवाहन

पावसाळ्यात मुंबईसह अनेक शहरात प्लास्टिकच्या कॅरिबॅग, पाणी बॉटल व अन्य वस्तूंमुळे नदी, नाले, गटारी तुंबतात. त्यामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण होते. समुद्रात प्लास्टिकच्या वस्तूंचा खच साचतो त्यामुळे मासे मरतात. पाळीव प्राणांच्या पोटात कॅरिबॅग गेल्यामुळे त्याच्या जीव जातो. प्लास्टिक हे अनेक वर्षे नष्ट होत नसल्याने पर्यावरणाबरोबरच मानवी आरोग्यावर परिणाम होत आहे. प्लास्टिक बंदी ही देश आणि समाजाच्या हिताची आहे. जनतेने या लोकचळवळीत सहभागी होणे गरजेचे आहे.

**शब्दांकन : डॉ. संभाजी खराट**
विभागीय संपर्क अधिकारी




**मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात राज्यस्तरीय 'सोशल मीडिया महामित्र' सोहळ्याला संबोधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. व्यासपीठावर माहिती व तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव एस. श्रीनिवासन, माहिती व जनसंपर्क सचिव ब्रिजेश सिंह, लोकमतचे समूह संपादक दिनकर रायकर, महाराष्ट्र टाइम्सचे संपादक अशोक पानवलकर, लोकमत न्यूज १८ चे संपादक डॉ. उदय निरगुडकर, उद्योगपती दीपक घैसास, मिलिंद कांबळे, हिवरे बाजारचे सरपंच पोपटराव पवार, अभिनेते मकरंद अनासपुरे, अभिनेत्री प्रतिक्षा लोणकर, स्पृहा जोशी, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप लोखंडे, अनुलोमचे अतुल वझे.**

# 'महामित्र' बनवतील सक्षम, सकारात्मक महाराष्ट्र

आधुनिक युगातील वेगवान संपर्क साधनांचा विधायक उपयोग करून घेण्यासाठी आणि तरुणांना अधिकाधिक वाव देऊन, समाज अधिक विवेकी व्हावा यासाठी महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या 'सोशल मीडिया महामित्र' उपक्रमात ८५ हजार व्यक्तींनी सहभाग नोंदवला. यामधून विविध निकषांच्या आधारे निवडण्यात आलेल्या सुमारे ३०० महामित्रांचा सन्मान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते २४ मार्च २०१८ रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सभागृहात राज्यस्तरीय सोहळ्यात करण्यात आला.

हल्ली सोशल मीडियाच्या माध्यमातून माहितीचा स्फोट होतो. मात्र त्यात ज्ञानाचा अभाव असल्याने त्यातून वेगवेगळ्या समस्या निर्माण होतात. सोशल मीडियाचे वाढते महत्त्व लक्षात घेता या माहितीच्या स्फोटातून निर्माण होणारी नकारात्मकता मिटवण्यासाठी, सोशल मीडियाच्याच माध्यमातून सकारात्मक संदेश पसरवण्याचे काम महामित्रच्या माध्यमातून झाले पाहिजे. राज्य शासन अनेक लोकोपयोगी योजना तयार करते. मात्र लोकसहभागाशिवाय त्याची यशस्वी अंमलबजावणी शक्य नाही. त्यामुळे महामित्रने अशा लोकोपयोगी योजनांचा प्रसार करणे आवश्यक आहे,' असे मुख्यमंत्री म्हणाले. या वेळी मुख्यमंत्र्यांनी महामित्रांना सांगितले की, 'माहितीच्या स्फोटाच्या युगात सकारात्मक ज्ञानाचा अभाव राहू नये यासाठी 'सोशल मीडिया महामित्र' यांनी समाज विघातक कृत्यांविरोधात ढाल बनवून काम करावे. त्या माध्यमातून सकारात्मक, सक्षम महाराष्ट्र घडवणे शक्य होईल.'

देशातील बहुतांश तरुण फेसबुक, व्हॉट्सप, ट्विटर, इन्स्टाग्राम




आदी सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणात उपयोग करीत असतात. ज्ञान आणि मनोरंजनाच्या साधनाबरोबरच लोकांची मने आणि मते घडवण्याची ताकद सोशल मीडियामध्ये असल्याचे अनेकदा सिद्ध झाले आहे. ही बाब समोर ठेवून सोशल मीडियाचा सदुपयोग समाजात अधिक विवेकवादी आणि सकारात्मक दृष्टिकोन तयार व्हावा म्हणून झटणाऱ्या तरुणांना; प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने 'सोशल मीडिया महामित्र' हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमास लाभलेल्या उदंड प्रतिसादानंतर 'पब्रेन' या संकेतस्थळाने 'महामित्र' ॲपला देशात प्रथम क्रमांकाचे 'सोशल' ॲपचे रॅंकिंग जाहीर केले. या उपक्रमासाठी १ फेब्रुवारीपासून नोंदणी सुरू झाली. 'गुगल प्ले स्टोअर' वरून महामित्र (Maha Mitra) हे ॲप्लिकेशन डाऊनलोड




**राज्यस्तरीय सोशल मीडिया महामित्रांसोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदी मान्यवर.**

करून १५ वर्षावरील कोणीही महाराष्ट्रातील रहिवासी विनाशुल्क सहभागी होण्याची मुभा होती. प्राथमिक स्तरावर प्रत्येक तालुक्यातून (क्षेत्रातून) प्रत्येकी १० 'सोशल मीडिया महामित्रां'ची निवड करण्यात आली. त्यांना जिल्हास्तरावर विशेष कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले. या महामित्रांची जिल्हाधिकारी, जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक तथा समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती यांच्यासमवेत समाज माध्यमाच्या सदुपयोगाबाबत गटचर्चा आयोजित करण्यात आली. या गटचर्चेअंती तालुक्यातील (क्षेत्रातील) प्रत्येकी एक महामित्राची राज्यस्तरावर होणाऱ्या कार्यक्रमासाठी निवड करण्यात आली.

विविध मॅसेजिंग ॲपच्या सर्वाधिक टॉप पाच ग्रुपमधील कॉन्टॅक्ट्सची संख्या, फोनबुकमधील एकूण कॉन्टॅक्ट्सची संख्या, किती सोशल मीडिया प्लॅटफॉर्म/मॅसेजिंग ॲप्लिकेशन उपयोगात आणण्यात येत आहेत, सहभागी व्यक्तीला त्याच्या स्नेहीजनांनी दिलेली मते, सोशल मीडियातील प्रभाव आजमावण्यासाठी सहभागी व्यक्तीला पाठविलेल्या संदेशापैकी किती संदेश त्यांनी वितरित केले आहेत; आलेल्या संदेशाचे पाठवलेल्या संदेशाशी गुणोत्तर या आधारे महामित्र निवडण्यात आले. या निकषांना मिळणाऱ्या गुणांकनाधारे आपले स्थान (रॅंक) काय आहे हे त्या सहभागी व्यक्तीला दिसण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. अशी सोय या ॲप्लिकेशनमध्ये होती. निकषात असलेल्या ७५ गुणांच्या आधारे प्रत्येक तालुक्यातील (क्षेत्रातील) टॉप १० सहभागी व्यक्तींची प्राथमिक फेरीत निवड करण्यात आली. या गटचर्चेतील सहभागानंतर १५ पैकी गुण देण्यात आले. या सर्व १०० गुणांच्या आधारे एकाची राज्यस्तरावरील कार्यक्रमासाठी निवड करण्यात आली आहे. सकारात्मक व सौहार्दपूर्ण महाराष्ट्र बनवण्यात आपला हातभार लावण्यासाठी 'सोशल मीडिया-महामित्र' उपक्रमात विशेषत: तरुणांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. ■■

## जिओ चॅनेल

या कार्यक्रमात माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे येथील माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या 'महाराष्ट्र शासन (Govt of Maharashtra)' या जिओ चॅट चॅनलचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या वेळी लोकार्पण करण्यात आले. या मोबाइल ॲपच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाविषयी सर्व माहिती एका क्लिकवर उपलब्ध असून त्यामध्ये राज्यपाल, मुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री, सचिव, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलिसांचे संपर्क क्रमांक, मंत्रिमंडळ व शासन निर्णय यांची माहिती तसेच लोकराज्याचे अंक, प्रश्न मंजुषा, अहवामान अंदाज, सेवा हक्क कायदा, तक्रार निवारण, महायोजना, महालाभार्थी, मी मुख्यमंत्री बोलतोय याबाबत माहिती उपलब्ध आहे. ॲन्ड्रॉईड आणि आयओएस मोबाइलवर हे ॲप डाऊनलोड करण्याची सुविधा असून जिओ चॅटवर महाराष्ट्र शासन नावाने चॅनल उपलब्ध आहे.

# येथे कर माझे जुळती...

स्मरण

**एप्रिल महिन्यात महात्मा जोतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,महात्मा बसवेश्वर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती शासकीय/ निमशासकीय स्तरावर साजरी करण्यात येते. त्यांच्या कार्याविषयी थोडक्यात...**

## महात्मा जोतिबा फुले




जोतिबा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे झाला. गोविंदराव आणि चिमणाबाई या दांपत्याचे जोतिबा हे दुसरे अपत्य. मूळचे गोऱ्हे हे उपनाव बदलून फुलांच्या धंद्यामुळे फुले हे नाव पडले. त्यांचा विवाह सातारा जिल्ह्यातील नायगाव येथील खंडोजी नेवसे–पाटील यांची कन्या सावित्री हिच्याशी झाला. त्यांनी मुलींसाठी पुणे येथे १८४८ मध्ये शाळा स्थापन केली. सावित्रीबाई यांनी याच शाळेत अध्यापनाचे कार्य सुरू केले. सत्यशोधक समाजाची स्थापना १८७३ मध्ये फुले यांनी केली. त्यांनी यशवंत नावाचा मुलगा दत्तक घेतला. त्यांचा मृत्यू २८ नोव्हेंबर १८९० रोजी झाला.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी महू (मध्य प्रदेश) येथे झाला. त्यांचे वडील रामजी हे लष्कराच्या सेवेत होते, त्यांच्या आईचे नाव भीमाबाई. 'प्राचीन भारतातील व्यापार' या विषयात एम.ए ही पदवी त्यांनी प्राप्त केली. 'भारताच्या राष्ट्रीय नफ्याचा वाटा : एक ऐतिहासिक पृथक्करणात्मक परिशीलन' या प्रबंधाबद्दल कोलंबिया विद्यापीठाने त्यांना पीएच.डी पदवी बहाल केली. 'रुपयाचा प्रश्न' या विषयावर लंडन विद्यापीठाने डी.एस्सी. ही अर्थशास्त्रातील पदवी त्यांना प्रदान केली. डॉ.आंबेडकर १९२३ मध्ये बॅरिस्टरची परीक्षा पास झाले. १९२० ते २३ या काळात 'मूकनायक' या पाक्षिकाच्या माध्यमातून अस्पृश्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यांनी २० जुलै १९२४ रोजी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' स्थापन केली. महाड येथे २५ व २६ डिसेंबर १९२७ रोजी सत्यागृह परिषदेचे आयोजन केले. डॉ. आंबेडकर यांनी 'डिप्रेस्ड क्लासेस एज्युकेशन सोसायटीची' स्थापना केली. १९४५ मध्ये मुंबई येथे 'पीपल्स एज्युकेशन सोसायटीची' स्थापना केली. या संस्थेमार्फत मुंबई येथे 'सिद्धार्थ' तर औरंगाबाद येथे 'मिलिंद कॉलेज' सुरू केले. डॉ. आंबेडकर बंगाल विधिमंडळातून घटना समितीवर निवडून आले. मसुदा समितीचे अध्यक्षपद त्यांना दिले गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी लाखो अनुयायांसह नागपूर येथे बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. भारत सरकारकडून त्यांना १९९० साली 'भारतरत्न' या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरवण्यात आले.

## महात्मा बसवेश्वर



वीरशैव धर्माचे पुनरुज्जीवन करणारी एक महान विभूती. कर्नाटक ही त्यांची कर्मभूमी. धर्म, समाज, तत्त्वज्ञान, वाङ्मय, राजकारण इ. क्षेत्रांत त्यांनी केलेले कार्य क्रांतिकारक स्वरूपाचे आहे. त्यांचा जन्म वैशाखातील अक्षय तृतीयेला झाल्याचे मानले जाते. दरवर्षी त्याच दिवशी बसवजयंती साजरी केली जाते. त्यांच्या आईचे नाव मादलांबिके व वडिलांचे मादिराज. पारंपरिक भारतीय समाजातील वर्णजातिमूलक उच्चनीचता व विषमता यांची प्रखर जाणीव बसवेश्वरांना झाली होती. म्हणूनच त्यांनी चातुर्वर्ण्याला आव्हान देऊन सर्व मानवांना समान मानले. परिणामतः त्यांच्याभोवती सर्व वर्णांतील व जातींतील अनुयायी जमा झाले. आंतरजातीय रोटीव्यवहार व बेटीव्यवहार करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले. त्यांनी बालविवाहाला विरोध केला. तसेच विधवांच्या पुनर्विवाहाला मान्यता दिली. सर्व मानव समान आहेत, याचा अर्थ स्त्री व पुरूष हेही समान आहेत, असे त्यांचे मत होते. आपले विचार सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचावेत म्हणून त्यांनी संस्कृतऐवजी कन्नड भाषेतून उपदेश केला.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज



१९०९ मध्ये यावली गावात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जन्म झाला. त्यांचे नाव माणिक असे होते. त्यांच्या वडिलांचे नाव बंडोजी इंगळे ठाकूर व त्याच्या आईचे नाव मंजुळा. त्यांच्या आईने त्यांना आपल्या आजोळी वरखेडला नेले. तिने त्यांना आडकोजी महाराजांच्या सान्निध्यात ठेवले. महाराजांनी त्यांना 'तुकड्या' हे नाव दिले. १९३० सालच्या जंगल सत्याग्रहात त्यांनी सत्याग्रही तरुणांच्या शिबिरांमध्ये जाऊन खंजिरी भजनांद्वारे त्यांच्या मनात स्वराज्य मिळवण्याची प्रेरणा जागवली. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात सर्वांना प्रवेश मिळावा म्हणून सानेगुरुजींनी उपोषण केले. यावेळी त्यांनी अनेक लोकांच्या सह्या मिळवून त्या उपोषणाला समर्थन मिळवून दिले. आचार्य विनोबा भावे यांनी भूदान चळवळ सुरू केली. महाराजांनी त्या चळवळीत भाग घेतला आणि भूदानासाठी जमीन मिळवून दिली. त्यांचे हे कार्य पाहून त्यांना 'राष्ट्रसंत' या पदवीने त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांनी हिंदी व मराठीत अनेक गद्य–पद्य पुस्तके लिहून प्रकाशित केली. ग्रामगीता हा त्या सर्व पुस्तकांचा मुकुटमणी होय.

**(संदर्भ– महाराष्ट्राचा इतिहास इयत्ता ११ वी आणि इयत्ता ५वी, मराठी विश्वकोश)**

**संकलन– गजानन पाटील**

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सर्वांगीण विकासाच्या पाऊलखुणा...

- परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये ज्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर व पीएच.डी अभ्यासक्रमाकरिता प्रवेश मिळाला आहे, अशा ५० विद्यार्थ्यांना परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती.
- राज्यातील अनुसूचित जातीच्या (नवबौद्धांसहित) १०० विद्यार्थ्यांना देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती
- विभागीय तसेच जिल्हास्तरावर वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना.
- नोकरी करणाऱ्या मागासवर्गीय महिलांसाठी मुंबई, नागपूर, आणि पुणे येथे वसतिगृह.
- औद्योगिक वसाहतीमध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द उद्योजकांसाठी राखीव भूखंड.
- जात पडताळणी प्रकरणांचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी जिल्हानिहाय जात पडताळणी समिती.
- बेरोजगार तरुणांसाठी कौशल्यविकासाचे प्रशिक्षण.
- अनुसूचित जाती प्रवर्गातील यूपीएससीच्या परीक्षार्थींसाठी औरंगाबाद, पुणे, नागपूर येथे मोफत निवासी प्रशिक्षण केंद्र.
- अपंग शाळेचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी जिल्हास्तरीय नियंत्रण समिती.








**सामाजिक न्यायाचे सरकार**
**युवकांच्या स्वप्नांना योजनांचे बळ**

जिल्हाधिकारी, मुंबई शहर, ओल्ड कस्टम हाऊस,
शहिद भगतसिंग मार्ग,फोर्ट, संपर्क : सहायकआयुक्त, समाजकल्याण, मुंबई शहर

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा.लि. प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई – ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह